# श्री स्वामी दत्तावधूत

## या सिद्धयोग्याच्या सहवासात

(भाग १)

♦ संग्रहक ♦

ॐ वनिता ॐ

ॐ वनिता बुक्स

मुंबई – ४०००१२

☯ **ॐ वनिता बुक्स**

☯ **पुष्प : अठरावे**

प्रथमावृत्ती : १४ मे २०१४ (बुद्ध पौर्णिमा)

द्वितीयावृत्ती : २०१७

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

☯ **मूल्य :** रु. २२० /-

☯ **प्रकाशक**

ॐ वनिता बुक्स

बी २१३,

सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),

डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई ४०० ०१२.

दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.

# अनुक्रमणिका


- ॐ वनिता ॐ ........ ८
- परिवर्तन ........ १२
- लोकोद्धार कार्य ........ ४५
- दया-करुणा ........ ५५
- प्रारब्धात हस्तक्षेप ........ ६५
- सूर्यनारायण शर्मा ........ ८०
- कल्पना-सुरेंद्र ........ ८२
- सर्व सत्पुरुष एकच असतात ........ ९५
- पूर्वजांचा उद्धार ........ ९८
- आत्मज्ञान ........ ९९
- सत्यान्वेषी ........ १०४
- आध्यात्म ज्ञान ........ १०९
- ईश्वर साक्षात्काराचा मार्ग ........ ११५
- सुनिता ........ ११७
- श्लोक ........ १४१
- दत्त पाठीराखा ........ १४४
- किशोर गुराम ........ १४८
- मृणाल ........ १५१
- स्मिता व सुजाता ........ १५७
- स्मिता ........ १५८
- सुजाता ........ १७०

- मानसी ........................................ १७४
- विहंगम मार्ग ........................................ १८५
- मेघल ........................................ १९९
- निखिल ........................................ २०८
- अल्पा ........................................ २१७
- पार्थ ........................................ २२०
- सुजाता माळवे ........................................ २२४
- निता ........................................ २३०
- दिपा पवार ........................................ २३३
- दिपा शेंबेकर ........................................ २३६
- शिल्पा ........................................ २४०
- मनोज-अस्मिता ........................................ २४५
- मनोज ........................................ २४५
- अस्मिता ........................................ २६०
- दुर्बिण ........................................ २७१
- १२ मार्च २०१३ ........................................ २७६
- डॉ. मीनाक्षी अमृतकर ........................................ २८०
- अविस्मरणीय हिमालय यात्रा ........................................ २९०
- नेहा पडाळे ........................................ ३०३

# ॐ वनिता ॐ

## परिचय

*सौ. वनिता दीक्षित उर्फ **ॐ वनिता ॐ** या श्रीस्वामी दत्तगिरी उर्फ श्रीस्वामी दत्तावधूत यांच्या सहवासात गेली तीस वर्षांपेक्षा जास्त काळ रहात आहेत. त्यांनी श्रीस्वामी दत्तगिरींची हिमालय पर्वतासारखी सेवा केली असून सेवेने व साधनेने त्यांनी षोडषीत्रिपुरसुंदरी, महालक्ष्मी, दुर्गा, परमेश्वरी, जगदंबा अशा सर्व अवस्था पार केल्या आहेत. श्रीस्वामीजींनी आपले सर्व अधिकार, शक्ती, सामर्थ्य त्यांना दिलेले असून त्यांना ईश्वराशी एकरूप केलेले आहे. त्यांच्या सेवेविषयी काय सांगणार? **"सेवा कशी करावी, तर सौ. ताई सारखी! भाव कसा ठेवावा तर सौ. ताईंसारखा! श्रद्धा कशी ठेवावी तर सौ. ताईंसारखी! ईश्वरीकार्य कसे करावे तर सौ. ताईंसारखे! मुक्त हस्ते दान कसे करावे तर सौ. ताईंसारखे! लोकोद्धार कार्य कसे करावे तर सौ. ताईंसारखे! व सर्व काही करून सुद्धा अलिप्त कसे रहावे, मनाला स्पर्श होऊ न देता कसे रहावे तर ते सौ. ताईंसारखे!"** असे श्रीस्वामीजी स्वतः म्हणत. "सौ. ताईंचा शरणागत भाव इतका उच्च कोटीचा आहे की विना अपराध फक्त परीक्षा म्हणून जेव्हा श्रीस्वामीजी त्यांना काहीही कारण नसताना ओरडतात तेव्हा त्यांच्या मनाला त्याचा काहीही स्पर्श होत नाही व त्यांच्यावर स्तुती सुमने उधळतात तेव्हाही त्यांच्या मनाला काहीही स्पर्श होत नाही. निर्गुण निराकार कसे रहावे व मनाने अलिप्त कसे रहावे*

हे सौ. ताईंच्या सहवासात राहून शिका,'' असे श्रीस्वामीजी आपल्या भक्तांना सांगत.

सुमारे तीस-पस्तीस वर्षांपूर्वी श्रीस्वामीजी चार बाय सहाच्या छोट्याशा झोपडीत रहात होते. आज तुम्ही आश्रमाचे भव्य दिव्य रूप पहात आहात हे सर्व सौ. ताईंनी स्वतः निर्माण केले आहे.

सात मंदिरे, आश्रम, लोकांची राहण्याची सोय व हिल कॉलनी येथील सर्व बांधकाम सौ. ताईंनी फक्त सेवा म्हणून केले. तसेच गेली तीस वर्षे आश्रमाच्या खर्चाचा ९८% भाग त्या एकट्याने सांभाळत आहेत. याशिवाय श्रीस्वामीजींना विविध वस्तू लोकांना वाटण्याची आवड असल्याकारणाने दरवर्षी सुमारे ५००-६०० साड्या, ७००-८०० ड्रेस मटेरियल व ७००-८०० पॅन्ट शर्टची कापडे आश्रमात पाठवत असतात. याशिवाय आश्रमात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला चहा, नाश्ता, जेवण देऊन तृप्त करून मग ईश्वरभक्तीविषयी बोलायचे असा श्रीस्वामीजींचा स्वभाव असल्याकारणाने आश्रमाची कोठी सतत भरलेली राहील याची दक्षता सौ. ताई घेतात. आश्रमात येणाऱ्या लहान मुलांना विविध प्रकारची खेळणी व कपडे वाटले जातात. या सर्वांची व्यवस्था सौ. ताई करतात. इतके करूनही सौ. ताई थांबल्या नाहीत. ६०-६५ गरीब मुला-मुलींची लग्ने त्यांनी स्वतःच्या खर्चाने लावून दिली. अनेक गरीब मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. अनेक गरीब मुलांना पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यंत शिक्षण दिले. काही आदिवासी शाळा आजही चालवित आहेत. या शाळांना टी.व्ही, सीडी प्लेअर, शैक्षणिक सीडीज्, मुलांचे युनिफॉर्म, मुलांना लागणारी स्टेशनरी इत्यादी सर्व गोष्टींचा पुरवठा त्या आजही करतात व हे सर्व करत असताना प्रसिद्धीपासून खूप दूर राहतात व कोणाचीही मदत घेत नाहीत.

श्रीस्वामीजी अरण्यात तपस्या करत होते. तपस्येद्वारा ज्ञान व शक्ती प्राप्त करत होते. आपले ज्ञान ते कागदावर उतरवित होते, पुस्तके लिहित होते, पोथ्या लिहून त्यामध्ये तपःश्चर्येद्वारा प्राप्त केलेली शक्ती ठेवत होते. जर सौ. ताई नसत्या तर हे सर्व ज्ञान व शक्ती अरण्यात पडून राहिले असते. श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके जगासमोर यावीत म्हणून सौ. ताईंनी स्वतः प्रकाशन संस्था काढली. **वनिता बुक्स** असे नांव प्रकाशन संस्थेला स्वतः श्रीस्वामीजींनी दिले. या प्रकाशन संस्थेमुळे कोट्यावधी लोकांचे आज कल्याण झाले आहे. कोट्यावधी लोक ज्ञानी झाले आहेत. मानवी जीवनाचा अर्थ मानवांना सौ. ताईंनी प्रकाशित केलेल्या श्रीस्वामीजींच्या पुस्तकांमुळे कळू लागला आहे. आज ७-८ लाख लोक श्रीस्वामीजींची पुस्तके व पोथ्या वाचत आहेत व दैवी कृपा प्राप्त करत आहेत.

श्रीस्वामीजींच्या घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. श्रीस्वामीजी घरच्यांसाठी सौ. ताईंना काहीही करू देत नसत. शेवटी श्रीस्वामीजी तपस्येसाठी गेलेले असताना सौ.ताईंनी श्रीस्वामीजींच्या घरच्या लोकांना उघड-उघड मदत करायला सुरुवात केली. श्रीस्वामीजींच्या तीनही बहिणींना घरे बांधून दिली. श्रीस्वामीजींच्या भाच्यांसाठी व पुतण्यांसाठी घरे बांधली. त्यांना मोटरसायकली व कार्स खरेदी करून दिल्या, तसेच श्रीस्वामीजींच्या घरातील नऊ मुला-मुलींची लग्ने लावून दिली. अशा प्रकारे सर्व सद्‌गुण संपन्न अशा सौ. ताई त्यांना आलेले श्रीस्वामीजींचे अनुभव आपल्याला कथन करत आहेत.

**सौ. अस्मिता शेंडे**

न्यूजर्सी (अमेरिका)

ॐ

# ॐ वनिता ॐ

मी सौ. वनिता दीक्षित ऊर्फ ॐ वनिता ॐ. माझे आजोबा राघव सिताराम आगे हे श्री ताज्जुद्दीन बाबांचे भक्त होते. आम्ही नागपूरमध्ये रहात होतो. नागपूरमध्ये अधून मधून श्री गजानन महाराज (शेगांव) हे श्रीमंत बुटींच्या घरी यायचे. माझ्या आजोबांची व श्रीमंत बुटींची मैत्री असल्याकारणाने श्री गजानन महाराज यांचे दर्शनही आजोबांना नेहमी व्हायचे, त्यांचा सहवासही मिळायचा. आजोबा श्री ताज्जुद्दीन बाबांच्या दर्शनाला आठवड्यातून एकदा तरी जात असत व त्यांचे मार्गदर्शनही घेत असत. श्री ताज्जुद्दीन बाबांच्या आशीर्वादाने आजोबांना रेल्वेमध्ये नोकरी लागली.

माझी आजी श्रीदत्त भक्त होती. तिला ध्यानामध्ये श्रीदत्ताचे दर्शन होत असे व श्रीदत्त महाराज तिच्याशी बोलत असत. श्रीदत्ताच्या दर्शनासाठी आजी-आजोबा माहूरगड व गाणगापूरला जात असत. आजीने आपल्या मृत्यूच्या एक महिना अगोदर तिच्या मृत्यूची तारीख व वेळ सांगितली होती व बरोबर सांगितलेल्या वेळी तिने **श्रीगुरुदेव**

**दत्त** म्हणून प्राण सोडला.

सत्पुरुषांची सेवा करण्याचा छंद माझ्या आजी-आजोबांना असल्याकारणाने अनेक सत्पुरुष घरी येत. श्री गजानन महाराज, श्री गाडगे महाराज, श्री गीता महाराज, श्री गुलाबराव महाराज, श्री ताज्जुद्दीन बाबा, श्री उपासनी महाराज, श्री नारायण महाराज, श्री गोळवलकर गुरुजी, श्री तुकडोजी महाराज, श्री जनार्दन स्वामी, श्री धुंडा महाराज, श्री अडाणेश्वर महाराज, श्री पाचलेगांवकर महाराज असे अनेक संत आमच्या घरी येत असत.

माझ्या आईचे, आई-वडीलही श्रीदत्त भक्त होते. त्यांच्या घरीही साधू संतांची सेवा होत असे. श्री गाडगे महाराज जेव्हा नागपूर मेडिकल हॉस्पिटलमध्ये होते, तेव्हा माझ्या आईच्या आईने हॉस्पिटलमध्ये राहून अहोरात्र त्यांची सेवा केली. माझ्या आईच्या वडिलांच्या घरी अनेक साधू-संतांचे व देवांचे फोटो होते. माझ्या आईच्या वडिलांनी मृत्युसमयी त्या सर्व फोटोंना नमस्कार केला, नंतर जमिनीवर एक घोंगडी अंथरली व त्यावर बसून प्राण सोडला. आपल्या मृत्युच्या चोवीस तास अगोदर त्यांनी आपल्या मृत्युची सूचना घरातील सर्वांना दिली होती.

माझे वडील श्रीदत्त भक्त होते तर माझी आई कृष्ण भक्त होती. माझ्या आई-वडिलांना परोपकाराची व साधू-संतांच्या सेवेची अत्यंत आवड होती. आजोबांच्या काळापासूनच आमच्याकडे अनेक साधू-संत येत असत व सत्संग होत असे. माझे आई-वडील गरीब मुलामुलींना शिक्षणासाठी खूप मदत करत असत. तसेच गरीब मुला-मुलींच्या लग्नकार्यात मदत करत असत. अशा प्रकारे गरिबांना मदत करण्याचा वारसा मला आई-वडिलांकडूनच मिळाला. गरिबांविषयी आस्था बाळगणे,

त्यांना जमेल तशी मदत करणे, असे अनेक सद्गुण मला आई-वडिलांकडून मिळाले. माझ्या वडिलांकडे शेकडो एकर जमीन होती. त्यातील चाळीस एकर जमीन त्यांनी एका सत्पुरुषाला दान दिली होती. अशा सुसंस्कृत घराण्यामध्ये १० जून १९५२ रोजी माझा जन्म झाला. माझे एम्. ए. पर्यंत शिक्षण झाले. आयुष्याच्या पहिल्या तेवीस वर्षाच्या काळात फारशा काही महत्त्वाच्या घटना घडल्या नाहीत. घरी येणाऱ्या साधू-संतांचे आशीर्वाद आपोआपच मिळत असत. यातील दोन महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे गणेशपुरी मुंबई, येथे रहात असताना श्री नित्यानंदांच्या समाधीचे दर्शन, श्री मुक्तानंदांचा थोडाफार सहवास व श्रृँगेरीच्या श्री शंकराचार्यांचा सहवास! या गोष्टींनी मनावर चांगलेच आध्यात्मिक संस्कार केले. सत्पुरुषांच्या सहवासात राहिल्याने आपल्यामध्ये नकळत आध्यात्मिक क्रांती घडत असते याची थोडीफार जाणीव मला गणेशपुरीलाच झाली. येथेच मला ज्ञानेश्वरी वाचण्याची प्रेरणा झाली व ज्ञानेश्वरीचे एक पारायण मी गणेशपुरीला केले. याच काळामध्ये श्रृँगेरीचे शंकराचार्य मंदाग्नी पर्वताजवळ अनुष्ठान करत होते. त्यांना दूध देण्याची सेवा मी करत असे व रोज वज्रेश्वरी देवीचे दर्शन घेत असे. अशा प्रकारे पुण्याईचा संचय होत होता.

१९७६ साली माझे लग्न झाले व मी सौ. वनिता जयंत दीक्षित झाले. दीक्षितांच्या घरातही अधून मधून आध्यात्मिक चर्चा होत असे, हे जरी खरे असले तरी इतर सुनांप्रमाणे मीसुद्धा जवळजवळ १४ वर्षे चांगलाच सासुरवास भोगला. या काळात माझ्या आई-वडिलांनी मला खूप आधार दिला.

भाई कदम नांवाचे आमचे एक कौटुंबिक स्नेही आम्हाला नेहमी घनघोर अरण्यात तपश्चर्या करणाऱ्या श्रीस्वामी दत्तगिरींविषयी खूप गोष्टी

सांगायचे व त्यांचे दर्शन जरूर घ्या, असा आग्रह धरायचे. तो योग नोव्हेंबर १९८३ मध्ये आला.

**व्हावी माझी चित्त शुद्धी ।**
**ऐशी उपजावया बुद्धी ।**
**ईश्वरकृपा पाहिजे आधी ।**
**योग्य सद्गुरु मिळावया ।।**

**श्रीस्वामी दत्तावधूत**

ॐ

# परिवर्तन

श्रीस्वामी दत्तगिरी अरण्यामध्ये विविध प्रकारच्या तपस्या व साधना करीत होते. समाधी अवस्थेमध्ये त्यांना अनेक मंत्र स्फुरत व या मंत्रांची ते अनुष्ठाने करीत. मंत्र सिद्ध झाला की श्रीस्वामीजींच्या समोर मंत्र देवता प्रकट होत असे व त्यांना मार्गदर्शन करीत असे. हा सगळा विषय गूढ व रहस्यमय आहे. माझ्याविषयी लिहित असताना अचानक मध्येच हे लिहायला घेतले, त्यालाही तसेच कारण आहे...

श्रीस्वामीजी षोडषीत्रिपुरसुंदरी देवीच्या मंत्राची साधना करत होते. या साधनेने सोळा हातांची षोडषीत्रिपुरसुंदरी देवी त्यांना प्रसन्न झाली. देवीने त्यांना दर्शन दिले. नंतर देवीने माझे रूप धारण केले व श्रीस्वामी दत्तगिरींना म्हणाली...

''या माझ्या रूपाला नीट पाहून ठेवा! या रूपामध्ये सध्या मी मुंबईत रहात आहे. याच रूपाने मी आपल्याला भेटणार आहे. ही स्त्री जेव्हा जन्माला आली तेव्हाच तिला षोडषीत्रिपुरसुंदरी ही स्टेज प्राप्त होती. तुमच्या सहवासात आल्यानंतर तुमचे सर्व ईश्वरीकार्य ही स्त्री पूर्ण करेल व आध्यात्मातील दुर्गा, परमेश्वरी, जगदंबा अशा सर्व

स्टेजेस् पार करेल. तुमचे कार्य करण्यासाठीच या स्त्रिचा जन्म झालेला आहे. या स्त्रिची भेट झाल्यानंतर तुम्हाला वैभव प्राप्त होईल व खऱ्या अर्थाने तुमचे ईश्वरीकार्य सुरू होईल!'' असे मार्गदर्शन करून षोडषीत्रिपुरसुंदरी देवी अदृश्य झाली.

१९८३ मध्ये श्रीस्वामीजींचे दर्शन झाल्यावर पहिल्या भेटीतच श्रीस्वामीजींनी मला खूप मान दिला. तुम्ही षोडषीत्रिपुरसुंदरी देवी आहात असे सांगून वरील गोष्ट सांगितली.

परिचय वाढल्यानंतर षोडषीत्रिपुरसुंदरी स्टेज म्हणजे काय असा प्रश्न मी श्रीस्वामीजींना विचारला तेव्हा ते म्हणाले...

''जर एखादा मनुष्य येथे पृथ्वीतलावर खूप शिकला, पी. एच्. डी. झाला, विद्वान म्हणून त्याने नांव कमविले, कालांतराने मृत्यू पावला व पुन्हा जन्माला आला तर त्याला पहिल्या इयत्तेपासून शिकावे लागते व पूर्वजन्माच्या शिक्षणाचा काही उपयोग होत नाही.

आध्यात्मात तसे नाही. आत्म्याचा प्रवास ईश्वराच्या दिशेने सुरूच असतो. एका जन्मामध्ये जेवढा प्रवास पूर्ण झाला आहे त्याच्या पुढील जन्मात तेथून पुढे प्रवास सुरू होतो किंवा पूर्वजन्मामध्ये आपण जेवढे काही शिकले असू त्याच्या पुढील शिक्षण सुरू होते.

पूर्वजन्मी तुमचा षोडषीत्रिपुरसुंदरी स्टेजपर्यंतचा प्रवास पूर्ण झालेला होता. षोडषीत्रिपुरसुंदरी म्हणजे सोमचक्र जागृत होणे. आज्ञाचक्राच्या पाठीमागच्या बाजूला सोमचक्र नांवाचे एक चक्र असते. या चक्राला सोळा पाकळ्या असतात. या चक्राची देवता षोडषीत्रिपुरसुंदरी! सोमचक्राच्या प्रत्येक पाकळीवर चार सद्‌गुण असतात. एक पाकळी जागृत झाली की चार सद्‌गुण प्राप्त होतात. अशा प्रकारे एकोणपन्नास सद्‌गुण प्राप्त झाले की त्या माणसाला उत्तम

पुरुष असे म्हणतात. स्त्री असेल तर उत्तम स्त्री असे म्हणतात. छप्पन्न सद्‌गुण प्राप्त झाले की, पुरुषोत्तम स्टेजमध्ये साधकाचा प्रवेश होतो. स्त्रिला देवी स्टेज प्राप्त होते. येथे आत्मा पूर्णपणे प्रकाशमान होतो. सोळाही पाकळ्या पूर्णपणे जागृत झाल्यानंतर चौसष्ट सद्‌गुण प्राप्त होतात व षोडषीत्रिपुरसुंदरी देवी ही स्टेज प्राप्त होते. पुरुषाला सिद्ध-साधक असे म्हणतात.

तुम्हाला जन्मतः षोडषीत्रिपुरसुंदरी ही स्टेज प्राप्त आहे. मागील जन्मात तुम्ही षोडषीत्रिपुरसुंदरी स्टेजपर्यंत प्रवास पूर्ण केलेला आहे. तुम्ही या जन्मी पुढील स्टेजेस् प्राप्त करायच्या आहेत. दुर्गा, परमेश्वरी, जगदंबा अशा स्टेजेस् पुढे असून त्या जसजशा तुम्हाला प्राप्त होत जातील तसतशा मी तुम्हाला सांगत जाईन. तुमच्या हातून फार मोठे ईश्वरी कार्य होणार असल्याकारणाने खूप मोठ्या ईश्वरी स्टेजेस् प्राप्त होऊनसुद्धा आपण अगदी सामान्य मनुष्य आहोत असे तुम्हाला वाटत राहील. परंतु जो कोणी तुमच्यावर श्रद्धा ठेवेल त्याचे खूप मोठे कल्याण होईल. तुमचे वैशिष्ट्य असे आहे की दुर्गा देवीची दिव्य शक्ती तुमचे संरक्षण करत असल्यामुळे अपात्र व अयोग्य व्यक्ती तुमच्यावर श्रद्धा ठेवू शकणार नाहीत. अशी माणसे तुमचा दुस्वास करतील.

पुण्यवान, भाग्यवान, सात्त्विक, प्रेमळ, निःस्वार्थ, भक्तिमान असे साधक योग साधना करतात. एखाद्याचीच कुंडलिनी जागृत होते व ती उर्ध्वमार्गाने प्रवास करू लागते. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा व सहस्त्रार अशा चक्रांना जागृत करते व साधक परमात्मा स्वरूप बनतो.

आज्ञाचक्राच्या मागच्या बाजूला मनःचक्र, सोमचक्र ललनाचक्र अशी उपचक्रे आहेत. तुमचा प्रवास मागील जन्मीच सोमचक्रापर्यंत

पूर्ण झालेला आहे. या जन्मी तुम्ही पुढील प्रवास पूर्ण कराल.'' अशा प्रकारे माझ्या आध्यात्मिक प्रवासाची सुरुवात झाली.

श्रीस्वामीजींनी माझ्याकडून वेगवेगळ्या मंत्रांची व वेगवेगळ्या स्तोत्रांची अनुष्ठाने करून घेतली. ही अनुष्ठाने करताना अनेक दिव्य अनुभव आले, देव-देवतांची दर्शने झाली, परमानंद मिळाला, अखंड समाधान प्राप्त झाले. सुख-दुःखातीत अशी अवस्था प्राप्त झाली. अरण्यामध्ये एकदा औदुंबराच्या झाडाखाली साधना करत असताना आकाशातून कुंकुमाचा वर्षाव झाला. आणखी एकदा घरी साधना करत असताना साधना संपल्यावर मी घरात चालू लागले तर जमिनीवर हळद व कुंकुवाच्या पाऊलांचे ठसे उमटू लागले. हा काय प्रकार आहे हे निरखून पाहता, माझ्या उजव्या पाऊलाचा कुंकुवाचा व डाव्या पाऊलाचा हळदीचा ठसा उमटत आहे असे लक्षात आले. मनात विचार आले, आता घरभर हळदी-कुंकुवाचे ठसे उमटणार. हे जर बंद झाले नाहीत तर घर साफ करता करता नाकीनऊ येतील व घरातील इतर लोक हा काय प्रकार म्हणून नांवे ठेवतील. मनांत असे विचार येताच हळदी-कुंकुवाचे ठसे उमटणे बंद झाले व मलाही हायसे वाटले. माझी सासू मला खूप त्रास द्यायची. मी श्रीस्वामीजींकडे जाते म्हणून खूप नांवे ठेवायची. नातेवाईकांमध्ये माझ्या विरोधात खूप प्रचार करायची. यामुळे हळदी-कुंकुवाचे ठसे जेव्हा घरात उमटू लागले तेव्हा मी खूप अस्वस्थ झाले व असे ठसे उमटू नयेत म्हणून श्रीस्वामीजींना प्रार्थना केली व तासाभराने हा प्रकार बंद झाला. सुदैवाने घरात मी एकटीच होते. सगळे हळद-कुंकू मी गोळा केले व दोन डब्यांमध्ये भरून ठेवले.

श्रीस्वामीजींबरोबर संपूर्ण भारतामध्ये हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत अनेक ठिकाणी साधनेनिमित्त खूप प्रवास केला. या

प्रवासातही खूप दिव्य अनुभव आले. तामिळनाडू-केरळ यांच्या बॉर्डरवरील जंगलात पाबनाशम् येथे साधना करत असताना रोज रात्री चंदनाचा वर्षाव होत असे. सर्व आसमंत चंदनाच्या सुगंधाने भरून जात असे. असे अनेक दिव्य अनुभव साधना काळात प्राप्त झाले. अनेक देवतांची दर्शने झाली. सुमारे बारा वर्षे अशा प्रकारे साधना केल्यानंतर ''तुम्हाला आता दुर्गा स्टेज प्राप्त झाली आहे'' असे श्रीस्वामीजी म्हणाले. या काळात दुर्गादेवीच्या अनेक रूपांची दर्शने मला झाली.

श्रीस्वामीजींनी आध्यात्मिक पुस्तके लिहिण्याचे ठरविले. ते मला समोर बसवित व धाराप्रवाह बोलत जात. मीही तितक्याच वेगाने ते जे बोलत ते लिहून घेत असे. अशा प्रकारे पुस्तके तयार होत. साधनेसाठी प्रवास करताना सुद्धा लिखाणाचे काम केले जाई. **श्री दत्त-दुर्गा संवाद** हा संपूर्ण ग्रंथ हिमालयात लिहिला गेला. **जीवन्मुक्तीचा मार्ग** व **अमरत्वाकडे वाटचाल** हे ग्रंथही असेच प्रवासात लिहिले गेले. लिखाणाच्या कामानिमित्त श्रीस्वामीजी आमच्या घरी घाटकोपरला येऊ लागले.

पुस्तकाच्या कामानिमित्त श्रीस्वामीजी काही दिवस आमच्या घरी राहणार होते. तेव्हा एक अतिशय अद्‌भुत अनुभव आला.

सर्वसाधारणपणे दुपारचे बारा वाजले होते. मी स्वयंपाक करत होते. श्रीस्वामीजी स्वयंपाक घरात येऊन मला म्हणाले... ''मला खूप झोप येत आहे. जेवण तयार असेल तर वाढा. जेवून मी झोपतो.'' इतक्यात फोन वाजला. मी फोन उचलला. फोनवर भाई कदम होते. ते म्हणाले... 'ताई ! मी अर्ध्या तासात तुमच्याकडे पोहोचत आहे.' श्रीस्वामीजींना हे कळताच श्रीस्वामीजी म्हणाले, ''मी अर्धा तास झोपतो. भाई कदम आल्यावर सगळे एकत्र जेवू या!'' मी ''ठीक'' म्हणाले.

श्रीस्वामीजी बेडवर पडले व दोन मिनिटात त्यांना अतिशय गाढ झोप लागली.

अर्धा-पाऊण तासाने भाई कदम आले. श्रीस्वामीजी जागे झाले आहेत का? हे पाहण्यासाठी मी त्यांच्या रूममध्ये प्रवेश केला. मला जे काही दृश्य दिसले ते मनाला थक्क करून टाकणारे होते.

अर्ध्या तासापूर्वी जेथे श्रीस्वामीजी झोपले होते त्याच जागी साक्षात् महालक्ष्मी झोपलेली होती. तिने सर्व अलंकार घातलेले होते. डोक्यावर मुकुटही होता. डोक्यापासून पायापर्यंत विविध अलंकारांनी ती अलंकृत होती. पराकोटीचे सौंदर्य ओसंडून वाहत होते. श्रीस्वामीजींनी महालक्ष्मीचे रूप धारण केलेले होते. ज्या देवतेचे आपण ध्यान करतो त्या देवतेचे रूप आपल्याला प्राप्त होते, हे श्रीस्वामीजींनीच मला शिकविले होते. त्यामुळे श्रीस्वामीजी महालक्ष्मीचे ध्यान करत झोपले व त्यांना महालक्ष्मीचे रूप प्राप्त झाले हे माझ्या तात्काळ लक्षात आले व प्रत्यक्षरित्या ध्यान किती प्रगाढ करायचे असते याचे ज्ञानही मिळाले. श्रीमहालक्ष्मीच्या रूपातील श्रीस्वामीजींना प्रणाम करून मी पुन्हा स्वयंपाक घरात आले. यानंतर सुमारे दहा मिनिटांनी श्रीस्वामीजी उठले व आम्ही सर्व जेवलो.

असेच एकदा रात्रीच्या वेळी श्रीस्वामीजी ध्यान करत बसले होते. मी व मेघल ठक्कर आम्ही दोघीही ध्यान करत होतो. दहा मिनिटानंतर मी डोळे उघडले तर माझा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना.

श्रीस्वामीजींच्या देहातून प्रकाश बाहेर पडत होता. पूर्ण देह आकाशी (sky blue) रंगाचा प्रकाशमान झाला होता. मला वाटले हा भास असावा म्हणून मी मेघलला ध्यानातून उठविले. तिने डोळे उघडताच ती मला म्हणाली, ''दीदी! श्रीस्वामीजींच्या देहातून प्रकाश बाहेर पडत

आहे. संपूर्ण देह प्रकाशमय झाला आहे, हे तुम्ही पाहिलेत का?'' तिच्या या बोलण्याने माझी खात्री झाली, की मी जे पाहिले ते सत्य आहे, आभास नाही.

अशा प्रकारे दिव्य अनुभव घेत जीवन व्यतीत होत होते. ध्यानामध्ये विविध दर्शने होत होती. श्री महाअवतार बाबाजी, श्री योगानंद, श्री रामकृष्ण परमहंस, श्री शारदामाता, ऋषी, सिद्धपुरुष, देव-देवता ध्यानात नेहमी दिसत. श्रीमहालक्ष्मी तर सतत ध्यान न करताही अधून मधून प्रकट होऊन दर्शन देत असे.

एका भक्ताला बरोबर घेऊन श्रीस्वामीजी गिरनार व माऊंट अबू येथे यात्रेला गेले होते. परत आल्यावर त्या भक्ताने सांगितले, गिरनार पर्वतावर जेथे पादुका आहेत तेथे श्रीस्वामीजी बसले व तेथील महंतांनी श्रीस्वामीजींची पूजा केली. माऊंट अबू पर्वतावर एक छोटीशी घुमटी असून त्या घुमटीत श्रीदत्त पादुका आहेत. तेथील साधूने श्रीस्वामीजींना घुमटीत बसविले व शेकडो लोकांनी श्रीदत्त पादुकांबरोबर श्रीस्वामीजींचेही दर्शन घेतले. माऊंट अबूहून परत येताना श्रीस्वामीजी अहमदाबादला थांबले. तेथे त्यांनी श्रीमहालक्ष्मीची एक सुंदर मूर्ती विकत घेतली व घाटकोपरला (मुंबई) येऊन त्या मूर्तीची त्यांनी माझ्या घरात स्थापना केली.

या मूर्तीने आमच्या घरामध्ये खूप चमत्कार घडविले. ज्योत्स्ना नांवाची एक मुलगी माझ्याकडे कामाला होती. नेहमीप्रमाणे एक दिवस ती कामाला आली. मला काही काम असल्याकारणाने मी बाहेर निघून गेले. घरात ती एकटीच होती. श्रीमहालक्ष्मीच्या मूर्तीतून एक ज्योति प्रकट झाली व त्या ज्योतितून दुसरी ज्योत्स्ना साकार झाली. तिने ज्योत्स्नाला सर्व कामात मदत केली. त्यामुळे काम लवकर आटोपले. नंतर तिने

ज्योत्स्नाला कुंकू लावले व ज्योत्स्नानेही तिला कुंकू लावले. ज्योत्स्ना प्रमाणेच दिसणारी दुसरी स्त्री मूर्तीत विलीन झाली व ज्योत्स्ना घरी जायची तयारी करू लागली. इतक्यात मी आले. ज्योत्स्नाच्या कपाळावर कुंकुवाचा मळवट पाहून हा काय प्रकार आहे असे मी तिला विचारले तेव्हा तिने मला वरील हकिकत सांगितली.

गरिबांची गरीबी, आजारी माणसांचे आजारपण व दुःखितांचे दुःख दूर व्हावे म्हणून श्रीस्वामीजी सतत झटत असत. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाचे कल्याण होत असे. एकदा ते मला म्हणाले, ''मी आता काही पोथ्या व पुस्तके लिहिणार आहे. पोथ्या लोकांचे दुःख व दारिद्र्य दूर करतील व पुस्तके लोकांना आध्यात्माचे ज्ञान देतील.'' यावर मी म्हणाले... ''पोथ्या व पुस्तके प्रकाशित करण्याची सेवा तुम्ही मला द्याल का?'' यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''हे एक फार मोठे ईश्वरीकार्य असून हे कार्य करण्यासाठीच तुमचा जन्म आहे. तुम्ही **वनिता बुक्स** नांवाची एक संस्था काढा व त्याद्वारे माझी पुस्तके प्रकाशित करा. ज्या घरात ही पुस्तके व पोथ्या जातील त्या घराचे कल्याण होईल अशी व्यवस्था ईश्वर व देव-देवता करणार आहेत.'' त्यानंतर श्रीस्वामीजींनी अनेक पोथ्या व पुस्तके लिहिली. आज (२०१४) सुमारे दोन लाख घरांमध्ये पोथ्या व पुस्तके वाचली जात आहेत व लोकांना अतिशय दिव्य अनुभव येत आहेत. लोकांना येणाऱ्या दिव्य अनुभवांवर आधारित **''ईश्वर भक्तीचे अनुभव''** नांवाचे एक छोटेसे पुस्तक मी प्रकाशित केले आहे.

श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या वाचून आमचे कल्याण झाले असे सांगणारे शेकडो फोन नेहमी वनिता बुक्सला येत असतात. अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी लाखो लोकांना सुखी केले. तेही कोणाकडून एकही

पैसा न घेता व प्रत्यक्ष कोणाला न भेटता. कोणाच्याही घरी जाऊन ते एक कप चहा सुद्धा प्यायले नाहीत. अतिशय निःस्पृहतेने त्यांनी लोककल्याणाचे कार्य केले व लोकांना सुखी केले.

त्यांच्या अंतःकरणातील दया व करुणा याविषयी काही गोष्टी सांगितल्याशिवाय मला राहवत नाही.

अरण्यात झोपड्या बांधण्याचे काम चालू होते. मीही तेथेच होते. श्रीस्वामीजींच्या प्रेमळ व विनोदी स्वभावावर सर्वजण खुश असायचे. सर्वांना ते आपलेसे वाटायचे.

देसाई नांवाचे गृहस्थ एक दिवस श्रीस्वामीजींना म्हणाले, ''मला तुमच्याशी एकांतात बोलायचे आहे.'' श्रीस्वामीजी त्यांना घेऊन एकांतात गेले.

देसाई म्हणाले...

''एकेकाळी मी खूप श्रीमंत होतो. जमिनीच्या वादातून मी चार खून केले. त्यामुळे मला शिक्षा झाली. बरीच वर्षे जेलमध्ये काढली. कोर्ट-कचेऱ्या पोलीस प्रकरणात सगळा पैसा संपला. घर-दार विकले गेले. दारिद्र्य आले व आता तुम्ही पहातच आहात, गवंड्याच्या हाताखाली मजुरीचे काम करत आहे, या पापातून सुटका होऊन मला काही उद्धाराचा मार्ग मिळेल काय?''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''ईश्वराच्या चिंतनाने व चांगले वागण्याचा निश्चय केल्याने पातकांच्या राशी जळून जातात. तुमचा नक्की उद्धार होईल. यापुढे तुम्ही इथेच माझ्याजवळ रहा. गोशाळेमध्ये राहून गायींची सेवा करा. तुमचे सर्व पाप फिटून जाईल व तुमचा उद्धार होईल.''

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे देसाई गोशाळेत राहू लागले व गायींची सेवा करू लागले. सुमारे दोन महिने सेवा केल्यानंतर त्यांना एक अद्‌भुत अनुभव आला...

रात्री सुमारे एकच्या दरम्यान देसाई गोशाळेमध्ये बसलेले होते. त्यांनी पाहिले की, दरवाजातून श्रीस्वामीजी आत आले. त्यांनी प्रत्येक गायीच्या पाठीवरून व्यवस्थित हात फिरविला व पुन्हा दरवाजातून बाहेर निघून गेले.

देसाई मनात विचार करू लागले, दरवाजा बंद असताना श्रीस्वामीजी आत कसे आले? माझ्याकडे पाहिले सुद्धा नाही हे कसे? माझे काही चुकले की काय? नेहमी हास्य विनोद करणारे श्रीस्वामीजी आज चुपचाप कसे निघून गेले? इत्यादी विचारांनी ते हैराण झाले.

सकाळ होताच त्यांनी, श्रीस्वामीजी गोठ्यात रात्री आले होते का? याची चौकशी केली. ही गोष्ट जेव्हा श्रीस्वामीजींना कळली, तेव्हा श्रीस्वामीजी देसाईंना म्हणाले...

''साक्षात् प्रभू दत्तात्रेय गायींना आशीर्वाद देण्यासाठी आले होते. तुम्हाला त्यांचे दर्शन घडले.'' हे ऐकून देसाई यांना खूप धन्य वाटले.

असेच काही दिवस गेले. पावसाळा सुरू झाला. श्रीस्वामीजी नागार्जुन सागरला निघून गेले. अरण्यातील झोपड्यांमध्ये आता फक्त देसाई व दोन-तीन मुले एवढीच माणसे होती.

एके रात्री धो धो पाऊस पडत होता. देसाई गोशाळेमध्ये छोटीशी शेकोटी करून तेथे शेकत बसले होते. इतक्यात त्यांनी पाहिले, गोशाळेच्या छतामधून अग्निचा गोळा खाली आला व त्यातून एक देवी

साकार झाली. त्या देवीच्या हातात सोन्याचे ताम्हण होते, सोन्याची पंचारती होती. पंचारतीमध्ये वाती प्रज्वलित होत्या. त्या देवीने सर्व गायींना ओवाळले व नंतर अग्नि गोळ्यात रूपांतर होऊन ती देवी आकाशात निघून गेली.

चार खून केलेल्या व्यक्तीला इतके दिव्य अनुभव देणाऱ्या श्रीस्वामीजींची योग्यता काय असेल याचा विचार वाचकांनीच करावा.

**मी** दररोज ध्यान करते. एकदा ध्यानाला बसले असताना प्रथम डोळ्यासमोर गडद अंधःकार दिसला. मला असे वाटले मी एका पठारावर ध्यान करत बसले असून सर्वत्र गडद अंधःकार आहे. माझे डोळे उघडे आहेत. अचानक क्षितिजावर किरणे दिसू लागली. उषःकाल झाला. शुभ्रधवल आकाश दिसू लागले. त्या शुभ्रधवल आकाशात सूर्य किरणांच्या अनेक छटा दिसत होत्या. हळूहळू सूर्योदय होऊ लागला. हे मनोहर दृश्य मी पहात होते व मनाला अतिशय आनंद होत होता.

सूर्याचा लाल गोळा आता आकाशात दिसू लागला. अचानक तो सूर्य अतिशय वेगाने माझ्यासमोर आला व त्यातून एक तरुण योगी माझ्यासमोर उभा राहिला. मी विचारले,''आपण कोण?''

तेव्हा त्या योग्याने उत्तर दिले, ''मी नामरूपातीत आहे. कुठल्याही नांवाने तू मला हाक मार. मी आहेच!''

मी त्यांना म्हणाले, ''मी आपल्याला **'दत्तगुरु'** म्हणाले, तर चालेल कां?'' ते म्हणाले, ''तथास्तु!''

हा अनुभव जेव्हा मी श्रीस्वामीजींना सांगितला तेव्हा त्यांनी मला **योगी कथामृत** वाचायला दिले. मी योगी कथामृत उघडले आणि

मला आश्चर्याचा धक्का बसला. मी जोराने म्हणाले,

''**दत्तगुरु**'' स्वामीजी मला हेच दिसले. असे म्हणून **योगी कथामृत** मधील **श्री महाअवतार बाबाजींचा** फोटो मी श्रीस्वामीजींना दाखविला.

यावर श्रीस्वामीजी म्हणाले... ''मला ते माहीत आहे म्हणून मी तुम्हाला **योगी कथामृत** दिले.''

एकदा ध्यानाला बसले असता ध्यानामध्ये श्रीस्वामीजी प्रकट झाले व मला म्हणाले, ''चला''.....!

श्रीस्वामीजींनी असे म्हणताच मी माझ्या देहातून बाहेर पडले. माझ्या ध्यानस्थ देहाकडे मी एक दृष्टिक्षेप टाकला व आकाशमार्गे श्रीस्वामीजींबरोबर अतिशय वेगाने जाऊ लागले. आम्ही दोघेही काही क्षणांतच हिमालय पर्वतावर पोहोचलो व दोघांनी एका गुहेमध्ये प्रवेश केला. गुहेत प्रकाश होता. गुहेच्या दुसऱ्या बाजूने आम्ही बाहेर आलो. बाहेर विस्तीर्ण पठार होते व त्या पठारावर अनेक ऋषी ध्यानस्थ बसले होते. हे ऋषी महाकाय देहाचे होते. त्यांच्या सर्वांगावर केस होते व बसून त्यांची उंची ८ ते ९ फूट होती. ते हजारो वर्षांपासून समाधिस्थ बसलेले होते. मी त्या सर्वांना नमस्कार केला व त्यानंतर ते सारे दृश्य अदृश्य झाले व मी माझ्या देहात परत आले.

**मा**झी मैत्रिण डॉ. मेघल लग्न करून कॅनडाला गेली. तिला मुलगा झाला. त्याचे नांव निखिल. मेघल दरवर्षी निखिलला घेऊन भारतात आली की, मी त्यांना घेऊन आंध्र प्रदेशात श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जात असे. अशा प्रकारे दरवर्षी निखिलला पाच-सहा दिवस श्रीस्वामीजींचा सहवास मिळत असे.

निखिल चार वर्षाचा असताना एका संध्याकाळी कॅनडाहून मेघलचा मला फोन आला. मेघल म्हणाली, ''ताई! गेले १५-२० दिवस निखिल खूप आजारी आहे. येथील चाईल्ड स्पेशालिस्टचे उपचार त्याच्यावर चालू आहेत, परंतु त्याला काहीच गुण येत नाही व एक तास झाला तो जवळजवळ बेशुद्ध आहे. मी स्वतः डॉक्टर आहे पण माझे काही डोके चालत नाही व चाईल्ड स्पेशालिस्टला पण काही कळत नाही. त्याची अवस्था मला पहावत नाही.''

मी तिला म्हणाले...

''मी श्रीस्वामीजींना फोन करते व निखिलला बरे करण्यासाठी प्रार्थना करते.''

मी श्रीस्वामीजींना फोन केला व निखिलची सर्व हकिकत सांगितली.

श्रीस्वामीजी मला म्हणाले...

''ताई! फोन ठेवा! बरोबर पंचेचाळीस मिनिटांनंतर प्रथम मेघलला फोन करा, ती काय म्हणते ते ऐका व नंतर मला फोन करा.''

पंचेचाळीस मिनिटांनंतर मी मेघलला फोन केला. मेघलने फोन उचलताच मला निखिलचा जोरजोराने हसण्याचा व खेळण्याचा आवाज येत होता. मी मेघलला विचारले...

''हे काय निखिल तर चांगला हसतो आहे व खेळतो आहे. त्याच्या खेळण्याचा व हसण्याचा आवाज मला जोरजोरात ऐकू येत आहे.'' यावर मेघल म्हणाली...

''ताई! काय सांगू? तुम्हाला फोन केला त्यानंतर सुमारे वीस मिनिटांनी निखिल शुद्धीवर आला. त्याचा चेहरा व डोळे अतिशय तेजस्वी

दिसत होते.'' तो मला म्हणाला...

''मॉम! मी आता एकदम बरा झालो आहे. आता मला खूप खूप खेळायचे आहे. तेव्हापासून तो जोरजोराने ओरडत आहे, घरभर धावत आहे व उड्या मारून आपला आनंद व्यक्त करत आहे. एवढी एनर्जी त्याच्यात कोठून आली हेच मला कळत नाही. कारण एक तासापूर्वी डोळ्याच्या पापण्या उघडण्याचे सुद्धा त्राण त्याच्या अंगात नव्हते व तो एक शब्दसुद्धा बोलू शकत नव्हता. गेले पंधरा दिवस तो अंथरुणाला खिळून होता यावर त्याचा व माझा विश्वासच बसत नाही.''

मी तिला म्हणाले, ''मला ही आनंदवार्ता प्रथम श्रीस्वामीजींना कळवू दे! ते माझ्या फोनची वाट पहात असतील. त्यांनी मला पंचेचाळीस मिनिटांनी फोन कर, असे सांगितलेले आहे.''

मेघलचा फोन ठेवून मी लगेच श्रीस्वामीजींना फोन केला व सर्व हकिकत सांगितली.

श्रीस्वामीजी म्हणाले...

''ईश्वराचे खूप खूप आभार! पण ताई ! तुम्ही मेघलला परत फोन करा व निखिल शुद्धीवर येण्यापूर्वी त्याने काय पाहिले, त्याला काही स्वप्न पडले का? स्वप्नात त्याला काही दिसले का? असे विचारा!''

मी तात्काळ मेघलला फोन लावला व तिला म्हणाले...

''मेघल ! शुद्धीवर येण्यापूर्वी निखिलला काही स्वप्न पडले का? त्याने स्वप्नात काही पाहिले का? हे तू त्याला विचार!'' माझ्या या दुसऱ्या फोनवर सुद्धा निखिलचे खेळणे व गोंगाट करणे मला चांगलेच ऐकू येत होते. फोन चालूच होता. मेघलने निखिलला जवळ घेतले व

इंग्रजीत विचारले,

‘‘निखिल तुला काही स्वप्न पडले का?’’ यावर निखिल म्हणाला...

‘‘मी आकाशात होतो. अचानक श्रीस्वामीजी माझ्याकडे येताना मला दिसले. त्यांच्या एका हातात पृथ्वी गरगर फिरत असताना मला दिसत होती. त्यांनी पृथ्वी आकाशात सोडून दिली व माझ्याजवळ आले. दोन्ही हातांनी मला जवळ घेतले, माझ्या डोक्यावरून हात फिरविला. चेहऱ्यावरून हात फिरविला व म्हणाले, निखिल! तू ठणठणीत बरा झालेला आहेस! आता तू उठ आणि खूप खूप खेळ! तू खेळलास की, तुझ्या आईला खूप आनंद होईल.’’ एवढे बोलून निखिलने मेघलला सोडले व पुन्हा त्याचे खेळणे व गोंगाट करणे सुरू झाले.

फोन चालूच होता. दोघांचे संभाषण मी ऐकत होते. फोनवर निखिलचा गोंगाट परत ऐकू येऊ लागला. निखिल जे काही म्हणाला ते मेघलने मला सविस्तर सांगितले.

मी तिला म्हणाले, ‘‘निखिल ईश्वर दर्शनाचा परमानंद अनुभवत आहे. त्यामुळे तो एवढा खेळत आहे व गोंगाट करत आहे. तू त्याला अडवू नकोस. त्याला जितके खेळायचे तितके खेळू दे. कारण ही डिव्हाइन एनर्जी आहे. ही अंगात जिरेपर्यंत त्याचा असाच गोंगाट चालू राहील.’’

यावर मेघल म्हणाली...

‘‘तुम्ही अगदी बरोबर बोललात. निखिल इतका शांत मुलगा आहे की, एवढा शांत मुलगा आपण आजपर्यंत पाहिलेला नाही. त्यामुळे मला त्याच्या खेळण्याचे व गोंगाट करण्याचे खूप आश्चर्य वाटत होते.’’

मेघलचा फोन ठेवून मी ताबडतोब श्रीस्वामीजींना फोन केला व सर्व हकिकत त्यांना सांगितली.

श्रीस्वामीजी म्हणाले...

''निखिल हा पूर्वजन्मीचा एक योगी आहे. त्याच्या आईने सुद्धा पूर्वजन्मी खूप साधना केली आहे. त्यामुळे ईश्वराने त्यांना एवढा मोठा अनुभव दिला!''

श्रीस्वामीजींच्या सहवासात राहणाऱ्यांना किंवा श्रीस्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार साधना करणाऱ्यांना नेहमीच असे दिव्य अनुभव येत असत.

**ए**कदा मी श्रीस्वामीजीं समोर बसले होते. अचानक मला प्रगाढ ध्यान लागले. मस्तकामध्ये ''क्लीक'' असा आवाज झाला व तृतीय नेत्र उघडला गेला. यालाच व्यावहारिक भाषेत समाधी लागली असे म्हणतात. मला एकाच वेळेला चारही बाजूचे दिसू लागले. माझ्यासमोर श्रीस्वामीजी ध्यानस्थ बसले होते. अचानक त्यांचा देह मोठा मोठा होऊ लागला. तो खूपच मोठा वाढला. आजूबाजूच्या सर्व झोपड्या त्यांच्यासमोर खूपच छोट्या दिसू लागल्या. अचानक तो देह स्फटिकाप्रमाणे पारदर्शक झाला. त्या देहामध्ये असंख्य देवदेवता दिसू लागल्या. मी मनोमन त्या दिव्य, विराट रूपाला नमस्कार केला. इतक्यात सर्व दृश्य मावळले व मी पुनःश्च पूर्वस्थितीत आले. माझा हा अनुभव मी श्रीस्वामीजींना सांगितला.

ते म्हणाले, ''तुम्ही भाग्यवान आहात. पूर्वजन्मीच्या योगसाधनेमुळे तुम्हाला असे अनुभव येत आहेत.''

श्रीस्वामीजींकडे जाणे म्हणजे एक दिव्यच होते. प्रत्येकवेळी

कोणालातरी बरोबर घ्यावे लागत असे. कारण पायवाटेने अनेक पर्वत पार करून जावे लागत असे. एकदा मी व पार्ले (मुंबई) येथील शैला मसुरकर आम्ही दोघीजणी श्रीस्वामीजींकडे गेलो. श्रीस्वामीजींसमोर बसताच श्रीस्वामीजी शैलाला म्हणाले...

''तुझ्या पाठीमागे काही शक्ती आहेत. धुनीच्या झोपडीमध्ये खूप दैवीशक्ती आहेत. या दोन्ही शक्तींचा एकमेकांशी संघर्ष होऊ नये म्हणून तू धुनीच्या झोपडीत प्रवेश करू नकोस.''

एक-दोन दिवसातच शैला हे विसरली. थोड्याच दिवसांनंतर काहीतरी कारणाने मी धुनीच्या झोपडीत गेले व माझ्या पाठोपाठ शैलाही आली. धुनीच्या झोपडीच्या उंबरठ्यापर्यंत येताच तिला एकदम शॉक लागल्यासारखे झाले व ती बेशुद्ध पडली. नंतर तिला पाणी मारून शुद्धीवर आणावे लागले.

शुद्धीवर आल्यावर ती म्हणाली, ''कोणीतरी माझे प्राण खेचत आहे'', असे मला वाटले.

श्रीस्वामीजींकडे अरण्यात जाताना बऱ्याच वेळा माझ्या बरोबर मेघल व अल्पा ठक्कर या दोन बहिणी असायच्या. त्यांनाही ध्यानामध्ये खूप दिव्य अनुभव यायचे. ध्यानामध्ये देव-देवतांची दर्शने व्हायची.

एकदा मेघल, आई व मावशीबरोबर श्रीनाथजींच्या दर्शनाला राजस्थानात गेली होती. श्रीनाथजींच्या गाभाऱ्यासमोर गेल्यानंतर मेघलचे शरीर एकदम निळ्या रंगाचे झाले. तिची आई व मावशी घाबरून गेल्या. त्या म्हणाल्या, ''आपण डॉक्टरला दाखवू या.'' तेव्हा मेघल म्हणाली, ''काळजी करू नका! मी स्वतः डॉक्टर आहे. मला डॉक्टरकडे जाण्याची आवश्यकता नाही. माझे शरीर निळे पडले आहे, त्यामागे दैवी कारण आहे.'' श्रीनाथजींचे दर्शन घेऊन हॉटेलमधील

आपल्या रूमवर जेव्हा मेघल परतली, तेव्हा तिला भगवान् श्रीकृष्ण डोळ्यासमोर दिसत होते. डोळे मिटले तरी, डोळे उघडे ठेवले तरी! चोवीस तासानंतर तिचा देह पुन्हा पूर्ववत झाला.

मेघल व मी एकदा श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी अरण्यात गेलो. तेव्हा श्रीस्वामीजी मेघलला म्हणाले...

''मनाची एकाग्रता म्हणजे काय? ती कशी असते व कशी असावी. हे मी तुला उद्या ताई ध्यानाला बसल्यावर दाखवून देईन!''

दुसऱ्या दिवशी मी ध्यानाला बसले, तेव्हा श्रीस्वामीजींनी मेघलला माझ्यापासून सुमारे दहा फूट अंतरावर उभे केले व एक लेडीज हातरुमाल तिच्या हातात दिला व हात उंच करून अलगद खाली टाकण्यास सांगितले.

मेघलने लेडीज हातरुमाल अलगद जमिनीवर टाकला. तो माझ्यापासून १० फूटावर, तिच्या पायाजवळ पडला परंतु मी मात्र एकदम दचकून जागी झाले. कारण मला बॉम्ब स्फोटाप्रमाणे खूप जोरदार आवाज ऐकू आला. मी दचकून जागी झाले. काय झाले म्हणून विचारले, तेव्हा खरा प्रकार मला कळला व श्रीस्वामीजी म्हणाले...

''याला म्हणतात **एकाग्रता!**''

पण त्याच बरोबर ते पुढे म्हणाले...''ही एकाग्रता जरी तीव्र असली तरी अतिसूक्ष्म आवाजानेही भंग पावते. म्हणून कुठल्याही आवाजाने एकाग्रता भंग पावणार नाही अशी एकाग्रता कशी साध्य करायची ते मी तुम्हाला शिकवेन!''

तद्नंतर त्यांनी मला भयाण गोंगाटातही मन कसे एकाग्र करायचे

हे शिकविले. त्यामुळे एकाग्रतेमध्ये सहजता आली, मन अविचल झाले.

ध्यानामध्ये असंख्य अनुभव येत असत. मी दिवसातून दोन वेळा ध्यान करत असे. दोन्ही वेळेला दिव्य अनुभव येत असत. कधीकधी मस्तकामध्ये दिव्य ज्योति दिसत असे तर कधी ब्रह्मरंध्रामध्ये सुईच्या टोकाएवढे बारीकसे छिद्र दिसे. या छिद्रातून पलीकडे गेल्यावर चिदाकाशात प्रवेश प्राप्त होत असे.

पुष्कळवेळा एखादी देवता प्रकट होत असे व दिव्य लोकातून भ्रमण करून परत आणीत असे. अशा प्रकारे वातावरणातील असंख्य स्तर व असंख्य लोक मी ध्यानामध्ये पाहिले.

**ए**क दिवस अचानक मला उघड्या डोळ्यांनी दुर्गादेवी दिसली. तेव्हा मी ध्यान करत नव्हते. दुर्गा देवीने ''तू आध्यात्मात खूपच पुढे जाशील!'' असा आशीर्वाद दिला. ही गोष्ट जेव्हा मी श्रीस्वामीजींना सांगितली तेव्हा ते म्हणाले...

''आध्यात्मातील दुर्गा ही स्टेज तुम्ही पार केली असून आता परमेश्वरी या स्टेजच्या प्रांतात तुमचा प्रवेश झाला आहे. आध्यात्माचा पुढील प्रवास आता तुम्ही सुरू करायला हवा.''

तेव्हा मी म्हणाले, ''आता पुढे काय करायचे?'' यावर ते म्हणाले...

मनाच्या पाच अवस्था असतात.

**१) जागृती २) स्वप्न ३) सुषुप्ती ४) तुर्या ५) उन्मनी**

**जागृती** - ईश्वर भेटीची ओढ लागणे, निःस्वार्थ असणे, आध्यात्मिक प्रगती व्हावी असे वाटणे म्हणजे जागृती!

**स्वप्न** - एखाद्या सत्पुरुषाच्या कृपेने ध्यानाचे अनुभव येणे,

ध्यानदृश्ये दिसणे याला स्वप्न अवस्था असे म्हणतात. पुष्कळवेळा एखाद्या आत्म्याची पात्रता नसताना श्रीगुरुंच्या कृपेने त्यांना ध्यानाचे अनुभव येतात व असे अनुभव आल्याने त्यांना थोडाफार अहंकारही होतो. अशा लोकांची अधोगती होते. असे होऊ नये म्हणून जोपर्यंत जागृती अवस्थेचे अनुभव पूर्णपणे आले नाहीत तोपर्यंत स्वप्न या अवस्थेतील अनुभव आले तरी त्याला महत्त्व देऊ नये.

स्वप्न या अवस्थेमध्ये ध्यानामध्ये मार्गदर्शन मिळते परंतु येथेही थांबता कामा नये.

**सुषुप्ती** – या अवस्थेमध्ये ध्यानदृश्ये दिसणे बंद होते. मनोलय होऊ लागतो व प्रगाढ ध्यान लागू लागते. या प्रगाढ ध्यानामध्ये काळवेळेचे भान रहात नाही. ब्रह्म दर्शन होते.

**तुर्या** – तुर्या अवस्थेमध्ये खूप ज्ञान व परमानंद प्राप्त होतो. ईश्वर साक्षात्कार होतो.

**उन्मनी** – या अवस्थेमध्ये साधक ईश्वरमय होतो. परमेश्वराशी एकरूप होतो.

या पाचही अवस्थांच्या पलीकडे असणाऱ्या सहजावस्थेपर्यंत तुम्हाला पोहोचायचे आहे. या अवस्थेमध्ये पोहोचल्यावर तुम्हाला परमेश्वर ही स्टेज प्राप्त होईल.

या नंतर श्रीस्वामीजींनी माझ्याकडून बऱ्याच विशिष्ट साधना करून घेतल्या व तीन वर्षानंतर एक दिवस ते म्हणाले...

''तुम्ही आता वनिता दीक्षित राहिलेल्या नसून **ॐ वनिता ॐ** झालेल्या आहात, तुम्हाला परमेश्वरी ही स्टेज प्राप्त झालेली आहे. जो कोणी श्रद्धेने तुमचे नामस्मरण **ॐ वनिता ॐ** या नामाने करेल त्याला

दिव्य अनुभव येतील हे निश्चित!''

माझा स्वभावच असा आहे की, श्रीस्वामीजी जे काही बोलतील ते फक्त निमुटपणे ऐकून घ्यायचे. त्यावर काही प्रतिक्रिया व्यक्त करायची नाही किंवा ते कोणाला सांगायचे नाही. माझ्या स्वभावाप्रमाणे **ॐ वनिता ॐ** याविषयी मी कोणालाच काही बोलले नाही.

याच काळामध्ये **ईश्वरभक्तीचे अनुभव** नांवाचे पुस्तक प्रकाशित करण्याचा योग आला. या पुस्तकामध्ये संकलक म्हणून **ॐ वनिता ॐ** नांव टाकावे असे श्रीस्वामीजींनी सुचविले. त्याप्रमाणे पुस्तकावर संकलक **ॐ वनिता ॐ** असे टाकले.

पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर सॅनफ्रान्सिस्को येथे राहणाऱ्या सुजाता माळवेने पुस्तक वाचले. पुस्तकावरील **ॐ वनिता ॐ** हे वाचून तिने **ॐ वनिता ॐ** या नाम मंत्राचा जप करण्यास सुरुवात केली व तिला इतके काही दिव्य अनुभव आले की तिने दहा-बारा पानी पत्र श्रीस्वामीजींना लिहिले व तुम्ही तयार केलेला **ॐ वनिता ॐ** हा मंत्र किती दिव्य आहे हे त्यांनाच सांगितले.

श्रीस्वामीजी माझ्याकडून वेगवेगळ्या साधना करून घेत होते. मन निर्विचार कसे करावे, सर्व प्रकारचे व्यवहार करतानाही मन शांत, एकाग्र व निर्विचार कसे ठेवावे हे समजावून सांगत होते. निर्विचार स्थितीमध्ये अनेक तास कसे बसावे, **मनानेच मनाला कसे पहावे** अशा अनेक गोष्टी त्यांनी मला शिकविल्या.

एकदा मी निर्विचार स्थितीमध्ये बसून मनाचे निरिक्षण करत असताना अचानक चिदाकाशामध्ये असंख्य देवता प्रकट झाल्या व त्यांनी माझ्या शरीरात प्रवेश केला व त्या सर्व माझ्या शरीरात सामावून गेल्या. हा अनुभव मी श्रीस्वामीजींना सांगायचे ठरविले व मी श्रीस्वामीजींकडे

गेले. मी काही सांगण्यापूर्वीच श्रीस्वामीजी म्हणाले...

''तुमच्या देहामध्ये असंख्य देवता सामावलेल्या आहेत. तुम्हाला **परमेश्वरी** स्टेज प्राप्त झाली आहे. '**ॐ ऐम् ऱ्हीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी स्वाहा**' या मंत्राची जो कोणी साधना करेल त्याला तुमच्या दिव्य रूपाचे दर्शन घडेल.''

**श्री**स्वामीजींच्या मार्गदर्शनाप्रमाणे माझी साधना चालू होती. अशीच काही वर्षे गेली. एकदा मला ध्यानामध्ये आपण आकाशाएवढे मोठे झालो आहोत, सर्वव्यापी आहोत असा अनुभव आला. चराचरामध्ये आपल्याशिवाय दुसरे काहीच नाही असे वाटू लागले. सारे विश्व माझ्यात सामावलेले आहे असा अनुभव आला. हा अनुभव श्रीस्वामीजींना सांगण्यापूर्वीच श्रीस्वामीजी म्हणाले...

''सर्वव्यापी महाकारणदेहापर्यंत तुमचा प्रवास पूर्ण झाला आहे. आता तुम्ही सर्वव्यापी झालेल्या आहात. या अवस्थेला **जगदंबा** असे म्हणतात. तुमच्या आत्म्याने आध्यात्मातील सर्व स्टेजेस् पार केलेल्या आहेत. आता काही शिल्लक नाही. आध्यात्मातील तुमचा प्रवास संपला आहे. व्यावहारिक जीवन व्यवस्थितरित्या जगता यावे म्हणून ईश्वर तुमची अवस्था झाकून ठेवेल. एखाद्या सामान्य स्त्री प्रमाणे तुम्ही जगाल. तुमच्या मृत्यूनंतर मात्र तुम्ही सर्वव्यापी व्हाल. आकाशाप्रमाणे व्हाल. जो कोणी तुमचे भक्तिभावाने स्मरण करेल त्याला ज्ञान, ऐश्वर्य, आध्यात्मिक प्रगती, सद्‌गुण व मोक्ष प्राप्त होईल.''

**ए**कदा मी श्रीस्वामीजींबरोबर प्रवास करत होते. तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले...

''सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी यदु नांवाचा एक राजा होऊन गेला. हा राजा भगवान् श्रीदत्तात्रेयांचा शिष्य होता. आपल्या मुलांकडे

राज्य सोपवून श्रीदत्तात्रेयांच्या मार्गदर्शनाप्रमाणे तपस्या करू लागला. सुमारे हजार वर्षे तपस्या केल्यानंतर तोच आत्मा भगवान् श्रीकृष्ण म्हणून जन्माला आला. यदु हा यादव वंशाचा मूळ पुरुष, भगवान् श्रीदत्तात्रेयांचा शिष्य, एक ऋषी व श्रीकृष्ण अवतारातील कार्य समाप्त झाल्यानंतर पुन्हा मूळ स्वरुपात जाऊन तो तपश्चर्या करू लागला. हा आत्मा आत्ताच माझ्यासमोर प्रकट झालेला असून ईश्वरीकार्य करण्यासाठी तो मानसीच्या पोटी जन्म घेणार आहे असे त्याने मला सांगितले. आपण जे काही जगदोद्धाराचे कार्य करीत आहोत हे कार्य पुढे तो चालविणार आहे.''

श्रीस्वामीजींनी जे काही मला सांगितले ते ऐकून मला खूप खूप आनंद झाला. आपल्यानंतर हे ईश्वरीकार्य कोण करणार असे अधून मधून मला वाटत असे त्याचे उत्तर मला मिळाले.

**ए**कदा मी माझ्या एका परिचितांच्या घरी बसले होते. तेथे एक त्रिकाल ज्ञानी व्यक्ती आली त्या व्यक्तीने मला सांगितले...

''एक महाऋषी तुमचा नातू म्हणून जन्माला येत असून तो फार मोठे ईश्वरीकार्य करणार आहे. तसेच श्रीस्वामीजींचे चरित्र तुम्ही लिहित आहात त्या चरित्र ग्रंथाचे जगातील अनेक भाषांमध्ये भाषांतर होईल व तो ग्रंथ जग गाजवेल. त्या ग्रंथामुळे जगाला एक वेगळीच दिशा मिळेल.'' मला हे ऐकून खूप खूप आनंद झाला.

**ए**कदा मी ओंकारेश्वरला काही साधना करण्याकरिता गेले होते. तेथे मला एक सिद्ध महात्मा भेटले. ते म्हणाले...

''आप के स्वामीजी बहुत बडे सिद्धपुरुष हैं । उन्होंने जो भी ग्रंथ लिखें है । उन ग्रंथों मे बहुत दिव्य शक्ती है । दुनिया में करोडो मंत्र है, हजारों की संख्या में स्तोत्र है लेकिन स्वामीजीने जो स्तोत्र और मंत्र तैयार किये है वो सर्वश्रेष्ठ है क्योंकी उनमें बहुत दिव्य शक्ती हैं। सभी

देवताओं की प्रसन्नता स्वामीजीने प्राप्त की है। उनके ग्रंथ, स्तोत्र, मंत्र विश्वमें आध्यात्मिक क्रांती लाऐंगे क्योंकी स्वामीजी ईश्वरीय कार्य करने के उद्देशसे इस जगतमें आये हैं।

जो किताबें स्वामीजीने लिखी है, उन किताबों द्वारा भावी काल में पूरी दुनियामें हलचल मचेगी, आध्यात्मिक क्रांती होगी इसके अलावा दैवी लहरीयोंद्वारा वो बहुत कुछ कार्य कर रहे है । इसलिए हमेशा एकांतमें रहते हैं । आपके द्वारा बहुत कार्य होनेवाला हैं । जो आपको सहायता करेंगे उनका भी भला होगा। उन्हे प्रकाशमार्ग मिलेगा । आपका जन्म भी ईश्वरीय कार्य के लिए हुआ है । जितनी भी स्वामीजीकी किताबें आपने प्रकाशित की है उन सभी किताबोंका दुनिया की कई भाषाओं में अनुवाद किया जाएगा ।''

**श्री**स्वामीजींबरोबर मी संपूर्ण हिमालय फिरले. हिमालयातील अनेक जागी श्रीस्वामीजींनी माझ्याकडून साधना करून घेतल्या. **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकाचे लेखन तर हिमालयातच झाले. हिमालयातील अनेक गुप्त स्थानांमध्ये श्रीस्वामीजींबरोबर वास्तव्य करण्याचे भाग्य मिळाले. १९९३ साली श्रीस्वामीजींनी त्यांचे सर्व अधिकार मला दिले. नागार्जुन सागर आश्रमाचे महंत बनविले व आपल्या सिंहासनावर मला बसवून पूर्णाभिषेक केला. आध्यात्मातील सर्व गोष्टी तुम्हाला प्राप्त झाल्या आहेत; आता काही मिळवायचे शिल्लक राहिले नाही असे सांगितले.

श्रीस्वामीजींविषयी लिहायचे ठरविल्यास संपूर्ण आयुष्य पुरणार नाही इतके लिखाण करता येईल. ४०-५० लाख लोकांना श्रीस्वामीजींच्या दिव्यत्वाचे अनुभव आहेत. इतके असूनही पैसा व प्रसिद्धी या दोन्ही गोष्टींपासून ते सतत दूर राहिले. स्वतःच्या पर्सनल खर्चासाठी ते फक्त माझ्याकडून पैसे घेत. इतर कोणाच्या पैशाला ते हात सुद्धा लावत नसत.

प्रेमळ, निरहंकारी असे आठ-दहा भक्त होते जे त्यांच्या नांवाने पैसे बाजूला काढत. हे पैसे अरुण दाभोळकर याच्याकडे गोळा होत. या पैशातून आश्रमातील किरकोळ गोष्टी भागविल्या जात. मुख्य गोष्टींसाठी लागणारा सर्व पैसा ते माझ्याकडून घेत. ते म्हणत...

''माणसाचे ९९ % पाप पैशावर असते. दुसऱ्याकडून पैसे घेणे म्हणजे त्याचे पाप घेणे. त्यामुळे मी पैशापासून दूर रहातो व फक्त ठराविक लोकांचाच पैसा घेतो. ज्यांची आध्यात्मात प्रगती होण्याची शक्यता आहे अशा लोकांकडून मी पैशाच्या रूपाने किंवा अन्य रूपाने सेवा करून घेतो. तुम्ही साक्षात् महालक्ष्मी आहात. तुमच्याकडून पैसा घेतल्याने मला कणभरही दोष लागत नाही म्हणून मी तुमच्याकडून पैसा व माझ्या गरजेच्या वस्तू घेतो.'' अशा प्रकारे त्यांच्या गरजेच्या सर्व वस्तू ते माझ्याकडून घेत व भारतातील विविध ठिकाणी एकांतवासात जाऊन तपस्या करत. ते स्वतः त्या काळामध्ये एका अरण्यातच रहात होते. स्वतःचे वाहन नसेल तर तेरा किलोमीटर आम्हाला चालत जावे लागे. त्या अरण्यातून अधून मधून ते आमच्याकडे येत असत. नागार्जुन सागर (आंध्र प्रदेश) येथे आश्रमाचे काम सुरू झाल्यानंतर म्हणजे १९९१ नंतर ईश्वरी आज्ञेप्रमाणे त्यांनी काही ठराविक लोकांकडून धनसेवा (पैसे) घेण्यास सुरुवात केली. अरुण दाभोळकरकडे सर्व पैसा गोळा होत असे. प्रत्येक माणसाने दिलेला पैसा एका स्वतंत्र पाकिटात ठेवण्यात येत असे व त्यावर त्या माणसाचे नांव लिहिले जाई. अशी सर्व पाकिटे स्वामीजींकडे जात असत. त्यांच्या पासून एक-दोन फूट अंतरावर सर्व पाकिटे पसरवून ठेवली जात. ज्यांनी ज्यांनी पैसा दिला आहे त्यांची नांवे वाचली जात.

पाकिटावरील नांवे वाचताना श्रीस्वामीजी डोळे मिटून ऐकत व ईश्वराचे ध्यान करत. ज्या पाकिटाचा स्वीकार करू नये असे ईश्वराकडून

सांगितले जाई, ते पाकीट त्या माणसाला परत पाठविले जात असे. अशी कितीतरी पाकिटे श्रीस्वामीजींनी परत पाठविली.

डॉ. अल्पा ठक्कर ही लहानपणापासूनच श्रीस्वामीजींची भक्त होती. अल्पा व तिची लहान बहीण मेघल या दोघीही माझ्याबरोबर अरण्यात येत असत. दोघींची ध्यान मार्गात खूप प्रगती झाली होती. ध्यानामध्ये त्यांना दिव्य दर्शने होत. भगवान् श्रीकृष्ण, गायत्री देवी, महालक्ष्मी, गणपती अशा अनेक देव-देवतांची दर्शने या दोघींना झाली. दोघी पुढे डॉक्टर झाल्या. अल्पा लग्न झाल्यानंतर मुंबईतच राहिली व मेघल कॅनडाला गेली. अल्पाने मुंबईत दवाखाना काढला. तिला दररोज जे पैसे मिळत असत, त्या पैशातून ती एका पर्स मध्ये श्रीस्वामीजींच्या नांवाने पैसे बाजूला काढत असे. याशिवाय गोरगरीबांना फुकट औषधे देणे, अनाथ, अपंग, अंध अशा संस्थाना मदत करणे हेही काम ती करत असे. श्रीस्वामीजींनी मला तीस वर्षांपूर्वीच अनाथ, अपंग, अंध अशा संस्थांना मदत करण्यासाठी सांगितले होते. त्याचप्रमाणे आदिवासी शाळांना सर्वतोपरी मदत करण्यास सांगितले होते. माझ्याकडून हा वारसा अल्पा, मेघल तसेच अनेक भक्तांना मिळाला व आजही श्रीस्वामीजींचे काही भक्त कुठल्याही प्रकारची पब्लिसिटी न करता चुपचापपणे हे सर्व काम करत आहेत. अशा प्रकारचे कार्य करणे व आजारी लोकांची सेवा करणे ही माझीच सेवा आहे असे श्रीस्वामीजी म्हणतात. श्रीस्वामीजींच्या काही भक्तांनी दुष्काळ पडणाऱ्या परिसरात जाऊन तेथील जनतेला बोअरवेलचे पाणी उपलब्ध करून दिले आहे. प्रसिद्धी न करता कार्य करणे हे श्रीस्वामीजींचे व त्यांच्या भक्तांचे वैशिष्ट्य आहे.

डॉ. अल्पा ठक्कर दरमहा श्रीस्वामीजींच्या नांवाने पैसे बाजूला

काढत असे व वर्षा-दीड वर्षाने ते सर्व पैसे एका पाकिटात भरून श्रीस्वामीजींकडे पाठवत असे. असेच एकदा श्रीस्वामीजी नागार्जुन सागरला असताना सेवेची काही पाकिटे त्यांच्याकडे आली. त्यात अल्पा ठक्करचेही पाकीट होते. श्रीस्वामीजींनी अल्पा ठक्करचे पाकीट तिच्याकडे परत पाठविण्यास सांगितले व या पाकिटामध्ये १५०० रु. अल्पा ठक्करचे नाहीत, ५००च्या तीन नोटा या अल्पा ठक्करच्या नसून दुसऱ्या कोणाच्यातरी आहेत. त्यामुळे तुझे पाकीट नाकारण्यात आले असे तिला कळविले.

अल्पा ठक्करला पाकीट मिळाल्यानंतर तिने श्रीस्वामीजींना फोन केला व ती श्रीस्वामीजींना म्हणाली...

''माझ्या दवाखान्यात जे पैसे गोळा होतात त्यातून थोडे पैसे बाजूला काढून मी एका स्वतंत्र पाकिटात ठेवते. असे असताना पाचशेच्या तीन नोटा अल्पाच्या नाहीत असे तुम्ही म्हणता याला काही अर्थ आहे का?''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''त्या पाकिटात पाचशेच्या तीन नोटा तुझ्या नाहीत. या तीन नोटा बाजूला काढल्या शिवाय माझा देव तुझे पैसे घेणार नाही. ज्या पाचशेच्या तीन नोटा तुझ्या नाहीत त्याच नोटा तू बाजूला काढ, मगच तुझे पैसे स्वीकारण्यात येतील!''

यावर अल्पा म्हणाली...

''गेली दीड वर्ष मी हे पैसे साठवत आहे. यात दुसऱ्या कोणाचेही पैसे नाहीत. तुम्ही म्हणता यात पाचशेच्या तीन नोटा दुसऱ्याच्या आहेत, मी त्या कशा ओळखू व कशा बाजूला काढू?'' यावर श्रीस्वामीजी म्हणाले,

''पाकीट उशाखाली ठेवून झोप! सर्व खुलासा आपोआप होईल.''

त्या रात्री प्रार्थना करून अल्पाने पैशाचे पाकीट उशाखाली ठेवले. अल्पाला त्या रात्री पाचशेच्या तीन नोटा व त्यांचे नंबर्स दिसले व त्याचप्रमाणे नोटा कोणाच्या हेही तिला कळले.

सकाळी उठल्यावर तिने प्रथम स्वप्नात दिसलेल्या पाचशेच्या तीन नोटा बाहेर काढल्या व मला फोन करून सर्व हकिकत सांगितली.

अल्पा म्हणाली...

''आमच्या शेजारी एक गुजराथी बाई रहाते. या बाईच्या घरातील सर्व लोकांना मी ट्रिटमेंट देते. त्यांच्याकडून कधीही पैसे घेत नाही. गेल्या दीड वर्षामध्ये ती बाई तीन वेळा माझ्या दवाखान्यात आली. माझ्याकडून औषधोपचार घेऊन झाल्यावर प्रत्येकवेळी तिने मला पाचशे रुपयाची एक नोट दिली व म्हणाली हे पैसे मी तुला देत नसून तू जे काही दान-धर्म करतेस त्या दान-धर्मात माझे पाचशे रुपये देऊन टाक, असे बोलल्याकारणाने तिने दिलेले पैसे मी श्रीस्वामीजींसाठी केलेल्या पाकिटात टाकले. अशा प्रकारे गेल्या दीड वर्षात पाचशेच्या तीन नोटा श्रीस्वामीजींच्या नांवाने ठेवलेल्या पाकिटात गेल्या. पण आश्चर्य वाटते की श्रीस्वामीजींनी पैसे परत पाठविले व बरोबर तीन नोटा बाजूला काढायला सांगितल्या. आता मी त्या नोटा बाजूला काढल्या व तुम्हाला फोन केला.''

माझ्याशी फोनवर बोलल्यानंतर अल्पाने श्रीस्वामीजींना फोन केला व सर्व हकिकत सांगितली तेव्हा श्रीस्वामीजी तिला म्हणाले...

''त्या स्त्रिचे पंधराशे रुपये देवाच्या नांवाने ठेवलेल्या पाकिटात ठेवले गेल्याकारणाने त्या स्त्रिच्या प्रारब्धातील भोग गेली दीड वर्षे हवेत लटकत राहिले आहेत. आता त्या पाचशेच्या तीन नोटा तू त्या बाईला परत दे व पुढे काय होते ते पहात रहा.''

अल्पा त्या बाईकडे गेली पाचशेच्या तीन नोटा त्या बाईला दिल्या व म्हणाली...

''गेल्या दीड वर्षात तू मला या पाचशेच्या तीन नोटा दिल्या व दान-धर्म कर म्हणून सांगितलेस पण कोठे व कोणाला दान-धर्म करायचा हे मला समजले नाही, तेव्हा तुझ्या या नोटा परत घे.'' असे म्हणून त्या स्त्रीला नोटा परत दिल्या.

त्यानंतर काही दिवसातच त्या स्त्रिचे काही गुन्हे उघडकीस आले व पोलीसांनी तिला अटक केली.

माणसाचे ९९% पाप हे पैशावर असते व दान केले असता प्रारब्धातील भोग टळतात हे अल्पाच्या या कथेवरून लक्षात येते.

अल्पा व मेघल या दोघीही इतक्या हुशार होत्या की प्रत्येक परीक्षेत त्यांना ९८-९९% मार्क मिळायचे. त्यांची पुस्तकेच्या पुस्तके पाठ असायची. अल्पा फर्स्टक्लास मध्ये एम्. बी. बी. एस्. झाली. मेघलच्या एम्. बी. बी. एस्. ची चिंता कोणालाच नव्हती कारण ती अल्पा इतकीच हुशार होती. असे असताना एम्. बी. बी. एस्. च्या फायनल परीक्षेत दोन विषय सोडून इतर सर्व विषयात ती फर्स्टक्लास मध्ये पास झाली होती. दोन विषयात ती फेल झाली होती. सर्वांना खूप मोठा शॉक बसला. प्रत्येक विषयात ९८-९९% मार्कस् मिळवणारी मुलगी कधी फेल होईल असा विचार कोणाच्याही मनात कधी आला नाही. परंतु नशीब, प्रारब्ध यांचेही काही विचित्र खेळ असतात हेच खरे!

सुदैवाने श्रीस्वामीजी अरण्यातून आमच्या घरी दोन-तीन दिवसांसाठी आले होते. त्यांना ही बातमी ऐकून धक्का बसला. त्या रात्री त्यांनी ध्यान केले. मेघल आमच्याकडेच रहात होती. सकाळी

सहा वाजता त्यांनी मला व मेघलला आपल्या खोलीत बोलावले व मेघलला म्हणाले...

"मुळीच काळजी करू नकोस. दोन्ही पेपर्समध्ये तुला फर्स्टक्लास मिळाला आहे. फक्त शनि महाराजांनी माया केली आहे. त्यामुळे तू दोन पेपर्समध्ये नापास झाली, असा रिझल्ट लागला आहे. आता मी सांगतो तसे कर म्हणजे शनिची माया दूर होईल.

आता तू आंघोळ करून स्वतःच्या हाताने बटाटा भजी तयार कर. या कामात ताईंची अथवा कोणाचीही मदत घेऊ नकोस.

बटाटा भजी तयार करून ती सर्व भजी एका ताटात भरून गॅलरीत ठेव. लक्षात घे, भजी करताना भज्यांचे बारीक तुकडे उरतात हे सर्व तुकडे त्या ताटात गेले पाहिजेत.

गॅलरीमध्ये भजी ठेवल्यानंतर कावळे येतील, सर्व भजी व भज्यांचे तुकडे खातील. दोन भजी प्रसाद म्हणून तुझ्यासाठी ठेवतील. संध्याकाळी सात वाजल्यानंतर तू ताट गॅलरीतून घरात आण. त्यात दोन भजी असतील ती तू शनिचा प्रसाद असे समजून एकट्याने खा. इतर कोणाला देऊ नकोस व उद्या रिव्हॅल्युएशनसाठी (पुनर्तपासणी) अर्ज कर!"

मी व मेघल, श्रीस्वामीजी जे काही सांगत होते, ते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होतो, सर्वकाही अचंबित करणारे होते.

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे मेघलने बटाटा भजी तयार केली, गॅलरीमध्ये नेऊन ठेवली व दरवाजा लावला. त्यावेळी सकाळचे सुमारे दहा वाजले होते. संध्याकाळी सात वाजता तिने गॅलरीचा दरवाजा उघडला. श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे त्या ताटामध्ये दोन भजी

शनिदेवाने प्रसाद म्हणून ठेवलेली होती व बाकी सर्व भजी कावळ्याने खाल्ली होती.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''मेघल तुझे काम झाले. तू एम्. बी. बी. एस्. फर्स्टक्लास मध्ये पास आहेस.'' दुसऱ्या दिवशी रिव्हॅल्युएशनसाठी अर्ज केला व काही दिवसातच पोस्टाने रिव्हॅल्युएशनचा रिझल्ट आला. मेघल दोन्ही विषयात फर्स्टक्लासने पास झाली होती.

हा प्रसंग ज्या दिवशी घडला त्या दिवशी श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''मनुष्यजन्म हे आत्म्याला मिळालेले एक खूप मोठे वरदान असून आध्यात्मिक प्रगती करून मनुष्य, देवता पदाला जाऊ शकतो. पण आध्यात्मिक प्रगती न करता मनुष्य जर स्वार्थाचाच विचार करत राहिला तर त्याची अधोगती होते व परत लवकर मनुष्यजन्म मिळत नाही.''

**श्री**स्वामीजींच्या वास्तव्यामुळे आमच्या घरामध्ये सदैव दैवी स्पंदने जाणवत असत व या दैवी स्पंदन लहरींचा फायदा माझ्या घरी येणाऱ्या सर्वांनाच मिळत असे.  अशा दिव्य स्पंदनामध्ये राहिल्याकारणाने माझ्याकडे काम करणाऱ्या मुलींना सुद्धा या दिव्य शक्तींचा अनुभव येत असे.

**ज्यो**त्स्नाची लहान बहीण शैला ही सुद्धा अधून मधून ज्योत्स्नाबरोबर येत असे. श्रीस्वामीजींनी मला श्रीमहालक्ष्मीची एक मूर्ती दिलेली आहे. ही मूर्ती अधून मधून तिच्याशी बोलत असे.

एकदा देवीने शैलाला विचारले, 'तुला काय हवे?'

यावर शैला म्हणाली, 'मला परिक्षेत पास कर!' तेव्हा ती आठव्या इयत्तेत होती व आपण नापास होणार अशी भीती तिला वाटत होती. त्यावर्षी ती चांगल्या मार्कांनी परिक्षेत पास झाली.

एकदा बरेच दिवस शैला आली नाही. ज्योत्स्ना किंवा तिची आई येऊन काम करून जायची. बऱ्याच दिवसांनी जेव्हा शैला आली तेव्हा देवीने, 'तू खूप दिवसात का आली नाहीस?' असे विचारले. 'कमीत कमी आठवड्यातून एकदा तरी येत जा...!' असे देवीने तिला सांगितले.

**स्मि**ता नांवाची माझी मैत्रिण महिन्यातून दोन-तीन वेळा येऊन ध्यान करत असे. तिला माझ्या घरामध्ये देव-देवतांची दर्शने होत असत. अधून मधून देव-देवता तिच्याशी बोलत व तिला मार्गदर्शनही करत. श्रीस्वामीजींची पुस्तके प्रकाशित होऊ लागल्यानंतर स्मिता आमच्या घरात येऊन एकदा ध्यान करत असताना देवी तिला म्हणाली...

''श्रीस्वामीजींनी लिहिलेली सर्व पुस्तके अदृश्य सृष्टीमध्ये नेली जातात व तेथील आत्म्यांना आध्यात्म कळावे म्हणून ही पुस्तके वाचण्यास सांगितले जाते.''

एकदा असाच अनुभव शैला मसुरकर हिलाही आला. तिचे वडील तिच्या स्वप्नात येऊन म्हणाले, ''आम्ही पृथ्वीतलावर जिवंत असताना अशी पुस्तके जर निर्माण झाली असती व आम्हाला वाचायला मिळाली असती तर आमचासुद्धा उद्धार झाला असता!''

चित्त शुद्धी होता जाण ।

दिसे सर्वत्र नारायण ॥

मी कोण? आलो कोठून ।

आपोआप कळतसे ॥

श्री स्वामी दत्तावधूत

ॐ

# लोकोद्धार कार्य

**श्री**स्वामीजींनी प्रचंड लोकोद्धाराचे कार्य केले. हे कार्य करताना आपली प्रसिद्धी होणार नाही, आपल्या भोवती माणसांचा घोळका जमा होणार नाही, याची दक्षता त्यांनी घेतली. तीस वर्षे सतत त्यांच्या सान्निध्यात राहून त्यांचे लोकोद्धार कार्याचे एक अभिन्न अंग बनल्याकारणाने मला त्यांची कार्यपद्धती जवळून पहायला मिळाली. तसेच या कार्याच्या अनुषंगाने घडणाऱ्या असंख्य लीलाही पहायला मिळाल्या.

त्यांची लोकोद्धार कार्यपद्धती अतिशय अद्‌भुत व अभिनव होती. त्यांच्याबरोबर काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत फिरल्याकारणाने मला बऱ्याच अद्‌भुत लीला पहायला मिळाल्या, त्यातील काही येथे देत आहे.

काश्मिरपासून-कन्याकुमारीपर्यंत व गुजरातपासून- गोहाटीपर्यंत ते लाखो ठिकाणी फिरले व लक्षावधी ठिकाणी त्यांनी आपली दैवीशक्ती ठेवली. श्रीस्वामीजींनी ठेवलेली ही दैवीशक्ती लोकांच्या मनोकामना पूर्ण करण्याचे कार्य करत असे. बऱ्याच वेळा ते एकटे फिरत तर काही वेळा मी बरोबर असे. श्रीस्वामीजी शक्ती कशी ठेवत व पुढे कसे चमत्कार घडून येत, याविषयी मला आलेल्या असंख्य अनुभवांपैकी काही अनुभव पुढे

देत आहे.

एकदा आम्ही आंध्र प्रदेशात प्रवास करत होतो. रस्त्याच्या कडेला एक सुंदर मारुतीची मूर्ती पाहिली. श्रीस्वामीजींनी गाडी थांबवली व तेथे बसची वाट बघत उभ्या असलेल्या लोकांना विचारले, ''मारुतीची मूर्ती उघड्यावर का उभी करून ठेवली आहे? मंदिर का बांधले नाही?''

यावर ग्रामस्थ म्हणाले...

''येथून सुमारे चार-पाच किलोमीटर दूर जंगलामध्ये एक खेडेगाव आहे. तेथील ग्रामस्थांनी मंदिर बांधले व त्या मंदिरामध्ये मारुतीच्या मूर्तीची स्थापना केली. परंतु त्या दिवसापासून गावामध्ये रोज भांडणे व मारामाऱ्या होऊ लागल्या. असे का होते म्हणून ग्रामस्थांनी एकत्र बसून विचार विनिमय केला. तेव्हा मारुतीच्या मूर्तीची स्थापना केल्यापासून हे सर्व प्रकार घडत असल्याचे सर्वांच्या लक्षात आले, म्हणून सर्वांनी मिळून या मूर्तीला येथे रस्त्यावर आणून ठेवायचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी ट्रॅक्टरमध्ये मूर्ती ठेवून येथे आणली व रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवली.''

सर्व हकिकत ऐकून झाल्यानंतर श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''आज हे सर्व लोक या मारुतीच्या मूर्तीला नांवे ठेवीत आहेत. पण मी अशी काही गंमत करतो की, याच गावातील लोक मारुती समोर ठेवलेल्या नारळाचा प्रसाद खाण्यासाठी येथे गोळा होतील.'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी मारुतीच्या मूर्तीवरून हात फिरविला. दोन मिनिटे त्याच्यासमोर उभे राहिले. तीन-चार मिनिटे त्याच्यासमोर बसले व मला म्हणाले, ''चला! जाऊ या!''

मी सुमारे दोन वर्षांनंतर श्रीस्वामीजींच्या दर्शनाला नागार्जुन सागरला गेले होते. तेव्हा श्रीस्वामीजी मला म्हणाले,

“ताई! जरा त्या मारुतीची खबरबात घेऊन या!”

मी त्यांना म्हणाले, “तुम्ही पण चला, आपण जाऊ या!” तेव्हा श्रीस्वामीजी मला म्हणाले...

“मी कशाला तेथे येऊ? तिकडे आता बाजार झाला आहे!”

श्रीस्वामीजींच्या सांगण्याप्रमाणे मी त्या स्थानी गेले. दोन वर्षांपूर्वी भर उन्हामध्ये जेथे मारुतीची मूर्ती दुर्लक्षित अवस्थेत होती, तेथेच अत्यंत सुंदर असे मंदिर झालेले होते. लोक येऊन नारळ फोडत होते व गावातील लोक तेथे उभे राहून प्रसाद खात होते. माझ्या बरोबर असणाऱ्या तेलगु व्यक्तीला मी सांगितले त्यांना विचार, “दोन वर्षांपूर्वी ही मूर्ती उन्हात होती. गावात भांडणे होतात म्हणून गावातील लोकांनी या मूर्तीला रस्त्याच्या कडेला आणून टाकलेले होते. त्याच मूर्तीसाठी इतके सुंदर मंदिर कसे बांधले गेले.” तेव्हा ग्रामस्थ म्हणाले...

“हल्ली हा मारुती खूप चमत्कार करत आहे. लोकांना पावत आहे. लोकांच्या मनोकामना पूर्ण करत आहे. एका श्रीमंत माणसाची मनोकामना पूर्ण झाल्याकारणाने त्याने सुमारे तीन लाख रुपये खर्च करून हे मंदिर बांधले. याशिवाय दर शनिवारी जवळजवळ शंभर-सव्वाशे नारळ या मारुतीसमोर फोडले जातात!”

मी त्या मारुतीचे दर्शन घेतले व आश्रमात परत आले.

अशा प्रकारे निर्जन ठिकाणी, मंदिरांमध्ये, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अशा असंख्य ठिकाणी श्रीस्वामीजींनी आपली शक्ती ठेवली व लोकांचा उद्धार होईल अशी व्यवस्था केली.

**ए**कदा श्रीस्वामीजी श्रीशैलच्या जंगलामध्ये साधना करत होते. तेथे कुमारस्वामी नांवाच्या एका साधूबरोबर त्यांची ओळख झाली. तो

त्यांची सेवा करू लागला. एकदा श्रीस्वामीजींनी कुमारस्वामीला एक वारूळ दाखविले. त्या वारूळातून पांढऱ्या रुईचा एक मोठा वृक्ष वर आलेला होता. पण तो वृक्ष पूर्ण सुकून गेला होता. श्रीस्वामीजींनी कुमारस्वामीला ते वारूळ खोदण्यास सांगितले. कुमारस्वामीने वारूळ खोदले तेव्हा रुईच्या झाडाच्या मुळापासून गणपतीची एक मूर्ती तयार झालेली त्यांनी कुमारस्वामीला दाखविली व ती मूर्ती कुमारस्वामीला पूजेत ठेवण्यास सांगितली.

पांढऱ्या रुईचा वृक्ष जेव्हा एकवीस वर्षांचा होतो तेव्हा त्याच्या मुळाशी गणपतीचा आकार तयार होतो.

असेच एकदा खूप मोठे वारूळ त्यांनी कुमारस्वामीला दाखविले व ते वारूळ साफ करण्यास सांगितले. कुमारस्वामीने ते वारूळ जेव्हा खणून काढले तेव्हा दगडावर कोरलेली देवीची एक मूर्ती आढळून आली. श्रीस्वामीजींनी तेथील आसपासच्या लोकांना त्या मूर्तीची पूजा करायला सांगितली. तेथून श्रीस्वामीजी नागार्जुन सागरला आले. त्या काळात एस्. टी. डी. फोनच्या सुविधा नव्हत्या. मला त्यांनी पत्र लिहून देवीसाठी अलंकार व साज घेऊन या, असे सांगितले.

अलंकार व साज घेऊन मी नागार्जुन सागरला गेले. मला घेऊन ते जंगलात गेले व माझ्या हातून देवीला साज व अलंकार चढविले. अशा प्रकारे अनेक ठिकाणी साधना व तपस्या करून श्रीस्वामीजी आपली शक्ती ठेवत व तेथे लोकांचा उद्धार होईल अशी व्यवस्था करत.

श्रीशैल पर्वतातील अक्कमा बिळम, बाणालोद्दी गुहा, मल्लेलूतीर्थ, उमा महेश्वर, कर्दळीबनम्, सलेश्वरम् अशा निर्मनुष्य अरण्यामध्ये श्रीस्वामीजींनी १९६७ ते १९७० या काळात साधना व तपश्चर्या केली.

आज या स्थानांमध्ये शेकडो लोक दर्शनाला जात आहेत. त्याकाळी अनेक वर्षात तेथे एकही मनुष्य गेलेला नव्हता. जंगलात राहणाऱ्या आदिवासी लोकांना फक्त या जागा माहीत होत्या.

अशा प्रकारे लोकांचा उद्धार व्हावा म्हणून श्रीस्वामीजींनी भारतातील हजारो ठिकाणी शक्ती ठेवली व यासाठीच ते सतत संपूर्ण भारतभर फिरत असत.

१९९२ मध्ये एकदा ते मला अचानक म्हणाले...

''ताई! मी आता पुस्तके व पोथ्या लिहिणार आहे. या पुस्तके व पोथ्यांमध्ये प्रचंड दैवीशक्ती ठेवणार आहे. या पोथ्या व पुस्तकांच्या वाचनाने लोकांना ज्ञानाचा मार्ग मिळेल. त्यांच्या मनोकामना पूर्ण होतील. बाधा व पीडा नष्ट होतील. पूर्वजांचा व पितरांचा उद्धार होईल. देवतांची प्रसन्नता प्राप्त होईल. अशा दैवीशक्ती या पोथ्यांमध्ये मी ठेवीन परंतु यासाठी तुम्हाला खूप कष्ट करावे लागतील.''

यावर मी विचारले, ''मला काय कष्ट करावे लागतील ते सांगा. मी आनंदाने करेन.''

तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले...

''मी जेथे असेन, तेथे तुम्हाला यावे लागेल. मी सांगत जाईन व तुम्ही लिहित जा. पुस्तक लिहून झाले की, तुम्ही ते प्रकाशित करा!''

मी आनंदाने 'हो' म्हणाले! अशा प्रकारे पोथ्यांच्या व पुस्तकांच्या लिखाणास सुरुवात झाली.

श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्यांमध्ये इतके दिव्य सामर्थ्य आहे की या पोथ्यांनी आत्तापर्यंत लाखो लोकांचे कल्याण केले आहे. लाखो लोकांना आध्यात्मिक बनविले. याविषयी जितके लिहावे तितके

थोडेच आहे.

**श्री**स्वामीजी संपूर्ण भारतभर सात-आठ वर्षे पायी फिरत होते. या काळात ते कोणाकडे काहीही मागत नसत. काही खात नसत. अगदी आग्रह करून कोणी दिल्यास चहा, दूध व फळे घेत परंतु जो कोणी भेटेल त्याची इच्छा मात्र ते पूर्ण करत असत.

असाच प्रवास करत एकदा ते शेगांवला पोहोचले. दर्शन घेऊन त्यांनी मोकळ्या हॉलमध्ये आसन मांडले.

श्री गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन दुसऱ्या दिवशी त्यांनी माहूरगडावर प्रयाण केले. रेणूका देवीचे दर्शन घेऊन पायऱ्या उतरून एके ठिकाणी ते विश्रांती घेण्यासाठी बसले. इतक्यात एक मनुष्य तेथे आला व त्याने श्रीस्वामीजींशी गप्पा मारण्यास सुरुवात केली. हा मनुष्य शिक्षक होता. महाराष्ट्र, मध्यप्रदेशाच्या सीमेवर त्याचे गाव होते. गप्पांच्या ओघात तो म्हणाला..

''मी गेली सोळा वर्षे श्रीगजानन महाराजांच्या समाधीच्या दर्शनाला येत आहे. पण श्रीगजानन महाराजांनी माझी इच्छा अद्याप पूर्ण केलेली नाही.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''कृपया असे म्हणू नका. ईश्वराची केलेली सेवा कधीही फुकट जात नाही. ईश्वराची सेवा केली की कोणीतरी सत्पुरुष आपल्याला भेटतो व आपली इच्छा पूर्ण करतो. आजकाल सर्वत्र भोंदूगिरी फोफावलेली आहे. त्यामुळे खरा सत्पुरुष भेटायला खूप वेळ लागतो. बरे ते जाऊ दे! तुम्ही कुठली इच्छा धरून श्री गजानन महाराजांच्या दर्शनाला येत आहात ते सांगा!''

यावर ते शिक्षक म्हणाले...

''माझ्या लग्नाला चोवीस वर्षे होऊन गेली. अद्याप मला मूल झाले नाही. वंशाला दिवा म्हणून मला एक मुलगा व्हावा अशी माझी इच्छा आहे व त्यासाठी मी गेली सोळा वर्षे श्रीगजानन महाराजांच्या येथे येऊन नाक घासत आहे, परंतु अद्यापही माझे काम झालेले नाही. त्यामुळे एक प्रकारची उदासीनता आली आहे.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''काळजी करू नका. एक वर्षाच्या आत तुमची ही इच्छा पूर्ण होईल!''

श्रीस्वामीजींच्या बोलण्यावर त्या शिक्षकाचा विश्वास बसला नाही. तो म्हणाला, ''खरेच! मला तुमचा पत्ता द्या, मी तुमच्या दर्शनाला येईन!''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले..

''तुम्ही दरवर्षी श्री गजानन महाराजांच्या दर्शनाला जा. मी एक पत्ता देऊन ठेवतो. त्या पत्त्यावर तुमच्या पत्नीला दिवस गेले की पत्र पाठवा व मुलगा झाला की पत्र पाठवा. ते पत्र मला मिळेल.'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी नागार्जुन सागर येथील पत्ता दिला.

बरोबर चार महिन्यांनी त्या शिक्षकाचे पत्र आले व पत्नीला चौथा महिना सुरू आहे असे कळविले. त्यानंतर मुलगा झाल्याचे त्याचे दुसरे पत्र आले. दोन्ही पत्रात त्याने 'मला दर्शन द्या!' अशी प्रार्थना केली होती. यावर श्रीस्वामीजींनी ''तुमचे काम श्रीगजानन महाराजांनी केले आहे. त्यांच्या समाधीचे दर्शन घेत रहा,'' असे सांगितले व स्वतः अलिप्त राहिले.

अशा प्रकारे वाटेमध्ये जो कोणी भेटेल त्याच्या मनोकामना श्रीस्वामीजी पूर्ण करत. याकरिता ओळखीची किंवा सेवेची त्यांना गरज पडत नसे.

आंध्र प्रदेशातील एका रस्त्याने श्रीस्वामीजी चालत जात होते. दुपारची वेळ होती. रस्त्यावर खडी फोडण्याचे काम करणारे दोन-तीन मजूर व त्यांच्या बायका यांनी समोर येऊन श्रीस्वामीजींना साष्टांग नमस्कार घातला व हात धरून रस्त्याच्या कडेला आपल्या झोपडीत नेले. हा काय प्रकार आहे श्रीस्वामीजींना कळेना. इतक्यात त्यातील एका स्त्रिने सुमारे सहा महिन्यांचे एक मूल श्रीस्वामीजींच्या मांडीवर दिले. त्या स्त्रिच्या नवऱ्याने श्रीस्वामीजींना सांगितले...

"सुमारे दीड वर्षापूर्वी तुम्ही या रस्त्याने चालत आला होता तेव्हा आमच्या लग्नाला बरीच वर्षे झाली, अद्याप मूल नाही अशी प्रार्थना केली होती. मूल होईल असा आशीर्वाद देऊन तुम्ही निघून गेला. त्यानंतर हा मुलगा झाला, याला तुम्ही आता आशीर्वाद द्या!"

एकदा तर माझ्यासमोर एका वृद्ध स्त्रिने श्रीस्वामीजींना प्रार्थना केली, "स्वामीजी माझ्या मुलाला दोन मुली आहेत मुलगा नाही. त्याला मुलगा होईल असा आशीर्वाद द्या!"

श्रीस्वामीजी म्हणाले...

"ठीक! काळजी नको मुलगा होईल!"

आज (२०१४) तो मुलगा आठ-नऊ वर्षांचा आहे.

श्रीस्वामीजी अरण्यात रहात होते. आमची ॲम्बॅसडर गाडी होती. मी ॲम्बॅसडर गाडीने श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जात असे. जेथे श्रीस्वामीजींची झोपडी होती, तेथे मैदान होते. खूप मोठी मोकळी जागा

होती. आमच्या ॲम्बॅसडर गाडीवर श्रीस्वामीजी ड्राइव्हिंग शिकले. ड्राइव्हिंग शिकत असताना ते मला नेहमी म्हणत, ''ताई! तुम्ही पण ड्राइव्हिंग शिका!''

आपल्याला जे काही प्राप्त होते ते सर्व आपल्याला देवच देत असतो अशी माझी श्रद्धा आहे. त्यामुळे प्रत्येक वेळेला मी त्यांना एकच उत्तर देत असे...

''देव मला जेव्हा मारुती ८०० देईल, तेव्हा मी ड्राइव्हिंग शिकेन.'' मी असे उत्तर दोन-तीन वेळा दिल्यानंतर एक दिवस श्रीस्वामीजी म्हणाले, ''मारुती ८००! ती तर तुमचा ड्राइव्हर भाजी आणण्यासाठी वापरेल. तुम्हाला तर त्याहून मोठ्या मोठ्या गाड्या मिळतील.'' श्रीस्वामीजींचे शब्द ऐकून मी तर दचकलेच कारण त्या काळात फियाट, ॲम्बॅसडर व मारुती ८०० या तीनच गाड्या भारतातील रस्त्यावर धावत होत्या.

श्रीस्वामीजींच्या शब्दातील सामर्थ्याची मला कल्पना असल्याने मी त्याच दिवसापासून ड्राइव्हिंग शिकायला सुरुवात केली. मला चांगले ड्राइव्हिंग येऊ लागताच आमच्याकडे मारुती ८०० आली. त्यानंतर हळूहळू गाड्यांची रीघ लागू लागली. मारुती ८०० नंतर झेन, मारुती व्हॅन, एस्टीम, सॅन्ट्रो, तवेरा, होंडा सिटी, मॅक्झिमो, युवा, इनोव्हा व वेन्टो अशा सगळ्या प्रकारच्या गाड्या श्रीस्वामीजींच्या कृपेने मी घेतल्या. त्यांचे आशीर्वाद व शब्द अक्षरशः खरे झाले.

विपन्नावस्थेत राहणाऱ्या अनेक कुटुंबांना त्यांनी संपन्नता प्राप्त करून दिल्याचे मी स्वतः पाहिले आहे. ते जेथे रहात त्यांच्या आजूबाजूच्या परिसरात जेथे कोठे सद्भक्त रहात असतील त्या सद्भक्तांना श्रीस्वामीजींचे

दर्शन घेण्यासाठी त्यांच्या आराध्य देवता दृष्टांत देत असत.

कर्नाटकातील अमृतकुंडावर श्रीस्वामीजी साधना करत होते. त्यांची साधना पूर्ण झाल्यानंतर आम्ही त्यांना आणण्यासाठी अमृतकुंडावर गेलो होतो. तेथे आम्हाला एक मनुष्य भेटला. तो म्हणाला, ''मी श्रीदत्त भक्त आहे व नेहमी गाणगापूरला जातो. श्रीदत्ताने मला दृष्टांत दिला व सांगितले, मी अमृतकुंडावर आलो आहे माझ्या दर्शनाला ये!'' म्हणून मी अमृतकुंडावर आलो. ज्या रूपामध्ये गाणगापूरच्या श्रीदत्ताने मला दर्शन दिले व अमृतकुंडावर येण्यास सांगितले, तेच रूप येथे पाहून श्रीस्वामीजी व श्रीदत्त एकच आहेत हे माझ्या लक्षात आले व मी श्रीस्वामीजींना मंत्र दीक्षा द्या, अशी विनंती केली. श्रीस्वामीजींनी मला ''**श्रीदत्त जय दत्त**'' असा मंत्र दिला व आपण दत्त असल्याची ओळख पटविली.

नागार्जुन सागर येथे एक नवीन सरकारी अधिकारी आला. हा अधिकारी शिर्डीच्या साईबाबांचा भक्त होता. त्याने शिर्डीच्या साईबाबांचे चरित्र वाचले की, आपोआपच त्याचे शिर्डीला जाणे होत असे. अशा प्रकारे वर्षातून दोन-तीन वेळा तो शिर्डीला जात असे.

नागार्जुन सागरला आल्यानंतर त्याने शिर्डीच्या साईबाबांचे चरित्र वाचले, परंतु त्याचे शिर्डीला जाणे होईना! उलट त्याच्या जाण्यामध्ये विघ्ने येऊ लागली. शेवटी त्याने श्रीसाईबाबांना प्रार्थना केली, तेव्हां त्याला दृष्टांत झाला. 'पायलॉन कॉलनी येथील श्रीदत्त पीठम् येथे, मी, श्रीदत्तगिरी यांच्या रूपाने रहात आहे. तेथे जाऊन माझे दर्शन घे!' दुसऱ्याच दिवशी तो अधिकारी आश्रमात आला व त्याने श्रीस्वामीजींचे दर्शन घेतले.

ॐ

# दया-करुणा

**श्री**स्वामीजी अतिशय दयाळू, अतिशय करुणामय व अतिशय परोपकारी होते. त्यांच्या परोपकाराच्या कथा सांगाव्या तितक्या थोड्याच! अगदी लहानपणी ते आपल्या घरातील वस्तू गरजूंना वाटून टाकत असत. स्वतः उपाशी राहून ते भुकेलेल्यांना पोटभर अन्न देत. एखाद्याची भूक व गरज त्यांना आपोआप कळत असे व त्याप्रमाणे ते आवश्यक ती तरतूद करत असत.

एकदा नागार्जुन सागरहून आपल्या काही भक्तांसमवेत ते हैद्राबादला जात होते. वाटेमध्ये माल या गावी एका चहाच्या टपरीजवळ गाडी थांबविली व गाडीतून उतरले. सेवकाला चहा आणायला सांगितला. सर्वांचा चहा पिऊन झाल्यावर भक्त म्हणाले, ‘‘स्वामीजी आपण पुढे जाऊ या का?’’

श्रीस्वामीजी म्हणाले...

‘‘थोडा वेळ थांबा!’’

अशीच पंधरा मिनिटे गेली. श्रीस्वामीजी कोणाची तरी वाट पहात आहेत हे आता बरोबरचे भक्तही समजून चुकले होते. पंधरा

मिनिटानंतर श्रीस्वामीजी म्हणाले...''आणखी एकदा चहा पिऊ या !'' सर्वांचा चहा पिऊन होईपर्यंत आणखी पंधरा मिनिटे गेली. इतक्यात एक ट्रक आला व तो श्रीस्वामीजींच्या ॲम्बॅसडर गाडीजवळ उभा राहिला. त्या गाडीतून पंधरा सोळा माणसे उतरली व ती बोलू लागली...

''यादगिरीच्या नृसिंहस्वामी देवस्थानात गेलो होतो, तेथून परत आलो. हैद्राबाद बस स्टॅण्डवर झोपलो. आमच्याजवळ आठशे रुपये होते. हैद्राबाद बस स्टॅण्डवर आमचे आठशे रुपये कोणीतरी चोरले. आम्ही हैद्राबाद बस स्टॅण्डपासून चालायला सुरुवात केली. या ट्रकवाल्याला थांबवून सर्व हकिकत सांगितल्यानंतर त्याने आम्हाला येथपर्यंत आणून सोडले. आम्हाला माचरल्याला जायचे आहे. आता आम्ही येथून माचरल्याला कसे जाणार? सकाळपासून आम्ही काही खाल्ले पण नाही.''

तेलगु भाषेत तो हे सर्व कोणालातरी सांगत होता.

श्रीस्वामीजींनी त्याला जवळ बोलाविले. श्रीस्वामीजी त्याला म्हणाले, ''तुम्ही पंधरा-सोळा माणसे आहात. तुम्हाला माचरल्याला जायला किती पैसे लागतील?'' त्यावर तो म्हणाला, ''बसने गेलो तर सातशे रुपये लागतात, पण ट्रकने गेलो तर पाचशे रुपयात जाऊन पोहोचू!''

श्रीस्वामीजींनी त्याच्या हातावर दोन हजार रुपये ठेवले व त्याला म्हणाले, ''प्रथम तुम्ही सर्वांनी पोटभर खाऊन घ्या व मग आरामात माचरल्याला बसने जा.'' त्या संकटग्रस्तांना अतिशय आनंद झाला. पैसे घेऊन सर्वजण हॉटेलमध्ये गेले. श्रीस्वामीजींनी आपला प्रवास पुढे सुरू केला.

**ए**कदा श्रीस्वामीजी प्रवास करत असताना त्यांच्या बरोबर श्रीस्वामीजींचा भाचा दिगंबर उर्फ नन्या व अल्पा ठक्कर हिचा मुलगा पार्थ

असे दोघेजण होते. पार्थ केवळ आठ वर्षांचा होता. पार्थ हा श्रीस्वामीजींचा व माझा एवढा वेडा होता की शाळेला सुट्टी लागल्याबरोबर तो श्रीस्वामीजींबरोबर अथवा माझ्याबरोबर रहायचा.

पार्थला भूक लागल्याने एका हॉटेल समोर नन्याने गाडी थांबविली. पार्थ व नन्या दोघेही हॉटेलमध्ये गेले. श्रीस्वामीजी गाडीत बसून राहिले.

गाडीपासून दूर अंतरावर एक चाळीस पंचेचाळीस वर्षांची बारीक किडकिडीत काळी सावळी स्त्री छातीशी गुडघे दुमडून जमिनीवर बसली होती. तिच्यासमोर एक टोपली होती. टोपलीत भाजी होती. भाजी कोणीतरी विकत घेईल म्हणून ती गिऱ्हाईकाची वाट पहात बसली होती. मधूनच कपाळाला हात लावत होती. हा सर्व प्रकार श्रीस्वामीजी दूरून पहात होते. सुमारे अर्धा-पाऊण तासाने नन्या व पार्थ हॉटेलमधून बाहेर आले. श्रीस्वामीजींनी नन्याला गाडी त्या बाईजवळ घेण्यास सांगितले. श्रीस्वामीजींनी त्या बाईकडून एक काकडी घेतली व तिला पाचशे रुपये दिले. ती बाई म्हणाली, ''माझ्याकडे सुट्टे पैसे नाहीत. सकाळपासून एकसुद्धा गिऱ्हाईक आले नाही.'' यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''तू पैसे परत देण्याची आवश्यकता नाही. हे पैसे माझ्याकडून भेट म्हणून तुला ठेवून घे.''

या लोकविलक्षण साधूकडे ती बाई पहातच राहिली कारण आजपर्यंत दहा रुपयाची भाजी पाच रुपयात कशी मिळेल यासाठी घासाघीस करणारी गिऱ्हाईकेच तिने पाहिली होती. ती आपल्याच विचारांच्या तंद्रीत होती.

इतक्यात श्रीस्वामीजी म्हणाले, ''तुझे नांव काय?''

''देवयानी'' ती स्त्री म्हणाली...

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''हे बघ देवयानी, आजपासून बरोबर आठव्या दिवशी मी येथे येईन. तू तुझ्या नवऱ्याला व मुलांना बरोबर घेऊन येथे हजर रहा. मी तुझा भाऊ आहे असे समज.'' असे म्हणून तिला आणखी हजार रुपये दिले. देवयानी या सर्व प्रकाराकडे विस्फारीत नजरेने पहात होती. जे काही घडत होते ते तिच्या बुद्धिमत्तेच्या पलीकडले होते. आकलन शक्तीच्या बाहेरचे होते. ती विचार करत असतानाच श्रीस्वामीजींची गाडी तेथून पुढे निघून गेली.

बरोबर आठव्या दिवशी श्रीस्वामीजी परत आले. नन्या व पार्थ बरोबर होतेच. नन्या गाडी चालवित होता.

देवयानी, तिचा नवरा, दोन मुले व दोन मुली सगळे झाडाखाली उभे राहून श्रीस्वामीजींची वाट पहात होते.

सर्वांनी श्रीस्वामीजींना नमस्कार केला. देवयानीच्या नवऱ्याच्या दोन्ही काखेमध्ये कुबड्या होत्या. तो एका पायावर कुबड्यांच्या आधाराने चालत श्रीस्वामीजींजवळ आला व त्यांना नमस्कार केला.

श्रीस्वामीजींनी देवयानीला विचारले, ''काय झाले?''

यावर देवयानी म्हणाली, ''ट्रकने धक्का दिला व मांडीचे हाड मोडले. मांडीमध्ये स्टील रॉड घातलेला आहे.''

यावर श्रीस्वामीजींनी देवयानीच्या नवऱ्याला विचारले, ''तुझे नांव काय?''

तो म्हणाला, ''माझे नांव हरिश्चंद्र पाटील. माझ्या एका मुलीचे नांव स्वाती व दुसरी पूजा. माझ्या मोठ्या मुलाचे नांव प्रणीत व लहान मुलाचे नांव सागर.''

श्रीस्वामीजी म्हणाले...

''हरिश्चंद्र पाटील, तुमच्या दोन्ही कुबड्या जातील. तुम्ही तुमच्या दोन्ही पायावर उभे रहाल. सगळी कामे कराल, काळजी करू नका, श्रीदत्त महाराज तुमच्या पाठीशी आहेत.'' ते देवयानीला म्हणाले...

''मी बरोबर चार दिवसांनी येथे परत येईन. देवयानी, तू येथे हजर असले पाहिजे. मी तुमच्या घरी येणार आहे.'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी देवयानीला पाच हजार रुपये दिले व प्रत्येक मुलाला एक-एक हजार रुपये दिले.

श्रीस्वामीजी तेथून निघाले ते सरळ माझ्या घरी आले. त्यांनी मला सर्व हकिकत सांगितली. मला म्हणाले, ''देवयानीच्या विषयी माझा कार्यभाग संपला आहे. तुम्ही महालक्ष्मी आहात. आता तुमचा कार्यभाग सुरू झाला आहे. चार दिवसांनी आपण जाऊ व त्या सर्वांची तुमच्याशी ओळख करून देतो.''

बरोबर चौथ्या दिवशी आम्ही देवयानीकडे जायला निघालो. देवयानीसाठी सहा साड्या, तिच्या मुलींसाठी सहा-सहा ड्रेस मटेरियलस्, तिच्या नवऱ्यासाठी दोन पॅन्टशर्टचे कापड, मुलांसाठी कपडे व भरपूर खाऊ असे सर्व साहित्य मी बरोबर घेतले होते.

प्रथम आम्ही जेथे देवयानी भाजी विकत होती तेथे गेलो व तेथून देवयानीच्या घरी गेलो. श्रीस्वामीजी त्यांना म्हणाले, ''या ताई तुमची सर्व काळजी घेतील. आजपासून सगळे दुःख विसरा.'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी त्यांना पंचवीस हजार रुपये द्यायला मला सांगितले.

यानंतर श्रीस्वामीजींच्या आज्ञेप्रमाणे मी त्यांचे घर नीट करून दिले व घरामध्ये टी.व्ही, फ्रीज, फर्निचर अशा सर्व वस्तू घेऊन दिल्या. नित्यनियमाने पोथ्या वाचनाने त्यांना खूप दैवी अनुभव आले.

त्यांना आलेले दैवी अनुभव **ईश्वरभक्तीचे अनुभव** नांवाच्या पुस्तकात दिलेले आहेत.

**श्री**स्वामीजींचे बालपण राजापूर जवळील शीळ गावात गेले. त्यावेळी त्यांचे वय चार-पाच वर्षांचे होते. त्या काळामध्ये महादेव गुरव नांवाचा एक चौदा-पंधरा वर्षांचा मुलगा श्रीस्वामीजींच्या आईला पाणी भरून देणे, पावसाळ्यात चार महिने पुरतील एवढी लाकडे फोडून देणे, घर सारवून देणे अशी मदत करायचा. आपल्या आईला केलेली मदत श्रीस्वामीजींनी लक्षात ठेवली. पन्नास वर्षांनंतर श्रीस्वामीजी त्या गावातील महादेव गुरव यांच्या घरी गेले. मीही बरोबर होते. महादेव गुरवांचे घर मोडकळीला आले होते.

"ताई! आपल्याला हे घर पूर्ण नवीन करायचे आहे," श्रीस्वामीजी मला म्हणाले. मी महादेव गुरव यांच्याशी या विषयावर चर्चा केली, तसेच काही भक्त लोकांबरोबर चर्चा केली. एक वर्षात महादेव गुरव नवीन घरात रहायला गेले.

श्रीस्वामीजींनी अशा प्रकारे असंख्य लोकांना मदत केली. त्यांनी लिहिलेल्या पोथ्यांमध्ये तर प्रचंड दैवीशक्ती आहे. त्या पोथ्या वाचल्याने संकटे दूर होतात, आर्थिक परिस्थिती सुधारते, पूर्वजांचा उद्धार होतो, पिशाच्च बाधा व करणी या पासून सुटका होते. अशा काही अनुभवांवर आधारित **ईश्वरभक्तीचे अनुभव** नांवाचे एक पुस्तक आम्ही प्रकाशित केले आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर परदेशातही श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचली जात आहेत व त्यांनाही दिव्य अनुभव येत आहेत.

मी सुमारे तीस वर्षांपासून श्रीस्वामीजींच्या सहवासात आहे. ते सतत एकांतवासात राहतात. दोन-तीन वर्षांनी केव्हांतरी नागार्जुन सागरला थोड्या दिवसांची भेट देतात. त्यामुळे भक्तांचा घोळका असणे हा प्रकार

श्रीस्वामीजींच्या जवळ नाही. ते कितीही दूर असले तरी भक्तांना त्यांचे अनुभव येतच राहतात व श्रीस्वामीजी सदैव जवळ आहेत असा अनुभव येतो. ते चराचरामध्ये भरून राहिलेले आहेत. जे सारखे सारखे दर्शनाला येतात, पुनःपुन्हा दर्शन करू इच्छितात त्यांना ते म्हणतात, ''माझा हाडामांसाचा देह पाहायला कशाला येता, श्वासावर लक्ष ठेवून **''ॐ दत्त ॐ''** अथवा **''सोऽहम्''** म्हणत रहा. तुम्ही जेथे कोठे असाल तेथे आपोआपच तुम्हाला ईश्वराचा साक्षात्कार होईल व माझे दर्शनही होईल.''

**गुं**डूनाना व चेन्नमा यांनी श्रीस्वामीजींची पस्तीस वर्षांहून अधिक काळ सेवा केली. श्रीस्वामीजींनी गुंडू नानाला त्याच्या गावी एक मारुतीचे मंदिर बांधून दिले. जो कोणी दुःखी कष्टी जीव तुझ्याकडे येईल त्याला फक्त विभूती दे. त्याच्या दुःखाचे, कष्टाचे मी निवारण करेन असे सांगितले. त्याप्रमाणे खेडेगावातील गोरगरीबांना गुंडूनाना विभूती देत असत व त्यांच्या दुःखाचे व कष्टाचे निवारण श्रीस्वामीजींच्या दत्त शक्तीने आपोआप होत असे.

आम्ही दोन गाड्या घेऊन गुंडूनानांच्या गावी गेलो. गुंडूनानांसाठी बांधलेले मारुतीचे मंदिर मी पहावे अशी श्रीस्वामीजींची व गुंडूनानांची इच्छा होती. आम्ही गुंडूनानांच्या गावी गेलो व मंदिर पाहिले. तेथे जमलेल्या असंख्य गोरगरीबांना पॅन्ट-शर्ट ची कापडे, साड्या, ड्रेस मटेरियलस् वाटले व आम्ही नागार्जुन सागरच्या दिशेने परत निघालो.

रस्ता अतिशय चांगला होता त्यामुळे आमच्या गाड्या वेगात होत्या. अचानक एके ठिकाणी श्रीस्वामीजींनी गाडी थांबविण्यास सांगितले. एक फाटके कपडे घातलेला दाढीवाला मनुष्य पुढे चालत होता. श्रीस्वामीजींनी त्याला जवळ बोलाविले. जवळ आल्यावर तो चक्क मराठीतून बोलू लागला. मेहबूब नगर डिस्ट्रिक्ट् मधील एका

निर्जन रस्त्यावर एक माणूस मराठीतून बोलतोय हे ऐकून आम्हा सर्वांना आश्चर्य वाटले.

तो माणूस म्हणाला...

''माझे नांव विवेक घाटे, मी पुण्याचा. मी पुण्याहून चालत प्रवासास सुरूवात केली. देहू, आळंदी, पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर व कुरवपूर असा प्रवास करून आता मी पीठापूरम्ला चाललो आहे.''

श्रीस्वामीजी म्हणाले...

''तुम्ही आमच्याबरोबर गाडीने नागार्जुन सागरला चला. तेथून मी तुम्हाला गाडीने पीठापूरम्ला पोहोचवतो.'' यावर विवेक घाटे म्हणाले, '' मी चालत प्रवासाचे व्रत घेतले आहे. पीठापूरम्पर्यंत मी चालत जाणार.''

यावर श्रीस्वामीजींनी त्यांना हजार, बाराशे रुपये दिले, नागार्जुन सागरचा पत्ता दिला व नागार्जुन सागरला जरूर या, म्हणून सांगितले.

आमच्या गाड्या पुढे निघाल्या. आम्ही सर्व नागार्जुन सागरला पोहोचलो. दोन दिवस श्रीस्वामीजींचे सर्व लक्ष चालत येणाऱ्या विवेक घाटे यांचेकडे लागलेले होते. तिसऱ्या दिवशी ते मला म्हणाले, ''आपण विवेक घाटे यांना पहायला जाऊ या!'' असे म्हणून त्यांनी नन्याला गाडी काढायला सांगितली. मी, नन्या व श्रीस्वामीजी असे आम्ही तिघेजण श्री. विवेक घाटे यांना पहायला निघालो. मल्लेपल्लीच्या जवळ आम्हाला विवेक घाटे भेटले. श्रीस्वामीजी त्यांना म्हणाले, ''दिवस मावळेपर्यंत तुम्ही पेद्दउरला पोहोचाल. सकाळी तुम्हाला घ्यायला मी गाडी पाठवितो.''

आम्ही आश्रमात परत आलो. श्रीस्वामीजींनी बाबूला (नन्याचा मोठा भाऊ जो आश्रमात रहातो) विवेक घाटे यांच्या साईजचे दोन शर्ट, दोन पॅन्ट, दोन बनियान व हॅवरसॅक असे सर्व आणायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी नऱ्या गाडी घेऊन त्यांना आणायला गेला व त्यांना घेऊन आश्रमात आला.

आदल्या रात्री विवेक घाटे यांना भगवान् श्री दत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ यांनी मी व श्रीस्वामीजी एकच आहोत, ते सांगतील तसे कर असा दृष्टांत दिला होता. त्यामुळे विवेक घाटे खूपच उत्साहित होते व केव्हा एकदा आश्रमात पोहोचतो असे त्यांना झाले होते. नऱ्याची गाडी पाहताच ते गाडीत बसले व म्हणाले, ''मला प्रथम श्रीस्वामीजींचे दर्शन घेऊ दे! श्रीस्वामीजी, श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीदत्तात्रेय हे सगळे एकच आहेत.''

नऱ्या, विवेक घाटे यांना घेऊन आश्रमात आला. श्रीस्वामीजींनी त्यांना भरपूर पैसे दिले. त्यांच्यासाठी घेतलेले कपडे दिले व साबण आणि तेल सारख्या नित्योपयोगी वस्तू दिल्या व त्यांना म्हणाले, ''आश्रम तुमचाच आहे. कितीही दिवस रहा. मी तुम्हाला गाडीने पीठापूरम्ला सोडतो.'' यावर विवेक घाटे म्हणाले, ''मी चालत जाण्याचा संकल्प केला आहे. मला फक्त मिऱ्यालगुडाच्या रस्त्यापर्यंत तुम्ही गाडीने सोडा तेथून पुढे मी चालत जाईन.''

त्या रात्री विवेक घाटे यांच्या स्वप्नात श्रीदत्त महाराज आले व त्यांना म्हणाले, ''श्रीस्वामी दत्तावधूत व आम्ही एकच आहोत ते जसे सांगतील तसे वागा!'' श्रीदत्तात्रेयांच्या आदेशाप्रमाणे विवेक घाटे यांनी आपला चालत जाण्याचा हट्ट सोडला.

विवेक घाटे आश्रमात १० दिवस राहिले. नंतर बाबू त्यांना घेऊन गाडीने पीठापूरम्ला गेला. देव दर्शन घडविले व दोन दिवस राहून नागार्जुन सागरला परत आले. त्यांना पुन्हा आश्रमात आठ-दहा दिवस ठेवले व नंतर पुण्याच्या गाडीत बसवून दिले. श्रीस्वामीजी एका

अनोळखी माणसाची सुद्धा किती काळजी घेत असत, त्याच्यावर किती प्रेम करत असत, हे दर्शविण्यासाठी मुद्दाम ही गोष्ट मी लिहिली आहे. यावरून भक्तांबरोबर त्यांचे वागणे कसे होते हे सहजच लक्षात येईल.

ॐ

# प्रारब्धात हस्तक्षेप

सुमारे तीस वर्षांपूर्वी श्रीस्वामीजी एका अरण्यात तपस्या करीत होते. वर्षातून एक-दोनदा घाटकोपरला ते आमच्या घरी येत असत. मुंबईतील काही भक्त अरण्यामध्ये श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जात असत. आपल्या भक्तावरील संकट टाळण्यासाठी पुष्कळवेळा श्रीस्वामीजी भक्ताच्या प्रारब्धात हस्तक्षेप करीत व मृत्युपासून त्याचे संरक्षण करीत.

गायकवाड नांवाचे एक वकील मुंबईहून श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ अरण्यात गेले. श्रीस्वामीजींनी त्यांच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला व म्हणाले, ''गायकवाड, तुमच्या हातातील घड्याळ माझ्या सेवकाला द्या व त्याच्या हातातील घड्याळ तुम्ही घेऊन जा!''

असे म्हणून त्यांनी जवळच उभ्या असलेल्या सेवकाला हाक मारली व त्या सेवकाला म्हणाले,''तुझ्या हातातील घड्याळ गायकवाड यांना दे व गायकवाडांचे घड्याळ आजपासून तू वापर!''

गायकवाड यांनी थोड्याशा व्यथित अंतःकरणाने सेवकाला घड्याळ दिले व सेवकाचे घड्याळ आपल्या हातात घातले.

गायकवाड मुंबईला निघून गेले. त्यांच्या हातातील सुमारे दोनशे

पन्नास रुपयांचे घड्याळ श्रीस्वामीजींनी काढून घेतले होते व सेवकाचे सुमारे एकशे चाळीस रुपयांचे घड्याळ त्यांना वापरण्यास दिले होते. या घटनेने ते थोडेसे नाराज झाले होते. श्रीस्वामीजींकडे जाताना परत अंगावर किमती वस्तू ठेवायच्या नाहीत असे विचार करत ते मुंबईला पोहोचले. पण हातातील दोनशे पन्नास रुपयांचे घड्याळ श्रीस्वामीजींनी काढून घेतले होते याच्या वेदना त्यांच्या अंतःकरणाला होतच होत्या. कसेही करून ते घड्याळ परत मिळवायचेच असे त्यांनी मनात ठरविले.

आमच्याशी बोलताना श्रीस्वामीजी आम्हाला नेहमी म्हणत, ''मी कोण आहे ? कोठून जन्माला आलो? कशासाठी जन्माला आलो? मृत्यूनंतर कोठे जाणार? या गोष्टींचा प्रत्येक माणसाने जर विचार केला तर गैरसमज, भांडण, वादविवाद या गोष्टी करण्यासाठी माणसाकडे वेळच शिल्लक राहणार नाही. जेव्हा माणूस या प्रश्नांचा विचार करतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की, मी जन्माला आल्यानंतर एक्स वाय झेड, असे माझे नांव ठेवले गेले. म्हणजे एक्स वाय झेड, माझे खरे नांव नसून ते माझे परिचय लेबल आहे. (आयडेन्टिफिकेशन लेबल) अशा प्रकारे पहिले लेबल चिकटले जाते.''

''मी एक्स वाय झेड धर्माचा आहे, हे दुसरे लेबल चिकटले जाते.''

अशा प्रकारे स्वतःच्या अंगाला अनेक लेबल्स चिकटवीत मी मोठा होत असतो व मोठा होत असतानाच माझा हात, माझा पाय, माझा डोळा, माझे नाक, माझे कान, माझी बुद्धीमत्ता, माझी बायको, माझी मुले, माझा नवरा, माझी नातवंडे, माझे विचार अशा प्रकारे मी मी करत जगतो. म्हातारा होतो व एक दिवस मरून जातो. त्याची अवस्था....

**मी मी हे समजे । परि न उमजे ।**

**कोठील मी ?। कोण मी ?।।**

अशी होते.

'मी' चे वर्णन वर अगदी थोडक्यात केले आहे. याशिवाय प्रत्येक जातीतील प्रथा, कुळाचार, चालीरिती या गोष्टींचा उहापोह येथे केलाच नाही. श्रीस्वामीजी म्हणत...

''अशा प्रकारे मनुष्य 'मी मी' करत जगतो व एक दिवस मरून जातो. पण अखेर पर्यंत त्याला 'मी कोण?' हे कळत नाही व मी कसे वागले पाहिजे हेही त्याला कळत नाही. तो भ्रमात जगतो व भ्रमातच मरतो. कारण तो हे जाणण्याचा कधीही प्रयत्न करत नाही. ईश्वर निर्गुण निराकार आहे. त्या निर्गुण निराकार ईश्वराच्या अनेक काल्पनिक मूर्ती मनुष्य बनवतो व एक नवीन बंधन स्वतःवर निर्माण करतो. पण जसा ईश्वर दिसत नाही तसा माणसाचा श्वासही माणसाला दिसत नाही. न दिसणारा श्वास हाच ईश्वर आहे हे त्याला कधी कळत नाही व म्हणून तो त्या संबंधी कधी विचारच करत नाही. असो!''

घड्याळ परत मिळवायचेच हा विचार गायकवाडांना स्वस्थ बसू देत नव्हता. बरोबर पंधरा दिवसांनी ते श्रीस्वामीजींकडे परत आले व श्रीस्वामीजींना म्हणाले...

''मी माझे घड्याळ परत घेऊन जातो व सेवकाचे घड्याळ सेवकाला परत देतो!''

हे ऐकताच श्रीस्वामीजी एकदम चिडले व गायकवाडांना ओरडले...

''तुम्हाला काय वाटले, मी तुमचे घड्याळ घेतले!'' ''अहो !

घड्याळ्याच्या रूपाने मी तुमचा मृत्यू काढून घेतला आहे!'' ''सत्पुरुषावर विश्वास नसेल तर येता कशाला सत्पुरुषाकडे!'' एवढे बोलून ते अचानक शांत झाले व म्हणाले...''ठीक आहे जा! मी तुमचा जीव वाचवला आहे ! पण घड्याळाचा लोभ धरल्याकारणाने तुमच्या हाताला थोडीशी इजा होईल!''

श्रीस्वामीजींचा अवतार बघून गायकवाड घाबरलेच होते. श्रीस्वामीजींना नमस्कार करून ते मुंबईला निघून गेले.

यानंतर सुमारे दोन महिन्यांनी श्रीस्वामीजी घाटकोपर, मुंबई येथे आमच्या घरी आले होते. अचानक गायकवाड यांचा फोन आला. गायकवाड म्हणाले...

''ताई ! श्रीस्वामीजींच्या दर्शनाला येऊ का?''

मी त्यांना ''जरुर या'', म्हणाले! गायकवाड श्रीस्वामीजींच्या दर्शनाला आले. त्यांना बघून मला थोडासा विस्मय वाटला. त्याच्या एका हाताला प्लास्टर घातले होते व तो हात गळ्यात अडकवलेला होता. बाकी ते एकदम तरतरीत होते.

आत्तापर्यंत मी जेवढी गोष्ट वाचकांना सांगितली यातील मला काहीच माहीत नव्हते. गायकवाडांचा व माझा फारसा परिचय नव्हता. शिवाय ते घाटकोपर पासून दूर बोरीवलीला रहात होते. मी त्यांना काय झाले म्हणून विचारले. त्यांनी मला घड्याळाची सर्व गोष्ट सांगितली. इतक्यात श्रीस्वामीजीही तेथे येऊन बसले. गायकवाडांनी आपली गोष्ट चालूच ठेवली. नंतर ते श्रीस्वामीजींकडे पाहून म्हणाले...

''मालाडला कोणीतरी एक मोठे साधू आल्याची बातमी आम्हाला मिळाली. मी व माझे दोन मित्र रिक्षाने त्यांच्याकडे जाण्यास निघालो.

अचानक रिक्षाला एका डबलडेकर बसने इतक्या जोराने टक्कर दिली की रिक्षाचा चुराडा झाला. रिक्षावाला व माझे दोन मित्र जागीच ठार झाले. एका अद्भुत अदृश्य शक्तीने ॲक्सिडेंट होण्याच्या पाच सेकंद अगोदर मला रिक्षाच्या बाहेर खेचले. तोपर्यंत बसने रिक्षाला धडक दिली होती. माझ्या शरीराला कोठेही एक ओरखडा सुद्धा आला नाही. फक्त मी जेथे घड्याळ बांधत असे तेथे थोडासा मार लागला व बारीक केसासारखे फ्रॅक्चर हाताला झाले आहे. डॉक्टरने प्लास्टर घातले आहे. विशेष म्हणजे एखाद्या प्रेक्षकाप्रमाणे ॲक्सिडेंट कसा झाला हे मी स्वतःच्या डोळ्याने पहात होतो. जवळच असणाऱ्या एस्. टी. डी. बुथवर चालत जाऊन मी फोन करून मित्रांना बोलावून घेतले.

गायकवाड यांनी आपली गोष्ट संपविली व श्रीस्वामीजींना नमस्कार केला.

सत्पुरुष जेव्हा रागावतात तेव्हा तो राग समोरच्या व्यक्तिवर नसतो. त्या व्यक्तिच्या पाठीमागे ज्या वाईट शक्ती असतात त्या वाईट शक्तींना किंवा त्या वाईट प्रारब्धाला आपल्या भक्तापासून दूर करण्यासाठी केलेला प्रयत्न असतो. येथे भक्ताचा अहंकार दुखावला गेल्यास भक्ताकडून चुकीची प्रतिक्रिया होते व या चुकीच्या प्रतिक्रियेने भक्ताचे नुकसान होण्याची शक्यता असते.

एकदा एक भक्त स्पेशल बसने चाळीस माणसांना घेऊन श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ अरण्यात आला. चार-पाच दिवस राहिल्यानंतर तो भक्त श्रीस्वामीजींना म्हणाला, ''आम्ही उद्या सकाळी सहा वाजता निघायचे ठरविले आहे. तेव्हा सकाळी आपली भेट होऊ शकणार नाही म्हणून आत्ताच आपले दर्शन घेतो.'' यावर श्रीस्वामीजी म्हणाले,

''तुमच्या बरोबर स्त्रिया व मुले आहेत. सगळ्यांनाच त्रास होईल असे कशाला करता. मस्त पैकी झोपा, सकाळी आरामात उठा, पोटभर नाश्ता करा व आरामात जा!'' यावर तो भक्त म्हणाला...

''नको स्वामीजी सर्वांना लवकर मुंबईला पोहोचायचे आहे. आम्ही सकाळी सहाच्या आत निघणार आहोत. तुम्ही काही काळजी करू नका.''

श्रीस्वामीजींच्या आग्रहाला न जुमानता ते सर्वजण पहाटे चारला उठले व पाच-साडेपाचच्या सुमारास अरण्यातील रस्त्याने त्यांनी प्रवास करण्यास सुरुवात केली. जेमतेम वीस किलोमीटर त्यांचा प्रवास पूर्ण झाला असेल, इतक्यात मोठा आवाज झाला व गाडीचा एक पार्ट तुटला. गाडी रस्त्यातच उभी राहीली. पुढे दीड दिवसपर्यंत ते सर्वजण रस्त्यात जंगलात उभे होते. तेथे चहा, पाणी, जेवणाची काहीही सोय नव्हती. म्हणून म्हणतात....**''सर देकर गुरु मिले तो भी सस्ता होय.''** खरा सत्पुरुष भेटणे दुर्मिळ असते. भेटला तर त्याच्यावर श्रद्धा बसणे कठीण असते. श्रद्धा बसल्यास त्याची सेवा करणे जमत नाही व इतक्या सर्व गोष्टी जमल्या तर त्याच्या वचनाचा मान राखणे, अशक्यप्राय असते कारण माणसाचा अहंकार सर्वत्र आडवा येत असतो आणि सत्पुरुष जर साधेपणाने वागणारा असला तर सर्व भक्त प्रथम दर्शनी एकच विचार करतात.

''अरे! यांना खिशात टाकणे तर सहज शक्य आहे.'' आणि जेव्हा माणसाच्या मनात असा विचार येतो, तेव्हाच तो सत्पुरुषाला कळलेला असतो.

सत्पुरुषाची कृपा संपादन करण्यासाठी मनाचा सरळपणा

अतिशय आवश्यक असतो. कारण तुमच्या मनातील प्रत्येक प्रवृत्ती कशी आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असते व त्यानुसार ते तुमच्याशी वागत असतात. श्रीस्वामीजी म्हणत,

''पूर्ण जगभर योगाचे क्लासेस काढले जातात. लोक योग शिकण्यासाठी हजारो रुपये खर्च करतात. पण पातंजल योगसूत्रातील पहिले सूत्र

**।। योगःश्चित्तवृत्तिनिरोधः।।**

हे एकच सूत्र पूर्ण आत्मसात करण्यासाठी एक जन्म पुरत नाही.''

ज्याप्रमाणे भाताच्या किंवा गव्हाच्या शेतात उगवलेले तण (अनावश्यक गवत) उपटून टाकावे लागतात, तसे मन व बुद्धीतील कुप्रवृत्ती, अनावश्यक प्रवृत्ती, हेकट प्रवृत्ती, योग्य काय व अयोग्य काय याचा जाणीवपूर्वक विचार करून काढून टाकाव्या लागतात तेव्हा कोठे योगाचा अर्थ कळतो. खरा गुरु आपल्या भक्ताला आवडणार नाही अशा गोष्टी करायला लावतो व हेकट प्रवृत्तीवर कसा विजय मिळवायचा याचे प्रॅक्टिकल शिकवतो. हे सर्व इतक्या बेमालूम पद्धतिने चालू असते की वर्षानुवर्षे सिद्ध गुरुच्या सहवासात राहणाऱ्या कोणालाही याचा काहीच पत्ता लागत नाही.

मला याचे असंख्य अनुभव आहेत. ते सर्व लिहायचे ठरविल्यास हजार पानांचा ग्रंथ होईल. सोप्या भाषेत जे काही सांगता येईल ते सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

माणसाला जे काही सुख-दुःख भोगावे लागते किंवा अदृश्य सृष्टीतून त्याला जी मदत मिळते किंवा फटके खावे लागतात, या सर्वांचे

मूळ त्या माणसाच्या अंतरंगातील चांगल्या वाईट प्रवृत्तीमध्येच असते.

भक्तातील वाईट प्रवृत्तीमुळे त्याला या जन्मी किंवा पुढच्या जन्मी काही त्रास होऊ नये म्हणून श्रीस्वामीजी त्याच्यातील ती वाईट प्रवृत्ती निघून जावी म्हणून खूप प्रयत्न करीत.

भक्ताच्या भल्यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न बघून मला श्रीस्वामीजींची दया येत असे. तुमचे हे सूक्ष्म आध्यात्म लोकांना कळत नाही. लोकांच्या भल्यासाठी तुम्ही इतके प्रयत्न कशाला करता? कारण लोकांना फक्त एवढेच वाटत असते की, श्रीस्वामीजींनी आमच्या हाकेला धावून यावे, आमच्या इच्छा व गरजांची पूर्ती करावी, आमच्या संकटांचे निवारण करावे व आम्हाला आनंद देत रहावे. आमच्यातील अहंकाराला खत पाणी घालावे. त्याला दुखवू नये. आमच्यातील दोष आम्हाला दाखवू नयेत. जर त्यांना सुधारण्याची इच्छा नाही तर तुम्ही त्यांना सुधारण्याचा प्रयत्न का करता? मी स्वामीजींपेक्षा फक्त एक वर्ष वयाने मोठी होते पण ते मला आईचा मान देत व म्हणत... ''श्री रामकृष्ण परमहंसांनी ज्या जगन्मातेची उपासना केली त्या तुम्हीच आहात.''

ते मला इतका मान देत असल्याने मीही त्यांच्या बरोबर अगदी मोकळ्या मनाने बोलत असे, तेव्हा ते मला म्हणत...

''हे पहा! या भक्तामध्ये एक प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती जर गेली नाही तर या जन्माच्या अखेरीस मृत्युपूर्वी त्याला खूप यातना भोगाव्या लागतील व पुढच्या जन्मी अनेक त्रास भोगावे लागतील.''

एखादा मनुष्य पुढच्या जन्मी कुठल्या प्राण्याच्या रूपाने जन्माला येणार हेही त्यांना कळत असे व मनुष्य रूपाने जन्माला आल्यास त्याचे

नशीब कसे असेल हेही त्यांना कळत असे. पुष्कळवेळा एखाद्या प्राण्याकडे पाहून हा प्राणी पूर्वजन्मी मनुष्य होता व मनुष्य असताना त्याने कशा प्रकारची कर्मे केली म्हणून हा प्राण्याचा जन्म त्याला प्राप्त झाला, हे ते मला समजावून सांगत असत.

श्रीस्वामीजींच्या अरण्यातील आश्रमात खूप गायी होत्या. त्यातील एका कपिला गाईला श्रीस्वामीजी भरपूर शिजवलेले अन्न खायला घालत. चांगले ताजे अन्न खायला घालत. तिच्या डोळ्यातून सतत अश्रूधारा वाहत असत. तिच्या पाठीवरून ते हात फिरवीत असत.

तिच्या विषयी श्रीस्वामीजी मला म्हणाले, ‘‘ही गाय पूर्वजन्मी ब्राह्मण जातीतील स्त्री होती.’’

**ना**शिक जवळील सोमेश्वर येथे गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर श्रीस्वामीजी साधना करत होते. एक भुकेलेला कुत्रा काही खायला मिळेल का? हे शोधत होता. एक-एक फूटावर वास घेत होता.

श्रीस्वामीजींनी त्याला खायला घालण्यास सांगितले. आमच्या गाडीमध्ये नेहमी खाण्याचे विविध पदार्थ असत. त्यातून पक्षांना दाणे, कुत्र्यांना व गायींना खाण्याचे पदार्थ व लहान मुलांना बिस्किटे असे आम्ही वाटत असू. परंतु त्या दिवशी गाडीत काहीच नव्हते. सर्व पदार्थ वाटून संपले होते व नाशिक पंधरा किलोमीटर दूर असल्याने खरेदी करणे राहून गेले होते. मी जवळच असलेल्या हॉटेलमध्ये गेले व तेथून खाण्याचे भरपूर पदार्थ आणले. वडा-पाव, भजी असे खाण्याचे पदार्थ आणत असताना अजून तो कुत्रा तेथे असेल का? असे विचार मनात येत होते. सुदैवाने कुत्रा तेथेच होता व अक्षरशः सहा-सहा इंचावर काही खायला मिळेल का? म्हणून जमीन हुंगत होता.

मी त्याच्यासमोर चार वडा-पाव ठेवले. त्याने ते वडा-पाव दोन-तीन वेळा हुंगले व तो पुढे निघून गेला.

असेच एकदा प्रवास करताना आम्ही एके ठिकाणी थांबलो होतो. एक गाय काही खायला मिळेल का? हे शोधत होती. मी तिच्यासमोर पाच-सहा इडल्या नेऊन ठेवल्या. गाईने दोन-तीन वेळा इडल्या हुंगल्या व पुढे निघून गेली.

वरील दोन्ही घटनांचा अर्थ सांगताना श्रीस्वामीजी म्हणाले, ''हे दोन्ही जीव कुत्रा व गाय पूर्वजन्मी मनुष्य होते. परंतु स्वतःचे पोट भरण्याव्यतिरिक्त त्यांनी संपूर्ण आयुष्यात काहीच केले नाही. कोणावर उपकार केला नाही, कोणाला मदत केली नाही, दान केले नाही त्यामुळे वातावरणातील ईश्वरी सत्तेने कोणाचीही मदत घेण्यापासून त्यांना वंचित केले आहे.

तुम्ही तुमच्या मुलाबाळांसाठी जे काही करता त्याची ईश्वराच्या हिशोबामध्ये नोंद असते. तुम्ही तुमच्या नातवांसाठी जे काही करता त्याचीही नोंद ठेवली जाते व प्राण्याच्या रूपाने जरी जन्म मिळाला तरी या सत्कर्माचा उपयोग होतो. परोपकार व दान करणाऱ्याला पुन्हा मनुष्यजन्म मिळतो व त्याची आध्यात्मिक प्रगती होते.''

**श्री**स्वामीजी व मी एके ठिकाणी गेलो होतो. तेथे एक छोटेसे कुत्र्याचे पिल्लू होते. श्रीस्वामीजींनी त्या कुत्र्याच्या पिल्लावरून हात फिरवला व त्या घरातील मुलांना म्हणाले, ''अरे या पिल्लाचे खूप लाड करा व त्याला भरपूर खायला-प्यायला द्या!''

तेथून निघाल्यावर गाडीत बसल्यावर श्रीस्वामीजी मला म्हणाले...''तो त्या मुलांचा काका आहे !''

आपल्या भक्ताच्या कल्याणासाठी श्रीस्वामीजी कुठल्याही थराला जाऊन कार्य करत असत. त्यामुळे पुष्कळवेळा त्यांचे भक्त स्वार्थापुरता त्यांचा वापर करत व त्यांच्या तोंडावर त्यांची खूप स्तुती करत व पाठीमागे त्यांची निंदा करत असत. श्रीस्वामीजींना हे सर्व कळत असे. पण एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे गडद अंधारात चुकणाऱ्या मानवी नौकांना ते दिशा दाखविण्याचे कार्य करत असत किंवा एखाद्या दिव्याप्रमाणे फक्त प्रकाश देण्याचेच कार्य करत असत. कोणी कितीही निंदा केली तरीही तिकडे लक्ष देत नसत. स्वतःच्या वागण्याविषयी बोलतांना ते ज्ञानेश्वरीच्या तीन ओव्या सांगत.

**गाईची तृषा हरू । का व्याघ्राते विष होऊनी मारू ।।**
**हे नेणेचि काही करू । तोय जैसे ।।१।।**
**घरचिया उजियेडू करावा । का पारखिया अंधारू पाडावा ।।**
**हे नेणेचि पांडवा । दीपु जैसा ।।२।।**
**खांडावया घावो घाली । का लावणी जयाने केली ।।**
**दोघां एकचि साऊली । वृक्ष दे जैसा ।।३।।**

श्री संत ज्ञानेश्वरांनी सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथात सत्पुरुष कसे असतात याचे वर्णन करताना ज्या अनेक ओव्या लिहिल्या आहेत त्यातील श्रीस्वामीजींच्या आवडत्या या तीन ओव्या मी वर लिहिल्या आहेत त्यांचा अर्थ पुढीलप्रमाणे,

‘‘पाणी असा विचार कधीही करत नाही की, गाय हा सात्त्विक व सज्जन प्राणी आहे, त्याची तहान मी भागवेन. वाघ हा क्रूर प्राणी आहे,

त्याला विष होऊन मारून टाकेन. पाणी दोघांचीही तहान भागवते. कारण तहान भागविणे हेच त्याचे मुख्य कार्य आहे. त्याप्रमाणे सत्पुरुष फक्त दुसऱ्याचे भलेच करतात, वाईट करत नाहीत.''

''दिवा असे कधीही म्हणत नाही, की फक्त घरातील लोकांना प्रकाश द्यावा. चोरी करायला आलेल्याला प्रकाश देऊ नये.'' त्याप्रमाणे सत्पुरुष सर्वांना सारखा प्रकाश देत असतात. सर्वांचे कल्याण करण्याचा सारखा प्रयत्न करत असतात. आप-पर किंवा कमी-जास्त असा भेद करत नाहीत. त्यांची प्रत्येक कृती ही भक्ताच्या कल्याणासाठीच असते.

भक्तांची बुद्धी मात्र स्वार्थी व चंचल असल्याकारणाने सत्पुरुष जेव्हा कौतुक करतात, गोड बोलतात तेव्हा भक्ताला वाटते माझ्यावर खूप कृपा आहे व जेव्हा कठोर बोलतात, तेव्हा भक्ताला वाटते आता मी दुसरा गुरु शोधायला हवा कारण या सत्पुरुषांची माझ्यावर काही कृपा नाही. असा भक्त लगेच निंदा करू लागतो, सत्पुरुषाला नांवे ठेवू लागतो पण खरे पाहता कठोर बोलून सत्पुरुष एकाच वेळी अनेक कामे करत असतात.

१) ते भक्ताला पुन्हा मार्गावर आणण्याचा प्रयत्न करत असतात.

२) भक्ताच्या पाठीमागे असणाऱ्या वाईट शक्तींना पळवून लावत असतात.

३) भक्तातील दूषित प्रवृत्तींना हाकलून लावण्याचा प्रयत्न करत असतात.

४) वाईट ग्रहांचे दुःष्परिणाम नष्ट करण्याचा प्रयत्न करत असतात.

५) एखादा भक्त जर सोन्यासारखा मौल्यवान असेल तर त्याला हिऱ्यासारखा बनविण्याचा प्रयत्न करतात.

६) तो जर पवित्र आत्मा असेल तर त्याला देवतात्मा बनविण्याचा

प्रयत्न करतात.

(७) तो जर देवतात्मा असेल तर त्याला वरच्या वरच्या स्टेजेस् देऊन अपग्रेड करण्याचा प्रयत्न करतात.

या सर्व प्रक्रियेतून जात असताना फक्त एकाच गोष्टीची आवश्यकता असते, भक्ताने अहंकाररहित असणे आवश्यक असते. भक्त जर अहंकारशून्य असेल तर ...

**अहंकार गेला । तुका म्हणे देव झाला ।।**

असा अनुभव येतो. मला स्वतःला याचा खूप अनुभव आहे. अगदी दहा-दहा तास मी श्रीस्वामीजींचा ओरडा खाल्ला आहे. परंतु त्यांच्या विषयीच्या माझ्या श्रद्धेत सुईच्या टोका एवढाही फरक पडला नाही. अशा प्रकारे सुमारे बारा वर्षे ओरडा खाल्ल्यानंतर एक दिवस श्रीस्वामीजी आपल्या भक्तांना म्हणाले...

''ताई म्हणजे सोनं आहे. प्रेमाने वागा फरक पडत नाही. प्रेमाच्या पाण्यात त्यांना टाकले तर त्या पाण्याला पवित्र करतात. चोवीस कॅरेटचे सोने आहे म्हणून अग्नित टाकले तर त्या सिद्ध करून दाखवितात, मी हजार कॅरेटचे सोने आहे. हजार कॅरेटचे सोने आहे म्हणून घणाने घाव घालावेत तर त्या सिद्ध करून दाखवितात की, मी जगाला प्रकाश देणारा हिरा आहे.'' अर्थात माझ्या तोंडावर जरी श्रीस्वामीजींनी माझी स्तुती केली तरी मी स्वतःच्या निर्विकारतेला चिकटून राहिले.

या घटनेनंतर वेळोवेळी माझी स्तुती करून तुम्हाला आता दुर्गा स्टेज प्राप्त झाली आहे. जगदंबा स्टेज प्राप्त झाली आहे. परमेश्वरी स्टेज प्राप्त झाली आहे असे सांगितले. अर्थात तुम्हाला जन्मतः षोडषीत्रिपुरसुन्दरी

स्टेज प्राप्त होती. या नंतर महालक्ष्मी स्टेज प्राप्त झाली या गोष्टी त्यांनी अगोदरच सांगितल्या होत्या. ते स्तुती करताना किंवा चिडून ओरडताना दोन्ही वेळेला मी माझी मनःस्थिती स्थिर, अविचल अशी ठेवत असे. मनावर त्याचा कुठलाही परिणाम होऊ देत नसे. यावर विनोद करत एकदा श्रीस्वामीजी म्हणाले,

''ताई म्हणजे अगदी दगडाचे शिवलिंग! यांच्यावर कसलाच परिणाम होत नाही.'' आपल्या भक्तांना ते म्हणाले, ''अहो ! ज्ञानेश्वरी मध्ये श्री ज्ञानेश्वरांनी ब्राह्मी स्थितीचे जे वर्णन केले आहे ते वर्णन ताईंना समोर बसवून केले असावे असे मला वाटते.'' असे म्हणून त्यांनी ओवी म्हटली...

**सुखी संतोषा न यावे । आणि दुःखी विषादा न भजावे ।।**
**लाभा-लाभ न धरावे । मनामाजी ।।१।।**

श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, सुखामध्ये मनाला संतोष वाटू देऊ नका; कारण सुख हे अशाश्वत आहे. तसेच दुःखामध्ये मन विषण्ण होऊ देऊ नका. लाभ झाला असता हर्षित होऊ नका, हानी झाली असता दुःख करू नका. या कुठल्याही गोष्टीचा मनावर परिणाम होऊ न देणे, ही **ब्राह्मीस्थिती!**

सत्पुरुष कसे असतात हे मी सांगत होते. हे सांगता सांगता, सत्पुरुषांचे रागावणे हे कसे परोपकारी असते हे सांगताना मी माझे अनुभव सांगितले. आता ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या ओवीच्या अर्थाकडे लक्ष देऊ! संत कसे असतात याच्या दोन ओव्यांचा अर्थ मी पूर्वीच सांगितला. आता तिसऱ्या ओवीचा अर्थ असा...

''ज्याप्रमाणे एक विशाल वृक्ष, जो वृक्षारोपण करतो, त्याला

सावली देतो व जो जंगल तोड करतो, त्यालाही सावली देतो. सत्पुरुष हे निंदा करणाऱ्याचेही कल्याण करतात व वंदन करणाऱ्याचेही कल्याण करतात असे श्री ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.''

या प्रकारेही श्रीस्वामीजींनी माझी परीक्षा पाहिली.

सर्वांना प्रेम देणे, सर्वांना मदत करणे, कुठल्याही व्यक्तीत कुठलाही दोष न पहाणे व शक्य असेल तितके दुसऱ्यासाठी झटत राहणे. या माझ्या स्वभावाला श्रीस्वामीजींमुळे खूपच उजाळा मिळाला, या स्वभावात प्रचंड वाढ झाली. त्यांनी माझ्या हातून प्रचंड कार्य करून घेतले. किती कार्य करून घेतले याची मला काही आठवण नाही. सर्व कार्य श्रीस्वामीजी लक्षात ठेवत व भक्तांसमोर सांगत व मी निर्विकारपणे श्रीस्वामीजी कुठल्यातरी भक्ताचे वर्णन करत आहेत अशा प्रकारे ऐकत असे. अशा माझ्या मानसिक अवस्थेची परीक्षा म्हणून की काय, अचानक श्रीस्वामीजींच्या अनेक भक्तांनी माझी निंदा करण्यास सुरुवात केली. सुमारे दहा वर्षे मी हे सर्व सहन केले. दहा वर्षांनंतर तेच भक्त मला चांगले म्हणू लागले. विशेष म्हणजे या निंदा करणाऱ्या सर्व भक्तांच्या उपयोगी पडण्याच्या अनेक संधी ईश्वराने मला उपलब्ध करून दिल्या. प्रत्येक वेळी सर्व निंदकांना मी भरपूर मदत केली. ते निंदक आहेत असे मला कधीच वाटले नाही व आजही वाटत नाही. कारण स्तुती करणाऱ्यामध्ये व निंदा करणाऱ्यामध्ये एकच ईश्वर भरलेला आहे असे मला वाटते. माझ्या या अवस्थेचे श्रीस्वामीजींनी एका वाक्यात कौतुक केले.

''ताई! तुमच्या इतकी स्पिरिच्युअल स्टेज जगातील कुठल्याही स्त्रिकडे नाही.'' श्रीस्वामीजी कसे व का रागवत असत याचे वर्णन करता करता मी बरेच काही सांगून टाकले. हे लिहिताना लिहिणारा ईश्वरच होता.

त्यातून ज्यांना काही शिकता येणे शक्य असेल, ते त्यांनी शिकावे. इतरांनी मला नांवे ठेवत बसावे. भक्तांना असे वाटत असे की श्रीस्वामीजींनी आम्हाला आनंद द्यावा, आमच्या इच्छांची पूर्ती करावी परंतु आमच्या प्रायव्हेट लाईफमध्ये त्यांनी लक्ष घालू नये. थोडक्यात भक्तांना असे वाटायचे की, श्रीस्वामीजींनी त्यांचा वापर आम्हाला करू द्यावा. पण आमचे किंवा आमच्या मुलाबाळांचे हित कशात आहे हे सांगू नये. कारण ती अक्कल आम्हाला आहे. श्रीस्वामीजींनी आम्हाला काही शिकवू नये. पण तसे घडत नसे. ते कितीही दूर असले तरी भक्तांच्या जीवनामध्ये ते योग्य ठिकाणी हस्तक्षेप करत. हा हस्तक्षेप ते न बोलताही करत.

**श्रीस्वामीजींनी आई वडिलांच्या विरोधाला न जुमानता अनेक आंतर जातीय व आंतर धर्मिय विवाह लावून दिले.**

## सूर्यनारायण शर्मा

**सू**र्यनारायण शर्माने आपल्या मुलीचे लग्न करायचे ठरविले. आपल्या भावी जावयाला (श्रीहरीला) घेऊन सूर्यनारायण शर्मा नागार्जुन सागर आश्रमात आला.

श्रीस्वामीजी म्हणाले...

''श्रीहरी हा खूप चांगला मुलगा आहे. सुरेखाचे व श्रीहरीचे लग्न मी लावले असे समजा.'' सूर्यनारायण शर्मा, त्याची पत्नी व सुरेखा सर्वांनाच खूप आनंद झाला. सर्वजण आपल्या गावाला निघून गेले.

चार दिवसांनी सूर्यनारायण शर्मा परत आला. श्रीस्वामीजींना म्हणाला, ''हे लग्न होऊ शकत नाही कारण मुलगा जातीने ब्राह्मण नाही.''

श्रीस्वामीजींनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

श्रीस्वामीजी म्हणाले,

“मुलगा सज्जन आहे. तो तुझ्या मुलीची आयुष्यभर काळजी घेईल. तुझी मुलगी सुखी होईल. तू बाप आहेस नां? आपली मुलगी सुखी कशी होईल याचा विचार कर. जातवाले काय म्हणतील याचा विचार करू नकोस!”

सूर्यनारायणला श्रीस्वामीजींचे म्हणणे पटले नाही. मुलीच्या सुखापेक्षा व गुरुच्या शब्दापेक्षा त्याला स्वतःच्या जातीचा अभिमान जास्त महत्त्वाचा वाटत होता. त्याने श्रीस्वामीजींकडे येणे सोडून दिले. पण शेवटी श्रीस्वामीजींनी श्रीहरी व सुरेखाचे लग्न लावून दिले.

श्रीहरी व सुरेखाचे लग्न लावल्यानंतर अनेक ब्राह्मण लोकांनी सूर्यनारायणचे अभिनंदन केले. खरे म्हणजे सूर्यनारायण लग्नाला गेला नव्हता. मुलीच्या लग्नाला न जाताही आंतर जातीय विवाह लावून दिला, म्हणून नातेवाईक व सर्व ब्राह्मण मंडळी अभिनंदन करत आहेत हे पाहून त्याचा भ्रम दूर झाला. त्याने जावयाचे स्वागत केले व तो आश्रमातही येऊ लागला. आता तो भक्तांना सांगतो, श्रीस्वामीजी केव्हा काय किमया करतील सांगता येत नाही. सुरेखाच्या लग्नाला सतरा वर्षे होऊन गेली आहेत. ती तिच्या संसारात सुखी आहे व तिचे आई-वडिलही सुखी आहेत.

१९७५ साली जेव्हा सूर्यनारायण शर्मा व श्रीस्वामीजी यांची ओळख झाली तेव्हा सुरेखा फक्त दोन वर्षांची होती. श्रीस्वामीजींनी या संपूर्ण कुटुंबाचे अनेक प्रकारच्या संकटांपासून संरक्षण केले व शेवटी सुरेखाच्या लग्नामध्ये तिच्या वडिलांनीच निर्माण केलेले विघ्नही दूर केले.

# कल्पना - सुरेंद्र

पुण्यातील कल्पना व सुरेंद्र यांना १९८७ साली श्रीस्वामीजींचे प्रथम दर्शन झाले. त्यांचा मुलगा प्रसाद हा त्यावेळी दीड वर्षाचा होता. प्रसाद श्रीस्वामीजींचा अतिशय आवडता होता. तो त्यांच्या मांडीवर बसून जेवत असे. सुरेंद्र हा बोटीवर रेडिओ ऑफिसर म्हणून काम करत असे. त्याचे सहा महिन्याचे कॉन्ट्रॅक्ट असे. सहा महिन्यानंतर सुमारे दोन महिने त्याला ब्रेक मिळत असे. ब्रेक मिळाल्याबरोबर तो पुण्यात येत असे, प्रसाद व कल्पनाला घेऊन अरण्यात श्रीस्वामीजींच्या सेवेला हजर होत असे. १९९७ साल पर्यंत सर्व सुरळीत चालू होते. १९९७ साली सुरेंद्र श्रीस्वामीजींना म्हणाला...

''श्रीस्वामीजी, ३१ डिसेंबर १९९८ या दिवशी जगातील सर्व रेडिओ ऑफिसर आपआपल्या घरी जातील. त्या दिवशी रात्री बारा वाजताच जगातील सर्व बोटींवरील सर्व सिस्टिम्स कॉम्प्युटराइज होतील. बोटींना रेडिओ ऑफिसर्सची आवश्यकता राहणार नाही. अशा परिस्थितीत मी काय करावे, तुम्ही मला मार्गदर्शन करा.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''खूप अवकाश आहे बघू !''

अशा प्रकारे १९९७ साल संपले. १९९८ साल सुरू झाले. सुरेंद्रची अस्वस्थता वाढू लागली. श्रीस्वामीजींनी मार्गदर्शन करावे म्हणून तो कल्पनाला वारंवार फोन करू लागला.

कल्पना जेव्हा श्रीस्वामीजींशी या विषयावर बोलत असे तेव्हा श्रीस्वामीजी फक्त ''बघू!'' एवढेच उत्तर देत. काहीच बोलत नसत. शेवटी कल्पना सुरेंद्रला म्हणाली, ''श्रीस्वामीजी काहीच बोलत नाहीत तेव्हा तूच

श्रीस्वामीजींना फोन कर!''

नोव्हेंबर १९९८ मध्ये सुरेंद्रने श्रीस्वामीजींना फोन केला व अगदी काकुळतीला येऊन म्हणाला...

''श्रीस्वामीजी, एक महिन्यानंतर बेकारीची कुऱ्हाड माझ्यावर कोसळणार आहे व तुम्ही काहीच बोलत नाही. मी काय करू ते तुम्ही मला आत्ताच्या आत्ता सांगा!''

श्रीस्वामीजी म्हणाले, **''चुप बस! तोंड बंद ठेव, काहीही बोलू नकोस. शांत रहा! चुपचाप दर महिन्याला पगार घेत रहा !''**

श्रीस्वामीजींच्या बोलण्याचा सुरेंद्रला काहीच अर्थ कळला नाही. तो वैतागलेल्या सुरात म्हणाला, ''तुम्ही काय बोलत आहात मला काहीच कळत नाही.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''गप्प बस व काय होते ते पहात रहा! जोपर्यंत कॅप्टन तुला घरी जायला सांगत नाही तोपर्यंत गप्प बसून रहा व दरमहा पगार घेत रहा!''

श्रीस्वामीजींनी जे सांगितले ते ऐकून सुरेंद्रचे डोके एकदम चक्रावून गेले. त्याला काहीच सुचेना व समजेना. त्याने कल्पनाला फोन केला व श्रीस्वामीजी जे काही बोलले ते सर्व सांगितले. यावर कल्पना म्हणाली,

''श्रीस्वामीजींनी तुला गप्प बसायला सांगितले आहे. तेव्हा तू गप्प बसून रहा, पुढे काय होते ते बघ!''

शेवटी तो भयंकर दिवस उगवला. जगातील सर्व रेडिओ ऑफिसर्सना समारंभपूर्वक घरी पाठविण्यात आले. परंतु सुरेंद्र हा रेडिओ

ऑफिसर आहे हे कोणाच्याही लक्षात आले नाही. त्यामुळे त्याला कोणीही ''निरोप'' दिला नाही.

**''चुप बस!'' ''तोंड बंद ठेव!''**

श्रीस्वामीजींच्या या वाक्याचा अर्थ आता सुरेंद्रच्या लक्षात हळूहळू येऊ लागला होता. तरीपण मनात भीती होती, धाकधूक होती. कोणाच्या लक्षात आले तर आपली खैर नाही. छातीत धडधड होत होती.

२ जानेवारी १९९९ रोजी त्याने श्रीस्वामीजींना परत फोन केला. तो श्रीस्वामीजींना म्हणाला,

''श्रीस्वामीजी, सगळे रेडिओ ऑफिसर आपआपल्या घरी गेले. पण मला कोणी 'जा' म्हटले नाही व मी रेडिओ ऑफिसर आहे हे कोणाच्या लक्षात आले नाही, पुढे काय?''

श्रीस्वामीजी म्हणाले...

''काहीही काळजी करू नकोस. ईश्वर तुझ्या पाठीशी आहे. आनंदात रहा! ''

सुरेंद्रचे बोटीवरील जीवन परत सुरू झाले. दर महिन्याला पगार मिळत होता. अशा प्रकारे एक वर्ष गेले. एक वर्षाचा पगार बँकेत जमा झाला.

जानेवारी २००० मध्ये सुरेंद्रने श्रीस्वामीजींना परत फोन केला व म्हणाला...

''श्रीस्वामीजी बोटीवर मला एक वर्ष झाले आहे. पूर्वी मला दर सहा महिन्यांनी ब्रेक मिळायचा. त्यामुळे दोन महिने मी भारतात येऊन रहात असे. सलग एक वर्ष बोटीवरील खाऱ्या हवेत राहिल्या कारणाने

मनाला खूप अस्वस्थता येते. डिप्रेशन आल्यासारखे वाटते मी काय करू?''

श्रीस्वामीजी म्हणाले...

''काही दिवस धीर धर! योग्य वेळी मी तुला काय ते सांगेन!''

मार्च २००० मध्ये सुरेंद्रने परत फोन केला व आपल्याला आता भारतात यायची ओढ लागली आहे असे सांगितले.

श्रीस्वामीजींनी त्याला आणखी काही दिवस तेथेच रहा असे सांगितले.

मे २००० मध्ये सुरेंद्रने परत फोन केला व तो वैतागून श्रीस्वामीजींना म्हणाला....

''माझी आता बोटीवर एक दिवस सुद्धा रहाण्याची इच्छा नाही. मला आता कुठल्याही परिस्थितीत भारतात परत यायचे आहे.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''मी रेडिओ ऑफिसर आहे असे जरी तू नुसते सांगितलेस तर ते तुला ताबडतोब हकलवून लावतील. कदाचित इतके दिवस म्हणजे दीड वर्ष तू बोटीवर का राहिलास? असे तुला विचारतील. म्हणून मी सांगतो तसे कर!''

''३१ मे किंवा १ जूनला तू त्यांना विचार की माझा रिलीव्हर केव्हा येणार? गेल्या दीड वर्षात तुम्ही मला रिलीव्हर दिला नाही व ब्रेकही दिला नाही. मी काय करू ते सांगा. तू असे बोलताच परिस्थितीचे गांभीर्य त्यांच्या लक्षात येईल व तुझ्या पगारापेक्षा जास्त पैसे तुला देऊन ते तुला आभारपूर्वक घरी पाठवतील.''

तीन दिवसांनी सुरेंद्रचा परत फोन आला. तो म्हणाला...

''तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी ऑफिसरला सांगताच बोटीवर स्फोट झाल्याप्रमाणे एकदम हलकल्लोळ उडाला. सगळ्यांची धावपळ उडाली. नुकसान भरपाई सहित मला सर्व पगार देण्यात आला व आभारपूर्वक निरोप देण्यात आला. एक-दोन दिवसात मी येथून निघेन व भारतात परत येईन.''

जून २००० मध्ये सुरेंद्र भारतात परत आला. आयुष्याची सुमारे तीस वर्षे समुद्रावर काढल्याने आता पुण्यात राहून काहीतरी उद्योग करावा असा त्याचा बेत होता.

श्रीस्वामीजी म्हणाले...

''तुला जितके दिवस विश्रांती घ्यायची तितके दिवस घे व अमेरिकेत जाऊन नोकरी कर !''

श्रीस्वामीजींनी जे सांगितले ते सुरेंद्रला मुळीच आवडले नाही. परंतु त्याने तिकडे दुर्लक्ष केले. पुण्यात काहीतरी उद्योग करावा असा त्याचा बेत होता. दिवसामागून दिवस गेले. सुरेंद्रला पुण्यात धंदा करणे जमले नाही. श्रीस्वामीजींना मार्गदर्शन विचारले तर श्रीस्वामीजी आपल्याला ''अमेरिकेला जा!'' असे सांगणार म्हणून तो श्रीस्वामीजींना विचारायला घाबरत होता. त्याने एक पर्यायी मार्ग शोधला. तीन-चार चांगल्या ज्योतिषांना त्याने आपली जन्म पत्रिका दाखविली. त्या सर्व ज्योतिषांनी त्याला सांगितले...

''तुझ्या नशिबात एक रुपयासुद्धा नाही. एक रुपया कमावण्याएवढीसुद्धा पुण्याई तुझ्याकडे नाही. इतकेच नव्हे तर तुझा सख्खा काका अथवा मामा तुला पाच रुपये सुद्धा कर्ज म्हणून देणार नाही.''

ज्योतिषाच्या या भविष्यवाणीने कल्पनाला काळजी वाटू लागली. परंतु सुरेंद्रला आनंद झाला.

आपल्या नशिबात पैसा नाही असे ज्योतिषाने सांगितल्याचे श्रीस्वामीजींना केव्हा एकदा सांगतो असे त्याला झाले होते. चार-चार ज्योतिषांची भविष्यवाणी ऐकल्यानंतर श्रीस्वामीजी किती चुकीचे मार्गदर्शन करत होते हे त्यांच्या लक्षात येईल व मग ते म्हणतील सुरेंद्र मी चुकलो तू अमेरिकेला जाऊ नकोस!

अगदी आनंदाच्या भरात सुरेंद्रने श्रीस्वामीजींना ज्योतिषांची भविष्यवाणी सांगितली व म्हणाला, ''आता मी काय करू ते सांगा. माझ्या नशिबातच पैसा नाही!''

श्रीस्वामीजी शांतपणे म्हणाले...

''मी कोठे म्हणालो, तुझ्या नशिबात पैसा आहे म्हणून! तुझ्या नशिबात पैसा नाही हे खरे आहे, म्हणून तर मी तुला 'अमेरिकेला जा!' असे सांगत आहे, कारण मी तुला डॉलर्स देणार आहे, रुपये नाही!''

सुरेंद्रला काय बोलावे हे कळेना.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''आता मी सांगतो ती भविष्यवाणी ऐक! तू अमेरिकेला जायचे आहे. योग्य वेळी माझे न ऐकल्याने सुरुवातीला तुला थोडा त्रास होईल पण हळूहळू सर्व ठीक होईल. प्रसाद आता सोळा वर्षांचा आहे. लवकरच तो सतराव्या वर्षात प्रवेश करील. त्याचे वय सतरा वर्षे सहा महिने पूर्ण होताच तुझ्या नंतर तो अमेरिकेला जाईल, अमेरिकन मुलीबरोबर त्याचे लग्न होईल. तो अमेरिकन सिटिझन् होईल. अमेरिकेत त्याचे सगळेच चांगले होईल.''

हे सर्व ऐकून सुरेंद्रला काय बोलावे हे सुचेना! श्रीस्वामीजींचे तोंड बंद करण्यासाठी चार ज्योतिषांचे भूत सुरेंद्रने श्रीस्वामीजींसमोर उभे केले पण परिणाम उलटा झाला. श्रीस्वामीजींनी त्याचे व त्याच्या मुलाचे भविष्य सांगून त्याचेच तोंड बंद केले. तरीही त्याच्यातील अहंकार त्याला स्वस्थ बसू देईना! मी कुठल्याही परिस्थितीत अमेरिकेला जाणार नाही हा त्याचा हट्ट कायम होता. शेवटी चार-पाच दिवस गेल्यानंतर श्रीस्वामीजींनी सुरेंद्र व कल्पनाला शेवटचे सांगितले.

श्रीस्वामीजी म्हणाले...

''देवतांनी अंतिम इशारा दिला आहे. अमेरिकेला न गेल्यास अतिशय वाईट दिवस येण्याची दाट शक्यता आहे. आज तुम्ही फियाट कारने फिरत आहात पण सुरेंद्र जर अमेरिकेला गेला नाही तर रिक्षाचे भाडे द्यायलाही पैसे नसतील याची जाणीव ठेवा.'' अतिशय कडक शब्दांमध्ये श्रीस्वामीजींनी सुरेंद्र व कल्पनाला सुनावले.

श्रीस्वामीजींनी प्रसादला एक सायकल भेट दिली होती. त्या सायकलने प्रसाद रोज हायस्कूलला जात असे. श्रीस्वामीजींनी सुरेंद्रला जेव्हा अंतिम इशारा दिला, त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी कल्पनाने श्रीस्वामीजींना फोन करून सांगितले...

''श्रीस्वामीजी, तुम्ही जी प्रसादला सायकल दिली होती ती रात्री चोरीला गेली.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''प्रसादला सांग, काही काळजी करू नकोस! मी तुला स्कूटर घेऊन देईन!'' त्याच बरोबर सुरेंद्रला सांग, ''जास्त हट्टीपणा करू नकोस. माझा नाईलाज होईल. त्याला लवकरात लवकर अमेरिकेला जायला सांग.''

श्रीस्वामीजींनी बोलल्याप्रमाणे प्रसादला स्कूटर घेऊन दिली. सुरेंद्रने आपला हट्ट सोडला व अमेरिकेला गेला. तिकडे सुरुवातीला त्याला थोडे कष्ट सहन करावे लागले. पण नंतर चांगली कमाई होऊ लागली.

सुरेंद्र गेल्यानंतर सात-आठ महिन्यातच प्रसादला अमेरिकेला पाठविले. प्रसादने आपले ग्रॅज्युएशन अमेरिकेला पूर्ण केले. सध्या तो एका कॉस्मेटिक कंपनीमध्ये चांगल्या हुद्यावर नोकरी करत आहे व भरपूर कमवत आहे.

२००९ मध्ये सुरेंद्र अमेरिकेहून भारतात परत आला. त्याला शिपींग कंपनीच्या कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून नोकरी लागली.

अमेरिकेमध्ये प्रसादला जॅनेट नांवाची एक अमेरिकन मुलगी भेटली.

प्रसादने जॅनेटविषयी श्रीस्वामीजींना सांगितले होते. श्रीस्वामीजींनी प्रसादला जॅनेट बरोबर लग्न करायला सांगितले. २०१० साली त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर प्रसादच्या समृद्धीत खूप वाढ झाली. २०१० मध्ये प्रसाद व जॅनेट यांनी एक नवीन कार सुरेंद्र व कल्पनाला भेट म्हणून दिली व अमेरिकेत स्वतःसाठी एक नवीन घर व कार विकत घेतली. सध्या प्रसाद व जॅनेट सुखी असून ते रोज ध्यान करतात, हवन करतात. त्यांच्याकडे एक कुत्री आहे. प्रसाद व जॅनेट जेव्हा ध्यानाला बसतात तेव्हा ती कुत्री त्यांना चिकटून बसते. हवन कुंडातील अग्निची तिला भीती वाटत नाही.

याविषयी एकदा त्याने फोन करून श्रीस्वामीजींना विचारले. तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले...

''ती कुत्री पूर्वजन्मी एक स्त्री होती. कर्म प्रारब्धानुसार तिला कुत्रीचा जन्म प्राप्त झाला आहे. पण काळजी करू नको तिला पुढचा जन्म मनुष्याचा मिळेल.'' श्रीस्वामीजी फोनवरून प्रसाद व जॅनेटशी बोलत होते. प्रसाद व जॅनेट स्पीकरवर श्रीस्वामीजींचे बोलणे ऐकत होते. प्रसाद जॅनेटला श्रीस्वामीजींचे बोलणे इंग्रजीत भाषांतर करून सांगत होता. त्या कुत्रीला पुढील जन्म मनुष्याचा मिळेल असे श्रीस्वामीजींनी सांगताच ती कुत्री आनंदाने उड्या मारू लागली.

आपल्या भक्तांना सुखी करण्यासाठी खरे सत्पुरुष प्रारब्धामध्ये कसा हस्तक्षेप करतात. हे वाचकांना समजावून सांगण्यासाठी मी सर्व लिहिले आहे. परंतु भक्तांचा अगदी स्वतःच्या फायद्यापुरता, स्वार्थापुरता श्रीस्वामीजींचा वापर करणे व नंतर श्रीस्वामीजींना असे काही विसरणे की जणूकाही आपण त्यांना ओळखतच नव्हतो. या प्रवृत्तिचा मला खूप खेद होत असे. याविषयी मी प्रत्यक्ष श्रीस्वामीजींबरोबर कधीही चर्चा केली नाही. पण श्रीस्वामीजींचे मित्र असणाऱ्या हिमालयातील श्री लक्ष्मणदासजीं बरोबर जेव्हा मी याविषयी बोलले तेव्हा ते गंभीरपणे म्हणाले....

''असे लोक मनुष्य नसतात. मनुष्याच्या रुपातील पशु असतात. सत्पुरुषाशी असे वागणाऱ्या लोकांना पुन्हा मनुष्यजन्म मिळत नाही!'' हे ऐकून मला थोडा धक्काच बसला. भक्तांच्या कृतघ्नपणाची जर एवढी मोठी शिक्षा ईश्वर देत असेल तर दुष्ट व राजकारणी लोकांचे काय होत असेल. असे विचार मनात येऊन मी जेव्हा श्री लक्ष्मणदासजींना विचारले तेव्हा ते म्हणाले...

''अशा लोकांविषयी आपण विचार करण्यात काही अर्थ नाही. असे लोक तीस-चाळीस वर्षे जनतेला पीडतात व तीस-चाळीस लाख

वर्षे त्याचे दुष्परिणाम भोगतात!''

मी त्यांना म्हणाले, ''आम्ही तुमच्या दर्शनाला आलो तर श्रीस्वामीजींना आनंद होतो व जरूर जा! म्हणून सांगतात. श्री गिरीशनाथ यांच्याकडे तर लोकांना आग्रह करून करून पाठवितात. पण एखादा भक्त एखाद्या तथाकथित (so-called) साधूकडे गेला तर त्यांना ते तितकेसे पसंत नसते असे का?'' यावर हसत हसत त्यांनी उत्तर दिले...

''कारण ते तथाकथित साधू असतात म्हणून! याशिवाय कुठल्या साधूकडे कुठल्या शक्ती आहेत हे त्यांना माहीत असते म्हणून तुम्ही लोकांनी कोणाकडेही न जाणे जास्त चांगले!''

आश्रमातील माताजी तेथेच बसल्या होत्या. त्या म्हणाल्या...

''अहो तुमच्या स्वामीजींविषयी काय सांगू? आमचे बाबाजी (श्री. लक्ष्मणदासजी) १०८ वर्षांचे आहेत. मी १९६८ सालापासून बाबाजींच्या आश्रमात रहात आहे पण श्रीस्वामी दत्तावधूतांविषयी ते म्हणाले...

''उनके अंदर साक्षात् दत्तभगवान् है। खुद चलकर आते है और हमें दर्शन देते है और क्या चाहिए? मुझे तो बहोत कुछ मिला, मगर मेरे पास आनेवाले सभी लोगोंका भला होगा इतनी दैवीशक्ती वो यहाँ छोडकर जाते है।''

आमचे सर्व संभाषण हिन्दीमध्ये चालले होते म्हणून माताजींनी श्री लक्ष्मणदासजींचे जे शब्द सांगितले ते तसेच्या तसे वर दिले आहेत. श्री लक्ष्मणदासजींनी फेब्रुवारी २०१२ मध्ये देह विसर्जन केला.

जेव्हा माताजींनी वरील उद्गार माझ्याजवळ काढले तेव्हा मला आणखी एक गोष्ट आठवली....

हिमालयामध्ये अकरा हजार फूट उंचीवरील एका गुहेत राहणाऱ्या नेपाळीबाबांकडे जेव्हा आम्ही गेलो तेव्हा नेपाळीबाबा मला म्हणाले...

''माताजी! श्रीस्वामीजीको हमारे यहाँ आठ-दस दिन रहनेके लिए लेकर आईये ना! पिछली बार उन्होंने यहाँ आकर एक घंटा ध्यान किया, तो हमें इतना कुछ मिला जिसके बारेमें हम बोल भी नही सकते। अगर आठ-दस दिन आकर साधना की तो हमारे पूरे जिन्दगीका कल्याण हो जाएगा।''

श्रीस्वामीजींच्या सहवासात रहाणारी, आध्यात्माचा गंधही नसणारी, दुर्गुणी अशी व्यक्ती एखाद्या दुसऱ्या सत्पुरुषाकडे जेव्हा जात असे तेव्हा ते तिला खूप सन्मानाने वागवित. अशीच एक स्त्री एका सत्पुरुषाकडे गेली. त्या सत्पुरुषाने तिला खूप सन्मानाने वागविले व ते सत्पुरुष त्या स्त्रिला म्हणाले...

''तुमच्यामध्ये जे दैवी तेज आहे ते पाहून मी अगदी स्तंभित झालो आहे. 'तुमचे गुरु तरी कोण?' तुमच्या गुरुंनी तुम्हाला इतकी दैवीशक्ती दिली आहे की त्याची किंमत तुम्हाला कळत नसेल, पण मला त्याचे मूल्य माहीत आहे. मी तेहतीस वर्षे माझ्या गुरुंची पहाटे ३ ते रात्री १ वाजेपर्यंत सेवा केली आहे. तरीसुद्धा तुमच्या गुरुंनी तुम्हाला जे काही दिले आहे, त्यातील एक कणभर सुद्धा माझ्याकडे नाही.'' हे ऐकून या स्त्रिला खूप आनंद झाला. फारसा भक्तीभाव नसलेल्या या स्त्रीने हे मला सांगितले होते. याची आठवण होऊन मी श्री लक्ष्मणदासजींना प्रश्न विचारला...

श्रीस्वामीजींचे भक्त जेव्हा दुसऱ्या साधूकडे जातात तेव्हा ते साधू त्यांना खूप मान देतात व पुन्हा पुन्हा या! असे म्हणतात. त्या भक्तांना

वाटते आपण खूप महान आहोत म्हणून हे साधू आपल्याला मान देतात, पण आपले श्रीस्वामीजी आपल्याला काहीच मान देत नाहीत, उलट ओरडतात याचा अर्थ काय?

यावर श्री लक्ष्मणदासजी म्हणाले...

याला दोन अर्थ आहेत.

१) पोस्ट ग्रॅज्युएशन करणारा विद्यार्थी जर के. जी. च्या वर्गात जाऊन बसला व तेथे मिळणारी चॉकलेटस् खाऊन ही शाळा खूप चांगली आहे, हे शिक्षक (टीचर्स) खूप चांगले आहेत असे म्हणू लागला तर पोस्ट ग्रॅज्युएशनचा अभ्यास शिकविणारे शिक्षक ओरडणे स्वाभाविक आहे.

२) दुसरा अर्थ असा आहे की, श्रीस्वामी दत्तावधूतांकडे येणाऱ्या प्रत्येकाला ते भरभरून पुण्याई व तेज देत असतात. फुकट मिळालेली ही पुण्याई व तेज घेऊन एखादा भक्त जेव्हा दुसऱ्या साधूकडे जातो तेव्हा ते तेज व पुण्य तो साधू खेचून घेतो व त्या साधूची भरभराट होते. असे दुसऱ्याच्या पुण्याईवर जगणारे साधू भारतात लाखोंच्या संख्येने आहेत म्हणून ''दिसला साधू की धावला दर्शनाला'' ही प्रवृत्ती श्रीस्वामीजींना आवडत नाही.

ज्याची श्रीस्वामीजींवर काही श्रद्धा, भक्ती नाही, जो कधीच श्रीस्वामीजींकडे येत नाही किंवा फक्त कामापुरताच येतो अशा माणसाचेही श्रीस्वामीजी कल्याण करत असत. असे लोक अतिशय हास्यास्पद पद्धतिने श्रीस्वामीजींशी बोलत, तरीही श्रीस्वामीजी त्यांचे काम करत. याचे एक उदाहरण सांगून हा अभक्तांचा व श्रद्धा नसणाऱ्यांचा विषय येथेच संपवते.

१९७४-७५ साली श्रीस्वामीजी जेव्हा नागार्जुन सागर येथे

एका झोपडीत रहात होते, तेव्हाची ही गोष्ट आहे.

श्रीस्वामीजींकडे खूप लोक येत असत व त्यांचे अक्षरशः कल्याण होत असे. एका माणसाला याचा खूप राग येत असे. तो श्रीस्वामीजींची निंदा करत असे. श्रीस्वामीजींना आपण नागार्जुन सागरहून पळून जायला भाग पाडू असे तो लोकांना सांगत असे. त्याच्या बायकोला व त्याच्या दोन्ही मुलींना श्रीस्वामीजींचे खूप दिव्य अनुभव होते पण त्याही फक्त गरज पडेल तेव्हा श्रीस्वामीजींकडे येत. त्याच्या मुलालाही श्रीस्वामीजींनी खूप चांगला मार्ग दिला होता पण तो कधीही श्रीस्वामीजींकडे आला नाही. फक्त निंदाच करीत असे. मुलाच्या आईने श्रीस्वामीजींना प्रार्थना केल्याने श्रीस्वामीजींनी त्या मुलाच्या आयुष्याला योग्य ती दिशा दिली. अशा या माणसाने एकदा श्रीस्वामीजींविषयी पोलिसात तक्रार केली व श्रीस्वामीजी जेथे झोपडीत रहात होते तेथे पोलिसांना घेऊन आला व चिडून श्रीस्वामीजींना धमक्या देऊ लागला. पोलिसांनी त्याला गप्प बसविले. श्रीस्वामीजींच्या वागण्याने पोलिस इतके खूष झाले की, ते श्रीस्वामीजींचे भक्त बनले.

असा हा मनुष्य बऱ्याच वर्षांनी म्हणजे २००५ साली आपल्या २५ वर्षाच्या नातीला घेऊन श्रीस्वामीजींकडे आला. त्याची नात विशाखापट्टणम्ला कॉलेजमध्ये शिकत होती. आश्रमात आल्यावर दोघांनीही नाश्ता केला व तो आपल्या नातीला म्हणाला, तू येथे बस. मी श्रीस्वामीजींना भेटून येतो असे म्हणून तो श्रीस्वामीजींकडे गेला.

श्रीस्वामीजी औदुंबराखाली बसले होते. तेथे येऊन तो श्रीस्वामीजींना म्हणाला....

‘‘श्रीस्वामीजी माझी नात हल्ली खूप वेड्यासारखी वागते. आम्ही मानसोपचारतज्ञाला दाखविले. पण काहीच उपयोग झाला नाही

म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे. मला माहीत आहे की हे काम तुमच्याकडून होणार नाही पण तुमच्या माहितीत एखादा कोणी मोठा सिद्धपुरुष असेल तर मला सांगा मी माझ्या नातीला घेऊन त्याच्याकडे जाईन व नातीला ठीक करेन.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''तुझ्या नातीला जरा बोलाव तरी, मला बघू दे!'' त्या माणसाने आपल्या नातीला बोलावले. श्रीस्वामीजींनी तिला आपल्यापासून २५-३० फूट दूर भिंतीला टेकून बसण्यास सांगितले व तिच्या बरोबर तेलगुभाषेत कॉलेजमध्ये शिकविल्या जाणाऱ्या विषयावर गप्पा मारल्या. १५ मिनिटांनंतर श्रीस्वामीजी त्या माणसाला म्हणाले, ''हिला आता तुम्ही घेऊन जा!''

यावर तो म्हणाला, ''मी उद्या परत येऊ का?''

तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले... ''आलास तर १०च्या आंत ये कारण मी उद्या बाहेर गावी जाणार आहे.'' दुसऱ्या दिवशी ११ वाजेपर्यंत श्रीस्वामीजींनी त्याची वाट पाहिली, पण तो आला नाही. तेव्हा श्रीस्वामीजींचा सेवक गुंडूनाना याने त्याला फोन केला, तेव्हा तो म्हणाला...

''कशाला येऊ! माझी नात ठणठणीत बरी झाली आहे! म्हणून मी आलो नाही.''

श्रीस्वामीजींकडे येणाऱ्या लोकांमध्ये कसे कसे लोक येत असत याची एक झलक मी येथे दाखविली आहे.

## सर्व सत्पुरुष एकच असतात

निर्गुण, निराकार परमेश्वर एक आहे. त्यामुळे जे

परमेश्वराशी एकरूप झालेले असतात ते सर्व सिद्ध एकच असतात. त्यांचे आंतरिक संबंध असतात. एक सत्पुरुष जे बोलतो, तेच दुसरा सत्पुरुष बोलतो. स्त्री, पुरुष, लहान, मोठा असा भेद नसतो. ही अवस्था प्राप्त होणे खूप कठीण असते. आपल्याकडे येणाऱ्या भक्तांना श्रीस्वामीजी नेहमी श्री गिरीशनाथांकडे पाठवत. ते व मी एकच आहोत असे म्हणत.

एकदा भालचंद्र जोशी नांवाचे एक भक्त श्री गिरीशनाथ महाराजांकडे गेले व श्रीस्वामीजींचा फोटो त्यांना दाखविला व विचारले, ''हे कोण आहेत?''

तेव्हा श्री गिरीशनाथ महाराज म्हणाले, ''हा मीच आहे!''

दुसऱ्या वेळेला गेले तेव्हा एका साधूचा फोटो घेऊन गेले. या साधूचे हजारो भक्त होते व त्याच्या गुरुचे तर लाखो भक्त होते. श्री गिरीशनाथ महाराजांना फोटो दाखवून विचारले, ''हे कोण आहेत?''

श्री गिरीशनाथ महाराजांनी तोंड फिरविले व काही उत्तर दिले नाही. कारण तो खरा साधू नव्हता. फक्त नांवाचाच साधू होता.

सत्पुरुष कधी दोन नसतात. ते एकच असतात. फक्त ते खरे सत्पुरुष असावे लागतात. हे सिद्ध करण्यासाठी आणखी एक गोष्ट सांगते.

श्रीस्वामीजी अरण्यात साधना करत असताना त्यांच्या दर्शनाला एक वयस्क स्त्री येत असे. तिला ते काकी म्हणत.

काकी ज्या गावाहून त्यांच्याकडे येत असत त्या गावापासून ५०-६० किलोमीटर अंतरावर एक खूप मोठे सिद्धपुरुष रहात असत.

श्रीस्वामीजी काकींना म्हणत...

''काकी! तुम्ही सिद्धनाथांच्या दर्शनाला का जात नाही?''

यावर काकी म्हणत, ''तुमच्याकडे आल्यानंतर मनाला खूप

आनंद होतो. तुम्ही खूप चांगल्या चांगल्या गोष्टी सांगता. त्यांच्याकडे गेले तर काही चांगल्या गोष्टी ऐकायला मिळत नाहीत. येणाऱ्या भक्ताकडे ते लक्षच देत नाहीत. शिवाय त्यांच्याकडे गर्दीही खूप असते.''

बऱ्याचवेळा सांगूनसुद्धा काकींनी ऐकले नाही.

एकदा श्रीस्वामीजींनी खूप आग्रह केला, ''काकी तुम्ही त्यांच्या दर्शनाला जा!'' तेव्हा काकी श्रीस्वामीजींना गप्प बसविण्यासाठी म्हणाल्या,

''जसे तुम्ही बोलता, जशा तुम्ही गप्पा-गोष्टी करता, तसा आनंद तेही देतील, असे जर तुम्ही प्रॉमिस करत असाल तर मी उद्या त्यांच्याकडे जाते!''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''प्रॉमिस!'' असे म्हणून त्यांनी एक नारळ त्यांच्या हातात दिला व त्या सत्पुरुषांना देण्यास सांगितले.

श्रीस्वामीजींनी दिलेला नारळ घेऊन काकी सिद्धनाथांकडे गेल्या. सिद्धनाथ आपल्या आसनावर बसले होते, त्यांच्या समोर बरीच माणसे बसली होती. ते काहीही बोलत नव्हते व त्यांच्यासमोर बसलेली माणसे पण काही बोलत नव्हती. दूर उभे राहून काकीने हे सर्व पाहिले. इतक्यात...

सिद्धनाथांनी सर्व लोकांना तेथून जाण्यास सांगितले, काकींना जवळ बोलावले व त्यांच्या बरोबर सुमारे आठ तास बोलले.

## सिद्धपुरुष एकच असतात.

# पूर्वजांचा उद्धार

**ए**कदा मी श्रीस्वामीजींना विचारले, ‘‘काही माणसे खूप गरीब असतात व खूप सज्जन असतात तरीसुद्धा त्यांना खूप दुःख भोगावे लागते, असे का?’’ यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

‘‘मानवाला दुःख भोगावे लागते याची असंख्य कारणे आहेत. पूर्वजन्मामध्ये आपण जी काही चांगली-वाईट कर्मे केली असतील, त्याचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतात. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे पूर्वजांना जर सद्गती प्राप्त झाली नसेल, पूर्वज जर यातना भोगत असतील तर पृथ्वीतलावरील त्यांच्या वंशजांना खूप त्रास भोगावे लागतात. समजा पूर्वज यातना भोगत आहेत व वंशजांना एखादा सत्पुरुष सांभाळत आहे तर त्या सत्पुरुषावरील श्रद्धा उडून जावी असे पूर्वज करतात. सत्पुरुषावरील श्रद्धा उडून गेली की, त्या वंशजाला पूर्वज स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागायला लावतात व मृत्यूनंतर पूर्वज ज्या लोकात आहेत त्या लोकात घेऊन जातात. अशा प्रकारे पूर्वज व त्याचे वंशज पृथ्वीतलावर व परलोकातही यातना भोगत राहतात. याला ठोस असा उपाय अद्याप तरी सापडलेला नाही.

सतत दान करत राहणे व पराकोटीची ईश्वरभक्ती करणे हे दोनच मार्ग मला माहीत आहेत. आपण जे काही दान करतो त्या दानाचे पुण्य चार प्रकारे विभागले जाते. २५% पुण्य आपल्या पूर्वजांना जाते. २५ % पुण्य आपल्या सध्याच्या जीवनात उपयोगाला येते. २५ % पुण्य आपल्या मुलाबाळांच्या उपयोगाला येते व २५ % पुण्य पुढील जन्मात उपयोगी येते. पुण्याई अशा प्रकारे वाटली जात असल्याकारणाने आपण जितकी जास्त पुण्याई करू तितके आपल्यासाठी चांगले असते.’’

यावर मी विचारले, ‘‘आपण श्राद्ध करतो, तिथी करतो यामुळे पूर्वजांचा उद्धार होत नाही का?’’

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

‘‘श्राद्ध विधी करणाऱ्या ब्राह्मणाकडे जर तुमच्या पूर्वजांना सद्‌गती देण्याइतकी योग्यता नसेल तर श्राद्ध विधी करूनही वंशजाची त्रासातून सुटका होत नाही. मनाच्या समाधानासाठी हे विधी जरूर करावेत. पण त्याच बरोबर दान करणे, गाय, कुत्रा व कावळे यांना रोज खाऊ घालणे, पक्ष्यांसाठी दाणा व पाणी ठेवणे, अंध व अपंगांची सेवा करणे अशा गोष्टी करत रहाव्यात. याने पूर्वजांना सद्‌गती मिळण्यास मदत होते. पूर्वजांना सद्‌गती मिळाल्यानंतर वंशजांची सांपत्तिक स्थिती सुधारते व आरोग्यही प्राप्त होते. याच्या जोडीने दररोज दोन तास तरी ईश्वरचिंतन करावे.’’

## आत्मज्ञान

**आ**मचे स्नेही भाई कदम एकदा एका नास्तिक माणसाला घेऊन आमच्या घरी आले. हा नास्तिक मनुष्य खूप शिकलेला होता. आत्मा नाही, देव नाही असे त्याचे ठाम मत होते. तो आपले मत बदलायला कधीच तयार होत नसे. तो मनुष्य पराकोटीचा भोगवादी होता, खावे, प्यावे, मजा करावी असे त्याचे मत होते, परंतु व्यसनी नव्हता. श्रीस्वामीजीं बरोबर बोलल्यानंतर हा सज्जन मनुष्य नक्कीच आस्तिक होईल असे भाई कदम यांना वाटत होते. म्हणून ते त्याला घेऊन आमच्याकडे आले होते.

भाई कदम यांनी त्याला सांगितले होते की, श्रीस्वामी दत्तावधूतांना भेटल्यानंतर तू नास्तिकाचा आस्तिक होशील.

त्यानंतर भाई कदम, तो नास्तिक व श्रीस्वामीजी यांच्यामध्ये पुढीलप्रमाणे संभाषण झाले.

**नास्तिक** – देव आहे का? आत्मा आहे का? माझे मत असे आहे की, देव नाही, आत्मा नाही, परंतु तुमच्यासारखे सर्व साधू संत देव निर्गुण, निराकार आहे असे सांगून पळवाट काढतात. या खोटेपणाचा मला अतिशय राग येतो.

**श्रीस्वामीजी** – आत्मा आहे की नाही किंवा देव आहे की नाही हे विषय आपण तूर्त बाजूला ठेवू! पहिले मला तुम्ही सांगा. तुम्हीतरी सगुण, साकार आहात का?

**नास्तिक** – म्हणजे काय मी चांगला पाच फूट सात इंच उंचीचा, ऐंशी किलो माझे वजन आहे, आपण एकमेकांना पहात आहोत. तरी सुद्धा तुम्ही माझे अस्तित्व नाकारता कसे?

**श्रीस्वामीजी** – तुम्ही फक्त पाच फूट सात इंच व ऐंशी किलो अशी तुमची ओळख करून दिली. परंतु आणखी बऱ्याच गोष्टी तुम्ही सांगितल्या नाहीत. तुमच्या देहामध्ये घणाचे घाव घालूनही तुटणार नाही अशी मजबूत कवटी आहे, एक सांगाडा आहे, बावीस फूट लांब आतडे आहे, शेकडो मैल लांब जातील अशा शीरा आहेत, तरीही देह म्हणजेच मी असे म्हणणाऱ्या तुम्हाला माझे असे म्हणणे आहे की, या तुमच्या देहाचे अस्तित्व शून्य आहे, असे मला म्हणायचे आहे. जर तुम्ही तुमच्या देहाचे अस्तित्व सत्य मानता तर तो कसा निर्माण झाला व त्या देहामध्ये या सर्व गोष्टी कशा निर्माण झाल्या हे सिद्ध करून दाखवा ! कारण तुमची ओळख करून देताना तुम्ही म्हणालात सायन्स व टेक्नॉलजीचे तुम्हाला

बरेच ज्ञान आहे, सायन्स, देव व आत्मा यांना मानत नाही. सायन्सने जे सिद्ध होते तेच मला मान्य आहे. असे तुम्ही म्हणालात म्हणून हा प्रश्न मी तुम्हाला विचारला आहे.

माझे म्हणणे असे आहे की, तुमचा देह सुईच्या टोकाहूनही सूक्ष्म आहे किंबहुना तुमच्या सारखे लाखो करोडो देह एका सुईच्या टोकावर मावतील इतका तुमचा देह सूक्ष्म आहे. आता तुम्ही विचार करायचा आहे की माझा देह सुईच्या टोकावर लाखो-करोडो मावतील इतका सूक्ष्म होता. एवढ्या सूक्ष्मदेहामध्ये घणानेही तुटणार नाहीत अशा हाडांची निर्मिती, जग पाहता येईल असे सुंदर व नाजूक डोळे, सतत पंप करणारे हृदय, सुपर कॉम्प्युटरपेक्षा फास्ट काम करणारा मेंदू या सर्व गोष्टी कशा निर्माण झाल्या व कोणी निर्माण केल्या. सायंटिफिकली तुम्ही एवढ्याच गोष्टींवर विचार करा.

तुमच्यामध्ये असणारे आकर्षण, तुम्हाला होणारी बुद्धी अथवा दुर्बुद्धी, हुशारी अथवा मंदबुद्धी, विकार, वासना इत्यादी प्रवृत्ती, प्रेम व ईश्वरभक्ती, चांगलेपणा, वाईटपणा, परोपकारी वृत्ती अथवा कंजूष वृत्ती या सर्व गोष्टी सायन्स व टेकनॉलॉजीच्या पलीकडील आहेत म्हणून त्यावर विचार करायला मी तुम्हाला सांगत नाही.

**नास्तिक** - श्रीस्वामीजी, तुम्ही विषयाला भरकटत नेत आहात. स्त्री व पुरुषाच्या मिलनातून मनुष्य देह निर्माण होतो. हे मी तुम्हाला सांगायला पाहिजे का? नको ते विषय तुम्ही का बोलायला लावता?

**श्रीस्वामीजी** - काय करणार! तुम्ही देहवादी आहात, भोगवादी आहात. तुमच्यासाठी पोस्टमॉर्टम् करणे आवश्यक आहे. अहो! पुरुषाच्या शरीरातून जेव्हा वीर्य बाहेर पडते त्यावेळी बाहेर पडलेल्या वीर्यातून

सुमारे तीस कोटींहून अधिक मानवी देह तयार होऊ शकतात; इतका मानवी देह सूक्ष्म आहे. सूईच्या टोकाहूनही सूक्ष्म! इतक्या सूक्ष्म अस्तित्वामध्ये अस्थिपंजर, पंपिंग करणारे हृदय, पोट, आतडी, शीरा, कॉम्प्युटरप्रमाणे काम करणारा ब्रेन या सर्व स्थूल गोष्टी भरलेल्या आहेत. याशिवाय काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, दंभ, गर्व, ताठा, अहंकार, अभिमान अशा असंख्य सूक्ष्म गोष्टी आहेत. या शिवाय प्रेम, करुणा, अहिंसा, मानवता, परोपकारी वृत्ती, दया, क्षमा, शांती अशा अतिसूक्ष्म गोष्टी आहेत. याशिवाय प्राण, अपान, व्यान, उदान, समान असे मुख्य वायू व नाग, कुर्म, कृकल, देवदत्त, धनंजय असे उपवायू आहेत. या सर्व गोष्टी सुईच्या टोकाहूनही सूक्ष्म अशा मानवी देहात रहात असतात. याशिवाय मेडिकल सायन्सने बऱ्याच गोष्टी प्रकाशात आणल्या आहेत. त्या मला माहीत नाहीत. या सर्व गोष्टी एका मानवी देहात असतात व सुमारे दहा मिलीग्रॅम वीर्यामधून सुमारे ३० कोटीहून अधिक मानवी देह तयार होऊ शकतात असे तुमचे सायन्स सांगते. एकंदरीत तुमचा देह किती सूक्ष्म आहे यावर प्रथम विचार करा. तद्नंतर तुमच्या वडिलांच्या शरीरातून जे ३० कोटीहून अधिक बाहेर पडले त्यातील हा तुमचा एक देह आहे. हा वाढत वाढत पाच फूट सात इंच झाला आहे. हा केव्हातरी मरेल. त्याच्यातून तुमचा **सूक्ष्मदेह** बाहेर येईल. तो किती सूक्ष्मतत्वांचा बनला आहे याचे ज्ञान मी तुम्हाला देत नाही. फक्त एवढेच सांगतो. या सूक्ष्मदेहालाच आत्मा म्हणतात. या **सूक्ष्मदेहात** मन, बुद्धी, चित्त, अहंकार या गोष्टी येतात. केव्हातरी हा ही मरेल. हा कसा मरतो हे ही मला माहीत आहे. पण ते मी तुम्हाला सांगत नाही.

यानंतर या सूक्ष्मदेहाला धारण करणारा आणखी एक देह असतो, त्याला **कारणदेह** म्हणतात. हा अति अति सूक्ष्म तत्त्वांचा बनलेला असतो.

आपण त्याला मायक्रो सेल्सचा बनलेला असतो असे म्हणू या! **कारणदेहामध्ये** तुम्ही पूर्वीच्या हजारो जन्मात केलेल्या कर्माचा साठा असतो. याहून अतिशय सूक्ष्म अशा तत्त्वांचा आणखी एक देह असतो. त्याला **महाकारणदेह** असे म्हणतात. हा अत्यंत सूक्ष्म असतो. याला **परमात्मा** म्हणतात किंवा परमात्मस्वरुप असेही म्हणतात. हा आनंदमय असतो. या **महाकारणदेहात** आनंदा शिवाय दुसरे काहीही नसते. आनंदाच्या स्थूल रूपाला आपण शांती असे म्हणतो. म्हणजे महाकारणदेहात पराशांती व परमानंद असतो व तुम्हाला माहीत आहेच की जगातील कुठल्याही बाजारात **शांती व आनंद** विकत मिळत नाही. अशा प्रकारे आपल्या देहापासून परमात्म्यापर्यंत सारे काही सूक्ष्म आहे व अदृश्य आहे. जे काही दिसते ती सर्व माया आहे.

श्रीस्वामीजींच्या वक्तव्याने नास्तिक माणसाची बुद्धी स्तंभित झाली होती. त्याला होणारा आनंद त्याच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. मी मी करणाऱ्या त्या माणसाने श्रीस्वामीजींना चक्क नमस्कार केला, तसेच भाई कदमांना व मलाही नमस्कार केला व त्याने श्रीस्वामीजींचा निरोप घेतला.

जाता जाता भाई कदम मला म्हणाले...''हा खूप सज्जन आहे पण अति बुद्धिवादाने याला नास्तिक केले होते म्हणून मी श्रीस्वामीजींकडे त्याला घेऊन आलो.''

श्रीस्वामीजी ज्या ज्या वेळी बोलत त्या त्या वेळी किंबहुना श्रीस्वामीजींसमोर बसण्याचा ज्या ज्या वेळी प्रसंग येई त्या त्या वेळी मी रजिस्टर व पेन जवळ ठेवत असे. ते जे बोलत ते भराभर लिहून घेत असे. ईश्वराच्या कृपेने मला अतिशय फास्ट लिहिता येते. याशिवाय त्यांची चार-चार, पाच-पाच वाक्ये मेंदूत ठेवून ती कागदावर उतरविणे मला

सहज शक्य होत असे. श्रीस्वामीजींनी वयाच्या आठव्या वर्षी अनेक अभंग, पदे, आरत्या केल्या होत्या. त्यातील एक अभंग हे लिहित असताना मला आठवला तो मी पुढे देत आहे.

**चाले हे शरीर कोणाचिये सत्ते ।**
**कोण बोलविते, मुखी बोल? ।।**
**सुबुद्धि, दुर्बुद्धि कैसी होतसे निर्माण ।**
**नेत्री पाहे कोण राहुनिया ।।**
**कैसा श्वासोच्छ्‌वास चाले आपोआप ।**
**क्षुधा, तृषा, झोप कैसी येते ।।**
**जीव वासनेचा ऐसा चाले खेळ ।**
**कोण घाली मेळ स्वामी म्हणे ।।**

## सत्यान्वेषी

बालपणापासून श्रीस्वामीजींचा स्वभाव अतिशय सत्यान्वेषी होता. सत्यान्वेषी म्हणजे सत्याचा शोध घेणारा होता. प्रत्येक गोष्टीच्या पाठीमागील सत्य शोधून काढलेच पाहिजे असे त्यांना वाटत असे.

त्यांचे बालपण शीळ नांवाच्या खेडेगावात गेले. या गावात आजही (२०१४) बस जात नाही. बालपणी ज्या पायवाटेने नदी पार करून एक डोंगर चढून उतरून श्रीस्वामीजी शाळेत जात होते, त्या पायवाटेचा अद्याप रस्ता झालेला नाही व नदीवर पूलही बांधला गेलेला नाही. श्रीस्वामीजींच्या वडिलांनी श्रमदानाने ग्रामस्थांकडून एक छोटासा रस्ता व एक छोटीशी शाळा १९५८ साली बांधायला घेतली

होती. १९५९ साली शाळा व रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले. तो रस्ता व ती शाळा आजही तशीच आहे. पण या शाळेत श्रीस्वामीजी गेले नाहीत कारण त्यापूर्वीच शीळ गावातील आपले पाच वर्षांचे वास्तव्य संपवून श्रीस्वामीजींचे वडील सर्वांना घेऊन आपल्या मूळ गावी रत्नागिरीला परतले होते. श्रीस्वामीजी पायवाटेने ज्या शाळेत जात होते ती शाळा त्यांच्या घरापासून सुमारे अडीच किलोमीटर दूर होती.

या शाळेच्या पेटाऱ्यातील सर्व पुस्तके वाचून संपलेली होती. कारण शाळेत जाण्यापूर्वीच वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत श्रीस्वामीजींना चांगले लिहिता वाचता येत होते व पाढेही पाठ होते. शाळेमध्ये एका पेटाऱ्यामध्ये खूप गोष्टीची पुस्तके आहेत असे कळल्याने ते शाळेत जात होते. चौथ्या वर्षी इयत्ता तिसरीत त्यांना प्रवेश मिळाला होता, कारण शाळाच चौथीपर्यंत होती. वयाच्या चौथ्या वर्षी त्यांना अनेक स्तोत्रे तोंडपाठ होती. गणपतीस्तोत्र, एकादश बिल्व स्तोत्र, नवग्रह स्तोत्र व इतर अनेक श्लोक त्यांना पाठ होते. त्यांनी पाठांतर केले नव्हते. ही सर्व स्तोत्रे वडील रोज पूजा करताना म्हणत असत. त्यामुळे त्यांची आपोआप पाठ झाली होती. शिवलीलामृताचा अकरावा अध्याय त्यांचे वडील दर सोमवारी रात्री वाचत. आठवड्यातून एकदा ऐकल्याने हा शिवलीलामृताचा अकरावा अध्याय त्यांना तोंडपाठ होता. वडील दररोज पंचरत्न गीता वाचत. त्याचा अर्थ अंगणामध्ये खेळणाऱ्या श्रीस्वामीजींच्या लक्षात येई. पण दोन अर्थाचे शब्द त्यांच्या पचनी पडत नसत किंवा एखाद्या गोष्टीचा अर्थ त्यांना कळला नाही की, ज्ञानी व्यक्ती म्हणून ते आपल्या वडिलांना त्याचा अर्थ विचारत असत. अर्थात वडील श्रीस्वामीजींच्या बाल बुद्धीला समजेल अशा पद्धतिने त्याची उत्तरे देत असत. वडील जी उत्तरे देत त्याने श्रीस्वामीजींचे समाधान होत असे, असे नाही.

वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षीच श्रीस्वामीजींच्या लक्षात आले होते की, आपल्या वडिलांना यातील फारसे काही कळत नाही. सत्य शोधून काढण्याचा त्यांचा स्वभाव असल्याकारणाने चाळीस, पन्नास, साठ वयाची वृद्ध माणसे दिसली की, त्यांच्याशी दोस्ती करायची व त्यांच्याकडून ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करायचा असा त्यांचा स्वभावच बनून गेला. दुर्दैवाने कुठल्याही देहधारी माणसाने, साधूने, गुरुने त्यांना ज्ञान दिले नाही. परंतु पूर्वजन्मीच्या पुण्याईने किंवा महद् भाग्याने साक्षात् दुर्गा देवीने प्रत्यक्ष प्रकट होऊन त्यांना विविध प्रकारचे इतके काही ज्ञान दिले की, त्या ज्ञानातील एक थेंब म्हणजे श्रीस्वामीजींनी लिहिलेली पुस्तके होत. सूक्ष्मसृष्टीचे, अदृश्यसृष्टीचे, वातावरणातील विविध शक्तींचे अपूर्व ज्ञान त्यांच्या जवळ आजही आहे. परंतु त्यांचे जवळील ज्ञान ग्रहण करणारा मात्र कोणीही पृथ्वीतलावर नाही. एकदा तर त्यांनी मला संस्कृत भाषा कशी निर्माण झाली, देवनागरी लिपी कशी निर्माण झाली, संस्कृत भाषेच्या देवनागरी लिपी मधील प्रत्येक अक्षरामध्ये कुठली शक्ती अवगुंठीत आहे हे समजावून दिले होते. पण हा सर्व विषय बुद्धीच्या पलीकडील आहे. यातील कित्येक सत्य गोष्टींवर आजकालचे विद्वानही विश्वास ठेवणार नाहीत. असो.

चौथ्या वर्षी आपली ज्ञानाची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी श्रीस्वामीजी आपल्या वडिलांना प्रश्न विचारून कसे भंडावून सोडत याच्या काही आठवणी पुढे देत आहे.

शीळ गावाहून राजापूर हे सात किलोमीटर दूर होते. वडील सकाळी पूजा आटोपल्यानंतर राजापूरला चालत जायचे. दुपारी एक वाजता परत यायचे. जेवून थोडा वेळ झोपायचे. त्यावेळी श्रीस्वामीजी वडिलांचे पाय चेपत. (भिंतीला धरून चार वर्षांचे श्रीस्वामीजी वडिलांचे

पायावर पाय देऊन पाय चेपत असत.)

यावेळी आपले सर्व आध्यात्मिक प्रश्न श्रीस्वामीजी वडिलांना विचारत असत. यातून पुष्कळवेळा विनोद निर्माण होत असे. उदाहरणार्थ...श्रीस्वामीजींनी विचारले,

''आबा! श्रीदत्ताच्या फोटोमध्ये श्रीदत्ताला तीन तोंडे दाखवतात? प्रत्येक माणसाला एकच तोंड असते नां?''

आबा म्हणाले, ''ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन देवांची तीन तोंडे श्रीदत्ताच्या फोटोत दाखवली आहेत.'' आबांनी श्रीस्वामीजींच्या बालबुद्धीला पटेल अशा भाषेत उत्तर देण्याचा प्रयत्न केला. यावर श्रीस्वामीजींनी विचारले...

''पण फोटोत सहा हात दाखविले आहेत. प्रत्येक माणसाला तर दोनच हात असतात नां?''

यावर आबा म्हणाले, ''अरे तीन दुणे सहा! तुला मी सांगितले ना तीन देवांचा एकत्रित फोटो म्हणजे श्रीदत्त! म्हणून श्रीदत्ताच्या फोटोमध्ये तीन तोंडे व सहा हात असे दाखवितात.''

आबांनी चार वर्षांच्या श्रीस्वामीजींचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. पण यावर श्रीस्वामीजींनी त्यांना प्रश्न विचारला....

''ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन देवांची तीन मुखे व सहा हात दाखवून श्रीदत्ताचा फोटो तयार केला आहे असे तुम्ही म्हणता मग तीन दुणे सहा पाय का नाही दाखविले?''

आता चार वर्षांच्या या बाल स्वामीजींच्या प्रश्नावर त्यांचे वडील काय उत्तर देणार?

ते एवढेच म्हणाले, ''ज्याने श्रीदत्ताचे चित्र काढले त्यालाच हा

प्रश्न विचारायला हवा.'' असे म्हणून आबांनी स्वतःची सुटका करून घेतली.

श्रीस्वामीजींच्या स्वभावातील सत्यान्वेषी प्रवृत्ती म्हणजे सत्य जाणून घेण्याची वृत्ती कशी होती व त्यातून कसे विनोद निर्माण होत हे दाखविण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

श्रीस्वामीजींचे वडील दररोज पंचरत्न गीता वाचायचे. चार वर्षांचे श्रीस्वामीजी अंगणात खेळत असायचे. त्यांच्या कानावर पंचरत्न गीतेतील ओव्या पडायच्या व त्याचा अर्थही कळायचा. एकदा एका ओवीचा अर्थ कळला नाही.

**पिंडी अत्यंत पाप घडे ।**

अशी ओवी पंचरत्न गीतेत आहे. श्रीस्वामीजींच्या बाल बुद्धीमध्ये फक्त महादेवाची पिंडी (शिवलींग) होती. त्यामुळे महादेवाची पिंडी पाप कसे करते हा प्रश्न त्यांना सतावू लागला.

दुपारी पाय चेपतांना त्यांनी आबांना प्रश्न विचारला...

''आबा! पंचरत्न गीतेमध्ये

**पिंडी अत्यंत पाप घडे ।**

**एकासी एक मारी कुडे ।।**

असे का म्हटले आहे?''

आबांना या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. त्यांनी काहीतरी थातूर-मातूर उत्तर देऊन स्वतःची सुटका केली.

अगदी बालपणापासून सत्याचा शोध घेण्याची वृत्ती श्रीस्वामीजींच्या मध्ये कशी होती हे दाखविण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

जेव्हा श्रीस्वामीजींनी ही गोष्ट मला सांगितली तेव्हा मी श्रीस्वामीजींना विचारले, ''मला त्या ओवीचा अर्थ समजावून सांगा. कारण मलाही त्या ओवीचा अर्थ कळला नाही.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले,''अहो! पिंड म्हणजे मानवी देह! आत्मा हा निर्गुण, निराकार असून सुद्धा तो जेव्हा पिंडात म्हणजे मानवी देहात प्रवेश करतो तेव्हा त्याच्या हातून अनेक पातके घडतात असे त्या ओवीत म्हटले आहे. पिंडी म्हणजे देहात आल्यानंतर... कुडे म्हणजे वाईट बुद्धीने.

बालपणापासून श्रीस्वामीजींची बुद्धी अतिशय प्रगल्भ होती. रेडिओवर गाणे लागले की ते त्यांना तात्काळ पाठ होत असे. प्रवचन, किर्तनकारांनी म्हटलेले श्लोक, ओव्या व अभंग त्यांचे ताबडतोब पाठ होत असत. इंग्रजी सुद्धा ते ऐकून ऐकून शिकले. कुठलाही इंग्रजी शब्द स्वतःहून पाठ केला नाही. असो.

## आध्यात्म ज्ञान

एखाद्या उत्तुंग शिखरावरून पडणाऱ्या धबधब्याप्रमाणे श्रीस्वामीजी धाराप्रवाह बोलत जात. मी ही तितक्याच वेगाने ते सर्व लिहून घेत असे. माझ्या हातून हे सर्व कार्य घडणार आहे व त्याद्वारे लाखो लोकांचा उद्धार होणार आहे असे भविष्य सुमारे तीस वर्षांपूर्वीच श्रीस्वामीजींनी वर्तविले होते. असेच लिखाण करत असताना मी त्यांना दोन प्रश्न विचारले...

''१) **राधा-कृष्ण** यांच्याविषयी तुम्ही काहीतरी सांगा!

**२) सोळा सहस्त्र नारी । परि म्हणे ब्रह्मचारी ।।**

म्हणजे काय ते समजावून सांगा!''

माझे प्रश्न ऐकून श्रीस्वामीजी म्हणाले, ‘‘काय ताई! अजूनही तुम्ही काल्पनिक देवांमध्ये अडकला आहात का? अहो, मानवाच्या कूटस्थामध्ये (कूटस्थ म्हणजे दोन भुवयांच्या मधील जागा. भ्रूमध्य) जी ज्योति असते या ज्योतिलाच श्रीकृष्ण म्हणतात व राधा म्हणजे धारा! जे काही वरून खाली अखंडपणे प्रवाहित होते त्याला धारा म्हटले जाते.

मानवी शरीरातील श्वास म्हणजे **धारा**, जे अखंड प्रवाहित असते. या धारेला राधेचे रूप देऊन मूढ, अज्ञानी व चंचल मनाच्या माणसांसाठी राधा-कृष्णाच्या कथा रचल्या आहेत.’’

**सोळा सहस्त्र नारी । परि म्हणे ब्रह्मचारी ।।**

याविषयी जी कथा आहे ती थोडक्यात अशी!

नरकासुर नांवाच्या राक्षसाने आपल्या राज्यामध्ये सोळा हजार एकशे स्त्रियांना बंदीवासात ठेवले होते. त्यांना भगवान् श्रीकृष्णाने सोडविले अशी रूपकात्मक कथा आहे. या कथेचा योगिक अर्थ असा.

मानवी शरीरातील नाभीच्या खालच्या प्रदेशामध्ये मोठ्या आतड्याच्या प्रांताला नरकासुराचा प्रांत असे म्हणतात. या प्रांतातील सोळा हजार एकशे नाड्या शरीरांतर्गत मळाने अशुद्ध झालेल्या असतात. या नाड्यांना शुद्ध केल्यानंतर विविध प्रकारचे सामर्थ्य प्राप्त होते व परमात्मस्वरूप अशी स्टेजही प्राप्त होते. भगवान् श्रीकृष्णाने या सर्व साधना पूर्ण केल्या होत्या. म्हणून म्हणतात...

**सोळा सहस्त्र नारी । परि म्हणे ब्रह्मचारी ।।**

इथे ब्रह्मचारी या शब्दाचा अर्थ जो साक्षात् परब्रह्म झाला तो; असा घ्यायचा आहे.

श्रीस्वामीजींनी राधा-कृष्ण व सोळा सहस्त्र नारी या रूपकांचा

अर्थ सुंदरपणे समजावून सांगितला.

पूर्वी एकदा मी रामायणाविषयी त्यांना विचारले होते तेव्हा ते म्हणाले होते...

''सीता ही जनकाची मुलगी! जनक राजाला ती शेतात सापडली. याचा अर्थ कुंडलिनी शक्ती जी माणसाच्या जनन प्रदेशामध्ये सुप्त रूपाने रहात असते.''

**दशानन रावण हा अहंकार!**

**अहंकार गेला । तुका म्हणे देव झाला. ।।**

**अहंकाराला मारल्यानंतर देवत्व प्राप्त होते.**

प्राचीन ऋषींनी अशा प्रकारे ग्रंथ लिहिले आहेत की ज्ञानी माणसाला त्यातून योगमार्गाचे अधिक ज्ञान व्हावे व मूढ अज्ञानी माणसाला भक्तीमार्ग मिळावा.

वयाच्या आठव्या वर्षी श्रीस्वामीजींनी हे पद रचले. यावरूनच त्यांच्या बुद्धिमत्तेचा अंदाज येतो. वयाच्या दहाव्या वर्षीच सर्व पुराणे व उपनिषदे वाचून पूर्ण झालेली होती. या सर्व धर्म ग्रंथांमध्ये ब्रह्मा, विष्णू, महेश यांचा उल्लेख त्यांच्या मनाला पटत नव्हता. अनेक मुखे व अनेक हात असलेले देव खरे नाहीत हे त्यांचे अंतर्मन त्यांना सांगत होते. ख्रिश्चन धर्मात हे लिहिले आहे का? हे पाहण्यासाठी त्यांनी पुण्याची एक संस्था Voice of Prophecy व चाळीसगावची दुसरी एक संस्था, या दोन संस्थांचे ख्रिश्चन धर्माच्या अभ्यासाचे कोर्स पूर्ण करून त्यांच्याकडून सर्टीफिकेटस् मिळविली. या दोन्ही संस्थांनी त्यांना बायबल भेट म्हणून

दिले. अशा रितीने ईश्वराने त्यांच्याकडून ख्रिश्चन धर्माचा अभ्यास करून घेतला. त्यानंतर जुने बायबल वाचून यहुदी धर्माचा अभ्यासही पूर्ण झाला व नंतर अनेकदा कुराण वाचले.

ख्रिस्ताचे अनुसरण (THE IMITATION OF CHRIST) हा त्यांचा अतिशय आवडता ग्रंथ होता. असे हजारो ग्रंथ त्यांनी अक्षरशः पाठ केले होते. एकदा ब्रह्मा, विष्णू, महेश या रूपकात्मक देवांवर त्यांनी मला बरेच सांगितले. पण तो विषय अतिशय कठीण असल्याने मला त्यातील काही कळले नाही. त्यामुळे मी त्याविषयी काहीही लिहित नाही.

एकदा त्यांनी मला काही अद्‌भुत माहिती सांगितली ती पुढे देत आहे.

पृथ्वीवरील ३६५ दिवस म्हणजे एक वर्ष. सामान्य माणसांचे पूर्वज मृत्यूनंतर ज्या लोकात राहतात त्याला पितृलोक असे म्हणतात. माणसांचे एक वर्ष पूर्ण होते तेव्हा पितृलोकातील आत्म्यांचा एक दिवस पूर्ण होतो.

पितृलोकामध्ये अनेक आत्मे अतृप्त असतात. पृथ्वीतलावरील आपल्या वंशजांनी काहीतरी दान-धर्म करावा. ईश्वरभक्ती करावी म्हणजे आपल्याला सद्‌गती प्राप्त होईल असे त्यांना वाटत असते.

पृथ्वीतलावर जेव्हा भाद्रपद महिन्यातील पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पितृपक्ष सुरू होतो, म्हणजे प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंतचा पंधरा दिवसांचा हा काळ पितृलोकातील दुपार असते; या काळात पितरांच्या नांवाने स्वयंपाक करून ते अन्न गाय, कुत्रा व कावळे यांना खाऊ घालावे म्हणजे पितृलोकातील आत्मे तृप्त होतात असे प्राचीन धर्मग्रंथात म्हटले आहे.

जेव्हा पितृलोकातील (Ancestor) शंभर वर्षे पूर्ण होतात तेव्हा स्वर्गलोकातील देवांचे एक वर्ष पूर्ण होते. एवढी माहिती सांगून श्रीस्वामीजींनी मला एक कोष्टक करायला सांगितले.

| | | |
|---|---|---|
| मानवाचे एक वर्ष | = | पितृलोकातील १ दिवस |
| पितृलोकातील १ वर्ष | = | देवलोकातील १ दिवस |
| देवलोकातील १०० वर्षे | = | ब्रह्मलोकातील १ दिवस |
| ब्रह्मलोकातील १०० वर्षे | = | विष्णूलोकातील १ दिवस |
| विष्णूलोकातील १०० वर्षे | = | रुद्राचा १ पळ (१ सेकंद) |
| रुद्राची १०० वर्षे | = | शक्तीचा १/२ पळ (१/२ सेकंद) |

शक्ती म्हणजे कॉसमिक एनर्जी.

गप्पांच्या ओघात एकदा श्रीस्वामीजी म्हणाले, ''कृतयुगामध्ये माणसांची उंची २८ फूट होती. त्रेतायुगामध्ये माणसांची उंची २२ फूट होती. द्वापार युगामध्ये माणसांची उंची १४ फूट होती. कलियुगामध्ये माणसांची उंची जास्तीत जास्त ७ फूट आहे. सरासरी दर हजार वर्षांनी माणसांची उंची एक फूटाने कमी होते. उंची बरोबर माणसाची शक्तीही कमी होत असते. इतिहासात असे लिहिले आहे की, आठशे वर्षांपूर्वी होऊन गेलेला बाप्पा रावळ हा योद्धा बसल्या बैठकीला दोन बकऱ्यांचे मांस खात असे. त्याच्या तलवारीचे वजन शंभर किलोहून जास्त होते. कलियुगाच्या अंति माणसाची उंची सहा इंच असेल. २१३०

साली समुद्र २० किलोमीटर आत आलेला असेल.'' अशा मजेदार गोष्टी श्रीस्वामीजी सहजपणे सांगत असत.

**- संवेदना -**

या पुस्तकातील (पान क्र. ८२ ते ९०) कल्पना-सुरेंद्र या प्रकरणातील श्री. सुरेंद्र रणदिवे यांचे वयाच्या ६१ व्या वर्षी हार्ट अॅटॅकने दि. २७ डिसेंबर २०१३ रोजी निधन झाले.

ॐ

# ईश्वर साक्षात्काराचा मार्ग

एकदा मी श्रीस्वामीजींना विचारले, ''ईश्वराचा साक्षात्कार कसा होतो?'' यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''जोपर्यंत मनामध्ये विचारांचे वादळ सुरू आहे तोपर्यंत कितीही भक्ती केली तरी ईश्वर साक्षात्कार होणार नाही. नामस्मरण, स्तोत्र पठण, ग्रंथ वाचन करून मन स्वच्छ करावे लागते. यासाठी सात्त्विक देवतांच्या स्तोत्रांचे किमान चाळीस- चाळीस हजार पाठ करावे लागतात. नंतर श्वासावर लक्ष ठेवून मंत्र जप करावा लागतो. अशा प्रकारे किमान तीन लाख तरी मंत्र जप व्हावा लागतो. याने मन एकाग्र होते. मन एकाग्र होणे म्हणजे एकाच विषयावर (एकाच पॉइन्टवर) लक्ष केंद्रित करणे, दुसरे काहीही न आठवणे अशा प्रकारे मनाची एकाग्रता झाल्यानंतर इतर सर्व चिंतन सोडून देऊन मन 'सोऽहम्' वर केंद्रित करावे लागते. श्वास आत घेताना 'सो' व सोडताना 'हम्' असे चिंतन करावे लागते. हळूहळू यातच मनाचा लय होऊ लागतो. यानंतर काही गुप्त साधना कराव्या लागतात. त्या साधना प्रकट करण्यास ईश्वराची परवानगी नाही, परंतु येथपर्यंत प्रगती झाली तरी माणसाच्या अंगी देवत्व येते.

ईश्वरप्राप्तीचा मार्ग मी तुम्हाला सांगितला. या मार्गात एकच अडचण आहे, प्रारब्ध शुद्ध नसेल तर या मार्गात यश येत नाही. यासाठी सेवा करून प्रारब्ध प्रथम शुद्ध करावे लागते.''

**स्वरुपी करी समाधान ।**
**तोचि एक सद्‌गुरु जाण ।**
**ज्याच्या दर्शने ब्रह्मज्ञान ।**
**आपोआप होतसे ।।**
**सद्‌गुरु साक्षात् परब्रह्म ।**
**हे ही बोलणे किंचित न्यून ।**
**त्याच्या शब्दा ब्रह्म जाण ।**
**हात जोडोनी तिष्ठतसे ।।**

**श्रीस्वामी दत्तावधूत**

**ॐ वनिता ॐ**
नवी मुंबई

**ॐ**

# सुनिता

**मा**झे नांव सुनिता! रत्नागिरी तालुक्यातील तळेकांटे हे माझे गाव! मी मुंबईला रहाते. अधून मधून गावाला जाणे होत असते. असेच एकदा गावाला गेले असताना श्री. किशोर गांधी यांच्याशी ओळख झाली. ते एस्. टी. मध्ये ड्रायव्हर होते. गप्पांच्या ओघात श्री. किशोर गांधी म्हणाले, ''आमच्या घराजवळ मोकळी जागा आहे. या मोकळ्या जागेत श्रीदत्त मंदिर बांधावे अशी आजोबांची इच्छा होती. आजोबांना व वडिलांनाही श्रीदत्त मंदिर बांधणे शक्य झाले नाही.'' अचानक माझ्या मुखातून शब्द बाहेर पडले... ''काळजी करू नका. श्रीदत्त महाराज तेथे श्रीदत्त मंदिर बांधून घेतील. यासाठी लागणारी सर्व मदत मी करेन!''

श्री किशोर गांधी यांना जेव्हा मी ''श्रीदत्त महाराज मंदिर बांधून घेतील'' असे सांगितले, तेव्हा मी श्रीस्वामी दत्तावधूतांना पाहिले सुद्धा नव्हते. परंतु त्यांनी लिहिलेल्या पोथ्या मी नित्य नियमाने वाचत होते. **''श्रीदत्त जय दत्त''** असा जपही सतत करत होते. या उपासनेमुळे माझ्यामध्ये खूप आत्मविश्वास निर्माण झाला होता. श्रीदत्त महाराज सतत आपल्या बरोबर असतात अशी माझी श्रद्धा होती व तसे अनुभवही

मला अनेकदा आले होते.

श्रीदत्त महाराज सतत माझ्या बरोबर असतात अशी माझी श्रद्धा असल्याने तेच माझ्या मुखाने बोलले. दुसऱ्याच दिवशी चिरा आणून फाऊण्डेशनचे काम पूर्ण केले. मंदिर उभे करण्यासाठी सुमारे बत्तीस हजार खर्च येईल असे गावातील लोकांनी सांगितले. याशिवाय श्रीदत्तमूर्ती, कळस व इतर सर्व खर्च मिळून दीड लाख खर्च येणार होता. गावाहून दुसऱ्या दिवशी मी मुंबईला आले. मंदिर उभारण्याचे बत्तीस हजार कसे गोळा करायचे हा पहिला विचार मनात होता.

मुंबईत पोहोचल्यानंतर दोन दिवसांतच मला नागार्जुन सागरला श्रीदत्तगिरी उर्फ स्वामी दत्तावधूत यांच्या दर्शनाला जाण्याचा योग आला. ते दत्तावतारी आहेत हे मला माहीत होते. त्यामुळे आपली चिंता दूर होणार असा विश्वास वाटला.

नागार्जुन सागरला गेले. श्रीस्वामीजींचे दर्शन घेतले. श्रीस्वामीजींना प्रार्थना केली, ''श्रीदत्तमंदिर पूर्ण होण्यासाठी तुमचे आशीर्वाद द्या!'' क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी एक पाकीट हातात दिले व म्हणाले, ''हा घे आशीर्वाद! तू निश्चिंत रहा. तुला पैशाची कधीही कमतरता पडणार नाही, श्रीदत्तमंदिराचे काम पूर्ण होईल.''

श्रीस्वामीजींनी दिलेले पाकीट उघडून पाहिले. पाकिटात बत्तीस हजार रुपये होते. मंदिराला येणाऱ्या खर्चाची तरतूद खुद्द श्रीदत्त महाराजांनीच केली होती. मी निश्चिंत झाले.

श्रीदत्त मंदिराचे काम चालू असताना अनेक दिव्य अनुभव आले. एकदा मी नाजूक काचेचे सामान (ट्युबलाईट, बल्ब, झुंबर इत्यादि) घेऊन चालले होते. संगमेश्वर येथे गाडी थांबल्यानंतर कंडक्टर म्हणाला, ''तुम्ही सर्व सामान घेऊन येथेच उतरा, गाडी तळेकांटे येथे

थांबणार नाही. ती आता सरळ रत्नागिरी येथे थांबेल.'' पहाटेचे चार वाजले होते. काचेचे नाजूक सामान घेऊन संगमेश्वर ते तळेकांटे हा पंधरा किलोमीटरचा प्रवास कसा करायचा इत्यादी प्रश्न माझ्या डोक्यात एका क्षणांत येऊन गेले. सामान उतरवण्यास सुरुवात करणार इतक्यात... 'ताई' अशी हाक ऐकू आली. मागे वळून पाहिले, श्री किशोर गांधींच्या रुपामध्ये श्रीदत्त महाराजच मागे उभे होते. ते म्हणाले...

''सामान उतरवू नका! तळेकांटे येथे मी गाडी थांबवितो!'' ते एस्. टी. मध्ये ड्रायव्हर असल्याकारणाने कोठेही गाडी थांबविणे त्यांना सहज शक्य होते. अशा प्रकारे अनपेक्षित मदत मिळून मी सामानासहित तळेकांटे येथे उतरले. मंदिरापर्यंत सुरक्षित सामान पोहोचले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुंबई ते संगमेश्वर या तीनशे किलोमीटर प्रवासामध्ये श्री. किशोर गांधी मला बस मध्ये दिसले नव्हते.

सहा महिन्यात मंदिर बांधून पूर्ण झाले. पैशाची कधीही कमतरता भासली नाही. श्रीदत्त जयंतीच्या शुभ मुहूर्तावर एकमुखी श्रीदत्त मूर्तीची स्थापना केली. एक हजाराहून अधिक लोकांना अन्नदान केले.

**को**कण रेल्वे नुकतीच सुरू झाली होती. कुठल्याही स्टेशनवर खाण्यापिण्याची काही सोय झालेली नव्हती. प्रत्येक प्रवासी आपला जेवणाचा डबा बरोबर घेत असे.

मी गावाहून मुंबईला चालले होते. घरातून बाहेर पडल्यावर एका व्यक्तीने मला विचारले, ''तू मुंबईला जातेस मग जेवणाचा डबा बरोबर कसा नाही घेतलास?'' यावर मी म्हणाले, ''माझा दत्त माझ्या जेवणाची सोय करेल!''

मी ट्रेन मध्ये बसले तेव्हा ट्रेन रिकामी होती. त्या डब्यात मी

एकटीच होते. दुपारी बाराच्या सुमारास कपाळाला अष्टगंध लावलेला, गळ्यात तुळशी माळ असलेला व पांढरे कपडे घातलेला एक मनुष्य माझ्यासमोर बसला व मला म्हणाला... ''ताई, मी दत्तभक्त आहे. आपण माझ्याबरोबर श्रीदत्ताचा प्रसाद घ्याल का?''

त्याच्या तेजस्वी डोळ्यांकडे व चेहऱ्यावरील सात्त्विकतेकडे पहात मी उत्तर दिले... 'जरूर!'

त्याने पिशवीतून दोन ताटे काढली. दोन्ही ताटे पंचपक्वान्नांनी भरून एक ताट मला दिले. मला आवडणारे सर्व पदार्थ त्या ताटात होते. दुसरे ताट घेऊन तो स्वतः जेवायला बसला. अशा प्रकारे श्रीदत्ताने माझी जेवणाची सोय केली.

जेवण आटोपल्यानंतर तो मनुष्य कोठे गेला काही कळले नाही.

जेव्हा मी मुंबईत रहात असे तेव्हा अधूनमधून वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये बसत असे. ऑफिसमध्ये बसून मी **श्रीदुर्गा सप्तशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** इत्यादी पोथ्यांचे वाचन करीत असे.

ता. १५ ऑक्टोबर २००१ या दिवशी मला एक अद्‌भुत व अलौकिक असा अनुभव आला.

वनिता बुक्समध्ये बसून मी **श्रीदुर्गा त्रिशती**ची पारायणे करत होते. वनिता बुक्स म्हणजे साक्षात् श्रीदुर्गा देवीचे ऑफिस! सौ. वनिता दीक्षित यांना आम्ही श्रीदुर्गा देवीच मानतो. श्रीस्वामीजीसुद्धा त्यांना श्रीदुर्गा देवीच मानतात. त्यांच्या ऑफिसमध्ये बसून श्रीदुर्गा देवीच्या स्तोत्राची पारायणे केल्याने ती साक्षात् श्रीदुर्गा देवीला पोहोचली. **श्रीदुर्गा त्रिशती** या ग्रंथात किती सामर्थ्य आहे हे दाखविण्याचे ठरवून श्रीदुर्गा देवीने

अद्‌भुत लीला केली. तिने माझे रूप घेतले व माझा मावस भाऊ प्रतीक याला अद्‌भुत लीला दाखविली.

प्रतीक आपल्या घराबाहेर उभा होता. अचानक त्याने फियाट कारमधून मला येताना पाहिले. मी कार त्याच्याजवळ थांबविली. त्याला गाडीत बस म्हणून सांगितले. फियाट कारमध्ये पुढच्या सीटवर माझ्या शेजारी प्रतीक बसला. अर्धा तास मी त्याला खूप फिरविले. खूप चॉकलेटस् दिली. शेवटी पुन्हा घराजवळ आणून सोडले. मी लायब्ररीत जाऊन येते तू आता घरी जा, असे मी त्याला सांगितले.

प्रतीक आनंदाने उड्या मारत माझ्या आईजवळ गेला व म्हणाला...

''मावशी, मला आज सुनितातार्ईने गाडीतून खूप फिरविले व खूप चॉकलेटस् दिली. माझे खूप लाड केले.''

प्रतीकचे हे बोलणे ऐकून माझ्या आईला आश्चर्य वाटले. तिने प्रतीकला विचारले...

''तुला सुनिता कोठे भेटली?''

''ताई आमच्या घराच्या समोर मला भेटली. फियाट गाडी चालवत माझ्याजवळ आली व मला गाडीतून फिरायला घेऊन गेली.'' प्रतीकने उत्तर दिले.

''तिने कुठले कपडे घातले होते?'' माझ्या आईने विचारले.

''सुनितातार्ईने पंजाबी ड्रेस घातला होता.'' प्रतीकने उत्तर दिले.

आता मात्र माझ्या आईची खात्री झाली. काहीतरी भयंकर घोटाळा झालेला आहे. प्रतीकला कुठल्यातरी पंजाबी ड्रेस घातलेल्या

स्त्रिने फिरवून आणून घराजवळ सोडले. कारण त्या दिवशी मी साडी नेसून वनिता बुक्सला गेले होते हे आईला माहीत होते म्हणून तिने प्रतीकला विचारले...

''कुठली गाडी होती? गाडीचा नंबर तुला माहीत आहे ना? सांग बघू!''

यावर प्रतीक म्हणाला, ''फियाट गाडी होती'' असे म्हणून त्याने गाडीचा नंबरही सांगितला.

माझ्या आईला वाटले, एखाद्या मैत्रिणीला मी आपली गाडी दिली असावी. तिने प्रतीकला पाहिले असावे व ती प्रतीकला फिरायला घेऊन गेली असावी.

माझ्या आईने वनिता बुक्सला फोन केला. फोन मीच उचलला, तिने मला विचारले...

''तू कोठे आहेस? व काय करत आहेस?''

यावर मी उत्तर दिले... ''मी वनिता बुक्समध्ये बसून **श्रीदुर्गा त्रिशती** वाचत आहे.''

यावर आईने विचारले, ''तू तुझी फियाट गाडी, पंजाबी ड्रेस घातलेल्या तुझ्या एखाद्या मैत्रिणीला दिली आहेस का?''

यावर मी म्हणाले...''मी घरून वनिता बुक्सला आले. गाडी येथेच ठेवली आहे. कोणालाही दिलेली नाही.'' यावर माझ्या आईने मला प्रतीकची सर्व हकिकत सांगितली.

मी फोन ठेवला. मला अतिशय आश्चर्य वाटले. डोळे मिटून थोडावेळ विचार केला. तेव्हा माझ्या लक्षात आले की वनिता बुक्स हे सौ. वनिता दीक्षित यांचे ऑफिस! सौ. वनिताताई या अपरंपार गुरुसेवा

करून दुर्गा स्टेजपर्यंत जाऊन पोहोचलेल्या, त्यांच्या ऑफिसमध्ये बसून **श्रीदुर्गा त्रिशतीचे** पाठ केल्याकारणाने श्रीदुर्गा देवीने माझे रूप घेतले व प्रतीकला फिरवून आणले. श्रीदुर्गा देवीने एवढा मोठा चमत्कार करून मला तसेच सर्व भक्तांना संदेश दिला 'जे कोणी **श्रीदुर्गा त्रिशती** वाचतील, मी त्यांचे सर्व लाड पुरवीन, त्यांना सर्व बाजूने सुखी करीन.'

**मा**झा चुलत भाऊ गजानन हा अतिशय गांजलेल्या परिस्थितीत रहात होता. नोकरी मिळत नव्हती व केलेल्या कुठल्याही धंद्यात यश येत नव्हते. उदासीनता व नैराश्य यामुळे त्याच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले.

एकदा मी गावाला गेले असता त्याने आपली सर्व मनोव्यथा मला सांगितली. मी त्याला म्हणाले...

''जवळ पुण्याई असल्याशिवाय पैसा मिळत नाही. पुण्याई मिळविण्यासाठी तू श्रीस्वामीजींनी लिहिलेले **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचत जा.''

त्याने दररोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन सुरू केले. काही दिवसातच त्याचे नशीब बदलले. त्याच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. लवकरच त्याला मुंबईमध्ये चांगली नोकरी लागली. मालकाचा त्याच्यावर इतका विश्वास बसला की तो त्याला विमानाने फिरवू लागला.

**मा**झे काका, त्यांचा मुलगा बाबू व वहिनी हे सगळे तळेकांटे गावाला रहात होते. माझे काका अनेक वर्षे आजारी होते. त्यांना बेडवरून उठविण्यासाठी कोणाचा तरी आधार घ्यावा लागत असे. माझा चुलत भाऊ बाबू हा त्यांची सेवा करत असे. त्यांना बेडवरून उठविणे, टॉयलेट, बाथरूमला घेऊन जाणे हे सर्व काम तो करीत असे.

अनेक वर्षे हा प्रकार चालू होता. वडील अंथरुणाला खिळलेले असल्याकारणाने बाबू आपले गाव सोडून कोठेही बाहेर गेलेला नव्हता.

एकदा आश्रमातून श्रीस्वामीजींचा निरोप आला. आश्रमात काही कामे आहेत. सेवेसाठी कोणाला तरी पाठवून दे.

मी बाबूला म्हणाले, ''बाबू, तुझा भाऊ गजानन याने श्रीस्वामीजींची सेवा केल्यानंतर त्याचे किती चांगले झाले, हे तुला माहीत आहेच. तुला सेवेची संधी मिळाली आहे तेव्हा तू पंधरा दिवस आश्रमात जाऊन सेवा कर. मी पंधरा दिवसांची रजा घेऊन गावाला येऊन तुझ्या वडिलांची सेवा करते व सर्वतोपरी काळजी घेते.''

बाबू या गोष्टीला तयार झाला. तो आश्रमात गेला व सेवा करू लागला. मी व वहिनी आम्ही दोघीजणी माझ्या काकांची सेवा करू लागलो.

आश्रमात सेवेला सुरुवात करून जेमतेम सात-आठ दिवस झाले असतील, या अवधीत गावी एक विचित्र प्रकार घडला.

सकाळी सहाच्या सुमारास मी उठले. पहाते तर काका आपल्या बेडवर नव्हते. मी लगेच वहिनीला उठविले. आम्ही दोघीही घराबाहेर गेलो. काकांना सर्वत्र शोधले. काका कोठेच नव्हते. आम्ही काकांना जोरजोराने हाका मारायला सुरुवात केली. तळेकांटे येथील डोंगरावर आमचे घर आहे. आजूबाजूला कोणाचेही घर नाही. संपूर्ण कंपाऊण्डमध्ये काका कोठेही नव्हते. ज्या काकांना बेडवरून उठतासुद्धा येत नव्हते ते काका अचानक गेले कोठे म्हणून मला खूपच काळजी वाटू लागली. आमच्या घराच्या खाली सुमारे पाचशे फूट पायवाटेने खाली उतरून गेल्यानंतर बॉम्बे-गोवा हायवे आहे. हायवे ओलांडून आणखी तीनशे फूट खाली उतरून गेल्यावर मोठी बावनदी आहे. त्या नदीजवळ आमची

विहीर आहे. त्या विहिरीवर पाण्याचा पंप बसविलेला आहे. त्या पायवाटेने काका वर आले. ते आरामात चालत होते. ठणठणीत बरे वाटत होते. आजारपणाचे कुठलेही लक्षण नव्हते. मी व वहिनीने त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केला.

''बेडवरून उठण्याची ताकद नसताना तुम्ही बेडवरून खाली उतरलात कसे व दरवाजाची कडी काढलीत कशी व कोठे गेला होतात?''

काका शांतपणे म्हणाले, ''मी आजारी होतो कधी? मी अगदी ठणठणीत आहे! मी उठलो. दरवाजाची कडी काढली व पायवाटेने नदीवर गेलो. पाण्याचा पंप सुरू केला व वर आलो. मी आजारी कधी नव्हतोच. तुम्ही वेड्यासारखे काय बोलत आहात.''

काकांच्या या उत्तराने आता आश्चर्यचकित होण्याची पाळी आमची होती.

बाबूने आश्रमात जाऊन जी काही सात-आठ दिवस सेवा केली या सेवेने बाबूचे वडील आजारपणातून पूर्णपणे बरे झाले होते. इतके की आपण आजारी होतो याचे भानही त्यांना राहिले नव्हते. मी ताबडतोब बाबूला आश्रमात फोन करून कळविले. श्रीस्वामीजी सांगतील तितके दिवस आश्रमात रहा. येण्याची घाई करू नकोस. तुझे वडील ठणठणीत बरे झाले आहेत.

त्या दिवशी ईश्वरचिंतन करत बसले असताना मला आणखी एक गोष्ट आठवली.

**ब**ऱ्याच वर्षांपूर्वी या घरामध्ये रात्री जेव्हा मी झोपले होते, तेव्हा स्वप्नामध्ये एक काळ्यारंगाची आकृती दिसली व त्या आकृतीने

माझा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. झोपेतच मी श्रीस्वामी दत्तावधूत म्हणताच ती आकृती नाहीशी झाली व मला शांत झोप लागली. त्याच काळ्या शक्तीने बहुतेक बाबूच्या वडिलांना जखडले होते. बाबूने आश्रमात जाऊन सात-आठ दिवस सेवा करताच त्या शक्तीचा उद्धार झाला. ती शक्ती काकांचे शरीर सोडून निघून गेली व काका ठणठणीत बरे झाले. इतके बरे झाले की आपण आजारी होतो याची सुद्धा त्यांना आठवण राहिली नाही.

सिद्धपुरुषांच्या सेवेने आपला तर उद्धार होतोच व आपल्या घराण्यात असलेल्या पिशाच्च शक्तींचाही उद्धार होतो. श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तकांच्या वाचनाने बाबूच्या घरची परिस्थिती सुधारली. घरात शांती निर्माण झाली. बाबूला तीन मुली होत्या, या तीनही मुलींची अभ्यासात खूप चांगली प्रगती झाली.

**ए**कदा बाबूची मोठी मुलगी प्रतिक्षा हिला खूप ताप आला. तिच्या कानाच्या खाली एक पुळी झाली होती. औषधोपचार करूनही तिची पुळी बरी होईना. तिला खूप वेदना होत होत्या.

बाबूची दुसरी मुलगी अमिषा हिने श्रीस्वामीजींच्या फोटोसमोर प्रार्थना करून प्रतिक्षाच्या पुळीला विभूती लावली. विभूती लावताच तिच्या वेदना गायब झाल्या व तिला शांत झोप लागली. रात्री बारा वाजता पुळी फुटली व त्यातून पाणी, पू वगैरे सर्व वाहून गेले. प्रतिक्षाच्या आईने त्यावर विभूती लावली. सकाळी प्रतिक्षा जेव्हा उठली तेव्हा ठणठणीत बरी झाली होती.

**ए**कदा बाबूच्या तीनही मुली अंगणात खेळत होत्या. माझे काकाही अंगणात बसले होते. अचानक त्यांनी पाहिले की दोन मोठे साप समोर असणाऱ्या नारळाच्या झाडाखाली खेळत होते. माझे काका सुमारे

अर्धा तास त्या सापांचा खेळ पहात राहिले. नंतर त्यांनी घरात जाऊन विभूती आणली व सापांच्या दिशेने फुंकली. विभूती फुंकताच ते दोन्ही साप त्यांच्या डोळ्यासमोर अदृश्य झाले. माझ्या काकांनी दूरवर साप कोठे दिसतात का पाहिले. परंतु साप अदृश्य झाले होते. ते कोठेच दिसले नाहीत. त्यानंतर ते साप कधीही दिसले नाहीत.

**आ**मच्या गावी म्हणजे तळेकांटे (रत्नागिरी) येथे आमचे घर आहे, तेथून थोड्या अंतरावर पाण्याचा एक झरा आहे. उन्हाळ्यात त्या झऱ्याचे पाणी आटून जाते म्हणून माझ्या आई-वडिलांनी बोअरवेल करायचे ठरविले. आमच्या घराच्या खालच्या बाजूला बोअरवेल करण्याचे निश्चित झाले. रात्री नऊच्या सुमारास बोअरींगचे काम सुरू झाले. माझा नवरा प्रवीण व चुलत भाऊ गजानन हे दोघेही जेथे बोअरींगचे काम सुरू होते तेथे थांबले. मला खूप झोप येत होती म्हणून मी घरी जाऊन झोपले. मला एक विचित्र स्वप्न पडले.

स्वप्नात मी पाहिले की प्रवीण व गजानन यांच्या तोंडातून, छातीतून, कानातून रक्त वाहत आहे. मी घाबरून उठले व जेथे बोअरवेलचे काम चालू होते तेथे गेले. त्या दोघांनाही माझे स्वप्न सांगितले.

सकाळ झाली, बोअरवेलला पाणी लागले नाही परंतु घरातील तसेच परिसरातील सर्व वातावरण उदास व भकास झाले होते. असा अनुभव पूर्वी कधीही आला नव्हता. आम्ही बोअरवेल करण्याचे कॅन्सल केले.

काही दिवसांनी आश्रमात जाण्याचा योग आला तेव्हा श्रीस्वामीजींना मी हे स्वप्न सांगितले; त्यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

''जेथे तुम्ही बोअरवेल करत होता, तेथे भूगर्भामध्ये ऋषी तपस्या

करत बसले आहेत. तुम्ही तुमच्या घराच्या आसपास कोठेही बोअरवेल करू नका. नदीकाठी विहीर बांधा. तेथे पाण्याची सोय होईल.''

श्रीस्वामीजींच्या सांगण्यानुसार बावनदीच्या किनारी औदुंबर वृक्षाजवळ आम्ही विहीर खणली व विहिरीला मुबलक पाणी लागले.

**मा**झा मामेभाऊ सिद्धेश धावडे खूप आजारी होता. डॉक्टर्सना त्याच्या आजाराचे निदान होत नव्हते. डॉक्टर्स कधी टायफॉईड, कधी मलेरिया, कधी कावीळ सांगत व त्यानुसार उपचार करीत. अनेक प्रकारची औषधे खाऊन सिद्धेश हैराण झाला होता. खूपच अशक्त झाला होता. अनेक प्रकारच्या टेस्ट, सोनोग्राफी, स्कॅनिंग अशा विविध पद्धतिने त्याच्यावर उपचार चालू होते. पण उपयोग काहीच होत नव्हता. पाण्यासारखा पैसा खर्च होत होता पण गुण येत नव्हता. सत्तर किलो वजन असणारा सिद्धेश अशक्त होऊन पंचवीस किलो वजनाचा हाडांचा सापळा झाला होता. शेवटी डॉक्टरनेही ८-१० दिवस काढेल अशी भविष्यवाणी केली होती. मला ही हकिकत कळताच मी प्रवीणला बरोबर घेऊन त्याला भेटायला गेले.

श्रीस्वामीजींनी दिलेली विभूती मी बरोबर घेऊन गेले होते. विभूती त्याच्या डोक्याला लावली व पाण्यातून प्यायला दिली. माझ्या मामीला म्हणजे सिद्धेशच्या आईला सांगितले, **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन करत रहा. माझ्या मामीने ताबडतोब **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केली.

दुसऱ्या दिवसापासून सिद्धेशच्या तब्येतीत फरक पडू लागला. त्याचे सर्व रिपोर्टस् नॉर्मल आले. चौथ्या दिवशी त्याला डिस्चार्ज् मिळाला. तो आनंदाने घरी गेला व ठणठणीत बरा झाला. तेव्हापासून तो नियमितपणे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचत आहे.

एकदा श्रीस्वामीजींनी आश्रमात या असा निरोप पाठवला. माझा नवरा प्रवीण व माझा भाऊ विशाल हे दोघेही आश्रमात निघून गेले. मी, गजानन व आमच्या बरोबर येणारे ४-५ लोक आम्ही सर्व मुंबईत होतो.

आम्ही सुमो गाडी बुक केली. त्या दिवशी शनिवार होता. कामावरून येईपर्यंत बँक बंद झाली. माझे ए. टी. एम्. कार्डसुद्धा प्रवीणकडे राहिले होते. माझ्याकडे जेमतेम तीन हजार रुपये होते. आश्रमामध्ये विशालला फोन केला. तो म्हणाला, ''काळजी करू नका इथे आल्यावर मी गाडीचे पैसे देईन.'' मी गजाननला फोन केला व सर्व परिस्थिती सांगितली, आपल्याकडे निदान दहा हजार रुपये तरी असले पाहिजे, असे त्याला सांगितले. तर तो म्हणाला, ''ताई, माझ्याकडे मुळीच पैसे नाहीत.''

निघण्याची घाई सुरू होती. सामानाची बांधाबांध चालू होती. इतक्यात गजानन ऑफिसमधून आला. त्याने माझ्या हातात एक पाकीट दिले व म्हणाला, ''काही दिवसांपूर्वी मी साहेबांचे काही महत्त्वाचे काम केले त्याबद्दल भेट म्हणून त्यांनी मला हे पाकीट दिले आहे. आत काय आहे ते बघ. ऑफिसमधून निघण्याच्या गडबडीत मी अद्याप पाकीट उघडलेले नाही.''

मी ते पाकीट उघडून पाहिले. आत दहा हजार रुपये होते. माझ्या व गजाननच्या डोळ्यात पाणी आले. खरंच! देव आपली किती काळजी घेत असतो त्याचा प्रत्यय आला. गाडीत बसून आश्रमात पोहोचलो. श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जाताच श्रीस्वामीजी म्हणाले...

''काय सुनिता पैशाची व्यवस्था झाली ना?''

मी श्रीस्वामीजींना सर्व हकिकत सांगितली आणि म्हणाले, ''सर्व पैसे तसेच आहेत. प्रवासात आम्हाला कोठेही पैशाची गरज भासली नाही.''

एकदा मी आणि प्रवीण आश्रमात जात होतो. पायलॉन पीलरला बस आल्यावर प्रवीणने त्याच्याकडील पाऊच माझ्याकडे दिला. त्या पाऊचमध्ये आमचे रेल्वेचे तिकीट महत्त्वाचे कागदपत्र व सर्व पैसे होते.

पायलॉन पीलर येथे आम्ही उतरलो. बस सुरू झाली एवढ्यात बसमधून कोणीतरी आम्हाला हाक मारली. आम्ही मागे वळून पाहिले त्या माणसाने एक ''वस्तू'' आमच्या दिशेने टाकली. ती वस्तू म्हणजे प्रवीणचा पाऊच होता. उतरण्याच्या घाईमध्ये मी तो पाऊच सीटवर विसरले होते.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे बस पूर्ण रिकामी होती. बसमध्ये जेमतेम आठ-दहा पॅसेंजर होते. आमच्या पुढे मागे कोणीच बसले नव्हते. असे असताना आमच्या पुढे अथवा मागे बसलेल्या त्या पॅसेंजरला आमच्या सीटवर जाऊन बसण्याची बुद्धी देवाने दिली व त्यामुळे त्याला तो पाऊच दिसला. याला ईश्वरीकृपा याशिवाय दुसरे काय म्हणणार. मी व प्रवीण आम्ही दोघांनीही ईश्वराचे आभार मानले.

स्वाती साटमकर नांवाची माझी मैत्रिण डोंबिवलीला रहाते. तिच्याकडे मी दोन दिवस राहिले होते. या दोन दिवसात माझ्या लक्षात आले की तिचा मोठा मुलगा कामेश फारच विचित्र वागत होता. आईला मारायला धावणे, अभ्यास न करणे, फार हट्ट करणे, यामुळे घरात अशांती होती. सतत पैशाची चणचण स्वातीला भासत असे. स्वाती व तिचा नवरा दोघांनाही चिंता व काळजीने ग्रासले होते.

माझ्याकडे असलेले **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** मी त्यांना वाचायला दिले. कामेशला जप करण्यास बसविले. जप करताना तसेच **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन घरात चालू असताना कामेशला खूप त्रास होत असे. तो म्हणायचा माझ्या अंगाची आग आग होत आहे. परंतु नियमित वाचनाने हा त्रास कमी झाला. घरात शांती नांदू लागली. कामेशच्या स्वभावात खूप फरक पडला. स्वातीने श्रीस्वामी दत्तावधूतांची सगळी पुस्तके वाचली. त्यातून तिला दानाचे महत्त्व कळले.

बऱ्याच दिवसापूर्वी तिने तीन-चार व्यक्तींना काही रुपये उसने दिले होते. ते परत येण्याची आशा तिने सोडली होती. पोथ्या वाचल्या नंतर सर्वांनी पैसे परत आणून दिले. घरात पोथी वाचन सुरू करताच काही दिवसांनी कामेशच्या स्वभावात आमूलाग्र बदल झाला. तो अभ्यास करू लागला. चांगल्या मार्कांनी पास झाला व घरात सर्वांशी प्रेमाने वागू लागला.

**मी** व प्रवीण आम्ही सुमारे चार वर्षे पुण्याला रहात होतो. आम्ही भाड्याने ब्लॉक घेतला होता. सकाळी प्रवीण कामावर गेला की, घरी मी एकटीच असायची. घरातील काम आवरून देवाचे वाचन, हवन सर्व करून वेळ घालवित असे. संध्याकाळी बाल्कनीत बसून बिल्डिंगमधील लहान मुलांना खेळताना पहात असे.

एक दिवस श्रीस्वामीजींच्या फोटो समोर बसून मी प्रार्थना केली. ‘‘स्वामीजी! येथे माझी कोणाशीच ओळख नाही, परंतु ही खाली खेळणारी मुले जर माझ्या घरी आली तर खूप बरे होईल. माझाही वेळ थोडा आनंदात जाईल.’’

त्या दिवशी संध्याकाळी आमच्या शेजारी पूजा होती. आमच्या बिल्डिंगमध्ये एकूण बारा ब्लॉक होते. या बाराही ब्लॉक मधील सगळे

आई-वडील आपल्या मुलांना घेऊन पूजेला आले होते. मलाही पूजेचे आमंत्रण होते. अचानक सगळे बाल गोपाळ आपल्या आई-वडिलांना सोडून माझ्या घरात शिरले व त्यांनी खूप मस्ती केली. मला अतिशय आनंद झाला. श्रीस्वामीजींनी माझी प्रार्थना ऐकली होती. मी सर्व मुलांना चॉकलेटस् दिली. थोड्यावेळाने सगळी मुले परत गेली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे मी मुलांना पाहण्यासाठी बाल्कनीत उभी राहिले. दररोज संध्याकाळी मी येथे उभी राहून खाली खेळणाऱ्या मुलांची गंमत पहात असे. काल मुले माझ्याकडे आली होती. पण आज मुले गेली कोठे असा विचार मी करत होते. इतक्यात दारावरची बेल वाजली मी दार उघडले.

दारात सगळी बालगोपाळ मंडळी उभी होती. सर्व लहान मुले मला म्हणाली, ‘‘काकी आम्ही तुमच्या घरी येऊ का?’’ मी आनंदाने सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर ही सर्व मुले दररोज संध्याकाळी खेळायला माझ्या ब्लॉकमध्ये येऊ लागली. असे बरेच दिवस झाले. एक दिवस त्या सर्व मुलांच्या आया माझ्याकडे आल्या व मला म्हणाल्या, ‘‘हल्ली ही मुले बाहेर खेळायला जाण्याऐवजी तुमच्या घरी येतात व तुम्हाला त्रास देतात.’’

यावर मी म्हणाले, मला या मुलांचा काहीच त्रास नाही. मुले येतात त्याचा मला खूप आनंद होतो. माझीही जरा करमणूक होते. आम्ही पुण्यात असे पर्यंत ही मुले दररोज संध्याकाळी आमच्याकडे येत. अशा प्रकारे श्रीस्वामीजींच्या फोटो समोर केलेली एक छोटीशी प्रार्थना श्रीस्वामीजींनी ऐकली होती व इच्छा पूर्ण केली होती.

पुण्यात एका शाळेमध्ये मला शिक्षिकेची नोकरी लागली. मी जातीने प्रत्येक मुलीकडे व्यवस्थित लक्ष पुरवून त्यांचा अभ्यास घेत असे. त्यांची काळजी घेत असे. असे करूनही एक मुलगी नववीच्या परिक्षेत

चार विषयात नापास झाली. मी त्या मुलीला पालकांना घेऊन ये! असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी ती मुलगी आपल्या आईला घेऊन आली. त्या मुलीची आई म्हणाली, ''माझा नवरा दररोज खूप दारू पितो. संध्याकाळी सहा वाजता घरी येतो. रात्रभर धिंगाणा घालतो. आमची परिस्थिती खूप हलाखीची आहे. अशा परिस्थितीत मुलगी अभ्यास कसा करणार ते सांगा!''

यावर मी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** त्या मुलीला दिले व सांगितले, ''तुम्ही दोघींनी हे दररोज वाचा व काय फरक पडतो ते मला येऊन सांगा!''

दहा दिवसानंतर त्या मुलीच्या आईने येऊन सांगितले, ''नवऱ्याच्या स्वभावामध्ये सुधारणा झाली असून त्याला आपल्या वागण्याचा पश्चात्ताप होत आहे. भांडणे व मारणे हा सर्व प्रकार पूर्णपणे थांबला असून आता घरात शांती आहे. घरातील वातावरण पूर्णपणे बदलले आहे. बरकत वाढली आहे. आम्ही खाऊन-पिऊन सुखी आहोत!''

यावर मी म्हणाले...

''वाचन चालू ठेवा आणखी सुधारणा होईल.'' मधल्या काळात मुलीची अभ्यासात खूप प्रगती झाली, तिला चांगले मार्कस् मिळाले.

पुण्यातील वास्तव्य संपवून आम्ही मुंबईत आलो. या मुलीची व आईची मला नेहमी आठवण येत होती. तीन वर्षानंतर मी तिला फोन केला तेव्हा कळले की, एक वर्षापूर्वी तिचे वडील स्वर्गवासी झाले. आर्थिक परिस्थिती उत्तम झाली होती. मुलीला टाटा मोटर्सची स्कॉलरशीप मिळाली होती व ती एक वर्षासाठी ऑस्ट्रियाला शिक्षणासाठी गेली होती.

घरी सर्व सुखी झाले होते.

**मा**झी मैत्रिण सत्त्वशीला लोहार ही तुळसणी (देवरुख) येथे राहते. आध्यात्माच्या विविध गोंडस नांवाखाली सामान्य जनांच्या शरीरामध्ये वातावरणातील पिशाच्च शक्ती घुसविण्याचे काम आपल्या देशामध्ये गेल्या शेकडो वर्षांपासून सुरू आहे. हे काम करणारे शेकडो तांत्रिक, मांत्रिक आजही आपल्या देशात आहेत. सध्याचे युग हे सुशिक्षितांचे युग आहे. तांत्रिक, मांत्रिकांनी आपल्या या विद्यांना गोंडस इंग्लिश नांवे देऊन भोळ्या भाबड्या जनतेच्या शरीरामध्ये पिशाच्चशक्ती घुसविण्याचे काम आजही चालू ठेवले आहे. सरळ साधा श्रीदत्त भक्तीचा मार्ग शिकविणाऱ्या श्रीस्वामीजींच्या सहवासात राहणाऱ्या आम्ही सर्वांनी अशा अनेक लोकांना पाहिले आहे की जे प्रथम इंग्लिश गोंडस नांवांना भुलून झटपट आध्यात्मिक प्रगतीसाठी कोर्सेस करायला गेले व स्वतःच्या देहामध्ये पिशाच्चशक्ती धारण करून आले.

या दुष्ट शक्ती शरीरात आल्यानंतर वेगवेगळे त्रास होऊ लागतात. शारीरिक व्याधी निर्माण होऊ लागतात. या व्याधींवरती डॉक्टरी उपाय चालत नाहीत. पूर्वजन्मीचे काही पुण्य असेल तर एखादा सत्पुरुष भेटतो व व्याधी मुक्त करतो. आमच्या श्रीस्वामीजींनी अशा अनेकांना व्याधी मुक्त केलेले मी पाहिले आहे. आपल्या देशातील असंख्य गरीब-श्रीमंत अशा प्रकारच्या तांत्रिक, मांत्रिक व तथाकथित साधू, तसेच कोर्सच्या नादाने फसलेले आहेत, असो.

सत्त्वशीला लोहार हिने अशाच प्रकारे कोर्स केला होता व त्यामुळे तिला विविध प्रकारच्या व्याधी जडलेल्या होत्या. घरची परिस्थिती हलाखीची होती. वडील पंढरपूरची वारी करत. त्यामुळे घरातील वातावरण समाधानाचे होते. मी जेव्हा तिच्या घरी गेले, तेव्हा

तिच्या वडिलांनी सत्त्वशीलाच्या आजारपणाविषयी सांगितले.

मी तिला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गा त्रिशती, श्री स्वामी समर्थ सप्तशती** व **श्रीदत्तस्तोत्र** दिले व दररोज वाचण्यास सांगितले. त्यांच्या घरासमोर औदुंबराचे झाड होते त्या झाडाला दररोज पाणी घालायला सांगितले.

सत्त्वशीलाची प्रकृती बिघडल्या कारणाने तिचे वडील तिला घेऊन मुंबईला आले. माझी एक मैत्रिण एन. जी. ओ. मध्ये होती. तिच्या मदतीने खूप कमी पैशात सत्त्वशीलावर उपचार होऊन ती गावी गेली.

काही वर्षांनी तिच्या प्रकृतीला परत त्रास सुरू झाला. या वेळीही ईश्वराच्या कृपेने अनपेक्षित मदत मिळून तिच्यावर उपचार झाले व ती बरी झाली.

मी हॉस्पिटलमध्ये तिला भेटायला गेले. श्रीस्वामीजींची विभूती तिच्या कपाळाला लावली व थोडी पाण्यातून तिला प्यायला दिली व मी घरी परत आले.

थोड्यावेळाने तिच्या वडिलांचा मला फोन आला. सत्त्वशीला विचित्र बडबड करत आहे. मी लगेच हॉस्पिटलमध्ये गेले. मला पाहताच ती म्हणाली...

''ताई! मला माफ कर! माझे चुकले! मी वाईट शक्तीचा कोर्स करायला नको होता. ती वाईट शक्ती मला ठार करायचा प्रयत्न करत आहे व पांढरे कपडे घातलेले एक सत्पुरुष त्या वाईट शक्तीपासून मला वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत.''

यानंतर तिने मला जगप्रसिद्ध असे इंग्लिश कोर्सचे नांव सांगितले.

हा कोर्स केल्याने आध्यात्मात प्रगती होते असे तिला सांगितले होते परंतु प्रत्यक्षात वाईट शक्ती तिच्या शरीरात घुसली व त्यामुळे सगळी आजारपणे निर्माण झाली, ऑपरेशन्स करावी लागली. शेवटी जेव्हा ती वाईट शक्ती सत्त्वशीलाचा जीव घेण्याचा प्रयत्न करत होती तेव्हा आमचे श्रीस्वामीजी तेथे प्रकट झाले व त्यांनी तिचे संरक्षण केले. सत्त्वशीलाने कधीही श्रीस्वामीजींना पाहिले नाही, परंतु तिने जे वर्णन केले ते आमच्या श्रीस्वामीजींचे होते.

श्रीस्वामीजींच्या पोथ्यांचे व पुस्तकांचे वाचन सत्त्वशीलाने चालू ठेवले व त्या वाईट शक्ती पासून स्वतःची सुटका करून घेतली.

**म**नापासून प्रार्थना केली की ती श्रीस्वामीजींपर्यंत पोहोचते असा माझा अनुभव आहे.

गावातील आमचे जुने घर दुरुस्त करायचे ठरविले. तेथे देवघर म्हणून एक नवीन खोली तयार करण्याचे ठरविले. घर पूर्ण दुरुस्त झाल्यानंतर देवघर कुठे करावे हे समजत नव्हते. मी श्रीस्वामीजींची मनापासून प्रार्थना केली की... ''मला मार्गदर्शन करा!''

दुसऱ्या दिवशी सकाळी अचानक सौ. दीक्षितताई आमच्या घरी आल्या. त्या मुंबईहून रत्नागिरीला जात होत्या.

आमच्या घरी आल्यावर त्यांनी मला देवघर कुठल्या दिशेला असावे हे दाखवून दिले व त्या पुढे रत्नागिरीला निघून गेल्या.

**ए**कदा माझा भाऊ विशाल याला श्रीस्वामीजींनी ताबडतोब आश्रमात निघून ये, असा निरोप पाठविला. तो ताबडतोब आश्रमात गेला. ४-६ दिवस आश्रमात राहिल्यानंतर त्याला मुंबईला परत जाण्याची अनुमती मिळाली.

तो आश्रमात असताना एकदा रात्री गाढ झोपेमध्ये माझ्या कानात स्पष्ट आवाज ऐकू आला. ''तुझा भाऊ आश्रमात गेला म्हणून वाचला. नाहीतर तो जिवंत राहिला नसता!'' मी घाबरून उठले. त्याच रात्री विशालची पत्नी वैशाली हिला सुद्धा एक स्वप्न पडले. स्वप्नात ती शालू नेसली होती. दागिने घातले होते. अचानक तिला आवाज ऐकू आला...

''तुला जेवढे नटून घ्यायचे तेवढे नटून घे. पण तू लवकरच विधवा होणार आहेस!''

सकाळी आम्ही एकमेकींना स्वप्न सांगितले. दोघींनाही एकाच अर्थाची स्वप्ने पडलेली पाहून आमच्या मनावर दडपण आले. पण त्याच बरोबर विशाल आश्रमात असल्याकारणाने सुखरूप आहे याबद्दल देवाचे आम्ही आभारही मानले.

**मा**झा भाऊ विशाल यालाही श्रीस्वामीजींच्या कृपेचे अनेक अनुभव आले. एकदा त्याने आपली फियाट गाडी स्टार्ट केली. अचानक त्याला 'तू बॉनेट उघडून बघ!' असा श्रीस्वामीजींचा आवाज ऐकू आला. तो गाडीतून खाली उतरला व बॉनेट उघडून पाहिले तर इंजिनमध्ये मांजरीचे एक पिल्लू बसलेले आढळले. एका फार मोठ्या संकटातून श्रीस्वामीजींनी आपल्याला वाचविले असे विशालला वाटले.

**ए**कदा विशाल फियाट गाडीने एक्सप्रेस हायवे वरून जात होता. त्याच्या समोर एक ट्रेलर होता व ट्रेलरवर सहा फूट रूंदीचे लोखंडाच्या शीटचे रोल ठेवले होते. अचानक आपण गाडी उजवीकडे घ्यावी अशी त्याला ईश्वराने प्रेरणा दिली या प्रेरणेनुसार त्याने गाडी उजवीकडे घेतली. विशालची गाडी जेमतेम उजवीकडे झाली असेल इतक्यात ट्रेलरवर ठेवलेल्या लोखंडाच्या शीटचा एक रोल धडाम्‌दिशी खाली पडला. विशालला गाडी उजवीकडे घेण्याची प्रेरणा जर ईश्वराने

दिली नसती तर तो रोल विशालच्या गाडीवर पडला असता. ईश्वरभक्ती केल्याने ईश्वर आपले सदैव संरक्षण करत असतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

विशालची पत्नी वैशाली हिच्या प्रकृतीच्या तक्रारी नेहमी सुरू असत. श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्यांच्या नित्य वाचनाने तिची प्रकृती सुधारली व डॉक्टरवर होणारा खर्च बंद झाला. तिचे चोरीला गेलेले मंगळसूत्रही अतिशय चमत्कारीकरित्या सापडले.

एकदा विशालची नोकरी सुटली. त्याचा एक मित्र त्याला ऑस्ट्रेलियाला ये, म्हणत होता. इतक्या लांब गेल्यावर आपण यशस्वी होऊ का? अशी विशालला काळजी वाटत होती म्हणून त्याने नाडीग्रंथवाल्या ज्योतिषाला हा प्रश्न विचारला.

ज्योतिषी म्हणाला, ''मुळीच ऑस्ट्रेलियाला जाऊ नकोस तुला दोन हजार रुपयांची सुद्धा नोकरी मिळणार नाही.''

विशालने श्रीस्वामीजींना विचारले तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ''खुशाल जा! काही काळजी करू नकोस. तुझे सर्व चांगले होईल.''

यावर विशालने श्रीस्वामीजींना नाडीग्रंथ तसेच इतर ज्योतिषांनी ऑस्ट्रेलियाला जाऊ नकोस, ग्रहमान बरोबर नाहीत, पश्चात्ताप करावा लागेल असे सांगितले.

तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले...''ग्रह व नक्षत्रांच्या पलीकडे ईश्वरीशक्ती आहे. या ईश्वरीशक्तीचे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत. तू आनंदाने जा! तुझ्या जीवनात आनंदी आनंद होईल.''

श्रीस्वामीजींच्या शब्दावर विश्वास ठेऊन विशाल ऑस्ट्रेलियाला गेला. तेथे त्याला खूप चांगली नोकरी लागली. इतकेच नव्हेतर काही

दिवसातच विशालची पत्नी वैशाली हिला फारसे इंग्लिश येत नसतानाही नोकरी लागली.

वर्ष दीड वर्षात त्याने ऑस्ट्रेलियात स्वतःचे घर विकत घेतले. इतकेच नव्हे तर त्याला ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्त्वही मिळाले.

आज माझा भाऊ विशाल, त्याची पत्नी वैशाली व मुलगा श्लोक तिघेही आनंदाने ऑस्ट्रेलियात रहात आहेत.

**श्री**स्वामीजींनी विशालला माझ्यासमोर सांगितले, ''तू ऑस्ट्रेलियाला जा. तुझे सर्व काही चांगले होईल.'' त्यामुळे मी अगदी निश्चिंत होते. परंतु घरी आई-वडिलांना खूप काळजी वाटत होती. आईने तर भरपूर पुरणपोळ्या बनवून विशाल बरोबर दिल्या.

आईने दिलेल्या पुरणपोळ्या घेऊन विशाल ऑस्ट्रेलिया-मध्ये जेव्हा सिडनी एअरपोर्टवर उतरला तेव्हा त्याला विचित्र प्रकार पहायला मिळाला.

सिडनी एअरपोर्टवरील ऑफिसर प्रत्येकाच्या बॅगा उघडून त्यात काही खाद्य पदार्थ आहेत का हे शोधत होते व खाद्य पदार्थ काढून कचऱ्याच्या डब्यात टाकत होते.

आईने दिलेल्या पुरणपोळ्या आता कचऱ्याच्या डब्यात जाणार अशी विशालची खात्री झाली. त्याच्या समोर शेकडो लोकांच्या बॅग्जस् उघडून त्यातील खाद्य पदार्थ कचऱ्याच्या डब्यात टाकत असलेले तो स्वतः पहात होता. शेवटी विशालचा नंबर आला.

ऑफिसरने विशालची बॅग उघडली. बॅग उघडताच त्याला श्रीस्वामीजींचा फोटो दिसला. बॅगेत सर्व सामान भरून झाल्यानंतर विशालने श्रीस्वामीजींचा एक फोटो सर्वात वर ठेवला होता. श्रीस्वामीजींचा फोटो पाहताच ऑफिसरने पटकन बॅग बंद केली. बॅगेची काहीही तपासणी

केली नाही व बॅग विशालकडे परत दिली. अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी विशालला **तू एकटा नाहीस मी तुझ्या बरोबर आहे** असे दाखवून दिले.

**श्री**स्वामीजींच्या आशीर्वादाने विशालला ऑस्ट्रेलियामध्ये याहूनही चांगली नोकरी मिळाली. सुरुवातीचे काही महिने विशाल, वैशाली व श्लोक आपल्या इतर काही मित्र मंडळींसह रहात होते. काही दिवसातच श्रीस्वामीजींच्या कृपेने त्यांना तीन बेडरूमचे एक मोठे घर मिळाले. विशालचे दोन मित्र व विशाल असे तिघांनी तेथे रहाण्याचे ठरविले.

२३ सप्टेंबर रोजी या सर्वांनी नवीन घरात सामान हलविण्यास सुरुवात केली. वैशाली व विशालचा मित्र सुभाष पेडणेकर, त्याची पत्नी संध्या या दोघी सकाळपासून नवीन घराची साफसफाई करत होत्या व विशाल कंपनीने दिलेल्या गाडीने सर्व सामान नवीन घरात नेत होता. सर्व सामान नेऊन झाले. शेवटची खेप करतेवेळी त्याने जुन्या घरातील देव्हाऱ्यातले श्रीस्वामीजींचे काचेची फ्रेम असलेले तीन फोटो उचलले व बाहेर आणून गाडीच्या टपावर ठेवून दिले. उरलेले सर्व सामान गाडीत लावल्यानंतर ते फोटो मांडीवर ठेवून ड्रायव्हींग करत नवीन घरात जायचे असा बेत त्याने केला होता. रात्रीचे पावणे बारा वाजले होते. सुभाष पेडणेकर विशालच्या बरोबर होता.

गाडीमध्ये सर्व सामान ठेवून झाल्यानंतर सुभाष व विशाल नवीन घराकडे जाण्यास निघाले. गाडीच्या टपावर तीन फोटो ठेवले आहेत याचा दोघांनाही विसर पडला. जुन्या घरापासून नवीन घर फक्त दहा मिनिटाच्या अंतरावर होते.

रात्री पावणेबारा वाजता सामानाने भरलेली गाडी सुरू केल्यानंतर विशाल सुभाषला म्हणाला, आज २३ सप्टेंबर आहे. रात्रीचे पावणे बारा

वाजलेले आहेत. श्रीस्वामीजींचा जन्म २३ सप्टेंबरच्या रात्री बारा वाजून २३ मिनिटांनी झाला. त्यामुळे त्यांची जन्म तारीख २४ सप्टेंबर धरली जाते. आपण अगदी श्रीस्वामीजींच्या वाढदिवसाच्या शुभ मुहूर्तावर गृहप्रवेश करत आहोत. विशाल असे बोलत असताना नवीन घर आले. गाडी उभी करून गाडीतून बाहेर पडताच टपावर ठेवलेले फोटो विशालला दिसले. त्याला आश्चर्याचा धक्का बसला. टपावर फोटो जसेच्या तसे होते. दहा मिनिटाच्या प्रवासामध्ये विशालने चार वेळा गाडी वळविली होती व तीन चढ उतार पार केले होते. दोन-तीन वेळा ब्रेक मारला होता. अशा परिस्थितीमध्ये टपावर काहीही असते तरी ते खाली पडले असते आणि फोटो तर टपावर ठेवलेले होते. या प्रसंगाने श्रीस्वामीजींनी आम्हाला दाखवून दिले की, **काळजी करू नका मी तुमच्या पाठीशी आहे.**

## श्लोक

**वि**शाल व वैशाली यांचा मुलगा श्लोक हा तर इतका भाग्यवान आहे की, त्याला वयाच्या सातव्या महिन्यापासून श्रीस्वामीजींच्या सहवासाचा व दर्शनाचा लाभ मिळाला. श्रीस्वामीजी बऱ्याचवेळा त्याला आपल्या मांडीवर बसवत. तो बोलू लागला तेव्हा श्रीस्वामीजींनी त्याला ‘‘**श्रीदत्त जय दत्त**’’ हा मंत्र म्हणण्यास शिकविले. श्लोकची आई वैशाली हिला श्रीस्वामीजी म्हणाले...

‘‘श्लोक दोन अडीच वर्षांचा झाल्यानंतर हळूहळू त्याच्याकडून एक-एक स्तोत्र पाठ करून घेत जा! प्रथम **श्रीगणपती स्तोत्र** पाठ करून घे. चांगले पाठ झाल्यानंतर दररोज एकवीस वेळा गणपती स्तोत्र म्हणून घे. असे केल्याने गणपतीची कृपा होऊन त्याला नेहमी सद्‌बुद्धी होत राहील. गणपती स्तोत्राची साधना व्यवस्थितरित्या सुरू

झाली की, **नवग्रह स्तोत्र** पाठ करून घे. नवग्रह स्तोत्र पाठ झाले की दररोज नऊ वेळा नवग्रह स्तोत्र म्हणायला सांग. नवग्रह स्तोत्र चांगले पाठ झाल्यानंतर रोज छत्तीस वेळा नवग्रह स्तोत्र म्हणून घे. अशी नवग्रह स्तोत्राची साधना त्याच्याकडून दोन-अडीच वर्षे करून घे! म्हणजे ग्रहांचे दुष्परिणाम त्याच्यावर होणार नाहीत. याच काळामध्ये त्याच्याकडून **श्रीदत्तस्तोत्र** पाठ करून घे. तीन वर्षांनंतर नवग्रह स्तोत्राची साधना बंद करून दत्तस्तोत्र दररोज छत्तीस वेळा त्याला म्हणायला लाव. दत्तस्तोत्र मात्र कायम चालू राहू दे. याशिवाय **प्रज्ञाविवर्धन स्तोत्र**ही पाठ करण्यास सांगितले!''

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे वैशालीने त्याच्याकडून सर्व साधना करून घेतल्या. प्रज्ञाविवर्धन स्तोत्रही तो दररोज आठ वेळा म्हणत असे.

श्लोक पाच वर्षांचा असताना विशालला ऑस्ट्रेलियात नोकरी मिळाली. ही नोकरी म्हणजे श्रीस्वामीजींचे खूप मोठे वरदान होते. हे मी मागेच लिहिले आहे. कारण ज्योतिषी व नाडीग्रंथवाल्यांनी तुझे प्रारब्ध अतिशय खडतर असून तुला दोन हजार रुपयाची नोकरी मिळणे सुद्धा कठीण आहे असे सांगितले होते. विशाल ऑस्ट्रेलियाला गेला व काही काळानंतर वैशाली व श्लोक हे सुद्धा ऑस्ट्रेलियाला गेले.

सुमारे चार वर्षांनंतर श्लोकला घेऊन वैशाली ऑस्ट्रेलियाहून सरळ हैद्राबादला आली व नागार्जुन सागर आश्रमात राहू लागली. नेहमीप्रमाणे श्रीस्वामीजींनी श्लोकचे खूप लाड केले. तेव्हा वैशालीने श्लोक कसा त्रास देतो, कसा हट्टीपणा करतो, याविषयी श्रीस्वामीजींकडे तक्रार केली. तेव्हा श्रीस्वामीजींनी श्लोकला जवळ बोलावले. त्याच्या डोक्यावर हात ठेवला व **ॐ दत्त दुर्गा ॐ** असा जप करण्यास सांगितले.

तसेच **श्रीदुर्गा स्तोत्राचे व श्रीदत्तात्रेय स्तोत्राचे (ॐ जटाधारं...)** पाठ करण्यास सांगितले. श्रीस्वामीजी वैशालीला म्हणाले, ''वैशाली तू श्लोकची काळजी करू नकोस. मी त्याचे भविष्य अतिशय चांगले केलेले आहे.'' श्रीस्वामीजींच्या या शब्दांमुळे वैशाली अगदी निश्चिंत झाली.

काही दिवस आश्रमात राहून वैशाली व श्लोक ऑस्ट्रेलियाला परत गेले. श्लोकच्या स्वभावात प्रचंड परिवर्तन झाले होते. तो शांत झाला होता. अभ्यासात त्याची खूप प्रगती झाली होती. श्लोकच्या मित्रांचे आई-वडील श्लोकच्या स्वभावाचे कौतुक करू लागले. यामुळे वैशालीला खूपच आनंद झाला.

**ए**कदा विशाल आश्रमात गुरुपौर्णिमेसाठी गेला होता. श्रीस्वामीजींच्या समोर बरीच भक्त मंडळी बसली होती. एका भक्ताचा एक वर्षाचा लहान मुलगा होता. त्या मुलाकडे बोट दाखवून श्रीस्वामीजी उपस्थित भक्तांना म्हणाले...

''ही मुले खरी भाग्यवान आहेत. श्लोक सुद्धा सात महिन्यांचा असल्यापासून माझ्याकडे येत आहे. आता तो नऊ-दहा वर्षांचा आहे. लहानपणापासून माझ्याकडे आल्याकारणाने मी त्याचे बरेचसे प्रारब्ध शुद्ध केले आहे. अगदी लहानपणापासून त्याने खूप ईश्वरभक्ती केली आहे म्हणून मला लहान मुले खूप आवडतात. श्लोकच्या प्रारब्धात काही चित्रविचित्र दोष होते पण अगदी बालपणापासून माझ्याकडे आल्याने मला ते सर्व दोष दूर करता आले.'' विशालने ही हकिकत जेव्हा मला व वैशालीला सांगितली तेव्हा मध्यंतरीच्या काळात श्लोक विचित्र का वागत होता याचा उलगडा झाला.

# श्रीदत्त पाठीराखा

माझा नवरा प्रवीण हा एकदा वनिता बुक्सची पुस्तके घेऊन अक्कलकोटला निघाला. पुस्तकांनी भरलेल्या चार बॅग्ज् त्याच्या जवळ होत्या. पहाटे साडेचार वाजता गाडी अक्कलकोट बस स्टॅण्डवर पोहोचली. पुस्तकांनी भरलेल्या चार बॅग्ज् बसमधून उतरायच्या होत्या. पहाटे साडेचार वाजता कोणाची मदत मिळणार? बॅग्ज् कशा उतरावयाच्या? असा विचार करत असताना पांढरे कपडे घातलेला एक मनुष्य बसमध्ये आला व त्याने सीटच्या खाली ज्या बॅग्ज् ठेवल्या होत्या त्यातील दोन बॅग्ज् उचलून बसच्या खाली ठेवल्या व दोन बॅग्ज् घेऊन प्रवीण उतरला. प्रवीणने त्या माणसाचे आभार मानण्यापूर्वीच तो मनुष्य अदृश्य झाला होता.

रिक्षामध्ये चारही बॅग्ज् ठेवून प्रवीण कृष्ण मंदिराच्या दिशेने जाऊ लागला. इतक्यात एक मुलगा धावत येऊन रिक्षात बसला.

मंदिराजवळ रिक्षा थांबविल्यानंतर त्या मुलाने रिक्षातून बॅग्ज् उतरवून मंदिरात पोहोचवून दिल्या. तेथे एक मनुष्य भेटला. त्या माणसाने रूम दिली. प्रवीणने आपले आन्हीक उरकले. इतक्यात तो मनुष्य पुन्हा प्रवीणला भेटायला आला. प्रवीणने त्याला पुस्तकाची दुकाने कोठे आहेत म्हणून विचारले.

तो मनुष्य प्रवीणला प्रथम श्रीअक्कलकोट स्वामींच्या मंदिरात घेऊन गेला. तेथे त्याला श्रीअक्कलकोट स्वामींचे दर्शन घडवून अक्कलकोट मधील सर्व पुस्तकांच्या दुकानामध्ये घेऊन गेला व पुस्तकांची माहिती त्याने दुकानदारांना स्वतःच सांगितली. अशा प्रकारे पहाटे सहा वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत तो प्रवीण बरोबर होता. त्याने प्रवीणला सर्वतोपरी मदत केली.

प्रवीणने त्याला जेवणाचा खूप आग्रह केला परंतु तो प्रवीण बरोबर जेवला नाही व प्रवीण पैसे देत होता ते पैसेही त्याने घेतले नाहीत. अशा प्रकारे प्रवीणला अपरिचित ठिकाणी सर्व बाजूंनी मदत मिळाली.

प्रवीण जेव्हा मुंबईहून निघाला तेव्हा अनोळखी ठिकाणी आपण श्रीस्वामीजींची पुस्तके घेऊन जात आहोत, काय होणार कसे होणार असे विचार प्रवीणच्या मनात सारखे येत होते. परंतु अक्कलकोटला पोहोचल्यापासून पुन्हा अक्कलकोटहून परत निघेपर्यंत प्रवीणला सर्वतोपरी मदत मिळाली.

मी, विशाल, चुलत भाऊ गजानन व बाबू, नवरा प्रवीण, विशालची पत्नी वैशाली आम्ही सर्वांनी श्रीदत्त भक्तीचा मार्ग धरल्यापासून आम्हाला इतके काही दिव्य अनुभव आलेले आहेत, की त्याचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात हेच खरे! या मार्गाचे आचरण सुरू केल्यापासून आमचे व आमच्या कुटुंबियांचेच भले झाले असे नव्हे तर आमच्या मित्र मंडळींचे पण खूप चांगले झाले आहे.

विशालचा मित्र सुभाष व त्याची पत्नी संध्या या दोघांना विशालने श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके दिली. त्यांनी श्रद्धेने पोथ्या व पुस्तकांचे वाचन सुरू करताच हळूहळू त्यांची परिस्थिती पूर्णपणे पालटली. कालांतराने सुभाष व संध्या या दोघांनाही ऑस्ट्रेलियामध्ये जाण्याची संधी मिळाली. श्रीस्वामीजींच्या कृपेने सुभाषला तेथे चांगली नोकरी लागली. सुभाष व संध्या यांचा मुलगा चिन्मय! हा चार वर्षांचा असताना त्याला हर्निया झाला.

इतक्या लहान मुलाला हर्निया झाला आहे व त्याचे ऑपरेशन करावे लागणार; हे ऐकून सुभाष व संध्या दोघेही गोंधळून गेले. विशालने त्यांना खूप धीर दिला, ऑपरेशनसाठी चिन्मयचे नांव

हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. ऑस्ट्रेलियातील मेडिकल सिस्टिमप्रमाणे डॉक्टरने ऑपरेशनची तारीख नक्की केली. ऑपरेशनला चार महिन्यांचा अवधी होता. या काळात काहीही चमत्कार घडू शकतो असे विशाल व वैशालीने सुभाषला सांगितले व श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्यांची पारायणे करत रहा असे सांगितले.

त्यांनी सांगितल्याप्रमाणे सुभाष व संध्याने श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्यांची पारायणे करण्यास सुरुवात केली. शेवटी ऑपरेशनचा दिवस उगवला. ऑपरेशनच्या दिवशी सुभाष व संध्या दोघांनी श्रीस्वामीजींच्या फोटोला नमस्कार केला व चार वर्षांच्या चिन्मयला घेऊन ऑपरेशनसाठी हॉस्पिटलमध्ये गेले.

हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यावर सुभाष व संध्या या दोघांना सांगण्यात आले की जे डॉक्टर चिन्मयचे ऑपरेशन करणार होते त्यांना अर्जंट कामासाठी परदेशात जावे लागले आहे म्हणून दुसऱ्या महिला डॉक्टर चिन्मयला तपासतील व ऑपरेशन संबंधी सांगतील.

महिला डॉक्टरने चिन्मयला तपासले व सांगितले, ''ऑपरेशन करण्याची मुळीच आवश्यकता नाही. याला काही त्रास नाही. चिन्मय पूर्णपणे बरा आहे.'' हे ऐकल्यानंतर सुभाष व संध्याच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनी श्रीस्वामीजींचे आभार मानले. चिन्मयचा हर्निया श्रीस्वामीजींच्या कृपेने शंभर टक्के बरा झालेला होता. अशा प्रकारे श्रीस्वामीजी आमचेच नाहीतर आमच्या मित्र-मंडळींचेही संरक्षण करीत आहेत.

श्रीस्वामी दत्तावधूतांच्या दर्शनाने आणि मार्गदर्शनाने सुख-शांती, समाधान प्राप्त झाले. मनाची अशांती व अस्वस्थता नाहीशी झाली. पूर्वी घरामध्ये नेहमी वादावादी होत असे. थोडीफार भांडणे होत असत. आजारपण सतत असायचे. श्रीस्वामीजींच्या कृपेने व मार्गदर्शनाने घरातील वातावरण

बदलले. घरातील लोकांच्या स्वभावात व जीवनात सुद्धा बदल घडले. घरातील वातावरण आनंददायी झाले. स्वभावातील हट्टीपणा व रागीटपणा अशा गोष्टी निघून गेल्या. ईश्वरभक्ती, दान-धर्म, परोपकार केल्याने मनाला आनंद प्राप्त होतो; हे जीवनाचे सूत्र समजले. श्रीस्वामीजींच्या पुस्तकांमुळे जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. देव आपल्या लायकीपेक्षा भरपूर जास्त देत असतो याची जाणीव झाली. भगवत्‌कृपा म्हणजे आपण ज्या परिस्थितीत आहोत त्या परिस्थितीमध्ये आनंदात व समाधानात जगणे हे ज्ञान प्राप्त झाले.

माझा भाऊ विशाल याचे जीवन श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तकांच्या वाचनाने इतके काही बदलून गेले की, त्याच्याकडे पाहिल्यावर हाच का तो पूर्वीचा विशाल असे वाटते. खरच चांगला मार्ग मिळण्यास ईश्वराची कृपा लागते हेच खरे!

**सौ. सुनिता सांडीम**

मुंबई

ॐ

# किशोर गुराम

माझे नांव किशोर गुराम. सिंधुदुर्गातील मालवण कट्टा हे माझे गाव. सध्या मी सिडनी ऑस्ट्रेलियात रहातो. विशाल सांडीम माझा मित्र आहे. आम्ही एकाच कंपनीत काम करतो. विशालमुळेच मला श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचण्याचा छंद लागला. श्रीस्वामीजींच्या पोथ्यांच्या नित्य वाचनाने माझ्या जीवनामध्ये आनंद निर्माण झाला. जीवनातील अनेक समस्या दूर झाल्या. फक्त पोथ्या व पुस्तके वाचून आपले जीवन जर इतके आनंदमय झाले तर प्रत्यक्ष श्रीस्वामीजींना पाहिल्यावर किती आनंद मिळेल असे विचार मनात येऊ लागले, म्हणून आता भारतात गेल्यावर श्रीस्वामीजींचे दर्शन घ्यायचेच, असे ठरविले. विशालकडून बरीचशी माहिती मिळालेली होती. श्रीस्वामीजी एकांतवासात रहातात. सहसा कोणाला भेटत नाहीत. आश्रमात जाऊनही काही उपयोग होत नाही. इत्यादी... परंतु मी आश्रमात जायचे ठरविले होते म्हणून आश्रमात येण्याची परवानगी काढण्यास विशालला सांगितले होते.

दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्षे आश्रमात जाण्यास परवानगी मिळत

नाही असे विशालकडून ऐकले होते. परंतु मला लगेचच परवानगी मिळाली.

भारतात पोहोचल्याबरोबर मी लगेच आश्रमात गेलो. वेळ दुपारची होती. आंघोळ करून जेवलो व श्रीदत्त मंदिराला प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. मी १०८ प्रदक्षिणा करण्याचे ठरविले होते. प्रदक्षिणा करताना नामस्मरण करत होतो. माझ्या ८० प्रदक्षिणा पूर्ण झाल्या मला खूप तहान लागली. मनात म्हटले १०८ प्रदक्षिणा पूर्ण करून मगच पाणी प्यावे.

१०८ प्रदक्षिणा पूर्ण झाल्या. मंदिरात जाऊन देवाला नमस्कार केला. इतक्यात प्रवीण धावतच आला व म्हणाला, ''श्रीस्वामीजींनी ताबडतोब दर्शनासाठी बोलावले आहे.'' लगेच दर्शनाला गेलो. श्रीस्वामीजींना पहाताच तहान हरपली. मला तहान लागली आहे हे विसरून गेलो. जवळच श्रीस्वामीजींचा सेवक बाबू उभा होता. श्रीस्वामीजी बाबूला म्हणाले...

''बाबू मला खूप तहान लागली आहे. माझ्यासाठी पाणी घेऊन ये. तसेच येथे बसलेल्या सर्वांसाठी पाणी घेऊन ये.'' हे लिहिण्याची आवश्यकता नाही की श्रीस्वामीजींनी माझी तहान ओळखली होती.

श्रीदत्त जयंतीचा सुयोग साधून मी आश्रमात आलो होतो. ऑस्ट्रेलियात असतांनाच श्रीस्वामीजी आश्रमात नाहीत असे कळले होते. मनात विचार आला, श्रीस्वामीजी आले तर किती बरे होईल! मला दर्शन मिळेल व शक्य झाले तर एखादा फोटोही काढता येईल. सुदैवाने श्रीस्वामीजी आश्रमात आले मी त्यांचा फोटो काढला. फोटो खूप सुंदर आला. मनात विचार आले. हा तर बसलेला फोटो आहे. एक उभा फोटो मिळाला असता तर किती बरे झाले असते.

त्या रात्री स्वप्न पडले...

श्रीस्वामीजी बसले होते. मी त्यांचे फोटो काढत होतो. मी त्यांना विनंती केली की, मला तुमचा उभा फोटो काढायचा आहे. श्रीस्वामीजींनी विनंती मान्य केली व फोटोसाठी उभे राहिले पण एका क्षणात त्यांची उंची एवढी वाढली की त्यांचे डोके आकाशापर्यंत पोहोचलेले होते. मला त्यांचा चेहरा दिसतच नव्हता. मी ते विराट रूप पाहिले, माफी मागितली तेव्हा ते मूळ स्वरूपात दिसू लागले.

**किशोर गुराम**

सिडनी, ऑस्ट्रेलिया

ॐ

# मृणाल

***परिचय*** *– पुण्यामध्ये सोनोपंत दांडेकर नांवाचे एक थोर संत होऊन गेले. सर्व वारकरी त्यांना मामा दांडेकर असे म्हणत. ते पुण्यातील एका कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. पुण्यामध्ये ते आपल्या बहिणीकडे रहात. या बहिणीचा मुलगा रामचंद्र टकले.*

*रामचंद्र टकले यांना लहानपणापासून सोनोपंत दांडेकरांचा सहवास मिळाल्याकारणाने त्यांची  ध्यान धारणेमध्ये खूप चांगली प्रगती झालेली होती. नोकरी निमित्त ते रत्नागिरीत रहात होते. त्यामुळे श्रीस्वामीजींची व त्यांची खूप मैत्री होती. रामचंद्र टकले यांना श्रीस्वामीजी भाऊ म्हणत.*

*भाऊ टकले हे श्रीस्वामीजींना घेऊन अधून मधून तीर्थस्थानांमध्ये जात. एकदा ते श्रीस्वामीजींना घेऊन गणपतीपुळे येथे गेले होते. दोघेही गणपती मंदिरात ध्यान करत बसले होते. इतक्यात पुजाऱ्याच्या घरून एक मनुष्य आला व त्याने भाऊ टकले यांना घरी बोलावल्याचा निरोप दिला. श्रीस्वामीजींना घेऊन भाऊ टकले पुजाऱ्याच्या घरी गेले. पुजाऱ्याने दोघांचेही स्वागत केले. पुजारी श्री भाऊ टकले यांना म्हणाला...*

''मी आत्ता झोपलो होतो. माझ्या स्वप्नामध्ये गणपती आला व गणपती मला म्हणाला... टकले माझ्या दर्शनासाठी आलेले आहेत. त्यांच्या बरोबर एक मुलगा असून तो दत्त अवतारी सिद्धपुरुष आहे. दोघांनाही घरी बोलावून त्यांचा आदर सत्कार करून त्यांना जेवायला दे! म्हणून मी ताबडतोब माझ्या मुलाला तुम्हाला आणायला पाठविले!''

पुजाऱ्याने अशा प्रकारे सांगून श्रीस्वामीजींना नमस्कार केला व आदर सत्कार करून दोघांनाही जेवायला वाढले.

मृणाल ही भाऊ टकले यांची मुलगी! श्रीस्वामीजी व भाऊ टकले यांचा जेव्हा परिचय झाला तेव्हा मृणाल सहा महिन्यांची होती.

एकदा भाऊ टकले यांना बाहेरगावी जायचे होते व मृणालला खूप ताप आला होता. मृणालची आई भाऊ टकल्यांना म्हणाली, ''आपण आधी मृणालला डॉक्टरकडे नेऊ व मग तुम्ही बाहेरगावी जा!'' यावर भाऊ टकले म्हणाले...

''तू श्रीस्वामीजींना सांग. श्रीस्वामीजी तिला बरे करतील!'' असे सांगून भाऊ टकले बाहेरगावी निघून गेले. थोड्यावेळाने श्रीस्वामीजी त्यांच्या घरी गेले.

भाऊ टकल्यांच्या पत्नीने मृणालच्या प्रकृतीविषयी सांगितले. मृणालला १०४° F ताप होता. श्रीस्वामीजी मृणालला मांडीवर घेऊन बसले. दहा मिनिटांत सर्व ताप उतरला व मृणाल खेळू लागली. मृणाल चार वर्षांची होईपर्यंत हा प्रकार सुरू होता. नंतर श्रीस्वामीजी कृष्णा व तुंगभद्रेच्या परिक्रमेला निघून गेले नंतर मात्र मृणालला घेऊन डॉक्टरकडे जावे लागले.

*अशी मृणाल टकले लग्नानंतर केळकर झाली. आता ती ४२-४३ वर्षांची आहे. आपले अनुभव तिच्या शब्दात सांगत आहे.*

***सौ. वनिता दीक्षित***

*मुंबई*

## मृणाल

**मी** मृणाल केळकर, रामचंद्र उर्फ भाऊ टकले यांची मुलगी! सध्या मी नाशिकला रहात आहे. माझा जन्म रत्नागिरीला झाला. अगदी बालपणापासून म्हणजे मी जेमतेम ६-७ महिन्यांची असेन तेव्हापासून श्रीस्वामीजींचा मला सहवास मिळाला. त्यांच्या सहवासाने माझे सर्व आयुष्य सुखात गेले.

श्रीस्वामीजी आमच्या घरी येत. माझे खूप लाड करत व माझ्या वडिलांबरोबर रात्री दोन-दोन वाजेपर्यंत आध्यात्मिक चर्चा करीत. घरातील वातावरण आध्यात्मिक, ज्ञानमय व आनंदमय असे होते. माझी मोठी बहीण सरोज श्रीस्वामीजींना मामा म्हणत असे.

एकदा सरोजचा फिलॉसॉफीचा पेपर होता. त्या दिवशी श्रीस्वामीजी आमच्या घरी आले होते. उद्या माझा फिलॉसॉफीचा पेपर आहे, असे सरोजने श्रीस्वामीजींना सांगितले.

श्रीस्वामीजी म्हणाले,''काळजी करू नकोस. चांगल्या मार्कांनी पास होशील.''

श्रीस्वामीजींनी माझ्या बाबांबरोबर गप्पा मारण्यास सुरुवात केली. श्रीस्वामीजी ज्या आध्यात्मिक गोष्टी सांगत होते, सरोज त्या ऐकत

बसली होती.

दुसऱ्या दिवशी सरोजच्या हातात जेव्हा फिलॉसॉफीचा पेपर आला तेव्हा तिच्या लक्षात आले की, श्रीस्वामीजींनी सगळ्या प्रश्नांची उत्तरे आदल्याच दिवशी देऊन ठेवलेली आहेत. तिने आनंदाने श्रीस्वामीजींनी दिलेले ज्ञान उत्तर पत्रिकेत उतरविले व ती चांगल्या मार्कांनी पास झाली.

मी बारावीत शिकत होते. परीक्षा जवळ आली होती व अभ्यास काहीच झाला नव्हता. बारावीचे सर्व पेपर्स लिहून झाल्यानंतर आपण शंभर टक्के नापास होणार अशी मला खात्री होती. कारण मी पेपर्स मध्ये फार काही लिहिलेले नव्हते. श्रीस्वामीजींची आठवण येत होती पण ते नेहमीप्रमाणे कोठेतरी तपस्येला निघून गेले होते.

रिझल्टच्या काही दिवस अगोदर अचानक श्रीस्वामीजी घरी आले. मी त्यांना माझी व्यथा सांगितली. शंभरटक्के नापास होणार याची खात्री असल्याचेही सांगितले तेव्हा ते म्हणाले...
''मुळीच काळजी करू नकोस! मी सांगतो तसे कर. तू स्वतःच्या हाताने एकवीस मोदक बनव व गणपती बाप्पाला नैवेद्य दाखव. तू चांगल्या मार्कांनी पास होशील!''

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे मी स्वतःच्या हाताने मोदक बनविले व गणपती बाप्पाला नैवेद्य दाखविला.

गणपती बाप्पाच्या कृपेने व श्रीस्वामीजींच्या आशीर्वादाने मी चांगल्या मार्कांनी बारावीची परीक्षा पास झाले.

**मी,** आई व बाबा आम्ही तिघेजण काशी, गया, प्रयाग अशा यात्रेला गेलो. रेल्वेतून प्रवास करताना वाटेत इटारसी स्टेशनवर

आई गाडीतून खाली उतरली व प्लॅटफॉर्मवर काकडी विकत घेऊ लागली. एवढ्यात ट्रेन सुरू झाली. ती दरवाजाजवळ आली पण ट्रेन चालू झाल्याकारणाने तिला चढता येईना. अचानक पाठीमागून एका माणसाने माझ्या आईला कंबरेत धरून वर उचलले व ट्रेनच्या आत ठेवून दिले. दरवाजात उभे राहून त्या माणसाचे आभार मानण्यासाठी आईने मागे वळून पाहिले तर तिला कोणीच दिसले नाही. साक्षात् देवानेच प्रकट होऊन आपल्याला उचलून ट्रेनमध्ये ठेवले असे आई म्हणाली. माझी आई खूपच लठ्ठ होती. तिला चटकन् उचलणे सामान्य माणसाला अशक्य होते. श्रीस्वामीजी आमचे सतत संरक्षण करीत आहेत हा अनुभव गेले ४०/४२ वर्षे आम्ही घेत आहोत.

वडील रिटायर झाल्यानंतर आम्ही पुण्याला स्थायिक व्हायचे ठरविले. पुण्याला आम्ही एक जागा बघितली. रत्नागिरीहून ट्रकने आम्ही सर्व सामान घेऊन पुण्याला आलो. पुण्याला येऊन पोहोचल्यानंतर ट्रकवाल्याने माझ्या वडिलांना सांगितले तुम्ही खूप पुण्यवान आहात म्हणूनच ट्रक येथपर्यंत येऊन पोहोचला. सातारा सोडल्यानंतर माझ्या लक्षात आले की ट्रकचे ब्रेक फेल झाले आहेत. ईश्वराच्या कृपेने आपण सुखरूप येऊन पोहोचलो.

दोन-तीन वर्षे पुण्यात काढल्यानंतर वार्धक्यामुळे माझ्या आई-वडिलांची प्रकृती बिघडू लागली. श्रीस्वामीजींना हे कळताच श्रीस्वामीजींनी सौ. दीक्षितताईंना माझ्याकडे पाठविले. सौ. दीक्षितताईंनी माझी सर्वतोपरी काळजी घेतली. कालांतराने माझे लग्न झाले. आई-वडिलांचे देहावसान झाले परंतु आजही श्रीस्वामीजी व सौ. दीक्षितताई माझी सर्वतोपरी काळजी घेत आहेत. त्यांच्या कृपेने मी

अगदी आनंदात व सुखात आहे.

**सौ. मृणाल केळकर**

नाशिक

ॐ

# स्मिता व सुजाता

**परिचय** – *भाई कदम नांवाचे श्रीस्वामीजींचे एक अतिशय जवळचे भक्त होते. स्मिता व सुजाता या त्यांच्या मुली! भाईंची श्रीस्वामीजींवर अतिशय श्रद्धा होती. भाई कदम यांनीच आम्हाला (मी व दीक्षितसर) अरण्यात नेऊन श्रीस्वामीजींचे प्रथम दर्शन घडविले. त्यामुळे गेली तीस वर्षे आम्ही श्रीस्वामीजींच्या सहवासात आहोत. भाईंना दोन मुली व दोन मुलगे. या मुलांवरती श्रीस्वामीजींची विशेष कृपा आहे. स्मिता व सुजाता या दोघींनीही ध्यान मार्गात खूपच प्रगती केली आहे. त्यांचे ध्यान मार्गातील अनुभव हृदयस्पर्शी असतात, ज्ञान देणारे असतात, जीवनातील रहस्य उलगडून सांगणारे असतात. त्यातील काही अनुभव आपण पाहू या! त्यांच्याच शब्दात!*

***सौ. वनिता दीक्षित***
*मुंबई*

# स्मिता

**मी** स्मिता राणे! माझ्या जन्माच्या आधी पासून माझे वडील, भाई कदम हे श्रीस्वामीजींना ओळखत होते. माझ्या वडिलांचे श्रीस्वामीजींवर खूप प्रेम होते, श्रद्धा होती. लहानपणी ते आम्हाला श्रीस्वामीजींच्या गोष्टी सांगत. अरण्यात जाऊन श्रीस्वामीजींकडे तीन-तीन दिवस रहात. पुष्कळवेळा श्रीस्वामीजींबरोबर प्रवासही करीत. १९८३ साली माझे वडील श्रीस्वामीजींना घेऊन मुंबईला आमच्या घरी आले होते तेव्हा त्यांना प्रथम पाहिले. त्यावेळी श्रीस्वामीजी माझ्या वडिलांना म्हणाले, ‘‘स्मिताची आध्यात्मात चांगली प्रगती होईल.’’ तेव्हा वडील म्हणाले, ‘‘ही सारखी टी.व्ही. बघत बसते ही कसली आध्यात्मात प्रगती करणार?’’

परंतु श्रीस्वामीजींचे शब्द खरे झाले व आध्यात्म मार्गात आजही माझी प्रगती सुरूच आहे.

मध्ये काही काळ गेला. त्यानंतर एकदा श्रीस्वामीजी माझ्या वडिलांना म्हणाले, ‘‘भाई! स्मिताला तुम्ही दीक्षित ताईंच्या सहवासात ठेवा. त्या साक्षात् महालक्ष्मी आहेत. त्यांच्या सहवासाने स्मिताची आध्यात्मात खूप प्रगती होईल!’’ अशा प्रकारे माझा व दीक्षितताईंचा परिचय झाला व मी त्यांना दीदी म्हणू लागले. त्यांच्या घरी जाऊन ध्यानसाधना करू लागले. त्यानंतर जेव्हा श्रीस्वामीजींची व माझी भेट झाली तेव्हा त्यांनी मला ध्यान साधनेमध्ये खूप मार्गदर्शन केले. श्रीस्वामीजी म्हणाले, ‘‘ध्यान साधनेत जसजशी प्रगती होऊ लागते तसतशा आपल्याला काही स्टेजेस् प्राप्त होतात. बालात्रिपुरसुंदरी, त्रिपुरसुंदरी, महालक्ष्मी, षोडषीत्रिपुरसुंदरी, भुवनेश्वरी, दुर्गा, परमेश्वरी, जगदंबा अशा त्या अवस्था असतात. सौ. दीक्षितताई या दुर्गा स्टेजपर्यंत पोहोचलेल्या आहेत व अजूनही आणखी बऱ्याच स्टेजेस् त्या प्राप्त करणार

आहेत म्हणून तुला मी त्यांच्या सहवासात रहा असे सांगितले. रोज नित्यनेमाने ध्यान करत जा. तुझी प्रगती होईल!''

श्रीस्वामीजींच्या उपदेशाप्रमाणे ध्यान करू लागले. ध्यानामध्ये मला दिव्य अनुभव येऊ लागले. ध्यान कसे करावे हे मला श्रीस्वामीजींनी व सौ. दीदींनी शिकविले.

ध्यानाच्या सुरुवातीला त्राटक साधना करावी लागते. आपल्या बरोबर डोळ्यासमोर येईल एवढ्या उंचीवर एखादा काचेचा गोळा, स्फटिक, देवाचा फोटो, लाल रंगाच्या बॉलचे किंवा वर्तुळाचे चित्र यापैकी एक काहीतरी ठेवून त्याकडे एकटक पाच-सहा मिनिटे पहात रहावे. डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप करू नये. सुरुवातीला हे जमणार नाही. सुरुवातीला एक मिनिट करावे. हळूहळू वेळ वाढवत पाच ते सात मिनिटांपर्यंत त्राटकाचा काळ वाढवावा. त्राटक करून झाल्यानंतर थंडगार पाण्याने डोळे धुवावे. तद्नंतर डोळे मिटून पूर्वेकडे अथवा उत्तरेकडे तोंड करून बसावे व डोळे मिटून मन दोन्ही भुवयांच्या मध्ये केंद्रित करावे किंवा ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी (fontanel) लक्ष केंद्रित करावे व तेथेच पहात रहावे असे श्रीस्वामीजी व दीदी या दोघांनी मला सांगितले. ध्यानाचे असंख्य प्रकार आहेत पण तुला जी पद्धत सांगितली आहे यात कुठल्याही प्रकारचा धोका नाही. हे ध्यान तू करत रहा व तुझी कशी प्रगती होते ते तूच पहा! अशा प्रकारे माझी ध्यान साधना सुरू झाली.

सुमारे एक महिना ध्यान केल्यानंतर मला हळूहळू ज्योति, प्रकाश, चिदाकाश, नीलबिंदू अशी दृश्ये दिसू लागली. हळूहळू मन ध्यानात रमू लागले. मला आलेल्या असंख्य ध्यानाच्या अनुभवांपैकी काही अनुभव पुढे देत आहे.

एकदा ध्यानामध्ये महाकालीचे दर्शन झाले. महाकाली म्हणाली, ‘‘पृथ्वीवर पाप खूप वाढत चालले आहे. लोक मानवता विसरत आहेत. यामुळे भावी काळात प्रचंड नरसंहार होईल.’’

एकदा श्रीस्वामीजींचे पुस्तक लिखाणाचे काम चालू होते. श्रीस्वामीजी सांगत होते व दीदी लिहित होत्या. जवळच मी ध्यान करीत बसले होते. ध्यानामध्ये मला त्या खोलीमध्ये अनेक देव-देवता बसलेल्या दिसल्या. त्यातील एक देवता मला म्हणाली, ‘‘खरे आध्यात्म काय आहे हे श्रीस्वामीजींची पुस्तके वाचल्यावर लोकांना कळेल. अदृश्य सृष्टीतही श्रीस्वामीजींची पुस्तके वाचली जातात. श्रीस्वामीजींनी पुस्तक लिहिले की, त्या पुस्तकांच्या ॲस्ट्रल कॉपीज् तयार केल्या जातात व अदृश्य सृष्टीतील विविध स्तरांवर राहणाऱ्या आत्म्यांना ही पुस्तके वाचायला दिली जातात. भावी काळामध्ये श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्यांच्या व पुस्तकांच्या आधाराने लाखो लोकांचा उद्धार होईल.’’

माझा वरील ध्यानाचा अनुभव १९९७ मधील आहे. १९९६ पासून श्रीस्वामीजींची पुस्तके व पोथ्या प्रकाशित होऊ लागल्या होत्या. आज जेव्हा वीस लाखांहून अधिक घरांमध्ये श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचली जात आहेत हे मी पाहते तेव्हा १९९७ साली ध्यानामध्ये आलेल्या या अनुभवाची मला आठवण येते.

**ध्या**नामध्ये एकदा एका देवतेने सांगितले की, ‘‘श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचल्याने पूर्वजांचाही उद्धार होतो.’’ माझा हा ध्यानाचा अनुभव १९९८ मधील आहे. या अनुभवानंतर सुमारे सहा-सात महिन्यांनी माझी मैत्रीण शैला मसुरकर म्हणाली, ‘‘माझे वडील स्वप्नात आले होते.’’ ते म्हणाले, ‘‘आम्ही जेव्हा पृथ्वीतलावर

रहात होतो तेव्हा अशी पुस्तके निर्माण झाली असती तर किती बरे झाले असते.'' श्रीस्वामीजींची ही पुस्तके पृथ्वीतलावरच नव्हे तर परलोकातील आत्म्यांच्याही उद्धाराचे कार्य करत आहेत. अशाच प्रकारच्या गोष्टी अधून मधून भक्तांकडून ऐकायला मिळत असत.

एकदा एका व्यक्तीला त्याचे घर विकायचे होते. त्या घरामध्ये काही दुष्ट शक्तींचे वास्तव्य होते. त्यामुळे घर मालकाला खूप त्रास होत होता. त्या दुष्ट शक्तीने घरातून जावे म्हणून त्याने अनेक उपाय केले. परंतु काही उपयोग झाला नाही. शेवटी त्याने घर विकायला काढले. परंतु बरीच वर्षे प्रयत्न करूनही घर विकले गेले नाही. एक दिवस त्याला त्याच्या एका हितचिंतकाने सल्ला दिला की, तू श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या घरात वाचायला सुरुवात कर! तुझ्या घरात राहणाऱ्या दुष्ट शक्तींचा उद्धार होईल व तुझे घरही विकले जाईल. त्याप्रमाणे त्या माणसाने करताच त्याचे घर विकले गेले व त्याला होणारा दुष्ट शक्तींचा त्रासही नाहीसा झाला. अशा कितीतरी गोष्टी कानावर आल्या. त्यानंतर बरेच वर्षांनी अमेरिकेत राहणाऱ्या सुजाता माळवेची भेट झाली. तिने श्रीस्वामीजींच्या पोथ्या वाचून पूर्वजांचा उद्धार कसा होतो हे मला सविस्तर सांगितले. अशा रितीने १९९८ साली ध्यानामध्ये देवतेने मला जे सांगितले होते ते पूर्णपणे खरे झाले.

जून १९९१ मध्ये माझी आई वारली व सहा महिन्यांनी वडील वारले. मी तेव्हा बावीस वर्षांची होते. दोन लहान भाऊ व एक लहान बहीण असे आम्ही चौघेजण होतो. श्रीस्वामीजी व सौ. दीक्षितताई यांचे जबरदस्त पाठबळ असल्याकारणाने दुःखाचा हा डोंगर आम्ही सहज पार केला. नंतर माझे लग्न झाले. मला एक मुलगी झाली. माझे वडीलच स्पिरीच्युअल प्रोग्रेस करण्यासाठी मुलीच्या रूपाने परत जन्माला

आले आहेत असे मला ध्यानात कळले.

एकदा मला ध्यानामध्ये माझ्या देहात वेटोळे घालून बसलेली कुंडलिनी शक्ती व सहा चक्रे कुठे व कशी आहेत ते एका देवतेने दाखविले.

एकदा ध्यानामध्ये असे कळले की, श्रीस्वामीजी आता एका पाठोपाठ एक पुस्तके लिहितील व ही पुस्तके खूप गाजतील. ध्यानामध्ये मला हे कळल्यानंतर पुढील पाच, सहा वर्षांत श्रीस्वामीजींनी सुमारे २०-२२ पुस्तके लिहिली.

खूपवेळा मला सौ. दीदींच्या म्हणजे सौ. दीक्षित ताईंच्या जागी श्रीदुर्गादेवी दिसत असे. श्रीस्वामीजी व सौ. दीक्षित ताई हे दोघेही ईश्वरीकार्य करण्याकरिता जन्माला आलेले असून हा देह सोडल्यानंतर सौ. दीक्षित ताई परत जन्माला येणार नाहीत व श्रीस्वामीजी, श्री महाअवतार बाबाजीं बरोबर राहतील असे दिसले.

एकदा अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ दिसले. त्यांनी श्रीस्वामीजींचे रूप घेतले व मी दत्तगिरी आहे असे सांगितले.

एकदा ध्यानामध्ये मी शून्यलोकात प्रवास करत होते. माझ्या बरोबर असणाऱ्या एका देवतेने लिंबाएवढ्या आकाराचा ग्रह दाखविला व म्हणाली, ''ती पृथ्वी आहे. या पृथ्वीवर सध्या जरी वाईट वातावरण असले तरी भविष्य काळात सुवर्णयुग अवतरणार आहे. पृथ्वीवरील सर्व माणसे आध्यात्मिक होणार आहेत. या देवतेने मला नंतर अनेक लोक दाखविले. हे सर्व दिव्यलोक होते. पृथ्वीवर पुण्य करणारी माणसे मृत्यूनंतर येथे येऊन राहतात, असे मला सांगितले!''

एकदा ध्यानामध्ये एका देवतेने मला भारतावर व त्याच्या अनुषंगाने

जगावर येणाऱ्या आपत्तींपासून श्रीस्वामीजी कसे संरक्षण करत आहेत हे दाखविले.

एकदा तर मुंबईवर प्रचंड त्सुनामीचे संकट येणार होते परंतु त्याच्या एक दिवस अगोदर श्रीस्वामीजींनी चांदी व तांब्याचे काही तुकडे व नारळ मंत्रून माझ्या वडिलांकडे दिले व मुंबईच्या परिसरात जो समुद्र आहे त्या समुद्रात अर्ध्या अर्ध्या किलोमीटर अंतरावर एक तुकडा चांदीचा व एक तुकडा तांब्याचा व एक नारळ असे टाकण्यास सांगितले. त्यामुळे मुंबईवर येणारे संकट टळले. वेगाने आलेले वादळ समुद्रातच अदृश्य झाले. फक्त २-३ परदेशी बोटी ज्या सत्तर हजार टन वजनाच्या होत्या, त्या माहिमच्या किनाऱ्यावर येऊन अडकल्या. इतर काही नुकसान झाले नाही.

या घटनेनंतर पुन्हा एकदा ध्यान करत असताना एका देवतेने असे सांगितले की, ''पृथ्वीतलावरील माणसे माणुसकीशून्य वागत असल्याकारणाने या सर्वांना शिक्षा करण्यासाठी रुद्र देवता अतिशय उतावीळ झालेल्या आहेत. परंतु श्रीस्वामीजींपुढे त्यांचे काही चालत नाही. श्रीस्वामीजींनी त्या सर्वांना थोपवून धरलेले आहे. परंतु श्रीस्वामीजींनी समाधी घेतल्यानंतर तीन वर्षात पृथ्वीतलावरील सर्व पाप धुऊन काढण्यात येईल. तेव्हा प्रचंड जनहानी होईल. आशिया खंडाची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात कमी होईल.''

१९९४ पासून श्रीस्वामीजी अज्ञातवासात राहू लागले. फक्त काही ठराविक लोकांना ते भेटत. वर्षभरामध्ये सुमारे ५०-६० अतिशय जवळच्या लोकांना ते फक्त दर्शन देत. आम जनतेला दर्शन देणे त्यांनी बंद केले. जास्तीत जास्त वेळ ते हिमालयात राहू लागले, एकांतवासात राहू लागले. या सर्वांच्या पाठीमागे काहीतरी अर्थ आहे असे मला सारखे

वाटत होते. पण नेमका काय अर्थ असावा हे मला कळत नव्हते, ध्यानामध्ये एकदा देवतेने याचा खुलासा केला...

देवता म्हणाली, ‘‘या जगापासून त्यांना असे दूर केल्यानंतर आम्हाला जग धुऊन काढणे सोपे जाते, जगाची साफ सफाई करणे सोपे जाते! यापुढे ते जास्तीत जास्त समाधीत राहतील. समाजात येणार नाहीत. या काळामध्ये जगाची थोडीशी साफसफाई केली जाईल. आध्यात्ममार्गात जगाची प्रगती होईल असे केले जाईल. अशा रितीने हळूहळू जग आध्यात्मिक होईल, जग संपूर्ण आध्यात्मिक होण्यास अजून किमान २०० वर्षांचा काळ लागेल.’’

**मा**झ्या सासरचे वातावरण आध्यात्मिक नव्हते.सासू, सासरा, नवरा कोणालाही देवाधर्माची आवड नव्हती. घरातील कोणीतरी एकाने कधीतरी देवाला एक अगरबत्ती ओवाळली की झाले. यापेक्षा जास्त काही देवाचे करण्याची आवश्यकता नसते असे सर्वांना वाटत असे. अशा वातावरणात मी माझी आध्यात्मिक साधना चूपचापपणे व कोणालाही कळणार नाही अशी चालू ठेवली होती. सौ. दीक्षितताईंचे मला खूप सहकार्य होत असे. त्यांच्याकडे जाऊन मी भरपूर साधना करत असे व डिव्हाइन् एनर्जी प्राप्त करत असे. त्यामुळे अशा विरोधी वातावरणात सुद्धा माझे आध्यात्म टिकून राहिले व माझी आध्यात्मिक प्रगती होत राहिली.

**१**९९७ साली वयाच्या ६६व्या वर्षी माझे सासरे वारले. त्यानंतर काही दिवसांनी मला ध्यानामध्ये काही विचित्र अनुभव आले. सिनेमा पहावा त्याप्रमाणे ते सर्व मी पहात होते.

माझे सासरे अंधःकारमयलोकात खेचले गेले. तो लोक जरी अंधःकारमय व भयाण असला तरी लाईट गेल्यानंतर जसा अंधार असतो

तसा अंधार होता व त्या अंधारातही त्यांचा आत्मा सर्व काही पाहू शकत होता.

अंधारात ते कोठेतरी चालले होते. वाटेत त्यांना एक गाईड आत्मा (spirit) भेटला. तो त्यांना म्हणाला, ‘‘चल मी तुला तुझी जागा दाखवितो.’’ असे म्हणून माझ्या सासऱ्यांना एक वेगळाच लोक (plane) दाखविला व म्हणाला, ‘‘तुला या लोकात रहायचे आहे.’’ त्या लोकामध्ये राहणारे आत्मे असंख्य प्रकारच्या यातना भोगत होते. त्यांच्या यातनांचे वर्णन शब्दात करणे कठीण आहे. कधी कधी आपण पुस्तकामध्ये यातना व छळ यांची वर्णने वाचतो. कधी कधी सिनेमामध्ये यातना दिल्याचे किंवा छळ केल्याचे आपण पहातो. त्यापेक्षा लाखो, करोडो पटीने यातना, त्या अदृश्य सृष्टीतील अंधःकारमयलोकामध्ये आत्म्यांना दिल्या जात होत्या.

त्या लोकातील आत्म्यांच्या यातना पाहून माझ्या सासऱ्यांनी त्यांच्या गाईड आत्म्याचे पाय धरले व कृपाकरून या लोकात मला ठेवू नका मला पृथ्वीतलावर परत पाठवा अशी विनंती करण्यास सुरुवात केली. अगदी गयावया करू लागले. तेव्हा तो गाईड आत्मा माझ्या सासऱ्यांना म्हणाला...

‘‘प्रत्येक आत्म्याला आध्यात्मात प्रगती करण्यासाठी पृथ्वीतलावर माणसाचा, स्त्री अथवा पुरुषाचा जन्म देऊन पाठविले जाते. तुम्ही आध्यात्मात प्रगती केली नाही तर आता तू जो यातनालोक पाहिलास अशा यातनालोकात त्यांना पाठविले जाते. तुला आध्यात्मात प्रगती करण्यासाठी खूप संधी होती. तुझी सून एका खूप मोठ्या सिद्धपुरूषाची कृपांकित आहे. तिच्या आधाराने तुला आध्यात्मात चांगली प्रगती करता आली असती. परंतु तू आपला जन्म फुकट

घालविलास. तुझ्या कर्माप्रमाणे हा अंधःकारमयलोक तुला प्राप्त झाला आहे.'' यावर माझ्या सासऱ्यांनी खूप गयावया केली. ते म्हणाले...

''तुम्ही माझ्या सुनेच्या पोटी मला जन्म द्या! तुम्हीच म्हणता की, ती खूप आध्यात्मिक आहे. म्हणून तिच्या पोटी मला जर जन्म मिळाला तर माझा उद्धार होईल.''

यावर तो मार्गदर्शक आत्मा म्हणाला, ''तुला जरी तुझे म्हणणे बरोबर वाटत असले तरी आध्यात्मिक मार्ग मिळण्यासाठी जेवढी पुण्याई लागते तेवढी पुण्याई तुझ्याजवळ नसल्याने जर तुला पृथ्वीतलावर जन्म दिला तर तू गुन्हेगार होशील; सत्ताधीशांचा आश्रित होशील व त्यानंतर तू आता पाहिलास त्यापेक्षाही अतिशय भयंकर लोक तुला प्राप्त होईल. चल तुला तोही लोक दाखवितो.'' असे म्हणून माझ्या सासऱ्यांना घेऊन तो गाईड आत्मा अत्यंत भयानक अंधःकारमय अशा लोकात गेला. या लोकामध्ये पृथ्वीतलावरील बरेचसे शासक, सत्ताधारी, सत्ताधीश, एकेकाळी पृथ्वीवर राज्य करणारे राजे, भयंकर गुन्हे करणारे गुन्हेगार, आतंकवादी असे लोक अतिशय भयानक प्रकारच्या यातना भोगत होते. त्यांच्या यातना एक मिनिटभर बघणे सुद्धा कठीण होते. अनुभवणे किती कठीण होत असेल याचा विचार वाचकांनीच करावा. पृथ्वीतलावर जीवन व्यतीत करत असताना जे उन्मत्तपणाने वागले, मदान्धपणे वागले ज्यांनी सत्तेचा दुरुपयोग केला, ज्यांनी लोकांवर जुलूम केले असे सगळे तेथे यातना भोगत होते. या लोकात यातना भोगण्यासाठी आलेल्या आत्म्याला हजारो वर्षे येथे खितपत पडावे लागते. येथील यातनांपासून क्षणभर सुद्धा विश्रांती मिळत नाही. देवा-धर्माच्या नांवाखाली ज्यांनी जनतेवर अत्याचार केले, अन्याय केले, जनतेची दिशाभूल केली असेही आत्मे या लोकात

यातना भोगत होते. सासऱ्यांच्या नशिबाने त्यांना मिळालेला यातनालोक कितीतरी पटीने चांगला असे म्हणण्याची पाळी आता सासऱ्यांवर आली होती.

सासरे गयावया करू लागले. ते गाईड आत्म्याला म्हणाले, ''हा लोक तर पूर्वीच्या लोकापेक्षा महाभयंकर आहे. तुम्ही मला काहीतरी उपाय सांगा की जेणे करून माझ्या सुनेच्या पोटी मला जन्म मिळेल व आध्यात्माचा मार्ग मला मिळून माझा उद्धारही होईल.'' यावर तो गाईड आत्मा म्हणाला,

''तू तुझ्या सुनेला दृष्टांत दे! व तुझा उद्धार करण्याची तिला विनंती कर! तुझ्या मुलाला व तुझ्या पत्नीला तुझ्या नांवाने भरपूर दानधर्म करायला सांग. पुरेसा दानधर्म झाल्यानंतर तुला पुनश्च पृथ्वीतलावर पाठविण्यात येईल.''

वरील सर्व दृश्य मी सिनेमाप्रमाणे पाहिले. तद्नंतर सासरे माझ्या ध्यानात आले. दोन-तीन वेळा स्वप्नातही आले. ध्यानात व स्वप्नात येऊन ते एकच गोष्ट मला सांगत, ''मला तुझ्या पोटी जन्म घ्यायचा आहे. माझ्या रिटायरमेंट नंतर मला भरपूर पैसा मिळाला आहे तो मी तुझ्या सासूकडे दिला आहे. तू त्यांना तो पैसा दान करायला सांग म्हणजे तुझ्या पोटी येण्याचा माझा मार्ग मोकळा होईल. मला स्वतःचा उद्धार करायचा आहे. पुरेसे दान केले नाही तर तुझ्या पोटी जरी मला जन्म मिळाला तरी माझा उद्धार होणार नाही. आध्यात्माचा मार्ग मला मिळणार नाही. माझी बुद्धी भ्रष्ट होऊन मी भ्रष्टाचाराच्या व गुन्हेगारीच्या मार्गाने जाईन व माझी भयंकर अधोगती होईल, म्हणून तू माझ्या बायकोला व मुलाला माझ्या नांवाने भरपूर दान करायला सांग.''

माझ्या सासरच्या लोकांना म्हणजे नवरा, सासू, सासरे, नणंद कोणालाही माझ्या आध्यात्मिक प्रगतीविषयी काहीच माहीत नव्हते. त्यामुळे सासऱ्यांच्या आत्म्याची व्यथा कशी सांगावी हा मला मोठा प्रश्न पडला. ते काम थोड्याशा युक्तीने करायचे असे मी ठरविले. एक दिवस मी माझ्या नवऱ्याला म्हणाले...

''माझ्या स्वप्नामध्ये सासरे आले होते. ते म्हणाले, माझ्या नांवाने दान करा. मला खूप त्रास होत आहे!'' यावर माझा नवरा म्हणाला...

''माझ्याकडे पैसा नाही. रिटायरमेंट नंतर माझ्या वडिलांना मिळालेला सर्व पैसा माझ्या आईच्या ताब्यात आहे तू तिला विचारून बघ!''

दुसऱ्या दिवशी मी सासूला सांगितले...

''सासरे माझ्या स्वप्नात आले होते. त्यांना खूप त्रास होत आहे. ते म्हणाले, माझ्या रिटायरमेंटच्या पैशातून माझ्या नांवाने दान करा!'' हे ऐकताच सासू खूप चिडली. ती म्हणाली,

''मी मुळीच दान करणार नाही. दान करायला माझ्या नवऱ्याने कोणाला लुबाडून पैसा मिळवलेला नाही. माझ्या नवऱ्याने कष्टाने पैसा मिळवलेला आहे. माझ्याकडून पैसा उकळण्यासाठी तू काहीतरी खोटेच सांगत असणार!''

नवऱ्याच्या व सासूच्या नादाला लागण्यात काहीच अर्थ नव्हता. मी नोकरी करत असल्याने मी नवऱ्याला म्हणाले... ''तू व तुझी आई सासऱ्यांच्या नांवाने दान करायला तयार नाही. तेव्हा माझ्याजवळ जे पैसे आहेत त्यातून मी सासऱ्यांच्या नांवाने दान करणार आहे.''

नवऱ्याला असे सांगून मी नवऱ्याला घेऊन तुळजापूरला गेले व एक लाख रुपये सासऱ्यांच्या नांवाने मंदिराला दिले.

माझ्या नवऱ्याच्या व सासूच्या वागण्यामुळे देवता खूप नाराज झाल्या होत्या. माझ्या सासऱ्यांचा गाईड आत्मा व इतर देवता ध्यानामध्ये मला म्हणाल्या...

''तुळजापूर भवानीला तू एक लाख रुपये दिल्याकारणाने तुझा मुलगा म्हणून तुझ्या सासऱ्यांना आम्ही तुझ्या पोटी जन्माला घालू. त्याला सन्मार्ग मिळेल अशी व्यवस्था करू. परंतु तुझ्या नवऱ्याला मात्र आम्ही चांगलाच धडा शिकवू. त्याने जेवढे दान करणे आवश्यक होते तेवढा पैसा आम्ही त्याच्याकडून वसूल करू!''

देवतांच्या सांगण्याप्रमाणे कालांतराने माझे सासरे माझ्या मुलाच्या रूपाने जन्माला आले. त्यानंतर दोन-तीन वर्षांनी माझ्या नवऱ्यावर चारही बाजूने संकटे आली. त्या संकटाबरोबर सामना करण्यामध्ये पाच-सहा लाख रुपये खर्च झाले. हेच पैसे जर माझ्या नवऱ्याने दान केले असते तर त्याला दानाचे पुण्य तरी मिळाले असते. अशारितीने वातावरणातील देवतांनी आपला वाटा वसूल केला. श्रीस्वामीजी आम्हाला नेहमी म्हणत...

''दानाच्या रूपाने ईश्वराचा टॅक्स ईश्वराला द्यावा लागतो. तो जर दिला तर पुण्याई व आशीर्वाद मिळतात. नाही दिला तर ईश्वर आपला टॅक्स व्याजासहित वसूल करतो, शिक्षाही करतो. पुण्य व आशीर्वाद काही मिळत नाहीत.''

श्रीस्वामीजी लहान मुलांना श्रीगणपती स्तोत्र रोज २१ वेळा, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र १० वेळा, नवग्रहस्तोत्र ३६ वेळा, श्रीदुर्गास्तोत्र ३६ वेळा, श्रीदत्तस्तोत्र ३६ वेळा अशी उपासना करायला सांगत.

श्रीस्वामीजींच्या या सांगण्याच्या पाठीमागे किती गहन अर्थ होता ते आत्ता माझ्या लक्षात आले. लहानपणीच जर ईश्वरीकृपा मुलांना प्राप्त झाली तर त्यांचे पुढील आयुष्य सुखमय होते.

माझ्या आयुष्यातील वरील सर्व घटना घडल्या त्या काळामध्ये श्रीस्वामीजी हिमालयात होते. श्रीस्वामीजींची भेट झाल्यानंतर मी श्रीस्वामीजींना सर्व हकिकत सांगितली. तेव्हा माझा मुलगा कार्तिक चार वर्षांचा होता. श्रीस्वामीजी म्हणाले, ''मुलाकडून रोज जप करून घे व श्रीदत्तस्तोत्र म्हणायला शिकव.'' कार्तिक हळूहळू दररोज एक्कावन्न वेळा श्रीदत्त स्तोत्र म्हणू लागला. स्वतःच्या उद्धाराच्या दिशेने त्याची पावले आता पडत आहेत.

**सौ. स्मिता कदम (राणे)**

मुंबई

## सुजाता

**मी** सुजाता राणे! स्मिताची लहान बहीण. मी श्रीस्वामीजींना अगदी लहानपणापासून पहात आहे. ते आम्हा सर्व भावंडांना सांभाळत आहेत. आई-वडील वारल्यानंतर श्रीस्वामीजींच्या व सौ. दीक्षितताईंच्या कृपाछत्राखाली आम्ही लहानाचे मोठे झालो. सहा महिन्यांच्या फरकाने आई-वडील वारले. स्मिताला नोकरी लागलेली होती. तद्नंतर दीड वर्षांनी स्मिताचे लग्न झाले. घरची सर्व जबाबदारी माझ्यावर पडली.

एकदा मी खूप आजारी पडले. औषधाने गुण येत नव्हता व नेमका आजार काय आहे ते डॉक्टरना कळत नव्हते. अंथरूणावर पडून

पडून अगदी कंटाळा आला होता. अचानक श्रीस्वामीजी आमच्या घरी प्रकट झाले. मला म्हणाले, ''सुजू, उठ! मी तुला दोन मिनिटात बरे करतो.'' असे म्हणून त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. त्यांच्या हातातून चैतन्याचे प्रवाह माझ्या डोक्यात गेले. त्यांचा हात माझ्या डोक्यावर असतानाच त्यांचा देह विरघळू लागला व दोन-तीन सेकंदात ते अदृश्य झाले. हा सर्व प्रकार मी उघड्या डोळ्यांनी पूर्ण जागृत अवस्थेत पहात होते. हा भास नव्हता किंवा ध्यानातील अनुभवही नव्हता. दिवसा, भरपूर उजेड असताना श्रीस्वामीजी आमच्या घरात प्रकट झाले होते. त्या क्षणी मी ठणठणीत बरी झाले. बेडवरून खाली उतरले, तोंड धुतले. मस्तपैकी चहा घेतला व घरच्या कामास सुरुवात केली. हा अनुभव जेव्हा मी सौ. दीक्षितताईंना सांगितला तेव्हा त्या म्हणाल्या, ''श्रीस्वामीजी चराचरात भरून राहिलेले आहेत. ते केव्हाही, कोठेही प्रकट होऊ शकतात.''

एकदा श्रीस्वामीजी मला म्हणाले...

''सुजाता तुझ्यासाठी परदेशात नोकरी करणारा नवरा शोधणार आहे. तू ड्राइव्हिंग शिकून ठेव. लग्नानंतर तुला गाडी चालवावी लागणार आहे. तुझ्या सासरची सर्व माणसे तुला सन्मानाने वागवतील.''

श्रीस्वामीजींनी जसे सांगितले तसाच नवरा मला मिळाला. सासरी सर्वजण मला खूप सन्मानाने वागवतात.

**ए**कदा मी शारजाला माझ्या नवऱ्याकडे चालले होते. विमानात बसण्याची माझी पहिलीच वेळ होती. मनात विविध प्रकारचे विचार येत होते. विमानात बसून आपण परदेशात जात आहोत. विमान पडणार तर नाही, हायजॅक तर होणार नाही ना! असे विविध विचार मनात येत होते.

श्रीस्वामीजी म्हणाले...

‘‘काळजी करू नकोस! तू शारजाला पोहोचेपर्यंत, तुझ्या नवऱ्याला भेटेपर्यंत, मी तुझ्या बरोबर आहे.’’

मी एअरपोर्टवर गेले. तेथे एका स्त्रिने माझी चौकशी केली. ती पण शारजाला जात होती. मी प्रथमच शारजाला जात आहे हे समजल्यावर ती म्हणाली, ‘‘काळजी करू नकोस! तुझा नवरा तुला भेटेपर्यंत मी तुझ्या बरोबर राहीन.’’ तिचे हे उद्‌गार ऐकून मला खूप धीर आला. मनातील भीती कमी झाली.

विमानात बसल्यावर एअरहोस्टेसला विनंती करून ती स्त्री माझ्या बाजूच्या सीटवर येऊन बसली. पूर्ण प्रवासात तिने माझ्याशी खूप गप्पा मारल्या. विमान शारजाला उतरल्यानंतर माझा नवरा प्रमोद भेटेपर्यंत ती माझ्या बरोबर होती. अशा प्रकारे पूर्ण प्रवासात देवाने मला साथ दिली.

**ए**कदा श्रीस्वामीजींच्या दर्शनाला नागार्जुन सागरला गेले होते. माझा मुलगा सौरभ याच्याकडे पाहून श्रीस्वामीजी म्हणाले...

‘‘याच्या ॲस्ट्रल बॉडीमध्ये काहीतरी गडबड दिसत आहे. याला थोड्याफार प्रमाणात आजारपण येण्याची शक्यता आहे. तू सौरभ कडून एकवीस वेळा श्रीदत्तस्तोत्र व एक वेळा श्रीदत्तात्रेयस्तोत्र दररोज म्हणून घे, म्हणजे आजारपणात फारसा त्रास होणार नाही.’’ श्रीस्वामीजींनी जेव्हा हे सांगितले तेव्हा जानेवारी महिना होता. दोन-चार दिवस श्रीस्वामीजींच्या सहवासात राहून आम्ही मुंबईला परत आलो.

मार्च महिन्यामध्ये सौरभच्या अंगावर खूप रॅश आला. चार-पाच दिवस विविध उपाय करूनही रॅश गेला नाही. माझ्या सासूबाई

म्हणाल्या हा गोवर (measles) असावा. त्याचा ESR पण खूप वाढला होता. डॉक्टरांनी वीस दिवस त्याला ॲन्टिबॉयटीक दिले. सासूबाई म्हणाल्या, ''गोवर आल्यावर मुलांना खूप त्रास होतो. मुले हैराण होतात पण सौरभला कसलाच त्रास होत नाही. कसल्याही प्रकारचे इरिटेशन होत नाही. तो शांत व आनंदात आहे.'' श्रीस्वामीजींच्या आशीर्वादामुळे व श्रीदत्तस्तोत्राचे पाठ सौरभने केल्याकारणाने कसलाही त्रास न होता तो आजारपणातून पूर्णपणे बरा झाला. अशा प्रकारे श्रीस्वामीजींच्या कृपेने जीवन आनंदात चालले आहे.

**सौ. सुजाता कदम (राणे)**
ठाणे, मुंबई

ॐ

# मानसी

**मा**झे नांव मानसी इंद्रजित दीक्षित. मी अमेरिकेत रहाते.

भारतात रहात असताना स्वामी दत्तावधूतांची सर्व पुस्तके मी पुन्हा पुन्हा वाचली. मला आध्यात्माची लहानपणापासून अतिशय आवड आहे. आपली आध्यात्मात प्रगती व्हावी त्यासाठी कोणीतरी योग्य मार्गदर्शक अथवा गुरु भेटावा, असे मला अगदी शाळा, कॉलेजमध्ये असल्यापासून वाटत असे. श्रीस्वामीजींची पुस्तके वाचायला मिळाल्यानंतर मला खूप खूप आनंद झाला. श्रीस्वामीजींना केव्हा भेटेन असे मला झाले होते. या संदर्भात मी अनेकांना विचारले. प्रत्येकाने एकच उत्तर दिले, ''ते हिमालयात तपश्चर्या करत असतात व कोणालाही भेटत नाहीत.''

मी इंजिनियर झाले. मला पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत जायचे होते. श्रीस्वामीजींना भेटण्याची खूप इच्छा होती परंतु त्यांचा काहीच ठावठिकाणा मिळत नव्हता. शेवटी मी अमेरिकेत निघून गेले. अमेरिकेत माझा पोस्ट ग्रॅज्युएशनचा अभ्यास सुरू झाला. पण डोक्यातून काही स्वामीजी जात नव्हते, जणू काही श्रीस्वामीजीच मला खेचत होते असे आता वाटते. पण तेव्हा असे आध्यात्मिक कनेक्शन लक्षात आले नव्हते.

श्रीस्वामीजी कसे भेटतील असे विचार डोक्यात चालू असताना एक दिवस मी सौ. वनिता दीक्षित यांच्याशी संपर्क करण्याचे ठरविले. कारण मी भारतात असताना वनिता बुक्सला दोन-तीन वेळा फोन केला होता. परंतु श्रीस्वामीजी कोणालाही भेटत नाहीत, ते हिमालयात असतात. हे एकच उत्तर प्रत्येक वेळी मिळाले होते. त्यामुळे वनिता बुक्सच्या प्रकाशक सौ. वनिता दीक्षित यांच्याशीच बोलायचे मी ठरविले.

मी वनिता बुक्सला फोन केला. मी त्यांना म्हणाले, ''मी अमेरिकेतून बोलत आहे. मला सौ. वनिता दीक्षित यांचा मोबाईल नंबर द्या! मला त्यांच्याशी काही महत्त्वाचे बोलायचे आहे.'' अशा प्रकारे सौ. वनिता दीक्षित यांचा मोबाईल नंबर मला मिळाला.

मी ताबडतोब सौ. वनिता दीक्षित यांना फोन लावला. त्यांच्याशी बोलल्यानंतर मला खूप खूप आनंद झाला. आयुष्यात प्रथमच आपण एका खऱ्या आध्यात्मिक व्यक्ती बरोबर बोललो असे मला वाटले. मी त्यांना म्हणाले, ''श्रीस्वामीजींना भेटण्याची मला तीव्र ओढ लागली असून श्रीस्वामीजी जर भेटणार असतील तर मी उद्याच भारतात यायला तयार आहे.''

यावर सौ. वनिता दीक्षित म्हणाल्या...

''श्रीस्वामीजी सध्या नागार्जुन सागर येथील त्यांच्या आश्रमात आहेत व आणखी पंधरा-वीस दिवस तरी ते आश्रमात आहेत. तेव्हा तू निवांतपणे तुझी सर्व कामे उरकून भारतात ये!''

सौ. दीक्षितताईंच्या या आश्वासनामुळे माझे मन अगदी शांत झाले. त्या रात्री मला अतिशय गाढ झोप लागली. स्वप्नामध्ये मला बर्फाने आच्छादलेला हिमालय दिसला व त्या हिमालयामध्ये माझ्याच वयाचे अनेक योगी व योगिनी ध्यान करत आहेत असे दिसले. हिमालयातील

आकाश इतके काही सुंदर दिसत होते की, अशा प्रकारचे सौंदर्य मी यापूर्वी कधीही पाहिलेले नव्हते. सकाळी उठले तेव्हा मन अतिशय शांत, आनंदी व प्रसन्न होते. अशा प्रकारच्या प्रसन्नतेचा अनुभव यापूर्वी कधीही आलेला नव्हता.

माझ्या मनात आले, की श्रीस्वामीजींची पुस्तके प्रकाशित करणाऱ्या सौ. वनिता दीक्षित यांच्याशी बोलून जर एवढा आनंद मिळाला तर श्रीस्वामीजींना भेटल्यानंतर आपल्याला किती आनंद मिळेल. आनंदाच्या भरात मी माझी सर्व कामे उरकली व मुंबईचे तिकीट काढले.

मुंबईत पोहोचल्यावर मी सौ. वनिता दीक्षित यांची भेट घेतली. फोनवर बोलल्याने मला खूप आनंद झाला त्याहून कितीतरी पटीने जास्त आनंद त्यांना प्रत्यक्ष भेटून झाला. सौ. वनिता दीक्षित या खऱ्या खुऱ्या आध्यात्मिक आहेत. आध्यात्मात त्यांनी खूप प्रगती केलेली आहे. श्रीस्वामीजींकडून त्या खूप काही शिकल्या आहेत. त्यांचा आध्यात्मिक अधिकार खूप मोठा आहे, याची पूर्ण खात्री पटली.

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघींनी विमानाने हैद्राबादला जायचे ठरविले. आम्ही दोघी एअरपोर्टला पोहोचलो. काऊंटरवर हैद्राबादला जाणाऱ्यांची लांबलचक रांग होती. आम्ही दोघीही रांगेत उभ्या राहिलो. इतक्यात एक मनुष्य आमच्याजवळ आला व मला म्हणाला...

''तुम्हाला कोठे जायचे आहे.''

मी म्हणाले, ''आम्हाला हैद्राबादला जायचे आहे.'' यावर त्याने मला नांव विचारले. मी म्हणाले, 'माझे नांव मानसी!' लगेच तो म्हणाला, ''चला! मी तुम्हाला बोर्डींग पास देतो.'' तो आमची तिकीटे घेऊन गेला व पाच मिनिटात आम्हाला बोर्डींग पास आणून दिले.

मी सौ. दीक्षितताईंना म्हणाले,

''ताई, तुम्हाला खरे सांगू श्रीस्वामीजीच मला खेचत आहेत.''

यावर सौ. दीक्षितताई म्हणाल्या...

''नक्की तुझ्यासाठी काहीतरी ईश्वरी योजना असणार कारण श्रीस्वामीजींसाठी इतक्या आतुरतेने अमेरिकेतून धावत येणारी, ही पहिली व्यक्ती मी पहात आहे.''

हैद्राबाद एअरपोर्ट वरून नागार्जुन सागर सुमारे एकशे पन्नास किलोमीटर दूर आहे. परंतु सौ. दीक्षितताईंनी श्रीस्वामीजींच्या इतक्या काही गोष्टी सांगितल्या की हे अंतर केव्हा संपले तेच आम्हाला कळले नाही व आम्ही नागार्जुन सागरला जाऊन पोहोचलो.

मी श्रीस्वामीजींना पाहिल्यानंतर त्यांना मी प्रथमच पहात आहे असे मला मुळीच वाटले नाही. त्यांची व माझी अनेक जन्मांची ओळख आहे असेच वाटले. श्रीस्वामीजीही माझ्याशी इतक्या आपुलकीने बोलत होते की जणूकाही ते बऱ्याच वर्षांपासून मला ओळखत आहेत. श्रीस्वामीजी सौ. दीक्षितताईंना म्हणाले,

''ताई! मानसी तुम्हाला वीस-एकवीस वर्षांची मुलगी दिसते आहे पण ही एक योगिनी असून सहाशे वर्षे हिने हिमालयात योग साधना केलेली आहे. श्रीमहाअवतार बाबाजींच्या सहवासात राहिलेली आहे. ही खूप खूप भाग्यवान आहे. हिला तुम्ही सून करून घ्या.'' अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी माझ्याविषयी बऱ्याच गोष्टी सौ. दीक्षितताईंना सांगितल्या.

श्रीस्वामीजींनी मला त्या दिवशी ध्यान करण्यास सांगितले. मला खूपच प्रगाढ ध्यान लागले. ध्यानामध्ये एकामागोमाग एक अशी अनेक देवतांची व दिव्य आत्म्यांची दर्शने झाली. मी कुठल्यातरी

अद्भुत लोकात होते. त्या लोकाचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतील. असा दिव्य अनुभव मला आधी कधीच आला नव्हता. आनंदाच्या समुद्रात मी अगदी पोहत होते. त्या दिवसापासून मला अतिशय सुंदर ध्यान लागू लागले व ध्यानामध्ये दिव्य अनुभव येऊ लागले. दोन दिवस आश्रमात राहून मी व सौ. दीक्षितताई मुंबईला परत आलो व मी अमेरिकेला निघून आले.

सौ. दीक्षितताई यांचा मुलगा इंद्रजित हा अमेरिकेत शिकत होता. सौ. दीक्षितताईंनी त्याला माझी भेट घेण्यास सांगितले व श्रीस्वामीजींचा निरोपही सांगितला. थोड्याच दिवसात सौ. दीक्षितताईंचा मुलगा इंद्रजित, याच्या बरोबर माझे लग्न झाले व मी सौ. मानसी दीक्षित झाले. सौ. दीक्षितताईंना मी आई म्हणू लागले, यापुढील लिखाणात मी त्यांचा उल्लेख आई असा करेन.

एक काळ असा होता या जन्मात तरी श्रीस्वामीजींचे दर्शन होईल की नाही असे वाटत होते. केव्हा दर्शन होईल अशी ओढ लागली होती. श्रीस्वामीजींनी अशी काही जादू केली की मी त्यांच्याच घरची झाले. कारण दीक्षितांच्या घराला श्रीस्वामीजी माझे घर असे म्हणत.

**मा**झा व इंद्रजितचा संसार अमेरिकेत सुरू झाला. मी दररोज ध्यान साधना करत असे. ध्यान मार्गात माझी प्रगती होत होती. ध्यान करताना कधी कधी दिव्य नाद ऐकू येत. कोणीतरी जोराने घंटा वाजवीत आहे असा आवाज ऐकू येई तर कधी शंख फुंकल्याचा आवाज ऐकू येई. कधी कधी समुद्राच्या लाटांचा आवाज येई तर कधी कधी मेघांचे गडगडणे ऐकू येई.

मी आईंना फोन करून या आवाजांविषयी सांगितले. तेव्हा

आईंनी श्रीस्वामीजींना सर्व सांगितले.

श्रीस्वामीजी म्हणाले....

''अनाहतचक्र जागृत झाल्यानंतर असे दिव्य ध्वनि ऐकू येतात.''

काही दिवस असा प्रकार होत होता की, ध्यानाला बसल्यानंतर आकाश व शांत समुद्र दिसत असे. या समुद्रात फारशा लाटा नसत. आकाश व समुद्र याकडे पाहताना मन प्रसन्न होऊन खूप आनंद होत असे. सारखे बघत रहावे असे वाटत असे. त्या आकाशात अधूनमधून जांभळ्या रंगाचा प्रकाश दिसत असे व काही क्षण दिसून तो पुन्हा नाहीसा होत असे. कधीकधी त्या शांत जलाशयामध्ये एक देवमासा (whale) जलविहार करताना दिसे. श्रीस्वामीजींनी याचा अर्थ स्वाधिष्ठान चक्र जागृती असा सांगितला.

जेव्हा चक्रे जागृत होतात तेव्हा अशी विविध प्रकारची दृश्ये दिसतात. या दृश्यांचा आनंद घेत तू पुढेपुढे जात रहा! असा संदेशही त्यांनी दिला.

**म**ला अर्ध शिशीचा (migrain) खूप त्रास होत होता. मी आईंना फोन करून मला होणाऱ्या त्रासाविषयी सांगितले. तेव्हा आई म्हणाल्या, ''नारळ ओला करून तो प्लॅस्टीकच्या पिशवीत ठेव व डोक्याजवळ तो नारळ घेऊन झोप. तो नारळ तुझे सर्व पोल्युशन खेचून घेईल व तुला बरे वाटेल.'' मी त्याप्रमाणे करताच एका तासात माझी डोकेदुखी थांबली.

**ध्या**नामध्ये मला बऱ्याचवेळा भारतातील विविध पर्वत दिसत व या पर्वतांमध्ये गुप्त रुपाने तपस्या करणारे ऋषीही दिसत. यातील काही ऋषी तर चाळीस-चाळीस फूट उंच होते. एकदा हिमालयातील एका गुहेमध्ये मला खूप मोठ्या आकाराचे विशालकाय असे ऋषी दिसले.

आत्तापर्यंत दिसलेल्या सर्व ऋषींपेक्षा आकाराने हे खूपच मोठे होते. हे कोण असावेत असा प्रश्न माझ्या मनात येताच हे बकदाल्भ ऋषी असून सृष्टीच्या आरंभापासून हे तपस्या करत आहेत असे समजले. मी त्यांना नमस्कार केला व त्यांच्यासमोर ध्यानस्थ बसले.

ध्यानाला बसताना मी प्रार्थना केली तुमचे कार्य कशाप्रकारे चालते याची माहिती देण्याची माझ्यावर कृपा करावी, असे म्हणून मी ध्यानस्थ झाले.

ध्यानामध्ये एका देवीने दर्शन दिले व ती म्हणाली, ''हे बकदाल्भ ऋषी असून सृष्टीच्या आरंभापासून हे तपस्या करत आहेत. प्रकाशमार्गाचे हे अधिपती असून पृथ्वीतलावर दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम अशा सद्गुणांचा प्रसार व प्रचार यांच्या दिव्य लहरींमुळे होत असतो. लोकांना शांती, प्रेम, आनंद व आध्यात्मिक प्रगती यांच्याच दिव्य लहरींमुळे प्राप्त होते. वातावरणामध्ये उत्साह व आनंद यांच्याच दिव्य लहरींमुळे निर्माण होत असतो. मानवांना यांच्या दिव्य लहरींमुळे आरोग्य प्राप्त होते, ईश्वरभक्ती करण्याची इच्छा यांच्यातून बाहेर पडणाऱ्या दिव्य लहरींमुळेच निर्माण होते. यांच्या कृपेमुळेच मानव योगसाधना करू शकतो. मानवांना सज्जन, सद्गुणी, दिलदार, उदार, परोपकारी, योगी, संत, महात्मा बनविण्याचे कार्य आपल्या दिव्य लहरींद्वारा हे करत असतात.'' मला वरील माहिती देऊन ती देवता गुप्त झाली. मी त्यांना नमस्कार केला व माझ्या देहात परत आले. एकदा ध्यानामध्ये मला गणपतीचे दर्शन झाले. मी गणपती बाप्पाला ज्ञान दे अशी प्रार्थना केली. गणपतीने मला आशीर्वाद दिला.

**मी** रात्री झोपताना सर्व लाईट बंद करून झोपते. खोलीत नाईट लॅम्प नाही. रात्री अपरात्री जाग आल्यास मी लगेच पडल्यापडल्या ध्यान

करायला सुरुवात करते. अशीच एकदा अचानक रात्री जाग आली. डोळे उघडून पाहिले खोलीत सर्वत्र दिव्य प्रकाश पसरलेला होता, तो दिव्य प्रकाश इतका सुंदर होता, मोहक होता की, त्याचे वर्णन शब्दाने करणे अशक्य आहे. त्या दिव्य प्रकाशामध्ये एक लाल गोळा होता; तो शांत होता, त्याच्यामध्ये दाहकता मुळीच नव्हती. एक-दोन मिनिटे मी हा सर्व प्रकार शांतपणे पहात राहिले. डोळे उघडे होते. मनात विचार आला, की हा काय प्रकार आहे, अचानक सर्व बाजूंनी आवाज येऊ लागले, ''मी ईश्वर आहे'' ''मी ईश्वर आहे'' ''मी ईश्वर आहे'' तीन वेळा मी स्पष्टपणे तो आवाज ऐकला व हा दिव्य प्रकाश पाच मिनिटे पहात होते. हळूहळू तो प्रकाश अंधूक होऊ लागला. खोलीत पुन्हा अंधार झाला. मी घड्याळ पाहिले, रात्रीचे तीन वाजले होते.

**मी** ध्यानाला बसले की पुष्कळवेळा एखादा दिव्य आत्मा किंवा देवता माझ्यासमोर प्रकट होत असे. हे आत्मे मला ब्रह्मांडात ठिकठिकाणी फिरवून आणत. एकदा एका दिव्य आत्म्याबरोबर मी अनेक ब्रह्मांडे पार करून खूप दूर निघून गेले. प्रकाशाच्या वेगापेक्षा कितीतरी पटीने अधिक वेगाने आम्ही जात होतो. एका विशिष्ट ठिकाणी आम्ही थांबलो. माझ्याबरोबर असणारा तो दिव्य आत्मा मला म्हणाला, ''ही नवीन सूर्यमाला तू पहात आहेस, ही अब्जावधी प्रकाश मैल दूरवर पसरलेली आहे. पृथ्वीवरील शास्त्रज्ञांना या सूर्यमालेचा शोध अद्याप लागलेला नाही. परंतु काही दिवसानंतर या नवीन सूर्यमालेचा शोध लागेल.

ही जी सूर्यमाला तू पहात आहेस, ही तुमच्या सूर्यमालेपेक्षा हजारो पटीने मोठी आहे. पृथ्वीतलावरील जे लोक आध्यात्मात प्रगती करतात अशा आत्म्यांना या सूर्यमालेत प्रवेश मिळतो.''

नवीन सूर्यमालेचे दर्शन घडवून या दिव्य आत्म्याने मला परत आणले. हा अनुभव अवर्णनीय होता.

हा अनुभव आल्यानंतर अनेक दिवसांनी नॅशनल जिओग्राफीक या मासिकात नवीन सूर्यमालेचा शोध लागल्याचे वर्णन छापून आले. दिव्य आत्म्याने मला जे दाखविले होते त्यातील काही अंश नॅशनल जिओग्राफीकमध्ये छापून आलेला होता.

मी जे काही पाहिले ते इतके भव्य, दिव्य व अद्वितीय होते की, त्याचे शब्दात वर्णन करणे अशक्य आहे. वाचकांना त्याची थोडीफार कल्पना यावी म्हणून त्या सूर्यमालेविषयी सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

आपण जो सूर्य पहातो तो पृथ्वीपेक्षा तेरा लाख पटीने मोठा आहे. म्हणजे आपण जो सूर्य पहातो, त्या सूर्याच्या पोटामध्ये तेरा लाख पृथ्वी मावतील.

मी जी सूर्यमाला पाहिली त्या सूर्यमालेतील सूर्य इतका विशाल होता की, आपला सूर्य त्या सूर्यापुढे एका चण्याच्या डाळी एवढा दिसत होता. म्हणजे आपल्या सूर्यासारखे दहा कोटी सूर्य त्या सूर्याच्या पोटात मावतील.

शून्यलोकामधून प्रवास करताना तसेच ब्रह्मांडात सर्वत्र फिरताना, आपली जाणीव व चेतना विशाल होते. त्यामुळे खूप दूर अंतरावरचे सहज पहाता येते. तेव्हा आपण डोळ्यांनी पहात नसतो. चेतनेने, जाणीवेने किंवा तृतीय नेत्राने पहात असतो. हा तृतीय नेत्र दोन भुवयांच्या मध्ये असून ध्यानाने तो जागृत होतो.

**ए**कदा मी ध्यान करत असताना मला माझा आकार वाढत आहे असे वाटू लागले. हळूहळू माझा आकार खूपच मोठा झाला. विशेष

म्हणजे माझ्या या आकाराला माझ्या घराच्या भिंती अथवा छत (roof) काहीच अडवू शकत नव्हते. हा माझा आकार म्हणजे आत्म्याचा आकार होता, महाकारणदेहाचा आकार होता. विमानातून पृथ्वीकडे पहावे त्याप्रमाणे मी पृथ्वीवरील बिल्डिंग व रस्त्यावरून धावणाऱ्या गाड्या सर्व काही आकाशातून पहात होते. माझे हे विराट शरीर वायुमय होते. उंचउंच आकाशातून मी खाली पहात होते. माझ्या चारही बाजूला आकाशच आकाश होते. मी एकाच वेळेला दाही दिशांचे पाहू शकत होते. कोणाच्याही घराच्या भिंती अथवा छत मला अडवू शकत नव्हते. माझ्या विराट रूपासमोर माझा देह (physical body) एखाद्या काडेपेटीच्या काडी एवढा दिसत होता. तो डोळे मिटून ध्यानस्थ बसलेला दिसत होता.

मी माझेच विराट रूप पाहिले होते. मी म्हणजे हाडामासाचा देह नव्हे; याची अनुभूती मला येत होती. माझा हा महाकारण, विश्वव्यापी, विराट देह अतिशय शुद्ध, अतिशय पवित्र व पारदर्शक होता. हळूहळू माझा आकार आणखी वाढू लागला व तो इतका वाढला की मला मी म्हणजेच आकाश आहे असे वाटू लागले. मी विश्वव्यापी आहे असे मला वाटू लागले. अचानक एकदम विरुद्ध क्रिया सुरू झाली. अतिशय वेगाने माझा आकार संकोच पावू लागला. समेटू लागला. मी लहान होऊ लागले. शेवटी मी इतकी लहान झाले की माझा आकार दिव्याच्या ज्योतिएवढा झाला; म्हणजे साधारणपणे आपल्या अंगठ्या एवढा झाला. हे माझे ज्योतिर्मय रूप माझे मीच पहात होते. या माझ्याच ज्योति रूपामध्ये मध्यभागी मोहरीच्या दाण्याएवढा एक नीलबिंदू चमकत होता. माझ्या लक्षात आले हे माझे ज्योतिर्मय रूप म्हणजे माझा **कारणदेह** व आतील नीलबिंदू म्हणजे **महाकारणदेह.** हा महाकारणदेहच काही क्षणापूर्वी विकसित होऊन विश्वव्यापी झाला होता.

मी ज्योतिर्मय देहाने माझ्या अमेरिकेतील घरी परत आले. येतायेता लॉसएन्जिलीसमधील सारा नजारा मी पाहून घेतला. गाड्या धावत होत्या, ट्रेन धावत होती. मी हे सर्व पाहू शकत होते पण पृथ्वीतलावरील कुठल्याही प्रकारचे आवाज किंवा गोंगाट मला ऐकू येत नव्हते. माझ्यापुरते ईश्वराने सर्व म्यूट (mute) करून टाकले होते. मी घरात आले. माझा देह डोळे मिटून ध्यान करत बसलेला होता. माझ्या स्थूलदेहाकडे मी क्षणभर पाहिले व मी ब्रह्मरंध्रामधून माझ्या देहात प्रवेश केला व देहात सामावून गेले. माझ्या स्थूलशरीरामध्ये काही सेकंदामध्येच पूर्ण चेतना आली. उठून थोडे एक्सरसाईज केले. आखडलेल्या शरीराला थोडे ताजेतवाने केले व घरातील कामाला सुरुवात केली. सुमारे दोन तास मी ध्यानस्थ बसलेले होते. या दोन तासात माझ्या मनात एकही विचार आला नाही. स्थूलदेहात परत आल्यानंतर विचार चक्र सुरू झाले.

श्रीस्वामीजी म्हणत, ''मी म्हणजे देह नव्हे! प्रत्येक माणसाने मी कोण आहे! कोठून आलो! जाणार कोठे! याचा विचार करायला हवा. स्व-स्वरुपाचा शोध घ्यायला हवा!'' इत्यादी श्रीस्वामीजींची वाक्ये आठवली. खरच मी म्हणजे देह नव्हे; याचा अनुभव मला आज ईश्वराने दिला होता.

फोनवर ही सर्व हकिकत मी आईंना कळविली. सौ. आईंनी हा सर्व अनुभव श्रीस्वामीजींना सांगितला. श्रीस्वामीजी म्हणाले...

''याला स्वरूप साक्षात्कार असे म्हणतात. मानसीने पूर्वजन्मी योगसाधना केलेली असल्याकारणाने ईश्वराने तिला हा अनुभव दिला. ताई! तुमची सून खूप भाग्यवान आहे. आयुष्यभर योगसाधना व वेगवेगळ्या तपस्या करणाऱ्या साधकांनाही इतक्या उच्चकोटीचा अनुभव येत नाही. पूर्वजन्मी तिने क्रियायोगाची साधना केलेली आहे. श्रीमहाअवतार बाबाजींची कृपा प्राप्त केलेली आहे. त्यामुळेच इतका उच्च

कोटीचा अनुभव तिला अगदी सहजपणे आला!''

## विहंगम मार्ग

एकदा श्रीस्वामीजी मुंबईमध्ये आमच्या घरी आले होते. एक दिवस आमच्या घरी राहून ते हिमालयाकडे प्रयाण करणार होते. आईंनी फोन करून मला ही गोष्ट सांगितली व म्हणाल्या, श्रीस्वामीजींशी बोल, असे म्हणून फोन श्रीस्वामीजींकडे दिला. श्रीस्वामीजी फोनवर बोलू लागले.

'मानसी, काय करतेस?' श्रीस्वामीजींनी विचारले.

'**विहंगम मार्ग**' वाचत आहे. मी उत्तर दिले.

''अरे वा! कोणी लिहिले हे पुस्तक!'' श्रीस्वामीजींनी विचारले.

'तुम्हीच लिहिले आहे!' मी म्हणाले.

श्रीस्वामीजींना खूप आश्चर्य वाटले, ते म्हणाले, ''मानसी, मी या नांवाचे पुस्तक लिहिलेले नाही. तू माझी चेष्टा करतेस काय?''

यावर मी म्हणाले, ''**विहंगम मार्ग** या पुस्तकाची मी मॅन्युस्क्रिप्ट् वाचत असून गेल्या वर्षी जेव्हा मी इंडियात आले होते, तेव्हा डी.टी.पी. केलेल्या मॅन्युस्क्रिप्ट्‌ची एक कॉपी आईंनी मला दिली. हे पुस्तक अजून प्रकाशित झालेले नाही.''

श्रीस्वामीजींना आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी ताबडतोब आईंना हाक मारली व आईंना विचारले, ''ताई! **विहंगम मार्ग** नांवाचे पुस्तक मी लिहिले आहे?''

यावर आई म्हणाल्या, ''**विहंगम मार्ग** नांवाचे पुस्तक आपण लिहिलेले नाही.''

श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''बघ मानसी! ताईसुद्धा म्हणतात

**विहंगम मार्ग** नांवाचे पुस्तक मी लिहिलेले नाही.''

यावर मी म्हणाले, ''अहो स्वामीजी! तुमच्या लक्षात नाही व आईपण विसरल्या वाटते. पण माझ्या हातात **विहंगम मार्ग** या तुम्ही लिहिलेल्या पुस्तकाची मॅन्युस्क्रिप्ट् आहे व ती, मी आता वाचत आहे.''

यावर श्रीस्वामीजी आईंना म्हणाले,

''तुम्ही आत्ताच्या आत्ता मॅन्युस्क्रिप्ट् शोधा!''

आईंनी मॅन्युस्क्रिप्ट् ठेवलेले पूर्ण कपाट शोधले. कोठेही **विहंगम मार्ग** या पुस्तकाची हस्तलिखित कॉपी अथवा डी. टी. पी. काहीच मिळाले नाही.

श्रीस्वामीजींनी दुसऱ्या फोनवरून डी.टी.पी. करणाऱ्या व्यक्तीला फोन लावला. त्यानेही सांगितले...

''**विहंगम मार्ग** हे पुस्तक मी डी. टी. पी. केलेले नाही.''

श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''मी व ताई विसरलो असे तू म्हणतेस परंतु जी व्यक्ती मी लिहिलेल्या पुस्तकांचे डी.टी.पी. करते त्या व्यक्तीचे म्हणणे असे आहे की, **विहंगम मार्ग** नांवाचे पुस्तक तिच्याकडे डी.टी.पी. करण्यासाठी आलेले नाही.'' आता आश्चर्य करण्याची पाळी माझी होती.

आई फोनवर बोलू लागल्या, ''मानसी आता चर्चा राहू दे. **विहंगम मार्ग** या पुस्तकाची डी.टी.पी. कॉपी तुझ्याकडे आहे, तू ई-मेल द्वारा संपूर्ण पुस्तक आम्हाला पाठव.''

मी म्हणाले, ''आई, मी आत्ताच तुम्हाला पूर्ण पुस्तक ई-मेल करून पाठवते.'' असे म्हणून श्रीस्वामीजींना नमस्कार करून मी फोन

ठेवला.

पंधरा-वीस मिनिटांत मी **विहंगम मार्ग** हे पुस्तक ई-मेल द्वारा आईंना पाठविले.

आईंनी त्याचे प्रिंट आऊट काढले. श्रीस्वामीजींनी व आईंनी ते पुस्तक वाचले. त्यामध्ये नंतर दैवी सत्ता व आसुरी सत्ता नांवाच्या दोन चित्रांचा त्यात समावेश केला व ते पुस्तक प्रकाशित केले. आजतागायत या पुस्तकाचे हस्तलिखित मिळालेले नाही. आमच्या श्रद्धेप्रमाणे या संपूर्ण घटनेचा अर्थ आम्ही पुढीलप्रमाणे लावला आहे.

मी जेव्हा मुंबईत गेले होते तेव्हा देवी आईंच्या रूपामध्ये प्रकट झाली व तिने मला **विहंगम मार्ग** हे पुस्तक दिले. ती आईंच्या रूपात असल्याकारणाने मला वाटले आईंनीच मला डी.टी.पी. केलेले **विहंगम मार्ग** दिले. पण ती आईंच्या रूपात साक्षात् जगदंबा होती. श्रीस्वामीजींच्या अनेक भक्तांना अदृश्य सृष्टीतील देवतांनी प्रकट होऊन दर्शन देणे, भेटवस्तू देणे, मार्गदर्शन करणे किंवा मार्ग दाखविणे असे अनुभव आलेले आहेत.

**मी** जेव्हा नागार्जुन सागरला श्रीस्वामीजींना भेटायला गेले होते तेव्हा मी त्यांना विचारले,

"श्रीस्वामीजी, बऱ्याचवेळा माझ्या डोळ्यासमोर निळ्या रंगाचे स्पार्क चमकताना दिसतात. डोळे उघडे असताना अथवा डोळे मिटलेले असताना हे स्पार्क सतत चमकत राहतात, याचा अर्थ काय?"

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

"यांना नीलबिंदू असे म्हणतात. अत्युच्च आध्यात्मिक अवस्थेत हे नीलबिंदू दिसतात. या नीलबिंदूतून देवता, ऋषी, योगी, उच्च कोटीचे आध्यात्मिक आत्मे, संत प्रकट होतात, दर्शन देतात, मार्गदर्शन करतात व

पुढचा रस्ता दाखवितात. लवकरच तुला हे सर्व अनुभव येणार आहेत. या अनुभवाला ''रेणूका ब्रह्म'' असे म्हणतात.''

मी अमेरिकेत परत आल्यानंतर श्रीस्वामीजींनी सांगितलेल्या वाक्याचा मला अक्षरशः अनुभव यायला सुरुवात झाली. अनेक योगी, योगिनी, ऋषी, देवता यांची दर्शने झाली. त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. हिमालयातील अनेक गुप्त आश्रम पाहिले. प्रत्येक आश्रमाला वेगवेगळी नांवे होती. त्यातील बरीचशी नांवे मी विसरले. सिद्धाश्रम हे एकच नांव लक्षात राहिले.

ध्यानमार्गाचे वैशिष्ट्य असे आहे की, ध्यानमार्गात तुम्हाला जे काही दिसते त्याचे ज्ञान तत्क्षणीच होत असते. जागृतीत आल्यानंतर काही दिवस त्या सर्व गोष्टी लक्षात राहतात. काही दिवसानंतर अनावश्यक गोष्टींचा विसर पडू लागतो. परंतु जे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे ते ज्ञान मात्र कायमचे लक्षात राहते.

बकदाल्भ ऋषींचे दर्शन झाल्यानंतर मध्ये बराच काळ गेला. या काळात काही खास विशेष ज्ञानवर्धन करणारा असा काही अनुभव आला नाही.

**ए**कदा ध्यान करत असताना ज्या देवतेने मला बकदाल्भ ऋषींचे दर्शन घडविले ती देवता प्रकट झाली व मला म्हणाली 'चल!'

तिने चल म्हणताच मी माझ्या देहाच्या बाहेर आले. आम्ही आकाशमार्गाने जाऊ लागलो. आत्तापर्यंत शेकडो वेळा मी ब्रह्मांडात फिरले आहे. सूर्याहून करोडो पटीने तेजस्वी तारे पाहिले आहेत. जवळजवळ पूर्ण प्रकाशमय ब्रह्मांड पाहिले आहे. सर्वांच्या अतीत असणारी एक ज्योतिही पाहिली आहे. पण आजचा प्रवास एकदम वेगळाच होता. त्या देवतेच्या बरोबर थोडावेळ प्रकाशातून प्रवास केल्यानंतर एका अंधःकारमय

बोगद्यामध्ये शिरलो. या अंधःकारमय बोगद्यामध्ये शिरण्यापूर्वी माझ्या बरोबर असणाऱ्या देवतेने माझ्या सभोवार एक दिव्य कवच निर्माण केले होते. तसेच दिव्य कवच तिने स्वतः भोवती धारण केले होते. हे दिव्य कवच माझ्या भोवती निर्माण करताना ती देवता म्हणाली, प्रकाशविश्वाचे अधिपती बकदाल्भ ऋषी यांना तू पाहिलेस आता अंधःकारमय युगाचे अधिपती काकभृशुँडी ऋषी यांच्या दर्शनाला आपल्याला जायचे आहे.

इंग्रजीत पिच् डार्क, जेट ब्लॅक असे शब्द अतिशय भयंकर अशा अंधःकाराला आहेत. मराठी मायबोलीत गडद काळ्या रंगाला आम्ही डांबरा सारखा काळा असे म्हणतो. हे सगळे शब्द फिके पडावेत अशा भयंकर काळ्या बोगद्यामध्ये (tunnel) आम्ही शिरलो. शास्त्रज्ञ लोक ज्याला ब्लॅक होल म्हणतात ते हेच असावे असे मला वाटले. अतिशय वेगाने आम्ही जात होतो. मी माझ्या गाईड देवतेला विचारले...

''प्रकाशलोक ज्याप्रमाणे शांती, प्रेम, आनंद, दया, करुणा, ज्ञान, दिव्यत्व अशा सद्‌गुणांनी भरलेला आहे व त्यांचे अधिपती बकदाल्भ ऋषी आहेत तसे या अंधःकारमय विश्वाचे काही वैशिष्ट्य आहे काय?''

यावर देवता म्हणाली, ''मी तुला दिव्य कवच दिलेले असल्याकारणाने तुला या अंधःकारमय विश्वाच्या खऱ्या अस्तित्वाची जाणीव होत नाही, हा यातनालोक आहे. पृथ्वीतलावर तसेच इतर ग्रहांवरील जे आत्मे स्पिरिच्युअल प्रोग्रेस करत नाहीत, मदांधपणे वागतात, भ्रष्टाचार करतात, पाप करतात, स्वार्थीपणाने जगतात, इतरांना फसवतात, गरिबांना लुटतात, देव धर्माच्या नांवाने आतंकवाद करतात, जुलूम जबरदस्ती करतात, जनतेला छळतात अशा सर्व लोकांना मृत्यूनंतर येथे आणले जाते. या अंधःकारमयलोकात ते लाखो वर्षे यातना भोगत राहतात. तुझ्या

भोवती दिव्य कवच असल्याने तुला याची जाणीव होत नाही. परंतु तुझ्या अवती-भोवती, वर-खाली चोहीकडे करोडो आत्मे लाखो वर्षांपासून येथे यातना भोगत आहेत. प्रकाशाचा किरण नांवाची काही चीज असते हेही ते विसरून गेले आहेत. आत्म्याला पुनर्जन्म असतो हेही ते विसरून गेले आहेत. विश्वात कोठेतरी प्रकाश आहे हे त्यांच्या स्मृतीतून गेलेले आहे. भयंकर यातना अखंड भोगणे, तेही चोवीस तास एवढेच त्यांच्या नशिबात आहे. यातील अनेक आत्मे पूर्वीच्या काळी पृथ्वीतलावर राज्य करत होते. पृथ्वीतलावर त्यांच्या इतके सुखी कोणी नव्हते. सत्तेच्या धुंदीमध्ये त्यांनी लाखो लोकांवर अन्याय केले, अत्याचार केले, छळले, ठार केले. **करावे तसे भरावे** या न्यायाप्रमाणे त्यांच्या प्रत्येक गुन्ह्याचा येथे न्याय केला गेला आहे व त्यानुसार त्यांना शिक्षा झालेल्या आहेत. या कृष्ण विवरात एकदा आत्मा अडकला की त्याची किमान लाख वर्षेतरी सुटका होत नाही.

पृथ्वीतलावर जर तुम्ही एका माणसाला छळले अथवा त्रास दिला तर येथे आल्यावर किमान शंभर काळ्या शक्ती तुम्हाला खूप हैराण करून सोडतात. त्यामुळे श्रीमंत, सत्ताधारी, राज्यकर्ते अशा सगळ्या लोकांच्या आत्म्यांनी हा लोक भरून गेला आहे. हे सर्व तुला पहायचे आहे का?'' असे मला माझ्या मार्गदर्शक देवतेने विचारले, मी तिला म्हणाले, ''नको कोणाच्याही यातना मी पाहू शकत नाही.'' अशा प्रकारे अत्यंत वेगाने आम्ही त्या ब्लॅक होल मधून पुढेपुढे जात होतो. अखेरीस ब्लॅक होलचा काळेपणा कमीकमी होऊ लागला. अतिशय सुंदर असा निळा रंग दिसू लागला. हा निळा रंग इतका सुंदर होता की त्याचे वर्णन करणे माझ्या शब्दांच्या पलीकडे आहे. वाचकांना थोडीशी कल्पना यावी म्हणून सांगते, मोराचा रंग जसा निळा असतो त्याहून हजारो पटीने सुंदर असा तो पीकॉक ब्लू कलरचा लोक होता. या लोकात आम्ही पोहोचलो. येथे

असंख्य साधक, सिद्ध ईश्वर चिंतनात निमग्न झालेले आढळले. हे सगळे समाधीमग्न होते. काकभृशुंडी ऋषी या सर्वांचे अधिपती होते. मी व त्या देवतेने काकभृशुँडी ऋषींना नमस्कार केला. ते समाधी अवस्थेतच होते व त्यांच्या देहातून ज्या लहरी बाहेर पडत होत्या त्या लहरी गुन्हेगारांना गुन्ह्याची शिक्षा देऊन त्यांना योग्य मार्गावर आणण्याचे काम करत होत्या. शिक्षा देणे व सुधारणे हा त्या लहरींचा दंडक होता. **भीती शिवाय नीती नाही** अशी त्यांची मान्यता होती. सोने असो अथवा तांबे त्याला आगीत घालून तापवावे लागते व मगच त्याला योग्य तो आकार दिला जातो. त्याप्रमाणे पृथ्वीतलावरील चांगल्या अथवा वाईट माणसांवर संकटांवर संकटे आणायची व त्यांना चांगले घासून-पुसून सद्गुणी बनवायचे व प्रकाश मार्गाकडे ढकलायचे असे काकभृशुँडी ऋषींचे कार्य चालते.

अशा प्रकारे एका वेगळ्याच विश्वाचे व त्या विश्वाच्या अधिपतीचे दर्शन घडवून देवतेने मला माझ्या देहात परत आणले.

श्रीस्वामीजींनी आपल्या पुस्तकांमध्ये लिहिले आहे की पृथ्वी हे एक विश्व विद्यालय असून आपण येथे सर्व शिकण्यासाठी आलेले असतो. ईश्वर चिंतन करून आपण आत्मसाक्षात्कार प्राप्त करायला हवा. एवढी उच्च अवस्था गाठता आली नाही तरी जास्तीत जास्त ध्यान करत रहायला हवे. ईश्वर चिंतन करत रहायला हवे. शांती, समाधान, आनंद व प्रेम या गोष्टी आपल्या नित्य आचरणात असायला हव्यात. ऋण, हत्या, वैर, अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर अशा वाईट गोष्टींपासून दूर रहायला हवे. देवधर्माच्या नांवाखाली समाजाला फसविण्याचे जे प्रकार या जगात चालतात त्याकडे पाहून श्रीस्वामीजी म्हणत, ‘‘मृत्यूनंतर याचे अतिशय भयंकर परिणाम होतात.’’ ब्लॅक होल पाहिल्यावर मला या सर्व गोष्टींची आठवण झाली.

एकदा मी भारतात गेले होते. काही दिवस मुंबईत राहून आईंबरोबर मी श्रीस्वामीजींच्या दर्शनाला गेले. मी आईंबरोबर श्रीस्वामीजींच्या समोर बसले होते. थोड्यावेळाने आम्ही ध्यानाला बसलो. त्या दिवशी मला अतिशय प्रगाढ ध्यान लागले. अतिशय दिव्य तेज माझ्या देहात प्रवेश करत आहे असा मला अनुभव आला. काही दिवस भारतात राहून मी अमेरिकेला परत आले.

अमेरिकेत आल्यानंतर मला दिवस गेले. सुरुवातीचे १५-२० दिवस मी कोणालाच काही बोलले नाही. नंतर मुंबईला फोन केला व आईंच्या कानावर ही गोष्ट घातली. आईंना मी म्हणाले,

''दोन-तीन महिने ही गोष्ट तुम्ही कोणाला सांगू नका. फक्त श्रीस्वामीजींच्या कानावर घाला.'' आईंनी ही गोष्ट कोणालाही सांगितली नव्हती.

आईंची एक मैत्रिण आहे. तिचा ज्योतिष शास्त्राचा गाढा अभ्यास आहे. श्रीस्वामीजींवर व आईंवर तिची खूप श्रद्धा आहे. श्रीस्वामीजींनी तिला काही साधनाही शिकविल्या आहेत. या साधनांमुळे बऱ्याचवेळा तिला अंतःप्रेरणेने काही गोष्टी कळतात.

एकदा ती आईंना भेटायला आली होती. आईंच्या चेहऱ्याकडे पाहून ती आईंना म्हणाली...

''आई, मानसी प्रेग्नण्ट आहे का?'' आईंची ही मैत्रिण माझ्या सासूला आईच म्हणते. तसेच बरेच भक्तही आई म्हणतात. आईंना अतिशय आश्चर्य वाटले.

आई, त्या मैत्रिणीला म्हणाल्या, ''चार दिवसांपूर्वी मानसीचा फोन आला होता.'' ती मला म्हणाली, 'आई, मला असे वाटते की मी

प्रेग्नण्ट आहे.'

आईंनी असे सांगितल्यावर ती मैत्रिण आईंना म्हणाली, ''आई, तुम्ही जवळजवळ तीस वर्षे श्रीस्वामीजींची सेवा केली आहे. त्या सेवेचे फळ तुम्हाला परमेश्वराने दिलेले आहे. तुमचा नातू हा एक खूप महान आत्मा आहे. मानसीच्या पोटी खूप महान आत्मा जन्माला येणार आहे.''

आईंनी मला फोन करून त्यांची ज्योतिषी मैत्रिण जे बोलली ते सर्व सांगितले.

मी आईंना म्हणाले, ''आई, मी अमेरिकेत रहाते. तुम्ही मुंबईत रहाता. तुमची मैत्रिण तुमच्यापासून चाळीस किलोमीटर दूर रहाते. हा विषय अजून जितूलाही माहीत नाही, असे असताना तुमच्या मैत्रिणीला हे सर्व कसे कळले, खरच ईश्वरी लीला अगाध आहे. मला हल्ली प्रेग्नण्ट झाल्यापासून खूप झोप येते. खरे म्हणजे मला समाधी लागते. या समाधी अवस्थेमध्ये मी नेहमी दिव्यलोकात फिरत असते. अनेक योग्यांची व देवतांची दर्शने होतात. मधून मधून ऋषी दिसतात. सतत चिदाकाशात विहार करत असते. दिव्य ज्योति दिसते. ही ज्योति आकाशापासून पृथ्वीलोकापर्यंत अशी विश्वव्यापी असते. बऱ्याचवेळा भगवान् श्रीकृष्णाचे दर्शन या ज्योतिमध्ये होते. मनाला अतिशय आनंद होत असतो. कधीकधी मी स्वतःला त्या ज्योतित पहाते. कधीकधी दोन वर्षाचे एक मूल त्या ज्योतित दिसते. एकदा तर शेषशाई भगवान् विष्णूचेही दर्शन झाले.'' मला सातवा महिना चालू असताना आई श्रीस्वामीजींच्या दर्शनाला गेल्या तेव्हा श्रीस्वामीजी त्यांना म्हणाले...

''ताई! भारतातील पर्वतांमध्ये लाखों वर्षांपासून ऋषी तपस्या करीत आहेत. पृथ्वीतलावरील महान माणसे या ऋषींचे अवतार असतात. ऋषींच्या पवित्र देहातून एक ज्योति बाहेर येते व प्रेग्नण्ट स्त्रिच्या उदरात

शिरते.

ऋषींचे देह हे चैतन्यमय असतात. त्यांना कधीही मरण येत नसते. कल्पकल्प वर्षे ते तपस्या करत असतात. ईश्वरी इच्छेनुसार अधून मधून ते अवतार धारण करतात. कधी दुष्टांच्या संहारासाठी त्यांना अवतार धारण करावा लागतो. तर कधी एखादा नवीन वंश सुरू करण्यासाठी ते अवतार धारण करतात. अशा प्रकारे विशिष्ट कार्यासाठीच ऋषी पृथ्वीतलावर जन्म घेतात.

प्राचीनकाळी नारायण नांवाचे एक ऋषी होते. ईश्वरी इच्छेनुसार या ऋषींनी जन्म घेतला. राजा यदु नांवाने ते कीर्तिवंत झाले. या यदुपासून जो वंश सुरू झाला त्याला यादव वंश असे म्हणतात. या यादव वंशामध्ये आठव्या पिढीमध्ये भगवान् श्रीकृष्णाने जन्म घेतला.

तेच ऋषी ईश्वरी कार्यासाठी मानसीच्या पोटी जन्म घेणार आहेत. ताई, तुमचा नातू खूप पराक्रमी व कीर्तिवंत होणार आहे.''

अमेरिकेमध्ये मूल जन्माला येण्याच्या अगोदरच मुलाचे नांव काय ठेवायचे हे ठरवावे लागते. मूल जन्माला आल्याबरोबर हॉस्पिटलच्या रजिस्टरमध्ये त्या मुलाच्या नांवाची नोंद केली जाते. जन्माला येणारे मूल हे मुलगा आहे की मुलगी आहे हे डॉक्टर अगोदरच सांगतात. तद्नुसार आई-वडील मुलाचे अथवा मुलीचे नांव अगोदरच ठरवितात.

मला मुलगा झाला. मुलाचे नांव व्योम अशी हॉस्पिटलमध्ये नोंद केली. व्योम जन्माला येण्याच्या सहा-सात दिवस अगोदर आई आम्हाला मदत करण्यासाठी अमेरिकेत लॉसएन्जिलीस येथे आमच्याकडे आल्या होत्या.

**अ**मेरिकेतील कॅलिफोर्निया स्टेटमधील लॉसएन्जिलीस या

शहरात मी व जितू रहात होतो. व्योम येथेच जन्माला आला. लॉसएन्जिलीस येथे मी व्योमला जन्म देत असताना लॉसएन्जिलीस पासून सहाशे किलोमीटर दूर असणाऱ्या सॅनफ्रान्सिस्को येथे काही अद्‌भुत ईश्वरी लीला घडत होत्या. सुजाता माळवे या श्रीस्वामीजींच्या भक्त सॅनफ्रान्सिस्को येथे रहात होत्या. त्यांना ध्यान धारणेचे खूप अनुभव आहेत.

सौ. सुजाता माळवे यांच्या डोळ्यासमोर अगदी नुकतेच जन्माला आलेले एक मूल दिसू लागले. डोळे मिटले तरी ते मूल दिसत होते व डोळे उघडे ठेवले तरी ते मूल डोळ्यासमोर दिसत होते. हा प्रकार काय आहे हे सौ. सुजाता माळवे यांना कळेना. तीन दिवस त्यांनी हा प्रकार काय आहे याचा विचार करण्यात घालविले. चौथ्या दिवशी त्यांनी मुंबईला आईंच्या घरी फोन लावला. माझ्या सासऱ्यांनी फोन उचलला.

''वनिता ताई आहेत का?'' सुजाता माळवेंनी विचारले, यावर माझे सासरे म्हणाले...

''मी जयंत दीक्षित बोलतोय, जितू-मानसी यांना मुलगा झाला आहे. आज चार दिवस झाले आहेत. मिसेस दीक्षित अमेरिकेतच आहेत. तुम्ही जितू-मानसीच्या घरी फोन करा. मिसेस दीक्षित तुम्हाला तेथेच भेटतील.''

सुजाता माळवेंना हे ऐकून आश्चर्य वाटले व नुकतेच जन्माला आलेले मूल आपल्याला का दिसत आहे हे ही त्यांच्या लक्षात आले.

सुजाता माळवेंच्या मनात आता नवीन विचार येऊ लागले...जे मूल मला दिसत आहे ते मानसीचेच असेल कशावरून? हा एक योगायोगही असू शकतो, असे त्यांना वाटले.

दुसऱ्या दिवशी सुजाता माळवे यांनी देवाची पूजा केली व

रसमलईचा नैवेद्य देवाला दाखविला. रसमलईच्या भांड्याजवळ व्योम प्रकट झाला. चार-पाच दिवसांपूर्वी जन्माला आलेल्या या मुलाचे नांव व्योम आहे हे सुजाता माळवे यांना कळले होते. लॉसएन्जिलीसला फोन करून व्योमविषयी सर्व माहिती आईंकडून घेतली होती.

सहज चेष्टा करण्याच्या उद्देशाने सुजाता माळवे म्हणाल्या, ''व्योम, तुला रसमलई आवडते का?''

यावर व्योमने उत्तर दिले, ''माझ्या आईला रसमलई खूप आवडते.'' व्योमचे हे उत्तर ऐकून सुजाता माळवे थक्क झाल्या त्यांनी व्योमची परिक्षा पाहायचे ठरविले. व्योम जन्माला आल्यापासून बाराव्या दिवशी सुजाता माळवे लॉसएन्जिलीस येथे आम्हा सर्वांना भेटायला आल्या. घरात आल्याआल्या त्यांनी मला प्रश्न विचारला... ''मानसी! तुला रसमलई आवडते ना?'' त्यांचा प्रश्न ऐकून मी जवळजवळ उडालेच. ''मला रसमलई खूप खूप आवडते. परंतु हे तुम्हाला कसे कळले.''

यावर सुजाता माळवे म्हणाल्या, ''सांगून कोणाला खरे वाटणार नाही परंतु तुला रसमलई आवडते हे मला तुझ्याच मुलाने, व्योमने सांगितले.''

आम्हा सर्वांनाच खूप आश्चर्य वाटले. त्यानंतर सुजाताताई निवांतपणे बसल्या. जितूने व्योमला त्यांच्या हातात दिले. सुजाताताईंनी व्योम जन्माला आल्यापासून त्यांनी अनुभवलेल्या ईश्वरी लीला आम्हाला सांगितल्या. त्या सर्वच्या सर्व येथे सांगणे कठीण आहे. व्योम जन्माला आल्यापासून मी, जितू , आई सर्वच नेहमी काहीतरी अद्‌भुत असा अनुभव घेत असतो. ही सर्व श्रीस्वामीजींची कृपा!

व्योम जन्माला आल्यानंतर आईंनी मुंबईतील आपल्या ज्योतिषी मैत्रिणीला फोन लावून तिला व्योमची पत्रिका तयार करण्यास सांगितले

होते. त्याप्रमाणे पंधरा दिवसात तिने पत्रिका तयार करून सर्व भविष्य आईंना सांगितले.

जन्माला आल्यापासून अद्‌भुत चमत्कार होत राहतील व मोठेपणी स्वामी विवेकानंदांसारखा कीर्तिवंत होईल असे तिने सांगितलेल्या भविष्याचा थोडक्यात सारांश आहे.

**मी** व जितू दर रविवारी व्योमला घेऊन लॉस-एन्जिलीस येथील योगानंदांच्या आश्रमात जातो. व्योम दीड वर्षाचा असतांनाची गोष्ट. आम्ही व्योमला घेऊन योगानंदांच्या आश्रमात गेलो. मी जितूला म्हणाले, ''जितू, मी ध्यान करते तू व्योमला सांभाळ.'' जितू मला म्हणाला, ''तू काही काळजी करू नकोस. तू ध्यान कर. मी व्योमला सांभाळतो.''

मी ध्यानाला बसले. योगानंदांच्या पवित्र भूमीत काही सेकंदातच मला प्रगाढ ध्यान लागले. मी माझ्या देहातून बाहेर पडले. मध्ये किती वेळ गेला ते मला काही कळले नाही. माझ्या चारही बाजूला आकाश होते. मी आकाशात होते. बऱ्याच दूरवरच्या गोष्टी मला दिसत होत्या. एकाच वेळेला चारही बाजूंचे मला दिसत होते. दृष्टी व्यापक झाली होती. आकाशातून हळूहळू मी खाली येऊ लागले. जसजशी मी खाली येऊ लागले तसतशा माझ्या दृष्टीला जवळच्या गोष्टी दिसू लागल्या. अचानक मला आश्रमातील टेनिस कोर्ट दिसले. त्या टेनिस कोर्टवर स्वतः श्री योगानंद व्योम बरोबर खेळताना दिसले.

व्योम दिसल्याबरोबर मला सर्व काही आठवले. व्योमला सांभाळण्यासाठी मी जितूला सांगितले होते. आकाशातून वेगाने खाली येऊन मी माझ्या देहात शिरत असताना पाहिले, जितू माझ्यापासूनच थोड्या दूरवर ध्यान करत बसला होता. मी उठले व धावतच टेनिस

कोर्टकडे गेले. तेथे व्योम खेळत होता. अदृश्य रूपाने योगानंद अर्थातच तेथे होते.

मी व्योमला उचलले. थोड्यावेळाने जितूही उठला. जितू म्हणाला, ''मी व्योमला मांडीवर घेऊन बसलो होतो पण मला केव्हा ध्यान लागले हे कळलेच नाही.''

अमेरिकेमध्ये श्रीस्वामीजींच्या कृपेचे दिव्य अनुभव घेत आम्ही आनंदात रहात आहोत. भारतात परत केव्हा यायला मिळेल याची मी वाट पहात आहे.

**सौ. मानसी इंद्रजित (जितू) दीक्षित**

लॉसएन्जिलीस - अमेरिका

ॐ

# मेघल

**मे** १९८५ मध्ये श्रीस्वामीजींचे दर्शन पहिल्यांदा घेतले. तेव्हा मी चौदा वर्षांची होते. आमचे टीचर आम्हाला म्हणाले....

''एका जंगलामध्ये एक तरुण योगी तपस्या करीत आहेत. तेथे फक्त चार झोपड्या आहेत, घनदाट जंगल आहे. मी त्यांच्या दर्शनाला जाणार आहे. तुम्हा कोणाला जर माझ्याबरोबर यायचे असेल तर मी तुम्हाला घेऊन जाईन. जंगलातले जीवन कसे असते याचा तुम्हाला अनुभव येईल. तेथे वीज उपलब्ध नाही. एकच कंदील आहे. त्यामुळे काळोखात झोपण्याची तुमची तयारी हवी. सर्प, वाघ, चित्ते, गवेरेडे, सांबर मुक्तपणे फिरत असतात. झोपड्यांमध्ये उंदीर दिवसाही उड्या मारतात. तेथील पाणी बर्फासारखे गार आहे. नदीत उतरून तुमचे पाणी तुम्हालाच आणावे लागेल. तीन दगडांची चूल मांडून तुमचा स्वयंपाक तुम्हालाच करावा लागेल. अशा सर्व गोष्टींची तयारी असेल तरच तुम्ही माझ्याबरोबर चला!''

आम्ही चार मुली हे धाडस करायला तयार झालो. त्या चार मुलीत मी एक होते. तेरा किलोमीटर चालत गेल्यानंतर जंगलामध्ये

त्या चार झोपड्या दिसल्या. एका झोपडीत चूल मांडलेली होती, दुसऱ्या झोपडीत लाकडांचा साठा होता, तिसऱ्या झोपडीत श्रीस्वामीजी स्वतः रहात होते व चौथ्या झोपडीत आम्ही आमचे सामान ठेवले.

माझ्या बरोबरच्या तीनही मैत्रिणी खेळण्यात दंग होत्या. मी श्रीस्वामीजींसमोर बसले होते. श्रीस्वामीजी मला म्हणाले , ''तू भरपूर ध्यान कर! तुझी आध्यात्मात खूप प्रगती होईल. पूर्वजन्मी तू खूप कृष्णभक्ती केली आहेस.'' श्रीस्वामीजींनी मला ज्योतिध्यान कसे करावे हे शिकविले. तुपाचा दिवा प्रज्वलित करून त्या ज्योतिकडे दोन-तीन मिनिटे पहात रहायचे. नंतर डोळे मिटून त्या ज्योतिचे ध्यान करायचे. अर्ध्या तासानंतर डोळ्यावर थंडगार पाण्याचे फवारे मारायचे व पुन्हा ध्यानाला बसायचे. दररोज संध्याकाळी असे दोन ते तीन तास करायचे. मध्ये थोडावेळ डोळे मिटून श्वासावर लक्ष केंद्रित करायचे व श्वास शरीरात कोठे कोठे जातो हे पहायचे. असे केल्याने डोळ्याला विश्रांती मिळते व ईश्वरीशक्ती आपल्यामध्ये जिरून जाण्यासाठी आवश्यक तो वेळही मिळतो. थोडा वेळ अशा प्रकारे डोळे मिटून लक्ष केंद्रित करून बसल्यानंतर पुन्हा डोळे उघडायचे व ज्योतिकडे पहात रहायचे. एकंदरीत दोन-तीन मिनिटे ज्योतिकडे पाहणे, पाच ते दहा मिनिटे डोळे बंद करून ज्योतिचे ध्यान करणे. परत डोळे उघडून ज्योतिकडे पहाणे. अशा प्रकारे अर्धा तास साधना केल्यानंतर डोळ्यावर पाण्याचे फवारे मारणे. वर-खाली इकडे-तिकडे डोळे फिरवून थोडा डोळ्यांना व्यायाम देणे व पुन्हा ज्योतिध्यानाला बसणे. अशा प्रकारे दररोज दोन ते तीन तास साधना करणे. तीन महिने साधना केल्यानंतर ही साधना बंद करणे व फक्त डोळे मिटून भ्रूमध्यावर लक्ष केंद्रित करून मनातल्या मनात ''**ॐ दत्तगुरु ॐ**'' असा जप करत रहाणे, अशी साधना श्रीस्वामीजींनी मला करायला सांगितली.

अरण्यातील जीवनाचा चार दिवस अनुभव घेऊन आम्ही मुंबईला परत आलो. माझ्या इतर मैत्रिणींना श्रीस्वामीजींनी काहीही साधना किंवा उपदेश केला नाही. त्यांचे फक्त लाड केले.

घरी आल्यानंतर श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे मी साधना करायला सुरुवात केली. महिना-दीड महिना साधना केल्यानंतर डोळ्यासमोर दिसणारा अंधःकार नाहीसा झाला. डोळे मिटले की डोळ्यासमोर दिव्य प्रकाश दिसू लागला. या प्रकाशाकडे पहात ध्यान करायचे व या प्रकाशाकडे पहातच झोपायचे अशी दुहेरी साधना सुरू झाली. हळूहळू मला या प्रकाशामध्ये अनेक देव-देवता दिसू लागल्या. भगवान् श्रीकृष्ण, बलराम, गणेश, बालात्रिपुरसुंदरी, गायत्री देवी अशा अनेक देव-देवतांचे दर्शन या प्रकाशात झाले. एकदा तर भगवान् श्रीकृष्णाने विराट रूपात दर्शन दिले. याला विश्वरूप दर्शन असेही म्हणतात. भगवान् श्रीकृष्णाने एवढा मोठा विशाल आकार धारण केला होता की, त्याच्या देहामध्ये सर्व ग्रह-नक्षत्रे व आकाशगंगा सामावून गेलेल्या होत्या. श्रीस्वामीजीही भगवान् श्रीकृष्णाच्या शरीरात होते. हे स्वरुप पाहताना मला दिव्य दृष्टी प्राप्त झाली होती. संपूर्ण पृथ्वी भगवान् श्रीकृष्णाच्या पायात गरगर फिरत होती. भगवान् श्रीकृष्णाचे शरीर पारदर्शक होते. पायात जेथे पृथ्वी फिरत होती तेथेच थोड्या अंतरावर चंद्रही फिरत होता. कोट्यावधी मैल उंच व लाखो मैल रुंद असे भगवान् श्रीकृष्णाचे आकाशमय शरीर होते. अनेक सूर्य, असंख्य ग्रह, नक्षत्रे, तारे भगवान् श्रीकृष्णाच्या देहात दिसत होते. दिव्य दृष्टीने मी हे सर्व पहात होते. माझी ही दिव्य दृष्टी आकाशाहूनही विशाल होती. सुमारे पंधरा-वीस मिनिटे असे दिव्य दर्शन घडले. त्यानंतर माझी जाणीव माझ्या स्थूलशरीरात परत आली.

या दर्शनानंतर अनेकवेळा भगवान् श्रीकृष्ण व गायत्री देवी

माझ्याशी बोलत असत. परीक्षेच्या वेळीही त्यांची खूप मदत होई. अनेकवेळा ध्यानामध्ये मी कुंडलिनी शक्ती, चक्रे व चक्रदेवता यांना पाहिलेले आहे. एकदा खूप मोठी ज्योत पाहिली. या ज्योतिमध्ये श्रीस्वामीजी दिसले. श्रीस्वामीजींच्या देहातून एक तेजस्वी प्रकाश बाहेर पडत होता. याच वेळी माझी व सौ. वनिता दीक्षित यांची ओळख झाली. त्यांचा आध्यात्मातील अधिकार खूप मोठा आहे हे मला माहीत होते. ‘‘यांच्या सहवासात रहा. यांच्या संगतीत राहिल्याने तुझी आध्यात्मिक उंची खूप वाढेल.’’ असे श्रीस्वामीजींनी मला सांगितले होते. काही भक्त यांना आई म्हणत. काही भक्त ताई म्हणत. मी व माझी मोठी बहीण अल्पा त्यांना दीदी म्हणू लागलो.

मी व अल्पा आम्ही दोघीही दीदीं बरोबर अरण्यात श्रीस्वामीजींकडे जाऊ लागलो. श्रीस्वामीजींना मी माझे ध्यानाचे अनुभव सांगितले. माझी प्रगती पाहून त्यांना खूप आनंद झाला.

श्रीस्वामीजी मला म्हणाले,

‘‘आता तू एक-एक देवतेच्या स्तोत्राचे चाळीस-चाळीस हजार पाठ करून देवतांना प्रसन्न कर!’’ असे म्हणून त्यांनी मला **श्रीगणपती स्तोत्र, नवग्रह स्तोत्र, प्रज्ञा विवर्धन स्तोत्र, श्रीदत्तस्तोत्र, श्रीदेवीसूक्त व नारायणी स्तुती** अशी स्तोत्रे दिली. याशिवाय **गायत्री मंत्र** दररोज पाचशे वेळा म्हणायला सांगितला.

ही सर्व साधना पूर्ण करण्यास मला सुमारे तीन-साडे तीन वर्षांचा काळ लागला. या साधनेने आध्यात्मिक परिपक्वता आली. मन स्थिर व गंभीर झाले. याच काळामध्ये मी एम्. बी. बी. एस्. झाले. एम्. बी. बी. एस्. च्या परिक्षेमध्ये श्रीस्वामीजींनी मला कशा प्रकारे मदत केली, कावळ्यांना भजी खायला घालून दोन पेपर्समध्ये मला कसा

फर्स्टक्लास मिळवून दिला, याचे समग्र वर्णन दीदींनी या पूर्वीच केलेले आहे. (पान नं.४१ पहा.) त्यामुळे ती हकिकत मी येथे सांगत नाही. ज्या ज्या स्तोत्राचे मी चाळीस हजार पाठ पूर्ण केले, त्या त्या स्तोत्रातील देवतेने प्रत्यक्ष दर्शन देऊन मला आशीर्वाद दिले व ज्ञान दिले. अशा प्रकारे अनेक देवतांची दर्शने मला स्तोत्रांच्या पाठाने झाली.

काही वेळा ध्यानामध्ये मी हिमालयातील सिध्दाश्रमात जात असे. तेथे सिद्ध लोक रहातात म्हणून त्यांना सिद्धाश्रम म्हणतात. असे अनेक आश्रम हिमालयात आहेत. हजार-दोन हजार वर्षांचे योगी-योगिनी येथे तरुण रूपामध्ये तपश्चर्या करीत असतात. श्रीमहाअवतार बाबाजींचे वय तर पाच हजार वर्षांहून अधिक आहे. त्यांच्या श्रीगुरुंचे वय अकरा हजार वर्षांहूनही अधिक असून त्यांचे नांव भद्रबाहु असे आहे. काही ठिकाणी श्रीमहाअवतार बाबांना अनंगदेव म्हटले जाते. असे अनेक आश्रम हिमालयात असून हे सर्व सिद्धांचे आश्रम आहेत. एका आश्रमामध्ये तर जलाशयात प्रवेश करून जावे लागते. मी हे सर्व आश्रम सूक्ष्मदेहाने पाहिले. श्रीमहाअवतार बाबाजी तसेच अनेक योग्यांचे आशीर्वाद मला तेथे प्राप्त झाले. विशेष म्हणजे मी श्रीस्वामीजींना सुद्धा सिद्धाश्रमात पाहिले.

एकदा सिद्धाश्रमात मी श्रीस्वामीजींचे अति विशाल रूप पाहिले. त्यांच्या सर्व अंगावर खूप लांब लांब असे केस होते. मी त्यांना नमस्कार करताच त्यांनी श्रीस्वामीजींचे आता जे रूप आहे, तसे रूप धारण केले. समोरून एक नदी वाहत होती. श्रीस्वामीजी म्हणाले, ''या नदीला रामगंगा असे म्हणतात. कृतयुगापासून येथे मी तपस्या करीत आहे. अधून मधून ३००/४०० वर्षांनी लोकोद्धारासाठी पृथ्वीतलावर येत असतो.''

ध्यानातून उठल्यानंतर मी हिमालयामध्ये रामगंगा नदी कोठे

आहे हे नकाशात पाहिले. तेव्हा आस्कोटजवळ रामगंगा नदी असल्याचे आढळले. या नंतर जेव्हा मी श्रीस्वामीजींच्या दर्शनाला दीदींबरोबर जंगलात गेले तेव्हा श्रीस्वामीजींना विचारले, ''हिमालयामध्ये रामगंगा नदी कोठे आहे व तेथे काय आहे?''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले,

''हिमालयातील रामगंगा नदी आस्कोटच्या जवळपास असून तेथे सुमारे तीस फूट उंचीचे माझे विशालकाय मूळ शरीर आहे. अवतार कार्य संपले की मी त्या शरीरात परत जातो व तपश्चर्या करत रहातो. तू माझ्या मूळ देहाला पाहिले आहेस हे मला माहीत आहे. कृतयुगापासून ते शरीर असून तो चिन्मय देह आहे. असे अनेक ऋषी हिमालयामध्ये तपश्चर्या करीत बसलेले आहेत.''

**ध्या**नामध्ये मी श्रीस्वामीजींची मानसपूजा करीत असे. पुष्कळवेळा श्रीस्वामीजी प्रकट होत व मला म्हणत, ''चल!'' त्यांनी चल असे म्हणताच मी माझ्या स्थूलदेहातून बाहेर पडत असे. सूक्ष्मदेहाने श्रीस्वामीजीं बरोबर भ्रमंतीला जात असे. चंद्रलोक, शुक्रलोक अशा वेगवेगळ्या लोकांमधून मला भ्रमण करायला मिळे. प्रत्येक लोकात दिव्य देहधारी आत्मे दिसत. तेथील प्रत्येक वस्तूमधून प्रकाश बाहेर पडत असे. अगदी गवताच्या पानापासून झाडापर्यंत सर्वांमधून दिव्य प्रकाश बाहेर पडत असे. परोपकार व ईश्वर चिंतन करणारे पुण्यात्मे मृत्यूनंतर येथे येऊन रहातात असे कळले.

श्रीस्वामीजी ज्या अरण्यात रहात होते, तेथील वातावरणात प्रचंड दैवीशक्ती होती. मी व अल्पा आम्ही दोघीही रात्रीच्या वेळी अरण्यात फिरत असू. आम्हाला तेथील वातावरणात कोट्यावधी नीलबिंदू दिसायचे. प्रत्येक नीलबिंदू म्हणजे एक देवता असायची. अनेकवेळा या नीलबिंदू

मधून देवता प्रकट होत आहेत, श्रीस्वामीजींचे दर्शन घेत आहेत, त्यांच्या बरोबर चर्चा करत आहेत, आशीर्वाद घेऊन जात आहेत, हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे.

अरण्यातील श्रीस्वामीजींच्या आश्रमामध्ये जेथे फक्त गवताच्या चार झोपड्या होत्या तेथे मी दीदींबरोबर जात असे. श्रीस्वामीजींनी मला दीदींच्या म्हणजे सौ. वनिता दीक्षित यांच्या सहवासात रहा असे पूर्वीच सांगितले होते. श्रीस्वामीजींची कृपा, दीदींचा सहवास व रोजची दोन ते तीन तास केलेली साधना यामुळे माझा तृतीय नेत्र जागृत झाला. दीदींचे सामान्य रूप दिसणे बंद झाले. त्यांच्या जागी मला सतत देवी दिसू लागली. त्या बोलत असल्या तरी मला देवी दिसायची. त्या चपाती करत असल्या तरी मला देवी चपाती करत आहे असे दिसायचे, त्या काही काम करत असल्या तरी मला देवी काम करत आहे असे दिसायचे. त्यांच्या हातांच्या बोटांमधून, पायांच्या बोटांमधून, डोळ्यांमधून डिव्हाइन् एनर्जी, दिव्य शक्ती लहरी वातावरणात पसरत आहेत असे मला दिसायचे. जणू काही त्या डिव्हाइन् एनर्जी बरोबर खेळत आहेत असे वाटायचे. पुष्कळवेळा मी ध्यानाला बसल्यानंतर दीदी मला पूर्णपणे सोनेरी रंगाच्या दिसायच्या. तर कधी कधी त्यांच्या अंगावर अनेक अलंकार असायचे. डोक्यावर मुकुट, पायात पैंजण, गळ्यात मोत्यांचे हार, हातात विविध अलंकार असायचे. दररोज ध्यानाला बसल्यानंतर ध्यानामध्ये विविध अलंकारांनी अलंकृत अशा प्रकट व्हायच्या व मी त्यांची मानस पूजा करायची.

**त्या** काळात (१९९०च्या पूर्वी) दीदी घाटकोपरला (मुंबई) रहात होत्या. मी त्यांच्याकडे रहात असे. श्रीस्वामीजींनी त्यांना एक श्रीमहालक्ष्मीची मूर्ती दिलेली होती. एका स्वतंत्र खोलीमध्ये एक सुंदरसे

देवघर तयार केलेले होते. त्या देवघरात मूर्तीची स्थापना केली होती. दीदी त्या मूर्तीची पूजा करीत असत.

**ए**कदा मी ध्यान करत बसले होते. डोळ्यासमोर श्रीमहालक्ष्मीची मूर्ती दिसू लागली. श्रीमहालक्ष्मी मला म्हणाली, ''आज मला ही लाल साडी नेसायची आहे,'' असे म्हणून एक लाल रंगाची विशिष्ट साडी मला दाखविली. मी मनात विचार केला ध्यान आटोपल्यानंतर देवीचा निरोप आपण दीदींना सांगू.

मला प्रगाढ ध्यान लागले होते. नेहमीप्रमाणे मी प्रगाढ ध्यानामध्ये गेले. दिव्य लोकातील अद्‌भुत आनंदाचा अनुभव घेतला. ध्यानातून उठले तेव्हा बराच वेळ झाला होता. पळतच मी देवीच्या खोलीत गेले. मला अतिशय आश्चर्य वाटले की, देवीने जी साडी मला ध्यानामध्ये दाखविली होती, तीच साडी दीदींनी देवीला नेसविली होती.

हा प्रकार पुढे अनेकवेळा घडला. देवी जी साडी तिला नेसायची आहे असे मला सांगत असे. तीच साडी दीदींनी देवीला नेसविलेली असायची.

मी दीदींना विचारले, ''देवी माझ्याशी बोलते, तिला कुठली साडी नेसायची आहे तेही सांगते. पण मी ते तुम्हाला सांगण्यापूर्वीच तुम्ही ती साडी देवीला नेसविलेली असते. हे कसे घडते? देवी तुमच्याशी बोलते का?''

दीदी म्हणाल्या, ''हे कसे घडते ते मला माहीत नाही. तू फार तर श्रीस्वामीजींना विचार.'' मी हा प्रश्न जेव्हा श्रीस्वामीजींना विचारला तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले,

''दीदी व देवी दोन नाहीत. दीदींचेच एक रूप श्रीमहालक्ष्मीच्या रूपाने तुझ्या ध्यानात येते व तुझ्याशी बोलते.''

श्रीस्वामीजींनी जेव्हा खुलासा केला तेव्हा दीदींनी श्रीस्वामीजींना विचार असे का सांगितले, ते माझ्या लक्षात आले.

याच काळामध्ये म्हणजे १९९०-९१ च्या आसपास अरण्यातून श्रीस्वामीजी घाटकोपर (मुंबई) येथे दीदींच्या घरी येत असत. दोन-तीन दिवस राहून परत ते अरण्यात जात असत. दीदींचे घर म्हणजे डिव्हाइन् आश्रमासारखे झाले होते. कितीतरी वेळा मी दीदींच्या घरामध्ये देव-देवतांना इकडे तिकडे फिरताना पाहिले. एकदा जलाराम बाप्पा (गुजरात मधील महान संत) दीदींच्या घरात प्रकट झाले. त्यांनी मला ''श्रीस्वामीजी सांगतील तशी साधना करत रहा. तुझ्या घराण्यातील सर्वांचा त्यामुळे उद्धार होईल'' असे सांगितले. ''तुझी पूर्ण फॅमिली श्रीस्वामीजींची भक्ती करते. याचा मला अतिशय आनंद आहे'' असे ते म्हणाले.

दीदी जेव्हा देवीची पूजा करीत तेव्हा दीदीं समोर आणखी एक देवी प्रकट होत असे व ती दीदींची पूजा करीत आहे असे मला दिसत असे. खूप वेळा दीदींकडून देवीला एनर्जी मिळत आहे असे दिसत असे तर अनेकदा देवीकडून दीदींना एनर्जी मिळत आहे असेही दिसत असे.

जेव्हा दीदी किंवा श्रीस्वामीजी मोठ्याने स्तोत्र म्हणत तेव्हा माझी कुंडलिनी एकदम जागृत होऊन सहस्त्रारचक्राकडे धाव घेत असे व मला प्रगाढ ध्यान लागत असे. या प्रगाढ ध्यानामध्ये मला विविध प्रकारचे दैवी अनुभव येत असत.

माझे लग्न झाले. मी भारत सोडून अमेरिकेत आले व नंतर अमेरिका सोडून कॅनडाला आले. कोठेही असले तरी दररोज ध्यान करणे कधीही चुकविले नाही, सकाळ-संध्याकाळ दीड-दीड तास तरी ध्यान करायचेच, हा श्रीस्वामीजींनी घालून दिलेला नियम पाळण्याचा मी जास्तीत जास्त प्रयत्न करते. पुष्कळवेळा ध्यानामध्ये मला श्रीस्वामीजी ध्यानस्थ

बसलेले दिसतात. त्यांच्या देहातून इंद्रधनुष्याच्या रंगाची असंख्य तेजस्वी किरणे बाहेर पडतात व वातावरणात पसरतात असे दिसते. श्रीस्वामीजी पूर्ण विश्वामध्ये डिव्हाइन् एनर्जी सोडत असतात असे वाटते.

श्रीस्वामीजी आणि दीदी आजही ध्यानामध्ये अथवा स्वप्नामध्ये मला मार्गदर्शन करतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्रीस्वामीजींनी व दीदींनी कुठल्याही परिस्थितीत समाधानात कसे जगावे ते शिकविले. वेगवेगळ्या आव्हानांना धैर्याने तोंड देताना सकारात्मक दृष्टिकोन (positive attitude) आणि भक्ती कशी ठेवावी हे शिकविले.

## निखिल

१९९७ साली मला मुलगा झाला. त्याचे नांव निखिल! तो तीन महिन्यांचा असताना मी त्याला श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी भारतात घेऊन गेले. तेव्हापासून दरवर्षी मी त्याला घेऊन श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ भारतात जाते व काही दिवस श्रीस्वामीजींच्या सहवासात आम्ही रहातो. त्याचे श्रीस्वामीजींवर खूप प्रेम आहे. तो म्हणतो, ''माझे पहिले प्रेम श्रीस्वामीजी आणि दुसरे प्रेम तू!'' श्रीस्वामीजींचाही तो खूप खूप लाडका आहे. निखिल माझ्याबरोबर ज्या ज्या वेळी श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ आश्रमात जातो, त्या त्या वेळी मग महिना कुठलाही असू दे, श्रीस्वामीजी दहीहंडी बांधायला लावत व निखिल ती हंडी फोडत असे.

श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''निखिल हा पूर्वजन्मीचा योगी आहे.'' श्रीस्वामीजींनी त्याला ध्यान करण्यास शिकविले. तो दररोज ध्यान करत असे.

निखिल चार वर्षांचा असताना पंधरा दिवस आजारी होता.

त्याच्यात डोळे उघडण्याची सुद्धा ताकद नव्हती. अशा वेळी जो अद्‌भुत अनुभव श्रीस्वामीजींनी दिला, त्याचे वर्णन यापूर्वी आलेले आहे. त्यामुळे त्याविषयी मी काही लिहित नाही.

निखिल पाच-साडे पाच वर्षांचा असताना पुन्हा व्हायरल फिवरने आजारी पडला. मी त्याला औषध दिले परंतु काही उपयोग झाला नाही. एक आठवडा झाला परंतु निखिलच्या प्रकृतीत काही फरक पडेना. मला काळजी वाटू लागली, मी दीदींना फोन केला. दीदी म्हणाल्या....

''निखिलला श्रीस्वामीजींची विभूती दे! आणि श्रीस्वामीजींच्या फोटोकडे पहात रहा असे त्याला सांग!''

मी दीदींनी सांगितल्याप्रमाणे केले. श्रीस्वामीजींच्या फोटोकडे पाहू लागताच निखिलला गाढ झोप लागली. सुमारे तासाभराने तो उठला. तो पूर्ण बरा झाला होता. त्याच्या अंगातील ताप नाहीसा झाला होता. तो मला म्हणाला...

''मला स्वप्न पडले. श्रीस्वामीजींच्या फोटोतून गोल्डन लाईट बाहेर पडत आहे व तो माझ्या देहात प्रवेश करत आहे.'' अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी निखिलला बरे केले.

श्रीस्वामीजींनी मला अनेकदा सांगितले होते की, निखिल पूर्वजन्मीचा योगी आहे. परंतु श्रीस्वामीजींच्या या वाक्याविषयी माझ्या मनांत शंका निर्माण होत असे, कारण निखिल अधून मधून खूप घाबरत असे. खूप अस्वस्थ होत असे. अगदी भीतीने घाबरून जात असे. असे का होते हे आम्हाला सुरुवातीला समजत नव्हते. हळूहळू लक्षात येऊ लागले की, जेव्हा पाऊस पडत असे, ढगांचा गडगडाट होत असे, विजांचा कडकडाट होत असे, अशा वेळी निखिल खूपच घाबरत असे.

खूप अस्वस्थ होत असे. यावर आम्ही मनोविकार तज्ज्ञ (सायकॉलॉजिस्ट) डॉक्टरचा सल्ला घेतला. त्यांनी त्यावर काही औषधे दिली. इतरही अनेक डॉक्टरना दाखविले. परंतु काहीही उपयोग झाला नाही. शेवटी श्रीस्वामीजींना विचारले.

श्रीस्वामीजी म्हणाले....

"निखिल हा पूर्वजन्मीचा योगी आहे. पूर्वजन्मामध्ये त्याने पृथ्वीतत्त्व व आपतत्त्व या दोन तत्त्वांच्या साधना पूर्ण केलेल्या आहेत. पृथ्वीतत्त्व व आपतत्त्वाच्या देवता त्याच्यावर प्रसन्न आहेत. अधून मधून त्या निखिलला भेटायला येतात. निखिल वयाने लहान असल्याने निखिलची स्पंदने व देवतेची स्पंदने एकमेकांशी मॅच होत नाहीत. त्यामुळे निखिल भयग्रस्त होतो."

श्रीस्वामीजींनी निखिलला तेजतत्त्वाची आणि वायुतत्त्वाची साधना शिकविली. या दोन्ही तत्त्वांच्या साधनेमध्ये त्याची जशी जशी प्रगती होत जाईल तशी तशी त्याची भीती कमी होत जाईल. तो पृथ्वीतत्त्व, आपतत्त्व, तेजतत्त्व व वायुतत्त्व या चारही तत्त्वातील देवतांना पाहू शकेल, त्यांच्याशी बोलू शकेल व त्यांच्याकडून ज्ञान प्राप्त करू शकेल असे ते म्हणाले.

सुमारे दोन-अडीच वर्षे साधना केल्यानंतर निखिलला या चारही तत्त्वातील देवता दिसू लागल्या. तो त्यांच्याशी बोलू लागला, त्यांच्याकडून ज्ञान ग्रहण करू लागला. पुष्कळवेळा तर देवता त्याच्याशी बोलत असताना तो मला रनिंग कॉमेंट्री सांगत असे.

निखिलला या सर्व साधना सांगताना श्रीस्वामीजींनी मला व निखिलला बजावून ठेवले होते की, या साधनेमध्ये पारंगतता येण्यासाठी दोन ते अडीच वर्षांचा काळ लागेल. या काळामध्ये जेव्हा-केव्हा कॅनडामध्ये वादळाची, मुसळधार पावसाची, ढगांच्या गडगडाटाची

पूर्व सूचना (weather report) मिळेल तेव्हा ताबडतोब मला फोन करा. जोपर्यंत निखिल या सर्व साधनांमध्ये पारंगत होत नाही, तोपर्यंत कॅनडातील तुमच्या परिसरात ढगांचा गडगडाट, वीजांचा कडकडाट अथवा चक्री वादळ असे काहीही होणार नाही; अशी देव व्यवस्था करेल. निखिल जेथे रहात असेल तेथून पन्नास चौरस मैल परिसरामध्ये असे काही घडणार नाही अशी व्यवस्था देव करेल.

**या** दोन-अडीच वर्षांच्या काळामध्ये म्हणजे, श्रीस्वामीजींनी शिकविलेल्या साधना निखिल करत होता त्या काळामध्ये असंख्य वेळा कॅनडा सरकारने थंडर स्टॉर्म, टोरनेडो, स्नो स्टॉर्म, सायक्लोन इत्यादींचा धोक्याचा इशारा दिला. हा धोक्याचा इशारा येताच आम्ही श्रीस्वामीजींना फोन करत असू! फोनवरच श्रीस्वामीजी सांगत, ''मुळीच काळजी करू नका!'' ज्या परिसरात निखिल आहे त्या परिसरात काहीही घडणार नाही. उलट वातावरण प्रसन्न राहील आणि या दोन-अडीच वर्षांच्या काळात असंख्य वादळे आली-गेली परंतु जेथे आम्ही रहात होतो तेथून पन्नास चौरस मैल परिसरात वातावरण सदैव प्रसन्न असायचे. मुसळधार पाऊस सुद्धा कधी पडला नाही. निखिलला त्रास होणार नाही एवढाच पाऊस पडायचा.

सुमारे दोन-अडीच वर्षांच्या काळामध्ये निखिलची व्हायब्रेशन्स व देवतांची व्हायब्रेशन्स मॅच होऊ लागली. देवता निखिल समोर प्रकट होऊ लागल्या, त्याच्याशी बोलू लागल्या व आपण कसे कार्य करतो ते निखिलला दाखवू लागल्या. भय आणि चिंता दोन्ही गोष्टी त्याला सोडून गेल्या.

एक दिवस श्रीस्वामीजींनी मला सांगितले, निखिल आता मोठा झाला आहे. त्याच्या करिता वादळवारे थांबविण्याची आता आवश्यकता

नाही. त्यानंतर १५ दिवसांनी कॅनडा ते अमेरिका या सर्व परिसरात प्रचंड बर्फवृष्टी झाली, वादळे झाली, परंतु निखिलला भीती वाटली नाही.

**श्री**स्वामीजी त्याला नेहमी शूरवीर म्हणायचे, तेव्हा आम्हाला हसू यायचे. श्रीस्वामीजी म्हणायचे तुम्ही मला हसता काय? पण तो किती शूरवीर आहे हे मी तुम्हाला सिद्ध करून दाखवीन. जेव्हा निखिलने हेलिकॉप्टर चालविले व चार मजली उंच इमारती एवढ्या खडकावर चढून दाखविले, तेव्हा श्रीस्वामीजी त्याला शूरवीर म्हणतात ते खरे आहे हे मला पटले.

**श्री**स्वामीजी एकदा त्याला म्हणाले...

''तू जेव्हा माझे स्मरण करशील तेव्हा मी तुझ्यासमोर प्रकट होईन व तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे देईन!''

श्रीस्वामीजींच्या या आशीर्वादाने निखिल एकदम आनंदित झाला. कॅनडाला परतल्यावर निखिलने मला विचारले...

''श्रीस्वामीजींना बोलविल्यानंतर श्रीस्वामीजी खरच प्रकट होतील का?''

मी म्हणाले, ''तू प्रयोग करून बघ!''

निखिलने श्रीस्वामीजींचे स्मरण केले आणि एकदम श्रीस्वामीजी त्याच्यासमोर प्रकट झाले. ते त्याच्या बरोबर इंग्लिशमध्ये बोलू लागले. श्रीस्वामीजी सफाईदार इंग्लिशमध्ये बोलत होते. बरेच दिवस हा प्रकार चालू होता. श्रीस्वामीजी त्याच्यासमोर प्रकट होत व त्याच्या सर्व व्यावहारिक व आध्यात्मिक जिज्ञासा पूर्ण करीत.

आम्ही भारतात गेलो तेव्हा श्रीस्वामीजी मोडक्या तोडक्या इंग्लिशमध्ये निखिलबरोबर बोलू लागले. अधून मधून ते मला इंग्लिशमध्ये

भाषांतर करायला सांगू लागले तेव्हा निखिलने श्रीस्वामीजींना स्पष्टपणे विचारले...

''श्रीस्वामीजी टोरोन्टोमध्ये जेव्हा तुम्ही माझ्यासमोर प्रकट होता तेव्हा सफाईदारपणे इंग्लिश बोलता ते कसे काय?''

तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ''माझा आत्मा, परमात्म्याशी एकरूप झाला आहे. परमात्मा तुझ्याशी माझ्या रूपामध्ये बोलतो. परमात्म्याला भाषेचे प्रतिबंध नसतात. तू जे पाहतोस ते माझे परमात्मस्वरूप आहे. सर्वव्यापी अशा दिव्य देहाने मी तुला भेटत असतो! माझ्याप्रमाणे आणखी काही महायोगी तुझ्याशी संपर्क साधणार आहेत.''

कॅनडाला परत आल्यानंतर निखिलबरोबर श्रीमहाअवतार बाबाजी, श्रीयोगानंद अशा काही महान सिद्धयोग्यांनी संपर्क करून निखिलला आशीर्वाद दिला व ज्ञान दिले. वातावरणातील अनेक देव-देवतांबरोबर त्याचा संपर्क झाला. त्या देव-देवतांनी त्याला विविध प्रकारच्या गिफ्टस् दिल्या. एकदा एका देवतेने त्याला गोल्डन फ्लास्क भरून काही दैवी औषध दिले. या औषधाने त्याला शक्ती, धैर्य व स्मरणशक्ती प्राप्त होईल असे सांगितले. पुष्कळवेळा देव-देवता प्रकट होऊन त्याच्या सूक्ष्मदेहामध्ये दैवी औषधे टोचत. या औषधाने त्याला दैवीशक्ती प्राप्त होत असे. कधीकधी दैवी औषधे प्यायला देत. एकदा त्याला क्रिस्टलच्या सुरईतून निळ्या रंगाचे औषध प्यायला दिले. हे दैवी औषध घेतल्यानंतर त्याला सरस्वती देवीची कृपा प्राप्त झाली. अभ्यासामध्ये खूप प्रगती झाली.

ध्यानामध्ये त्याला नेहमी हिमालय दिसतो. स्फटिकाने निर्माण केलेली देवळे दिसतात. त्या देवळात स्फटिकाचाच गणपती दिसतो.

जसजसे त्याचे वय वाढू लागले, तसतसे वातावरणातील देवतांकडून त्याला वेगवेगळे मंत्र प्राप्त होऊ लागले. बरेच मंत्र त्याला भगवान् श्रीदत्तात्रेयांकडून प्राप्त झाले. त्या विशिष्ट मंत्रांचे जप, विशिष्ट काळामध्ये, विशिष्ट संख्येमध्ये पूर्ण करावे लागत. विशिष्ट काळात विशिष्ट संख्येइतका जप पूर्ण केला की, त्याला उच्च दर्जाची आध्यात्मिक स्टेज प्राप्त होत असे. त्यानंतर आणखी प्रगती करण्यासाठी वेगळा मंत्र दिला जात असे. याशिवाय वेगवेगळ्या पॉवर्स कशा प्राप्त कराव्या याचे मार्गदर्शन त्याला श्रीस्वामीजी ध्यानामध्येच देत असत. त्याच्या प्रगती मध्ये जे अडथळे येत ते श्रीस्वामीजी स्वतः दूर करत व त्याचा आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग सुखकर करत. सामर्थ्याचा उपयोग कसा करावा याचे ज्ञानही श्रीस्वामीजी त्याला देत.

एकदा निखिलला एक विशिष्ट प्रकारचा अदृश्य सृष्टीतील बोर्ड दाखविण्यात आला. या बोर्डावर अनेक प्रकारचे बोल्टस् होते. प्रत्येक बोल्ट वेगवेगळ्या प्रकारची एनर्जी (ऊर्जा) निर्माण करीत असे. एक बोल्ट पाऊस व गडगडाट यांचे होते तर दुसरे बोल्ट भूकंप यांचे होते. अशाप्रकारे असंख्य शक्तींचे असंख्य बोल्टस् त्या बोर्डावर होते. पृथ्वीतलावरील माणसांच्या कर्मानुसार वातावरणातील कर्म देवता यातील आवश्यक ती बोल्ट दाबून पृथ्वीवरील वातावरणामध्ये आवश्यक ते फेरबदल घडवून आणत असत. यातील काही बोल्टस् तर भूकंप, त्सुनामी, टोरनेडो, हरिकेन असे विनाश करणारे होते.

निखिल आणि मी एकत्रितपणे हवन करतो. हवन झाल्यानंतर एकमेकांसमोर बसून एकाच वेळी ध्यान करतो. तेव्हा आम्हा दोघांना अगदी सारखेच अनुभव येतात. एकदा आम्ही दोघांनी एकाच वेळी अश्वलायन ऋषींना पाहिले. अतिविशाल आकारामध्ये ते निखिलच्या

समोर बसले होते व त्यांनी निखिलला आशीर्वाद दिला. एकदा आम्ही दोघांनी श्री महाअवतार बाबाजींना पाहिले तसेच श्रीस्वामीजींनाही पाहिले. ते त्यांचा दैवी प्रकाश विश्वभर पसरवित आहेत असे दोघांना एकाचवेळी दिसले. बऱ्याचवेळा दोघांनाही सारखे अनुभव येतात. परंतु निखिलची स्टेज व माझी स्टेज भिन्न असल्यामुळे ध्यानामध्ये दोघांना दिसणारे प्रकाश वेगवेगळे असतात.

एकदा निखिलने पाहिले की श्रीस्वामीजी त्याच्यावर प्रकाशाचा वर्षाव करीत आहेत आणि त्याच्या सूक्ष्मदेहाला तेजस्वी करीत आहेत. त्याच वेळी मी पाहिले की श्रीस्वामीजी त्याच्या सूक्ष्मदेहावर प्रकाशाचा वर्षाव करून त्याच्या चक्रांना जागृत करत आहेत. अशा प्रकारे दोघांनाही एकाच वेळी सारखे अनुभव येतात.

खूप वेळा ध्यानामध्ये निखिलला इंद्रधनुष्याच्या प्रकाशमय प्रभावळीमध्ये ॐ दिसतो. खूप वेळा त्याला स्वतः भोवती गोल्डन लाईट दिसतो.

एकदा आम्ही भारतात जाणार होतो. श्रीस्वामीजींसाठी भेट म्हणून मी हेडफोन्स घ्यायचे ठरविले होते. हेडफोन्स घेण्यामागचा माझा हेतू असा होता की, श्रीस्वामीजी हेडफोन्स लावून ध्यानाला बसतील तर त्यांना बाहेरच्या आवाजाचा काहीच त्रास होणार नाही. याविषयी मी निखिलला काहीही सांगितले नव्हते. निखिल स्वतःहून मला म्हणाला,

"मॉम! श्रीस्वामीजींना आवाजांचा त्रास होऊ नये म्हणून तू हेडफोन्स घ्यायचे ठरविले आहेस. परंतु श्रीस्वामीजी अदृश्यसृष्टीतील अनेक लोकातील आवाज ऐकत असतात. तू जे हेडफोन्स घेणार आहेस ते स्पिरिच्युअल वर्ल्डचे आवाज थांबवू शकतील काय? आपल्या जगातील आवाजापेक्षा अदृश्य सृष्टीतील त्यांना ऐकू येणारे आवाज हे खूप वेळा

मोठेही असतात. तू जे हेडफोन्स घेणार आहेस त्यांचा श्रीस्वामीजींना काहीही उपयोग होणार नाही.''

मी निखिलला विचारले,

''तुला हे सर्व कोणी सांगितले?''

तेव्हा तो म्हणाला, '' हे आत्ताच मला श्रीस्वामीजींनी सांगितले.''

मी हेडफोन्स घेण्याचे रद्द केले हे सांगण्याची आवश्यकता नाही.

श्रीस्वामीजींची पुस्तके सतत वाचनात ठेवल्याकारणाने आपण स्पिरिच्युअली कुठल्या लेव्हलवर आहोत याची निखिलला सतत जाणीव असते आणि पुढची लेव्हल प्राप्त करण्यासाठी तो सतत मंत्राचे जप व ध्यान करीत रहातो. दीदींच्या घरी जाऊन रहायला त्याला खूपच आवडते. भारतात गेल्यावर आम्ही दीदींच्या घरीच रहातो. दीदींच्या घराला तो आपले स्पिरिच्युअल होम असे म्हणतो. निखिलची आध्यात्मिक प्रगती पाहून व त्याच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी श्रीस्वामीजी व दीदी करत असलेले प्रयत्न पाहून मला अगदी धन्य झाल्यासारखे वाटते.

**सौ. मेघल ठक्कर**

टोरोन्टो, कॅनडा

ॐ

# अल्पा

**मा**झी लहान बहीण मेघल! ही १९८५ सालापासून श्रीस्वामीजींकडे अरण्यात जात होती. घरी आल्यानंतर ती अरण्यातील अद्भुत अनुभव आम्हाला सांगत असे. माझे एम्. बी्. बी. एस्. चे दुसरे वर्ष चालू होते. अभ्यासाच्या प्रेशरमुळे इच्छा असूनही मी श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जाऊ शकत नव्हते. अखेरीस श्रीस्वामीजींच्या दर्शनाचा योग आला.

१९८७ साली मी एम्. बी. बी. एस्. च्या शेवटच्या वर्षाला होते. त्या वर्षी श्रीस्वामीजी मुंबईत आले होते. दीदींच्या बरोबर श्रीस्वामीजी आमच्या घरी आले. त्यांनी आमच्या घरी यावे म्हणून मेघलने त्यांना आग्रह केला होता. मी घरी होते. मेघल व दीदी श्रीस्वामीजींना घेऊन आमच्या घरी आल्या. अशा रितीने श्रीस्वामीजींचे प्रथम दर्शन मला आमच्याच घरी झाले. मी श्रीस्वामीजींना प्रथमच पहात होते. परंतु माझ्या मनामध्ये एक असा भाव निर्माण झाला की, मी तर यांना कितीतरी युगांपासून ओळखत आहे. मला ते अपरिचित मुळीच वाटले नाहीत.

एम्. बी. बी. एस्.ची फायनल परिक्षा झाल्यानंतर मी वारंवार आश्रमाला भेट देऊ लागले. दीदी व मेघल बरोबर १०-१५ दिवस आश्रमात राहू लागले, साधना करू लागले. श्रीस्वामीजींनी मला गायत्री मंत्राचा उच्चार शास्त्रशुद्ध पद्धतिने कसा करावा हे शिकविले. गायत्री मंत्राचा जप मी लहानपणापासून करत होते. परंतु श्रीस्वामीजींनी शिकविल्याप्रमाणे मंत्राचा जप केल्यानंतर त्याचे शुभ परिणाम तात्काळ दिसून येऊ लागले. गायत्री मंत्राने हवन कसे करावे हे त्यांनी मला शिकविले. एकाच आसनावर अनेक तास बसून मंत्र जप व स्तोत्रांचे पाठ मी करू लागले.

एका स्तोत्राचे हजारो पाठ करणे, अशा अनेक स्तोत्रांचे पाठ श्रीस्वामीजींनी माझ्याकडून करून घेतले. तसेच एकाच मंत्राचा एक लाख जप अशा प्रकारे अनेक मंत्रांचे एक-एक लाख जप श्रीस्वामीजींनी माझ्याकडून करून घेतले. ही साधना पूर्ण झाल्यानंतर एकाच आसनावर तास-दोन तास स्थिर बसायचे व मनात एकही विचार येऊ द्यायचा नाही अशी साधना त्यांनी करून घेतली.

मला सर्वात पहिले दिव्य दर्शन झाले ते गायत्री देवीचे! गायत्री देवीने मला आशीर्वाद दिला, मार्गदर्शन केले व त्यानंतर अनेक देवतांची दर्शने झाली. दररोज मानस पूजा करते वेळी विविध देवतांची दर्शने होऊ लागली. ध्यानामध्ये अनेकवेळा मी हिमालयात जात असे. प्राचीन ऋषींची तसेच सिद्धपुरुषांची दर्शने मला होत असत.

अत्यंत तेजस्वी नेत्रदीपक अशी कुंडलिनी शक्ती पाठीच्या मणक्यातून सहस्त्रारचक्रापर्यंत जाताना अनेकदा मी पाहिली आहे. स्वतःचा सूक्ष्मदेह स्थूलदेहातून बाहेर पडतानाही मी अनेकदा पाहिला आहे. काही वेळा ध्यान न करताही माझ्या उघड्या डोळ्यांना देवता व

सिद्धपुरुष दिसत. खूपदा ते मार्गदर्शनही करत.

श्रीस्वामीजींकडे असंख्य पुस्तके होती. ती सर्व पुस्तके मी वाचली. याशिवाय १९८८ साली श्रीस्वामीजींनी मला थिऑसॉफीची सर्व पुस्तके वाचायला सांगितली. त्याप्रमाणे थिऑसॉफीची सर्व पुस्तके मी पुन्हापुन्हा वाचली. त्या काळामध्ये मला माणसांचे ऑरा दिसत असत व त्या माणसाविषयी मला सर्व काही कळत असे. त्याचे भूत, भविष्य व वर्तमान कळत असे. तसेच त्याची प्रवृत्ती व त्याचा स्वभावही कळत असे. याचा अभ्यास कसा करावा हेही मला श्रीस्वामीजींनी शिकविले होते. काही काळ मी या गोष्टींचा अभ्यास केला व नंतर मी या सर्व गोष्टी सोडून दिल्या व फक्त आत्मोन्नतीची साधना करत राहिले.

प्रत्येक माणसाच्या जीवनामध्ये त्याच्या प्रारब्ध कर्मानुसार सुख-दुःखे येतच असतात. माझ्याही आयुष्यामध्ये दहा-बारा वर्षे खूप त्रासाची गेली. या त्रासाच्या काळाला धैर्याने तोंड देण्याचे सामर्थ्य मला उपासनेने प्राप्त झाले. त्यामुळे या संकट काळाचा काहीही दुष्परिणाम माझ्यावर अथवा माझ्या फॅमिलीवर झाला नाही. आश्रमामध्ये राहून मी जे काही दिव्य अनुभव घेतले त्या अनुभवांच्या दिव्य शक्तींमुळे माझ्या संपूर्ण आयुष्याचे संरक्षण झाले. संकटाला तोंड देण्याइतके धैर्य व चिकाटी माझ्यात निर्माण झाली.

माझ्या पत्रिकेप्रमाणे माझे आयुष्य फक्त तीस वर्षांचेच होते. श्रीस्वामीजींनी माझ्या आईला माझे संरक्षण व्हावे म्हणून विशिष्ट प्रकारचा जप करायला सांगितला होता. माझे प्राण रक्षण व्हावे म्हणून त्यांनी स्वतःही काही साधना, तपस्या केल्या होत्या. अशा प्रकारे ईश्वराच्या कृपेमुळे माझे संरक्षण झाले व तद्नंतर मात्र मी सर्व बाजूंनी

सुखी झाले. वयाच्या ३०व्या वर्षानंतरचे माझे सर्व आयुष्य हे फक्त श्रीस्वामीजींमुळे आहे; याची मला पूर्ण जाणीव आहे. जर श्रीस्वामीजी नसते तर आज मी या जगात जिवंत राहिले नसते व आध्यात्मिक प्रगतीही करू शकले नसते.

बरीच वर्षे गायत्रीमंत्र, स्तोत्रांचे पाठ, हवन अशा प्रकारे साधना केल्यानंतर मी सोऽहम् ध्यान करायला सुरुवात केली. या साधनेने मला एक प्रकारचे आंतरिक समाधान, आंतरिक शांती प्राप्त झाली. हे सोऽहम् ध्यान करताना मी कूटस्थामध्ये माझे सर्व लक्ष केंद्रित करत असे. येथे दिसणाऱ्या ज्योतिकडे मी एकाग्रतेने पहात असे. या ज्योतिमध्ये मला कधीकधी श्रीस्वामीजी दिसत.

सर्व प्रकारची संसारिक कर्तव्ये पार पाडत असताना दवाखाना सांभाळून घरी येणारे पेशंट पाहून मी दररोज तीन वेळा हवन करते, गायत्री मंत्राचा जप करते. स्तोत्रांचे पाठ करते व उरलेल्या वेळात सोऽहम् ध्यान करते. दवाखान्यात बसूनही सोऽहम् ध्यान करते. ईश्वराच्या कृपेने माझी आध्यात्मिक प्रगती व्यवस्थित चालू असून ऐहिक बाबतीतही मी सर्व बाजूने सुखी आहे. एखाद्या महान सिद्धपुरुषाची कृपा माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीला उत्तम आध्यात्मिक जीवन देऊ शकते, हे अगदी खरे आहे, मी स्वतः अनुभवले आहे.

## पार्थ

१९९५ साली माझा मुलगा पार्थचा जन्म झाला. त्याकाळी श्रीस्वामीजी अधून मधून दीदींच्या घरी येत असत, त्यामुळे साहजिकच पार्थला त्यांचे दर्शन होत असे. पार्थ दोन वर्षांचा झाला तेव्हा पासूनच

त्याने जप करायला सुरुवात केली. हळूहळू तो गायत्री मंत्रही म्हणू लागला. पाच वर्षांचा होईपर्यंत त्याला गणपती स्तोत्र, दत्तस्तोत्र, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र ही स्तोत्रे पाठ झाली. या प्रत्येक स्तोत्रांचे पाठ तो दररोज करत असे. याशिवाय गायत्री मंत्र व '**श्रीदत्त जय दत्त**' या मंत्राचा जप तो करत असे. श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जेव्हा आम्ही जात असू तेव्हा श्रीस्वामीजी त्याच्याकडून सर्व स्तोत्रे म्हणून घेत व त्याला चॉकलेटस् बक्षीस देत. वयाच्या ६व्या वर्षी तो हनुमान चालीसा तोंडपाठ म्हणत असे. अगदी लहानपणापासून पार्थ कधीही रडत नसे. कुठलीही गोष्ट मागत नसे व कधीच चिडत नसे. सहनशीलता व समाधान, आनंद व शांती हे गुण पार्थकडे जन्मापासून आहेत. ''पार्थ हा पूर्वजन्मीचा खूप मोठा सिद्धपुरुष आहे, दैवी बालक आहे. पार्थने पूर्वजन्मी खूप उच्च कोटीची सिद्धावस्था प्राप्त केलेली आहे.'' असे उद्गार श्रीस्वामीजी त्याच्याविषयी नेहमी काढतात. ''देव-देवता पार्थची काळजी घेतात. बाह्य वातावरणापासून त्याचा सूक्ष्मदेह दूषित होणार नाही याची देवता दक्षता घेतात.'' असे श्रीस्वामीजींनी मला अनेकवेळा सांगितले.

पाचव्या वर्षापासून पार्थने ध्यान करायला सुरुवात केली. सातव्या-आठव्या वर्षी गणपती स्तोत्र २१ वेळा, नवग्रह स्तोत्र ९ वेळा, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र ८ वेळा, श्रीदत्त स्तोत्र १६ वेळा, दुर्गा स्तोत्र ५ वेळा, गायत्री मंत्र १०८ वेळा अशी साधना करण्यास त्याने सुरुवात केली. श्रीस्वामीजींच्या सांगण्यावरून वयाच्या ९व्या वर्षी काही दिवस अखंड जप केला.

पार्थ अतिशय समाधानी, अतिशय समजूतदार, प्रेमळ अशा स्वभावाचा आहे. पाचव्या वर्षापासून त्याने म्युझिक शिकायला सुरुवात केली. तबला, की-बोर्ड व हार्मोनियम वयाच्या सातव्या वर्षी वाजवायला

शिकला. त्याचे संगीताचे टीचर त्याच्यावर अत्यंत खूष असत. ते म्हणत पार्थला शिकवावे लागत नाही. मी जो राग गातो पार्थ तोच राग बरोबर हार्मोनियमवर वाजवितो. त्याला सूक्ष्म सूरांचे चांगले ज्ञान आहे. फारसा अभ्यास न करता तो हार्मोनियमची परीक्षा पास झाला. आठवीत असताना त्याने आय. आय. टी. ला जाण्याचे ठरविले.

पार्थ बुद्धिबळही छान खेळतो. त्याच्या मनाची एकाग्रता अतिशय चटकन होते. ही मनाची एकाग्रता त्याला म्युझिक , बुद्धिबळ, अभ्यास व ध्यान अशा सर्व ठिकाणी उपयोगी पडते.

सुमारे एक-दोन वर्षांपूर्वी श्रीस्वामीजी त्याला म्हणाले, ‘‘तुझे रोजचे ध्यान कमीत कमी तीन तास तरी व्हायला हवे! याशिवाय रोजचा जप, स्तोत्रवाचन, हवन या सर्व गोष्टी करायलाच हव्यात.’’ तेव्हापासून त्याने वेळ मिळेल तेव्हा ध्यानाला बसायचे व दिवसभरात तीन तास ध्यान पूर्ण करायचे अशी साधना सुरू केली. पुष्कळवेळा तो मध्यरात्रीपर्यंत ध्यान करत बसतो व आपला साधनेचा कोटा पूर्ण करतो. साधनेच्या बाबतीत तो अतिशय प्रामाणिक, वक्तशीर व मेहनती आहे. आता श्रीस्वामीजींनी त्याला सोऽहम् ध्यान करायला सांगितले आहे, त्याप्रमाणे तो सोऽहम् ध्यान करत असतो.

आय. आय. टी. चा अभ्यास, दररोजची साधना, ध्यान या सर्व गोष्टी पार्थ व्यवस्थितपणे करत असतो. सद्‌गुणी व समाधानी स्वभावाचा मुलगा जन्माला येण्यासाठी खूप पुण्य असावे लागते असे म्हणतात; हे अगदी खरे आहे असे मला पार्थकडे पाहिल्यानंतर वाटते. श्रीस्वामीजींच्या कृपेमुळे आमच्या जीवनात एक दैवी सुगंध निर्माण झालेला आहे. हा दैवी सुगंध आमच्या बरोबर राहणाऱ्या लोकांनाही

प्राप्त होत असतो. तो सर्वांना असाच प्राप्त होत रहावा, सर्वांना सन्मार्ग मिळावा अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

**सौ. अल्पा ठक्कर**

मुंबई

ॐ

# सुजाता माळवे

**परिचय** - *सुजाता माळवे अमेरिकेत सॅनफ्रान्सिस्को येथे रहाते. तिचा नवरा प्रवीण भारतात आलेला असताना आपल्या घरात व दुकानात असणाऱ्या प्रॉब्लेम्सवर उपाय विचारण्यासाठी नाशिक येथील एका ज्योतिषाकडे गेला होता. त्या ज्योतिषाने श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचत रहा तुमचे सर्व प्रॉब्लेम्स दूर होतील असे सांगितले. अशा प्रकारे सुजाता व प्रवीण माळवे हे उभयता श्रीस्वामीजींच्या संपर्कात आले.*

*पुस्तके व पोथ्या वाचून त्यांना खूपच दिव्य अनुभव आले. २००८ मध्ये सुजाताची व माझी भेट झाली व त्यानंतर दोन वर्षांनी व्योम जन्माला आला. त्यावेळी त्यांना अतिशय अद्‌भुत अनुभव आले. त्यानंतर सुमारे एक वर्षाने म्हणजे श्रीस्वामीजींची पुस्तके हातात आल्यानंतर चार-साडेचार वर्षांनी श्रीस्वामीजींची प्रत्यक्ष भेट झाली. सुजाताने फक्त दोन वेळा श्रीस्वामीजींना पाहिले. मानसीने आपले जे अनुभव लिहिले आहेत त्यात सुजाता माळवे यांच्याविषयी लिहिले आहे. आता आपण त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात वाचू !*

**सौ. वनिता दीक्षित**

# सुजाता माळवे

**मी** सुजाता माळवे सॅनफ्रान्सिस्को अमेरिका येथून आमचे काही अनुभव कळवित आहे. श्री श्री स्वामीजी, श्री श्री वनिता आई आणि आमचे सर्वांचे लाडके व्योम उर्फ यदु महाराज या सर्वांना मनापासून नमस्कार करून अनुभव पाठवित आहे. लिखाणात काही चुकल्यास क्षमा करावी अशी प्रार्थना करीत आहे.

मी एक सामान्य स्त्री असून आध्यात्म या विषयाचा मला काहीही गंध नाही. जीवनातील अडीअडचणींच्या परिस्थितीमुळे देवाविषयी ओढ निर्माण होत गेली व जसे जमेल तसे मी देवाचे करू लागले.

**शा**ळेत असताना मला पांढरी शुभ्र साडी नेसलेली, लांब केस मोकळे सोडलेली, उंच, सुंदर देवी स्वप्नात दिसायची. तिने मला मंगळवारचा उपवास करायला सांगितले. मी ते केले नाही म्हणून मला शिक्षाही केली. अमेरिकेतील घरामध्ये तीच देवी स्वप्नात आली व म्हणाली, ‘‘मी येथे बसू कोठे ? मला बसायला जागाच नाही.’’ त्यानंतर असेच स्वप्न दोन-तीन वेळा पडले. शेवटी ती स्वयंपाक घरात बसली व मसाला दूध मागून घेतले. त्यानंतर घरात सप्तशृंगी देवीची मूर्ती आली.

**आ**मचे जीवन अनेक समस्यांनी ग्रस्त होते. मी अनेक प्रकारच्या पोथ्या वाचत होते परंतु अडचणींमधून मार्ग मिळत नव्हता.

माझा नवरा प्रवीण हा भारतात गेला होता. नाशिक हे आमचे गाव आहे. नाशिकमध्ये एका ज्योतिषाला त्याने आपली पत्रिका दाखविली. पत्रिका पाहून ज्योतिषी म्हणाला, ‘‘तुम्ही स्वामी दत्तावधूतांनी

लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचा त्याने तुम्हाला मार्ग मिळेल. अडीअडचणीतून सुटका होईल.''

श्रीस्वामी दत्तावधूतांची मिळतील ती पुस्तके व पोथ्या घेऊन प्रवीण अमेरिकेत आला. पोथ्यांमध्ये **श्रीदत्तलीलामृत-श्रीसिद्धलीलामृत** ही पोथी मिळाली होती. मी ही पोथी वाचण्यास सुरुवात केली. पोथी वाचायला सुरुवात केल्यानंतर घरात शांतीचा अनुभव येऊ लागला. दुकानातील वातावरण बदलले. तेथेही शांतीचा अनुभव येऊ लागला व विक्रीमध्ये वाढ झाली. मी दिवसातून दोन-तीन वेळा पोथी वाचत असे. या पोथीची पन्नास-साठ पारायणे झाल्यानंतर तीस वर्षांपूर्वी मृत्यू पावलेली माझी आई माझ्या स्वप्नात आली व मला म्हणाली...

''श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या सर्व पोथ्या वाचत रहा! वाचनात खंड पडू देऊ नकोस. या पोथ्यांच्या वाचनाने पूर्वजांचा उद्धार होत आहे.''

हे स्वप्न पडण्यापूर्वीच श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या इतर पोथ्याही मागविल्या होत्या. त्या पोथ्या हातात आल्यानंतर मला हे स्वप्न पडले. काही कारणाने दोन-तीन दिवस पोथ्यांचे वाचन झाले नाही तर आई किंवा आजी स्वप्नात येऊन पोथ्यांचे वाचन का बंद केले? असे विचारायच्या.

**ए**क मुस्लिम कुटुंब आमचे मित्र आहेत. त्यांचा मुलगा व मुलगी घर सोडून निघून गेले होते. आठ दिवस त्यांचा काही पत्ता लागला नाही. त्यांनी त्यांची समस्या मला सांगितली. मी त्यांच्या घरी जाऊन ''**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र**'' व ''**श्रीस्वामी समर्थ सप्तशती**'' या दोन्ही पोथ्यांचे वाचन केले. वाचन पूर्ण झाल्यानंतर एका तासाभरातच

त्यांच्या मुलाचा फोन आला व आपण दोघे कोठे आहोत तो पत्ता त्यांनी सांगितला. चार तासातच बहीण व भाऊ घरी परत आले. श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्यांनी असे अद्भुत अनुभव असंख्य लोकांना दिलेले आहेत. ज्यांनाज्यांना मी पोथ्या दिल्या त्या सर्वांचे अगदी कल्याण झाले आहे. अमेरिकेतील मराठी माणसे माझ्याकडून पोथ्या घेऊन जातात.

**सौ.** वनिता दीक्षित यांच्याविषयी मी खूप ऐकले होते. त्यांना भेटण्याची खूप इच्छा होती. २००८ मध्ये वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये मी जेव्हा सौ. वनिता दीक्षित यांना भेटले तेव्हा मला अतिशय आनंद झाला. या आनंदाचे वर्णन मी शब्दात करू शकत नाही.

मी सौ. ताईंच्या समोर बसले होते. त्या माझ्याशी बोलत होत्या. त्यांच्या प्रत्येक शब्दाबरोबर अत्यंत तेजस्वी असे स्टार्स त्यांच्या देहातून निघून वातावरणात विलीन होत होते. त्यांच्या मागे मला दिव्य तेजोवलय दिसत होते. त्या तेजोवलयात मला वणीची देवी त्यांच्या मागे उभी आहे असे दिसत होते. जणूकाही ती वणीची देवी, ''मी व सौ. ताई एकच आहोत'' असे सांगत आहे असा मला भास होत होता.

मी सौ. ताईंना म्हणाले, ''मी तुम्हाला आई म्हणाले तर चालेल का?'' त्या चालेल म्हणाल्या. तेव्हापासून मी त्यांना आई म्हणू लागले.

**भा**रतातील कामे उरकून मी अमेरिकेला परत आले. दोन वर्षानंतर व्योमचा जन्म झाला. व्योमच्या जन्माच्या वेळी मला अतिशय दिव्य अनुभव आले. (ते सर्व अनुभव मानसी या प्रकरणात दिलेले

आहेत - प्रकाशक) व्योम हा एक दिव्य आत्मा आहे. ईश्वरीकार्य करण्यासाठीच त्याचा जन्म आहे याची मला खात्री आहे. कारण त्याने मला असंख्य अनुभव दिलेले आहेत.

एकदा मी पूजेला बसलेले असताना व्योम तेथे प्रकट झाला व माझी पण पूजा कर असा हट्ट धरून बसला. तेव्हा तो दीड वर्षाचा होता.

मी त्याला म्हणाले, ''अरे बाळा, तू अजून लहान आहेस. तू मोठा झालास की मी तुझी पूजा करीन!''

मी असे म्हणताच तो म्हणाला, ''मी लहान आहे काय? मी प्राचीन कालीन ऋषी आहे !''

व्योमने असे म्हणताच मला दीड वर्षाचा दिसणारा व्योम अदृश्य झाला व तेथे विशाल आकाराचे ऋषी दिसू लागले. ते ऋषी म्हणाले...

''व्योमच्या रूपाने मी जन्म घेतला आहे. चल! माझी पूजा कर!'' मी तात्काळ त्या ऋषींची मानसपूजा केली.

जितू व मानसी लॉसएन्जिलीसहून सॅनफ्रान्सिस्को येथे शिफ्ट होणार होते. त्यांना मदत करायला आई अमेरिकेला आल्या होत्या. हे सर्वजण आपल्या जवळ येणार म्हणून मला खूप आनंद होत होता. आईंनी आपल्या घरी यावे अशी माझी खूप इच्छा होती. त्यांना तसे सांगण्याचे मला धाडस होत नव्हते.

मला स्वप्न पडले, वणीची देवी माझ्या स्वप्नात आली व मला म्हणाली, ''उद्या मी तुझ्या घरी येणार आहे.'' सकाळी मी अतिशय आनंदात होते. त्यादिवशी आई अचानक आमच्या घरी आल्या. तेव्हा मला स्वप्नाचा अर्थ कळला. ताईंच्या व श्रीस्वामीजींच्या कृपेने

सध्या आमचे जीवन आनंदात व्यतीत होत आहे.

**सौ. सुजाता माळवे**

सॅनफ्रान्सिस्को (अमेरिका)

# निता

२००० साली माझी मैत्रिण निरुपमा हिने श्रीस्वामीजींची पुस्तके वाचायला दिली. मी आणि गौतमने ती पुस्तके एका दमात वाचून काढली व परतपरत वाचत राहिलो. साधारण त्याच दरम्यान गौतमच्या डाव्या डोळ्यातील रक्तवाहिन्या फुटल्यामुळे त्याला त्या डोळ्याने अंधूक दिसायला लागले. आम्ही "**श्रीस्वामी समर्थ सप्तशती**" वाचायला सुरुवात केली व काही महिन्यातच महागड्या उपचाराविना गौतमचा डोळा बरा झाला. या काळात श्रीस्वामीजींनी पुस्तकात सांगितलेल्या उपासना आम्ही जशा जमेल तशा करत होतो. काही दिवसांनी गौतमला पुन्हा डोळ्याचा त्रास सुरू झाला. तेव्हा श्रीस्वामीजींनी गौतमला बोलावून घेतले त्याच्या डोक्यावर हात ठेवला व दुसऱ्या दिवसापासून गौतमला व्यवस्थित दिसायला लागले.

श्रीस्वामीजींच्या सहवासात आल्यावर आमच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल झाला. दररोज ठराविक वेळ ईश्वर चिंतन झाले नाही तर मन बेचैन होते. रोजच्या जीवनामध्ये श्रीस्वामीजींच्या कृपाशिर्वादाचे

अनुभव आम्ही आजही घेत आहोत.

एकदा आम्ही आश्रमात गेलो होतो. माझ्या बहिणीला काजूकतली खाण्याची अनिवार इच्छा झाली. तिने मला तसे बोलूनही दाखविले. थोड्यावेळाने एकजण काजूकतली घेऊन आला व त्याने माझ्या बहिणीला काजूकतली दिली.

२६ जुलै २००५ ला मुंबईच्या परिसरामध्ये शंभर चौरस किलोमीटरमध्ये प्रलयंकारी पाणी भरले होते. श्रीस्वामीजींच्या कृपाशिर्वादाने माझ्या दोन्ही मुली प्रकृतीच्या किरकोळ कारणांमुळे शाळेत गेल्या नाहीत. दुपारी गौतम जेवायला घरी आला. अर्ध्या तासात आमच्या इमारती समोरील परिसर पाच फूट पाण्याने भरून गेला. सर्वत्र भीतीचे साम्राज्य होते. पण आमच्या घरी आम्ही सर्वजण सुखरूप होतो.

माझ्या वडिलांचे धंद्यामध्ये खूप नुकसान झाले. खूप संकटे आली. श्रीस्वामीजींनी नवनाथाची पारायणे करायला सांगितली. कसलाही त्रास न होता माझे वडील सर्व संकटातून सहीसलामत बाहेर पडले.

श्रीस्वामीजींच्या दिव्यत्वाचा अनुभव आम्हाला कैलास मानस सरोवर यात्रेच्या वेळीही आला. यात्रेला निघण्यापूर्वी संयोजकांनी सांगितले की स्त्रियांचे हिमोग्लोबीन कमीत कमी बारा असलेच पाहिजे. माझे हिमोग्लोबीन कायमच सात ते आठ! तरीही यात्रेला जाण्याचे भाग्य मला मिळाले. प्रत्यक्ष यात्रेमध्ये धडधाकट, तंदुरुस्त तरुणांनाही श्वास घ्यायला खूप त्रास होऊ लागला. पण मला मात्र काहीही त्रास झाला नाही. या शिवाय गुरुकृपेने खूप सुंदर अनुभव आले.

गेल्या बारा वर्षात आम्ही असंख्य अनुभव घेतले आहेत. नित्य

जीवनामध्ये आपल्या पाठीशी कोणीतरी आहे याची सदैव जाणीव होत असते. आपले संरक्षण होत आहे याची सदैव अनुभूती येत असते.

**सौ. निता आंगणे**

ठाणे, मुंबई

ॐ

# दीपा पवार

**मी** दीपा महेंद्र पवार. २००७ साली मी नोकरी निमित्त नवऱ्याबरोबर दुबईला गेले. मनावर खूप दडपण होते. बालपणापासून मराठी वातावरणात वावरण्याची सवय होती. येथे दुबईत जवळपास कोणी मराठी-हिंदी बोलणारे नव्हते. इंग्रजीही बेताचेच येत होते.

मी नोकरीसाठी फक्त दोन इंटरव्ह्यू दिले. पहिल्या जॉबला मी नकार दिला. दुसरा इंटरव्ह्यू देताना मनावर खूप टेन्शन होते. उप मुख्याध्यापिकांनी माझा इंटरव्हू घेतला व मला बरेच प्रश्न विचारले. सर्वात महत्त्वाचा प्रश्न तिने विचारला तो असा...

''तू अरबी पेरेन्टस् व मुलांना कसे हॅन्डल करशील?''

मला काय उत्तर द्यावे हे सुचत नव्हते. अचानक माझ्या मुखातून आलेल्या "I will handle them with patience !" या उत्तराने ती खूष झाली व मला नोकरी मिळाली. शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करण्याआधी तुम्ही कसे शिकविता त्याचे प्रात्यक्षिक द्यावे लागते. श्रीस्वामीजींच्या कृपेने मला तीन महिन्यांचा अवधी मिळाला. माझी नोकरी पक्की झाली.

यु. ए. ई. मध्ये तुमच्याकडे लेबर कार्ड असल्याशिवाय तुम्ही

नोकरी करू शकत नाही. मला हे माहीत नव्हते. एकदा पिरीयड संपवून मी स्टाफरूममध्ये मैत्रिणी बरोबर बसायला चालले होते. बाहेर पडताच पांढऱ्या अरबी पोषाखातील अनेक माणसे मला दिसली. मला वाटले पेरेन्टस् आले असावेत पण तितक्यात एक अरबी माणूस आमच्या दोघींच्या दिशेने आला व त्याने माझ्या मैत्रिणीला लेबरकार्ड कुठे आहे असे विचारले. आम्हा दोघींकडेही लेबरकार्ड नव्हते. तिला ते ऑफिसमध्ये घेऊन गेले पण माझ्याकडे त्यांनी पाहिलेही नाही. याचा अर्थ मी त्यांना दिसले नाही. ते लेबर ऑफिसर्स होते व लेबरकार्ड नसलेल्या टिचर्सना पकडत होते. मी व मैत्रिण बरोबरच होतो. पण माझ्या अस्तित्वाची दखलही घेतली नाही. माझ्यावर असणाऱ्या श्रीस्वामीजींच्या कृपेमुळे मी त्यांना दिसले नव्हते.

दुबईत सगळ्यात महाग काही असेल तर ते घरभाडे. आम्ही तीन फॅमिलीज् एकत्र रहात होतो. तसे रहाणे मला खूप जड जात होते. घर घेण्याइतके पैसे आमच्याकडे नव्हते. मला माझ्या मैत्रिणीकडून स्टुडिओ फ्लॅटविषयी कळले. स्टुडिओ फ्लॅट म्हणजे एक हॉल असतो व त्यातच बेडरूम व कीचन असते. आमची स्टुडिओ फ्लॅट शोधण्याची मोहीम सुरू झाली. बरेच फ्लॅट बघितले पण गाडी काही पुढे सरकत नव्हती.

एकदा दुपारी एका अनोळखी नंबर वरून एक फोन आला. एक एजंट फ्लॅटविषयी सांगत होता व लगेचच बघण्याचा आग्रह करत होता. माझ्या नवऱ्याने मला मराठीत विचारले, ‘आपण बघायला जाऊ या का?’ पलीकडून बोलणाऱ्या एजंटने लगेच मराठीत बोलायला सुरुवात केली. तो माणूस अलीबागचा होता. त्याने आम्हाला आमच्या अपेक्षेपेक्षा मोठे घर अतिशय स्वस्त दरात मिळवून दिले. अलीबागचा तो मनुष्य दुबईत बरीच वर्षे एजंटचे काम करत होता. आम्हाला फोन करण्याची बुद्धी

त्याला देवानेच दिली. अशा प्रकारे देवाच्या कृपेने मला खूप मोठे छान घर दुबईत मिळाले. छानशी नोकरी मिळाली. गेली सहा वर्षे आम्ही दुबईत आनंदात रहात आहोत.

**सौ. दीपा पवार**

दुबई

## दीपा शेंबेकर

**मी** दीपा शेंबेकर. माझा मुलगा तनय याची ॲडमिशन आम्ही इन्टरनॅशनल शाळेत घेतली. दोन वर्षानंतर लक्षात आले की त्या शाळेला बोर्डाची संलग्नता नव्हती. त्यामुळे फारच काळजी वाटू लागली. कुठल्याही शाळेत ॲडमिशन मिळणे कठीण होते. श्रीस्वामीजींना प्रार्थना करत होते, प्रयत्न चालू होते. ईश्वरीकृपेने अकल्पितरित्या ठाण्याच्या एका प्रतिष्ठीत शाळेमध्ये त्याला ॲडमिशन मिळाली.

**म**ला पाठीचा खूप त्रास आहे. एल ५ जागेवरून सरकल्यामुळे पाठ खूप दुखते. पंधरा दिवस बेड रेस्ट घ्यावी लागते. आमच्या जवळच्या काही लोकांनी कैलास मानस यात्रा करायची ठरविली. या यात्रेत घोड्यावरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे पाठीला त्रास होणार होता. पण जायची इच्छा प्रबळ होती. शेवटी कैलास मानस यात्रेला जायचे ठरविले.

अतिशय कठीण अशा या यात्रेमध्ये पाठीला मुळीच आराम मिळाला नाही. सतत घोड्यावर बसून प्रवास करावा लागत होता. तरीही पाठीला काहीही त्रास झाला नाही; एकदाही पाठ दुखली नाही.

जणूकाही पाठीला कोणीतरी आधार दिला होता.

यात्रेहून परत आल्यानंतर जेव्हा डॉक्टरांना पाठ दाखविली तेव्हा डॉक्टर म्हणाले, 'पाठीची स्थिती एकदम उत्तम आहे.' याच डॉक्टरांनी पूर्वी ऑपरेशन शिवाय पर्याय नाही असे सांगितले होते.

कैलास मानस यात्रेला आम्ही नऊजण गेलो होतो. तेथे ऑक्सिजन विरळ असल्याकारणाने श्वास घेण्यास त्रास होतो. या यात्रेत अनेकजण मृत्यूमुखी पडतात. आजूबाजूला निसर्गसौंदर्य अत्युत्तम होते, परंतु जवळपास हॉस्पिटल नसल्याकारणाने प्रकृती बिघडल्यास कसलीही मदत मिळत नाही. सारेच दैवाधीन! तीन दिवसांच्या परिक्रमेच्या दरम्यान पहिल्या रात्री आम्ही जेथे मुक्काम केला होता तेथे मध्यरात्री माझ्या छातीत अचानक दुखू लागले. श्वास घेणे कठीण जात होते. माझ्या बहिणीचा नवरा नंदन यालाही श्वास घ्यायला खूप त्रास होत होता. मला खूप भीती वाटू लागली मी किंवा नंदन दोघांपैकी कोणीतरी एक मरणार असे वाटत होते. मी श्रीस्वामीजींना प्रार्थना केली, ''आम्हाला वाचवा, सुखरूप घरी आणा.'' मी माझ्या बहिणीला - शिल्पाला उठविले व कोणालातरी मदतीसाठी घेऊन ये असे सांगितले. ती गौतमला घेऊन आली. त्याने माझ्याकडे रुद्राक्ष दिला व जप करण्यास सांगितले. जप सुरू करताच पाच मिनिटात मला चांगली झोप लागली. आमची प्रार्थना सफल झाली व आम्ही सर्वजण सुखरूप घरी पोहोचलो.

मी भरतनाट्यम् नृत्य शिक्षिका असून ठाण्यात नृत्याचे स्वतंत्र क्लासेस घेते. माझ्या विद्यार्थिनी खाजगी संस्थेतर्फे नृत्याच्या परिक्षा देतात. फक्त वयाने मोठ्या असणाऱ्या विद्यार्थिनी गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा देतात. दोन वर्षांपूर्वी सरकारने अचानक एप्रिलमध्ये नियम केला, ज्याने गांधर्व महाविद्यालयाच्या नृत्याच्या परिक्षा दिल्या असतील अशा

दहावीतील विद्यार्थ्यांना अकरावीच्या कॉलेजच्या प्रवेशाच्या वेळी '**संस्कृती**' कोट्यातून प्रवेश मिळेल.

त्यावर्षी माझी एक विद्यार्थिनी या कोट्यामार्फत प्रवेश मिळावा म्हणून सरकारच्या संस्कृती विभागात गेली. परंतु खाजगी संस्थेतून परिक्षा दिल्याकारणाने हा कोटा नाकारला गेला. हे ऐकल्यावर मला खूप वाईट वाटले. आयत्यावेळी नियम केल्याकारणाने विद्यार्थिनीला गांधर्व महाविद्यालयाच्या परिक्षेला बसवून प्रमाणपत्रक मिळविणे शक्य नव्हते.

मी श्रीस्वामीजींची प्रार्थना केली व तिला सांगितले, ''तू फॉर्म भर व त्याला खाजगी प्रमाणपत्र जोड, आपण प्रयत्न करू.'' प्रार्थनेच्या प्रभावामुळे फक्त तिलाच संस्कृती कोट्यातून अकरावीत विज्ञान शाखेत प्रवेश मिळाला. अशा प्रकारे केवळ प्रार्थनेमुळे ईश्वराने मला सांभाळून घेतले.

**श्री**स्वामीजींचे काही भक्त दर महिन्यातून एकदा एकत्र येतात व सत्संग करतात. या सत्संगाला मीही जाते. सत्संगाची वेळ दुपारी चारची असते.

एकदा सत्संगाच्या दिवशीच माझ्या विद्यार्थिनीची गांधर्व महाविद्यालयाची विशारद पूर्णची प्रॅक्टीकलची परीक्षा होती. शिक्षिका म्हणून मी तेथे उपस्थित असणे अत्यंत आवश्यक होते.

परीक्षेची वेळ तीन ते पाच अशी होती. त्यामुळे माझा सत्संग चुकणार होता. मनाला खूप वाईट वाटले. मनात विचार आला... परीक्षा जर सकाळी दहा ते दोन या वेळात केव्हाही झाली असती तर मी सत्संगाला जाऊ शकले असते.

मनात असे विचार येऊन दोन-तीन मिनिटे झाली असतील इतक्यात परीक्षा केंद्रातून फोन आला.

''तुमची परीक्षेची वेळ बदलली आहे. सकाळी अकरा वाजता परीक्षा देण्यासाठी विद्यार्थिनीला घेऊन यावे.''

हा फोन आल्यानंतर मला खूप आनंद झाला. मी ईश्वराचे खूप खूप आभार मानले व श्रीस्वामीजींच्या फोटोला नमस्कार केला.

**सौ. दीपा शेंबेकर**

ठाणे (मुंबई)

ॐ

# शिल्पा

मी शिल्पा चौगुले. माझा नवरा नंदन व मुलगा प्रतीक. प्रतीक फारसा हुशार अथवा अभ्यासू नाही. श्रीस्वामीजींच्या कृपेने त्याला दहावीला सत्त्याहत्तर टक्के मार्कस् मिळाले. कॉलेजला प्रवेश मिळविण्यास हे मार्कस् पुरेसे नव्हते. परंतु ईश्वरी कृपेने त्याला कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. पुढील वर्षी त्याच कॉलेजमध्ये बेस्ट स्टुडण्टचे बक्षिस त्याला मिळाले.

बारावी नंतर काय करावे असा विचार करत असताना त्याची पत्रिका आम्ही ज्योतिषाला दाखविली. तेव्हा त्याने हा मुलगा सी. ए. करेल असे सांगितले. प्रतीकने एन्ट्रन्स दिली त्यात तो चांगल्या मार्कांने पास झाला. पुढे आय. पी. सी. सी. पण पास झाला. श्रीस्वामीजींच्या कृपेने माझ्या मुलाला चांगला मार्ग मिळाला.

## काळ आला होता...१

नंदनच्या पत्रिकेत ज्योतिषाने लिहिले होते की, वयाच्या ४०-४१ व्या वर्षी पत्नीवर खूप मोठे गंडांतर येईल. माझ्या सासूबाईंच्या

वाचनात एकदा ही पत्रिका आली. आईंनी भविष्याचे ते पान फाडून टाकले. मधल्या काळात मला माझी मैत्रिण निता हिने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गा त्रिशती** मधील देवी कवच व देवी सूक्त, **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** इत्यादी पोथ्यांची माहिती दिली. श्रीदुर्गा त्रिशती मधील श्रीदेवी कवच व श्रीदेवी सूक्त दररोज खूप वेळा वाचायला सांगितले. श्रीगुरुचरित्र दररोज एकदा व श्रीसमर्थ सप्तशती जशी जमेल तशी वाचायला सांगितले. मी निताच्या सांगण्याप्रमाणे वाचन सुरू केले.

डिसेंबर २००६ मध्ये मला अचानक श्वासाचा त्रास होऊ लागला. माझ्या सासूबाईंना पत्रिकेतील गोष्ट आठवून काळजी वाटू लागली. त्यात माझा मुलगा प्रतीक १०वीत होता. मी वेगवेगळ्या डॉक्टरांना दाखवले. पण कोणालाच या गोष्टीचे निदान होईना. मी लोक हॉस्पिटलच्या एका डॉक्टरांना दाखवले. मला तेव्हाच श्वास घेता येईनासा झाला म्हणून त्यांनी 'मला श्वास किती घेता येतोय' हे एका मशीनवर तपासले. तेव्हा मात्र मशीनवर ९०%श्वास घेता येतोय असे दिसले. पण मला मात्र घुसमटतच होते. मग मी हॉस्पिटलमध्ये ॲडमीट झाले. सर्व प्रकारच्या टेस्ट झाल्या पण कुठेच काही प्रॉब्लेम दिसत नव्हता. शेवटी मी तशीच घरी आले. मग मात्र निताने श्रीस्वामीजींना माझे नांव व प्रॉब्लेम सांगून उपाय विचारला. त्यांनी मला रोज देवी सूक्ताचे १०८ पाठ करायला सांगितले. डोक्यावर पोटावर व पाठीला, पायांना व तळपायांना तर तीन-तीन लिंबे बांधायला सांगितली. मी त्यांनी सांगितल्याप्रमाणे लगेचच करायला सुरुवात केली. दोन-तीन दिवसात माझ्या प्रकृतीत खूप सुधारणा झाली व साधारण सात दिवसात मी पूर्ण बरी झाले. अशा प्रकारे श्रीस्वामीजींच्या कृपेने माझ्या वरचे खूप मोठे गंडांतर टळले.

**मी** व नंदन आम्हा दोघांनाही कैलास मानस यात्रा करण्याची संधी मिळाली. मी भित्री असल्याने मला खूपच टेन्शन आले होते. यात्रा नीट पार पडावी म्हणून मी श्रीस्वामीजींची व ताईंची प्रार्थना करत होते.

१२ जून २०१२ ला आम्ही सुभाष वैद्य सरांबरोबर यात्रेला निघालो. प्रस्थान पूजेच्या वेळी त्यांनी आम्हाला यात्रेसंबंधी सूचना दिल्या.

हिमालयामध्ये ऑक्सिजन खूप कमी असतो. वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी आम्ही तीन ठिकाणी स्टॉप घेतले. तरीही अनेकांना डोकेदुखी, मळमळणे, धाप लागणे असे त्रास झाले. मला मात्र यातील काहीही त्रास झाला नाही.

या यात्रेमध्ये जर पाऊस पडला तर जमिनीवर सर्वत्र बर्फ होतो व बर्फातून घोडे जाऊ शकत नाहीत. परंतु आमच्या ग्रूपवर ईश्वराची विशेष कृपा होती. आम्ही यात्रा करेपर्यंत एकदाही पाऊस पडला नाही. त्यामुळे घोड्यावर बसून आमची परिक्रमा व्यवस्थित पार पडली. वाटेतील नद्याही गोठलेल्या होत्या त्यावरून आरामात चालत जाता आले. आमचे कपडेही ओले झाले नाहीत. आमची सर्व यात्रा आनंदात पार पडली.

**अ**लिबागच्या आमच्या बंगल्यामध्ये माझ्या सासूबाई कधी कधी आठ-आठ दिवस एकट्या रहातात. आजूबाजूला वस्ती नसल्याने रोज सकाळी आठ वाजता बंगल्याच्या गेटला लावलेले कुलूप उघडतात.

ऑगस्ट २०१२ मध्ये त्या जेव्हा रहायला गेल्या तेव्हा एक दिवस नेहमीप्रमाणे सकाळी आठ वाजता गेटचे कुलूप काढण्याऐवजी बंगल्यात काम करणारी बाई सरीता आल्यावर कुलूप काढू असा

विचार त्यांच्या मनात आला, त्या दिवशी सरीता नेहमीपेक्षा लवकर कामाला आली. तिने माझ्या सासूबाईंजवळ कुलूप उघडण्यासाठी किल्ली मागितली. सहज तिचे लक्ष जेथे कडी अडकवितात तेथे गेले. तेथे तिला एक घोणस जातीचा विषारी साप दिसला. तिने माझ्या सासूबाईंना सांगितले तुम्ही घराबाहेर येऊ नका. बाहेर विषारी साप आहे. माझ्या सासूबाईना असे सांगून तिने आपल्या नवऱ्याला व आणखी दोघांना बोलावून आणले. सर्वांनी मिळून त्या विषारी सापाला मारले.

माझी सासू जर सकाळी गेट उघडायला गेली असती तर तो विषारी साप तिला नक्कीच चावला असता. पण म्हणतात ना 'देव तारी त्याला कोण मारी!' श्रीस्वामीजींच्या कृपेने त्यांचा जीव वाचला हेच खरे!

## काळ आला होता ...२

**६** सप्टेंबर २०१३ रोजी मी, नंदन, प्रतीक व माझ्या सासूबाई ठाण्याहून अलिबागला जायला रात्री ९.४५च्या सुमारास निघालो. नंदन ड्रायव्हिंग करत होता व प्रतीक त्याच्या बाजूच्या सीटवर बसला होता. मी मागे डोळे मिटून पडले होते. तिनवीरा धरणावरून पुढे गेल्यावर पाच मिनिटातच आमची गाडी एका वस्तूवर आदळली. नंदन व प्रतीक दोघांनाही समोर काहीच दिसले नव्हते. पण गाडी आपटल्यावर प्रतीकला एक तपकिरी रंगाचा मोठ्या आकाराचा प्राणी हवेत उडालेला दिसला. आमची गाडी पुढे चालली होती. फक्त आम्ही थोडेसे घाबरलो इतकेच. थोडे पुढे जाऊन जेव्हा गाडीतून उतरलो तेव्हा आमच्या लक्षात आले की, गाडी कुठल्या तरी भयंकर वस्तूवर आदळली होती. कारण गाडीचे खूप नुकसान झाले होते.

आम्हाला आणखी २०-२५ किलोमीटर प्रवास करायचा

होता तेवढा प्रवास पूर्ण करून आम्ही अलिबागला सुखरूप घरी पोहोचलो. त्यामुळे आम्हाला फारसे काही वाटले नाही.

सकाळी गाडीला झालेल्या नुकसानीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा आम्हाला आश्चर्य वाटले की, या गाडीने अशा अवस्थेत २५ कि.मी प्रवास केला तरी कसा? अर्थात आमच्या गाडीच्या आडवी आलेली वस्तू या सृष्टीतील नव्हती. कारण या सृष्टीतील असती तर आमच्या बॉनेटवर पडली असती किंवा पुढे तरी पडली असती व आम्हाला दिसलीही असती.

काळ आला होता पण आम्ही गुरुकृपेने वाचलो. दुसऱ्या दिवशी श्रीस्वामीजींकडून नंदिनीच्या मार्फत निरोप आला, ''आनंदात रहा, काळजी करू नका, देव तुमच्या पाठीशी आहे.''

**सौ. शिल्पा चौगुले**
ठाणे मुंबई

ॐ

# मनोज - अस्मिता

***परिचय*** *- मनोज व अस्मिता हे पती-पत्नी न्यूजर्सी -अमेरिका येथे रहातात. श्रीस्वामीजींच्या सान्निध्यात आल्यापासून शांती, समाधान, आनंद अशा सर्व गोष्टी त्यांना प्राप्त झाल्या. सध्या ते अमेरिकेत रहात आहेत. आपण त्यांचे अनुभव वाचूया त्यांच्याच शब्दात.*

***सौ. वनिता दीक्षित***

## मनोज

**मा**झे नांव मनोज शेंडे. आम्ही पूर्वी विलेपार्ले, मुंबई येथे रहात होतो. सध्या मी व माझी पत्नी अस्मिता आम्ही नोकरीनिमित्त अमेरिकेत, न्यूजर्सी येथे रहात आहोत व माझे आई-वडील पुण्यात रहात आहेत.

माझे आई-वडील जेव्हा पार्ल्याला रहात होते तेव्हा माझी आई पोस्टात नोकरी करत होती व वडील एका खाजगी फर्ममध्ये

नोकरी करत होते.

आध्यात्ममार्गात आपली प्रगती व्हावी असे माझ्या आईला खूप वाटायचे. यासाठी ती अनेक साधूंकडे गेली. आध्यात्माच्या नांवाखाली चालणारे अनेक कोर्सेस व दीक्षाही तिने घेतल्या. अनेक लेखकांची आध्यात्मिक पुस्तके वाचली. त्या लेखकांच्या गाठी-भेटी घेतल्या. आध्यात्मात प्रगती व्हावी, शांती, समाधान प्राप्त व्हावे म्हणून माझी आई अनेक साधूंना भेटली व बऱ्याच आध्यात्मिक लेखकांना भेटली. त्या सर्वांनी जे काही सांगितले ते सर्व केले परंतु आध्यात्मात प्रगती काही झाली नाही. शांती, समाधान प्राप्त झाले नाही. कोठेतरी आपले चुकत आहे असे सारखे वाटत रहायचे. शांती, समाधान व आनंद यांचा शोध चालूच होता. परंतु माझ्या आईला या गोष्टी प्राप्त होत नव्हत्या.

**ए**क दिवस माझ्या आईला एका ओळखीच्या व्यक्तीने स्वामी दत्तावधूतांचे **अगम्यवाणी** हे पुस्तक वाचायला दिले. वस्तुतः हे पुस्तक जागतिक भविष्यावर आधारित आहे. परंतु ते पुस्तक वाचायला सुरुवात केल्याबरोबर आपण या स्वामीजींची पुस्तके वाचलीच पाहिजेत असे वाटू लागले म्हणून माझ्या आईने प्रिन्टरला फोन केला. प्रिन्टरने सर्व पुस्तके पार्ल्यातील शैला मसुरकर यांच्याकडे मिळतील असे सांगितले. माझ्या आईने शैला मसुरकरकडे जाऊन सर्व पुस्तके विकत घेतली.

श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचायला सुरुवात केल्याबरोबर माझ्या आईला अपरिमित आनंद होऊ लागला. आपल्याला मार्ग मिळाला याचे समाधान तिला प्राप्त झाले, मन शांत झाले व ती श्रीस्वामीजींची भक्त झाली. हळूहळू तिची आध्यात्मात चांगली प्रगती होऊ लागली. ध्यानामध्ये तिला देव-देवतांची दर्शने होऊ लागली. तिने या सर्व गोष्टी मला व अस्मिताला सांगितल्या व श्रीस्वामीजींची सर्व

पुस्तके आम्हाला पाठवून दिली. पोथ्या दररोज वाचा, कमीत कमी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** नित्यनेमाने वाचा असे आग्रहाने सांगितले.

आम्हाला पुस्तके पोहोचली. आम्ही ती आमच्या संग्रहामध्ये ठेवली. दररोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचणे काही जमले नाही.

श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी माझी आई नागार्जुन सागरला गेली. त्याकाळी श्रीस्वामीजी वर्षातून दोन वेळा गुरुपौर्णिमा व दत्तजयंतीसाठी आश्रमात येऊन सुमारे महिनाभर रहात असत. असेच ते आश्रमात आलेले असताना माझ्या आईने त्यांचे दर्शन घेतले, तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले...

''तुमचा मुलगा मनोज व अस्मिता हे दोघेही पोथ्या वाचत नाहीत तरी त्यांना रोज पोथ्या व अधून मधून पुस्तकेही वाचत जा असे सांगा! मला त्यांचे खूप खूप चांगले करायचे आहे. परंतु यासाठी नित्यनेमाने पोथ्या वाचत रहाणे आवश्यक आहे व अधून मधून पुस्तकेही वाचत राहिले पाहिजे म्हणजे त्यांचे भले करणे मला सोपे जाईल.'' माझ्या आईने ही गोष्ट मला फोनवर सांगितली. दुसऱ्या दिवसापासून मी व अस्मिता आम्ही दररोज पोथ्या वाचू लागलो व तेव्हापासून आमचे जीवनच पालटले. नंतर काही महिन्यातच आम्हाला श्रीस्वामीजींच्या दर्शनाचा लाभ झाला. आम्ही सर्व बाजूने सुखी झालो. इतकेच नव्हेतर आम्ही ज्यांनाज्यांना पोथ्या दिल्या त्या सर्वांचे खूप चांगले झाले. आम्हाला तर इतके अनुभव आहेत की, श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके श्रद्धेने घरात ठेवल्यानंतर सुद्धा लोकांचे भले होते असाही अनुभव आम्हाला आला. पोथ्या, पुस्तकांच्या वाचनाने इतके काही दिव्य अनुभव येतात की ते सर्व अनुभव सांगायचे ठरविल्यास किमान शंभर पाने तरी लिहावी लागतील. येथे मी फक्त माझे काही निवडक अनुभव सांगतो व माझे लिखाण आटोपते घेतो.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपली कोणीतरी काळजी घेत आहे, आपले कोणीतरी संरक्षण करत आहे किंवा आपल्या पाठीशी कोणीतरी आहे याचा सदैव अनुभव येत रहातो. त्यामुळे अमेरिकेसारख्या परदेशातही रात्री-अपरात्री फिरताना मुळीच भीती वाटत नाही किंवा प्रवासातही काही वाटत नाही. एकदा तर रात्री दीड वाजता स्वित्झर्लंड मध्ये आम्हाला आकस्मिकरित्या मदत मिळाली.

**आ**नंद नांवाचा एक मनुष्य आमच्या कंपनीत अधून -मधून येत असे. त्याची व माझी फारशी ओळख नव्हती. परंतु आम्ही एकमेकांना फक्त हाय हॅलो करत असू.

एक दिवस तो माझ्याकडे आला व मला म्हणाला, ''मला तुमच्याशी बोलावेसे वाटते. का कोण जाणे पण माझे अंतःकरण मला असे सांगतय की, तुमच्याशी बोलल्यानंतर मला काहीतरी मार्ग मिळेल'' अशी प्रस्तावना करून आनंदने बोलण्यास सुरुवात केली...

''मी नागपूरचा! नोकरी निमित्त अमेरिकेत आलो. इथे जो काही पगार मला मिळतो त्या पगारात माझे जेमतेम भागते. नागपूरला असणारे माझे पूर्ण कुटुंब माझ्यावर अवलंबून आहे. पण माझेच इथे भागत नसल्याकारणाने घरी पैसा पाठविण्याची खूप मारामार होते. माझा मालक मला इतका काही हैराण करतो की नोकरी सोडून द्यावी किंवा आत्महत्या करावी असे विचार माझ्या मनात सारखे येत असतात. नागपूरला आमचे खूप जुने घर आहे. ते अगदी पडायला झाले आहे. त्याची दुरुस्ती करणे अतिशय आवश्यक आहे. एक लग्नाची बहीण आहे. तिचे लग्न करणे आवश्यक आहे. माझेही लग्न झालेले नाही. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. घरचे लोक माझ्याकडून केव्हा पैसे येतात याची वाट पहात असतात. माझे तोंड पहाताच मालकाच्या तळपायाची

आग मस्तकात जाते व तो मला सारखा शिव्या घालत असतो. याशिवाय नागपूरला आमच्या घरी आमची आजी जवळजवळ ९५ वर्षांची असून ती अनेक वर्षे अंथरुणावर आहे. तिची सुटकाही होत नाही. अशा असंख्य यातनांनी मी अगदी गांजून गेलेला आहे व आता आत्महत्या करण्याशिवाय मला दुसरा काहीही मार्ग नाही. तुमच्याकडे पाहिल्यानंतर मनाला खूप बरे वाटले. काहीतरी मार्ग मिळेल असे वाटले म्हणून मी हे सर्व आज तुम्हाला सांगत आहे.''

मी त्याला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची** पोथी दिली व दररोज श्रध्देने वाच असे सांगितले. त्यानेही घरी गेल्यावर प्रथम मी ही पोथी वाचतो व मगच इतर कामे करतो असे सांगितले.

जेव्हा मी त्याला पोथी दिली तेव्हा अमेरिकेत दिवस होता व भारतात रात्र होती. आनंद घरी गेला. त्याने पोथी वाचली व मला मार्ग दाखवा म्हणून प्रार्थना केली. त्याचवेळी (भारतात रात्र असल्याकारणाने) नागपूरमध्ये आनंदच्या बहिणीला स्वप्न पडले तिचे आजोबा तिच्या स्वप्नात आले. त्यांना अतिशय आनंद होत होता ते आनंदच्या बहिणीला म्हणाले, ''मुली, आपल्याला मार्ग मिळाला. आता आपले घर नवीन होणार, तुझे लग्न होणार, आपले सगळे प्रश्न सुटणार आपल्याला मार्ग मिळाला'' असे म्हणून ते आनंदाने नाचू लागले. त्यांचा आनंद अगदी ओसंडून वाहत होता. आनंदाने नाचतानाचता क्षणभर थांबून ते म्हणाले, ''मुली तू काळजी करू नकोस! ही जी म्हातारी अनेक वर्षे अंथरुणाला खिळून आहे. (अंथरुणाला खिळून असलेली ९५ वर्षांची म्हातारी ही त्यांची बायकोच होती.) तिला उद्या सकाळी मी घेऊन जातो.''

आनंदच्या बहिणीचे स्वप्न संपले. सकाळी उठून पाहिले तर खरच म्हातारीची सुटका झालेली होती.

भारतात जेव्हा सकाळ झाली होती तेव्हा अमेरिकेत रात्र होती. नागपूरहून आनंदला फोन आला. आनंदच्या बहिणीने त्याला स्वप्न सांगितले व म्हणाली, ''स्वप्नात पाहिल्याप्रमाणे आज सकाळीच आजीची सुटका झाली.''

श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेले **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचून चोवीस तासही पूर्ण झालेले नव्हते, आनंदला अनुभव यायला सुरुवात झाली होती. वेळ रात्रीची असल्याकारणाने त्याने मला फोन केला नाही, परंतु सकाळी प्रथम हा अनुभव त्याने मला सांगायचे ठरविले. परंतु मला भेटायला येण्यापूर्वीच त्याला आणखी एक अनुभव आला. जो मालक आनंदचे तोंड पाहिल्याबरोबर कपाळाला आठ्या घालत असे व काहीतरी बडबडायला सुरुवात करत असे त्या मालकाने आनंदचे हसून स्वागत केले, त्याच्या कामाचे खूप कौतुक केले व तो आनंदला म्हणाला, ''आजपासून मी तुझा पगार दुप्पट केला आहे.''

**संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या** वाचनाने आनंदचे सर्व प्रॉब्लेम चोवीस तासाच्या आत संपले होते. आनंदने धावत येऊन ही सर्व हकिकत मला सांगितली.

मी माझे काही अनुभव वाचकांना सांगितले पण असे कितीतरी अनुभव मला व माझी पत्नी अस्मिताला आले आहेत.

**श्री**स्वामीजींची एक भक्त डॉ. मेघल ही कॅनडामध्ये रहाते. तिचा मुलगा निखिल हा वातावरणात बदल झाले म्हणजे चक्रीवादळ, वादळ, वीजा कडाडणे, ढगांचा गडगडाट या गोष्टींना खूप घाबरतो. डॉ. मेघलने यावर अनेक उपचार केले, शेवटी श्रीस्वामीजी तिला म्हणाले, ''तू काही काळजी करू नकोस, टी.व्ही.वर जेव्हा खराब वेदरचा रिपोर्ट

देतील तेव्हा तू मला कळव. जेथे निखिल रहातो त्या परिसरातील वातावरण कधीही खराब होणार नाही याची मी दक्षता घेतो.''

निखिलसाठी श्रीस्वामीजींनी अनेकदा वातावरणात बदल केले व त्याला सदैव सुरक्षित ठेवले. निखिल कॅनडात रहातो व श्रीस्वामीजी भारतातील जंगलात साधना करत असतात. हे सर्व कसे घडते याचे मला नेहमीच आश्चर्य वाटत असे.

२९ व ३० ऑक्टोबर २०१२ रोजी सॅन्डी नांवाच्या भयंकर चक्रीवादळाने अमेरिकेमध्ये हाहाःकार उडवून दिला. चोवीस राज्यांमध्ये १० ते १५ दिवस वीज नव्हती. हजारो घरे पडली व अनेक लोक मेले. हजारो कोटी डॉलर्सचे नुकसान झाले. १८० किलोमीटर वेगाने आलेले हे वादळ तितक्याच वेगाने कॅनडाकडे गेले. आता निखिलचे कसे होणार याविषयी मला काळजी वाटू लागली होती. मी इंटरनेट द्वारा वादळाच्या गतीवर लक्ष ठेवून होतो.

मुंबईला सौ. ताईंना फोन केला. तेव्हा सौ. ताई मला म्हणाल्या, ''मेघलचा फोन आला होता, चार-सहा तासात प्रचंड वादळ टोरोन्टोच्या दिशेने येत आहे'' असे मला तिने सांगितले. यावर मी तिला म्हणाले...

''निखिलला सांग सॅन्डी वादळ टोरोन्टोच्या दिशेने येणार नाही, ते दूरून निघून जाईल असे श्रीस्वामीजींनी सांगितले आहे.'' मी इंटरनेट द्वारा वादळावर लक्ष ठेवून होतोच. अचानक वादळाने दिशा बदलली. टोरोन्टोला वादळ गेलेच नाही. ते टोरोन्टोपासून खूप लांब निघून गेले.

३० ऑक्टोबर २०१२ रोजी झालेल्या सॅण्डी वादळाचा फोटो इंटरनेट द्वारा मी काढून ठेवला आहे. वादळ कसे जाणार होते व अचानक

वादळाने दिशा कशी बदलली हे सर्व मी फोटोमध्येच नोट डाऊन करून ठेवले आहे. ज्या दिशेने वादळ जाणार होते त्या दिशेने न जाता वादळाने दिशा कशी बदलली याच्या खूणा मी फोटोवर रेड मार्क करून ठेवल्या आहेत.

हे सर्व कसे घडते! किती अद्‌भुत आहे हे जग! असा विचार मी मनात करू लागलो...

'श्रीस्वामीजी नर्मदा किनारी कोठेतरी तपस्या करत आहेत. सौ. ताईंबरोबर कधीतरी त्यांचा संपर्क होतो, असे असताना महाभयंकर वादळ प्रचंड वेगाने कॅनडामध्ये पोहोचणार असताना मेघल सौ. ताईंना फोन करते काय! ताई! तिला मुळीच काळजी करू नकोस असे सांगतात काय! श्रीस्वामीजींना मेसेज पाठवतात काय! आणि वादळ आपली दिशा बदलते काय! सारेच अगम्य होते! गूढ होते! अनाकलनीय होते!' या रहस्यावरून थोडाफार पडदा हटवता आला तर पहावा, हे कसे घडते ते जाणून घ्यावे या उद्देशाने मी सौ. ताईंना फोन केला.

फोनवरून मी सौ. ताईंना विचारले, ''ताई! हे सर्व कसे घडते? एकशेऐंशी ते दोनशे किलोमीटर वेगाने येणाऱ्या वादळाची दिशा नर्मदा किनारी रहाणारे श्रीस्वामीजी कशी बदलू शकतात? वादळ अमेरिकेत येते, आपल्या एका १३-१४ वर्षाच्या भक्तासाठी ते वादळ त्याच्या गावाच्या दिशेने न जाता ५० किलोमीटर दूरून जाते हे कसे शक्य आहे? विज्ञानाच्या कसोटीवर याचे काहीच उत्तर मिळत नाही, याचा अर्थ काय?''

यावर ताई म्हणाल्या, ''मला यातील फारसे काही कळत नाही. पण श्रीस्वामीजींकडून जे काही थोडेफार ऐकले आहे ते मी तुला सांगते.'' श्रीस्वामीजी एकदा म्हणाले होते. ''वातावरणात देव-देवता असतात. त्या देव-देवता श्रीस्वामीजींना आवश्यक त्या सूचना व माहिती देत असतात.

निखिलविषयी देवतांनी असे सांगितले आहे, ज्या परिसरात निखिल राहतो त्या परिसरात कुठली भयानक घटना देव-देवता घडू देणार नाहीत.'' देवतांकडून असे आश्वासन मिळाले असल्याने श्री स्वामीजींनी निखिलला असे सांगितले आहे की, ''तू जेथे राहतोस त्या ठिकाणापासून ५० किलोमीटर परिसरात कुठल्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती येणार नाही.'' श्रीस्वामीजींनी हे जे आश्वासन दिले आहे ते आजपर्यंत खरे झाले आहे. पुढे काय होईल हे आम्हाला आत्ता सांगता येणार नाही.

निखिल मोठा झाल्यानंतर व वादळ, वारा, पाऊस यांची भीती वाटणे बंद झाल्यानंतर कदाचित या ईश्वरी निर्णयात बदल घडू शकेल. दुसरी गोष्ट अशी की नैसर्गिक आपत्ती, या देशाच्या प्रारब्धानुसार येत असतात. ज्या परिसरात निखिल राहतो, त्या परिसराचे रक्षण जरी ईश्वरी सत्तेने होत असले, तरी श्रीस्वामीजींनी असेही सांगून ठेवले आहे की, 'केव्हातरी निखिल व मेघल दोघेही भारतात येतील. तेव्हा कॅनडावर आपत्ती येतील व निखिल ज्या परिसरात राहतो, त्या सर्व परिसरावर प्रचंड आपत्ती येऊन तो सर्व प्रदेश धुतला जाईल व निखिल कॅनडात जाण्यापूर्वी साफसफाईचे सर्व काम पूर्ण करण्यात येईल. अशा प्रकारे प्रारब्धाची भरपाई पूर्ण करण्यात येईल.'

सौ. ताईंचे व माझे फोनवरील संभाषण येथेच संपले. सौ. ताईंनी जे काही सांगितले ते सहा-सात महिन्यात खरे ठरले. योग्यांच्या शब्दात किती ताकद असते याचा चांगलाच अनुभव मला आला. तो अनुभव मी पुढे देत आहे.

एक जुलै २०१३ रोजी मेघल व निखिल दोघेही कॅनडाहून मुंबईला सौ. ताईंकडे भारतात पंधरा दिवसांच्या सुट्टीवर गेले होते. १५ जुलै २०१३ चे त्यांचे परतीचे तिकिट होते. माझ्या मनात विचार

आले, सहा महिन्यापूर्वी सौ. ताई बोलल्या होत्या निखिल व मेघल जेव्हा कॅनडामध्ये नसतील तेव्हा कॅनडावर आपत्ती येतील व ज्या मिसिसागा परिसरात निखिल राहतो तो सर्व परिसर धुतला जाईल. अरे बापरे ...! या पंधरा दिवसात असे काही घडेल काय!... मनातील या कुविचारांना मी झटकून टाकले. छे छे! पंधरा दिवसात असे काही घडणे शक्यच नाही असे स्वतःच्या मनाला समजाविले...!

टोरोन्टो, मिसिसागा या परिसरामध्ये ८ व ९ जुलै २०१३ रोजी प्रचंड पाऊस पडला. ८ तारखेला बारा इंच व नऊ तारखेला १० इंच पाऊस पडला. या पावसाने प्रचंड उत्पात कॅनडामध्ये केले. निखिल व मेघल ज्या रस्त्याने रोज प्रवास करतात, त्या रस्त्यावर ३ फूट पाणी भरले होते. रेल्वे ट्रॅकवर ५ फूट पाणी साचले होते व अंडरग्राऊंड रेल्वे ट्रॅक मध्ये तर १५ फूट पाणी होते. काही ठिकाणी रस्त्यावर एवढे प्रचंड पाणी होते की पोलिस मोटरबोटने फिरत होते. कॅनडामध्ये शेकडो वर्षात असा पाऊस पडला नव्हता. तासाला चार इंच या वेगाने पाऊस पडत होता. ३ लाख घरांमध्ये वीज नव्हती. लोकांच्या घरात, बेसमेंटमध्ये पाणी शिरले होते. पण निखिलच्या घराच्या बेसमेंटमध्ये पाणी शिरले नव्हते. त्याच्या शेजारच्या घरामध्ये पाणी घुसले होते. अशा प्रकारे निखिलने कॅनडा सोडल्याबरोबर निखिल ज्या परिसरात राहतो तो परिसर व आसपासचा ५० किलोमीटर परिसर पावसाने स्वच्छ धुऊन काढला. सौ. ताईंनी मला हे केव्हाच सांगितले होते. निखिल जेथे राहतो त्याच्या आसपासच्या ५० किलोमीटर परिसरामध्ये तो तेथे असताना नैसर्गिक आपत्ती येणार नाही. मात्र तो तेथे नसताना त्या परिसराच्या प्रारब्धाप्रमाणे जो काही बॅकलॉग झाला असेल तो सर्व २-३ दिवसात पूर्ण केला जाईल म्हणजे निखिल नसताना तेथे

नैसर्गिक आपत्ती येतील. त्याप्रमाणे अक्षरशः घडले होते.

माझे व अस्मिताचे जीवन श्रीस्वामीजींच्या अनुभवाने पूर्ण भरून गेलेले आहे. आम्हाला सतत काही ना काही अनुभव येत राहतात. भारतापासून दूर सातासमुद्रापलिकडे अमेरिकेमध्ये आम्हाला जर इतके अनुभव येतात तर भारतात राहणाऱ्यांना किती अनुभव येत असतील असे मनाला सारखे वाटत असते. यावर सुद्धा सौ. ताई एकदा म्हणाल्या होत्या... ''तुमची श्रद्धा किती खरी आहे व बळकट आहे, त्यानुसार अनुभव येत असतात. फक्त श्रीस्वामीजींची ओळख आहे पण श्रद्धा काहीच नाही तर अनुभव येत नाहीत. फक्त स्वार्थापुरताच श्रीस्वामीजींचा वापर करायचा, आध्यात्मात काहीही प्रगती करायची नाही अशा स्वभावाचा मनुष्य असेल तर सुरुवातीला अनुभव येतात व नंतर अनुभव येणे बंद होते. लबाडी करणाऱ्या माणसाला, आत एक बाहेर एक असे वागणाऱ्या माणसाला, श्रीस्वामीजींना फसवणाऱ्या माणसाला एखादा छोटासा फटका बसण्याचीही शक्यता असते. अशा माणसांच्या मनाला शांती नसते. अशी माणसे, एका गुरुला फसवून झाले, स्वार्थ साधून झाला आता दुसऱ्या गुरुला फसवू या, अशा विचाराने दरवर्षी गुरु बदलत असतात. ईश्वराला सरळ मनाचा मनुष्य अतिशय आवडतो. लबाडी मुळीच खपत नाही.'' असो.

एकदा मी भारतात काही दिवस श्रीस्वामीजींच्या सहवासात रहावे या उद्देशाने गेलो. तेव्हा मला अनेक अनुभव आले. त्यातील एक महत्त्वाचा अनुभव पुढे देत आहे.

श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''चल फिरून येऊ...!'' आम्ही गाडीत बसून निघालो. दूर गेल्यानंतर श्रीस्वामीजींनी गाडी एका कच्च्या

रस्त्याला घ्यायला सांगितली. रस्त्याने जात असताना श्रीस्वामीजींनी मला एक गोष्ट सांगितली. श्रीस्वामीजी म्हणाले...

''मनोज, भारतामध्ये अजूनही काही चांगले साधू आहेत. सात्त्विकतेची जोपासना करत ते साधना करत असतात. अशा साधूंच्या मृत्यू पूर्वी दोन-तीन महिने अगोदर ईश्वर मला त्या साधूंकडे जायला सांगतो व एक विशिष्ट क्रिया करायला सांगतो. ईश्वराने सांगितलेली क्रिया मी करतो. त्यामुळे त्यांना देह सोडणे सुलभ जाते. स्थूलदेह व सूक्ष्मदेह यांना एकत्र बांधून ठेवणारी एक ब्रह्मगाठ असते. ती ब्रह्मगाठ सोडविण्याचे काम मी करतो. आत्ता आपण ज्या स्वामींकडे जात आहोत, दोन-अडीच महिन्यांमध्ये त्यांचा मृत्यू होणार आहे. म्हणून ईश्वराने मला त्यांच्याकडे जायला सांगितले आहे. तू तर बरोबरच आहेस! तुला काही कळते का बघ!''

श्रीस्वामीजींनी जे काही सांगितले, त्यावरून आपल्याला काही विशेष पहायला मिळणार असे मला वाटले. माझी उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली होती. गाडी कच्च्या रस्त्याने जंगलातील एका झोपडीजवळ जाऊन थांबली. आम्ही गाडीतून उतरलो. एक वृद्ध साधू तेथे होते. मी व श्रीस्वामीजी त्यांच्या समोर जाऊन बसलो.

श्रीस्वामीजी व ते साधू दोघांच्या गप्पा रंगल्या. चहा पाणी झाले. थोड्यावेळाने श्रीस्वामीजी म्हणाले, ''बरं मी येतो.'' श्रीस्वामीजी त्या साधूंबरोबर हिन्दीतून बोलत होते. त्यामुळे ते साधू मराठी नव्हते एवढेच मला कळले. या पलीकडे मला काहीही कळले नाही. तेथून निघण्यासाठी श्रीस्वामीजी उठले. श्रीस्वामीजी मला हळूच म्हणाले, ''यांना परत पहायला मिळणार नाही!'' ''नमस्कार करून घे!''

मी त्यांना नमस्कार केला. एवढ्यात ते साधू श्रीस्वामीजींना म्हणाले...

''स्वामीजी! मला ८६ वर्षे पूर्ण झाली आहेत. मी अजून किती वर्षे जगणार आहे. नाडीग्रंथामध्ये मी माझे भविष्य पाहिले. त्यात मी ९० वर्षे जगणार असे लिहिलेले आहे.''

यावर काहीही न बोलता श्रीस्वामीजी हसले व आम्ही तेथून निघालो.

ही गोष्ट जेव्हा मी सौ. ताईंना सांगितली, तेव्हा सौ. ताई म्हणाल्या, ''बऱ्याच खऱ्या सत्पुरुषांच्या बाबतीमध्ये त्यांची 'सुटका' करण्यासाठी ईश्वराने श्री स्वामीजींना पाठविलेले आहे. त्यावेळी श्रीस्वामीजींबरोबर जाण्याचे भाग्य कुठल्या ना कुठल्या भक्ताला मिळालेले आहे.''

''एकदा एका सत्पुरुषाकडे आमच्या ड्रायव्हरला घेऊन गेले व त्यालाही त्यांनी जसे तुला सांगितले तसेच सांगितले, दोन महिन्यांनंतर या व्यक्तीला आपण पाहू शकणार नाही. नमस्कार कर, असेच म्हणाले. दुसऱ्या एका सत्पुरुषाकडे गेले. तेव्हा शिरीष मसुरकर बरोबर होता. मला अशा बऱ्याच गोष्टी माहीत आहेत. कदाचित शंभरहून अधिक साधूंच्या गोष्टी मला माहीत असतील पण साधूसंतांच्या बाबतीमध्ये आपण सामान्य माणसांनी बोलणे ठीक नव्हे म्हणून मी काही बोलत नाही. जर मला परवानगी मिळाली तर जवळजवळ शंभर सत्पुरुषांविषयी मी लिहू शकेन इतकी माहिती मला आहे. या सर्व सत्पुरुषांच्या सहवासात श्रीस्वामीजी राहिलेले आहेत व त्यांच्याबरोबर राहून वेगवेगळ्या तपश्चर्या व साधना केलेल्या आहेत. अजूनही ते गुप्त ठिकाणी राहणाऱ्या योग्यांकडे जातात व त्यांच्या सहवासात राहून साधना करतात म्हणून ते दोन-दोन

वर्षे आश्रमात येत नाहीत. मध्यंतरी त्यांनी खूप पुस्तके लिहिली त्या काळात मात्र ते आमच्या सर्वांच्या सहवासात होते.''

पण ताई! आम्ही जंगलामध्ये त्या साधूंकडे गेलो. श्रीस्वामीजींनी त्यांच्याशी गप्पा मारल्या. अर्ध्या तासात आम्ही तेथून निघालो. कुठल्याही प्रकारच्या क्रिया श्रीस्वामीजींनी केल्या नाहीत. फक्त गप्पा मारल्या व आम्ही तेथून निघालो. त्यामुळे श्रीस्वामीजींनी काय क्रिया केल्या काहीच कळले नाही! मी सौ. ताईंना विचारले.

यावर ताई म्हणाल्या, ''अरे मनोज! श्रीस्वामीजी देहाने काहीही करताना दिसत नाहीत. त्यांचा दिव्य देह संपूर्ण जगभर कार्य करत असतो. सामान्य माणसाला ते कसे कळणार! इकडे ते मुलांबरोबर खेळत असतात त्याच वेळी दिव्य देहाने दुसरीकडे त्यांचे कार्य चालू असते.''

''सौ. ताई! मला आणखी विचारायचे आहे'' मी म्हणालो. श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''दोन-अडीच महिन्यात हे साधू आपले शरीर सोडतील. पण प्रत्यक्ष जेव्हा आम्ही त्या साधूंच्या समोर होतो तेव्हा ते साधू म्हणाले, त्यांचे आयुष्य अजून चार वर्षे आहे असा नाडीग्रंथात उल्लेख आहे.''

यावर सौ. ताई म्हणाल्या, ''तू दोन-अडीच महिने धीर धर व काय होतं ते बघ!''

सौ. ताईंच्या व माझ्या या संवादानंतर मी अमेरिकेला परत आलो. बरोबर दोन महिन्यानंतर सौ. ताईंनी मला फोन केला व त्या साधूंनी देह सोडल्याची बातमी दिली.

सत्पुरुषांची वागण्याची पद्धत मानवी बुद्धीच्या आकलन

शक्तीच्या पलीकडे असते असेच म्हणावे लागेल. त्यांच्या बाह्य आचरणावरून ते कोठे असतात व काय करत असतात हे समजणे कठीण असते.

**मी** व अस्मिता क्लिफ्टन, न्यूजर्सी येथे राहतो. तेथून जवळच हडसन नदी असून हडसन नदीच्या पलीकडे न्यूयॉर्क आहे. आम्ही दररोज बसने न्यूयॉर्कला आपआपल्या कंपनीत जाऊन काम करतो.

ही घटना २००३ मधील आहे. तेव्हा माझे आई-वडील भारतातून आमच्याकडे आलेले होते. माझी आई श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचत असे. तिची श्रीस्वामीजींवर खूप श्रद्धा होती. तिने आम्हाला श्रीस्वामीजींविषयी खूप सांगितले होते. परंतु आम्ही श्रीस्वामीजींना पाहिलेले नव्हते.

रोजच्या प्रमाणे आम्ही बसमध्ये बसून न्यूयॉर्कला आपआपल्या कंपनीत कामाला गेलो. त्यादिवशी संध्याकाळी अमेरिकेच्या सहा राज्यांना व कॅनडाच्या दोन राज्यांना वीज पुरवठा करणारी ओहायो येथील इलेक्ट्रिकल पॉवर ग्रीड बंद पडली. त्यामुळे संपूर्ण न्यूयॉर्क व न्यूजर्सी येथे ब्लॅक आऊट झाला. तसेच इतरही अनेक राज्यात ब्लॅक आऊट झाला. मी व अस्मिता खरे पाहता एकाच बसस्टॉपवर बसची वाट पहात होतो. परंतु बसस्टॉपवर ऐंशी हजारहून अधिक माणसे गोळा झालेली असल्याने व भयानक अंधार असल्याकारणाने कोण कोठे आहे काहीच कळत नव्हते. सर्वांचे मोबाईल्सही बंद पडले होते. आपआपल्या खिशातून मोबाईल्स काढून सर्व लोक मोबाईल्सची बटणे दाबत होते व नेटवर्क सुरू झाले का हे पहात होते. मोबाईलचे बटन दाबल्यानंतर एक सेकंदभर मोबाईलचा स्क्रीन प्रकाशित होत असे. अशा प्रकारे सर्वत्र गोंधळ उडालेला होता. पन्नास माणसांच्या बसमध्ये ऐंशी- पंचाऐंशी

माणसे भरून बसेस जात होत्या कारण रेल्वेपण बंद पडली होती. एका बसमध्ये मी शेवटचा पॅसेंजर म्हणून घुसलो व अर्ध्या तासात घरी पोहोचलो. घरी आई सारखी श्रीस्वामीजींची प्रार्थना करत होती की मनोज, अस्मिता सुखरूप घरी येऊ दे!

मी घरी पोहोचल्याचे पाहून आईला आनंद झाला. परंतु आम्हाला आता अस्मिताची काळजी वाटू लागली. आईने आता अस्मितासाठी प्रार्थना सुरू केली. रस्त्यावर लाईट नसताना बसस्टॉप पासून घरी ती चालत कशी येईल याची आईला खूप काळजी वाटत होती.

तिकडे न्यूयॉर्कमध्ये ऐंशी हजार लोकांच्या घोळक्यात अस्मिताही होती. मोबाईलला नेटवर्क आले आहे कां? हे पाहण्यासाठी तिने मोबाईलचे बटन दाबले. तिच्या चेहऱ्यावर लाईट पडला व तिला अचानक ''अस्मिता!'' अशी हांक ऐकू आली...

न्यूजर्सीमध्ये आम्ही ज्या कॉम्प्लेक्समध्ये राहतो, तेथील एक मनुष्य तिच्या समोर उभा होता. त्याला पाहून अस्मिताला खूप बरे वाटले. अस्मिता म्हणाली, ''बरे झाले तू भेटलास!'' तेव्हा तो मित्र म्हणाला, ''काळजी करू नकोस. मी तुला तुझ्या घरापर्यंत पोहोचवतो.'' अशा प्रकारे दैवी मदत मिळून अस्मिता घरी सुखरूप पोहोचली.

अशा प्रकारे रोजच्या जीवनामध्ये आम्ही श्रीस्वामीजींचे अनुभव घेत आहोत.

## अस्मिता

**मा**झे नांव अस्मिता ! मी मनोज शेंडे याची पत्नी. मनोजचा व माझा असा अनुभव आहे की मनातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर श्रीस्वामीजींच्या पुस्तकात मिळते म्हणून श्रीस्वामीजींची पुस्तके आम्ही सतत वाचनात

ठेवतो. पुस्तकांची पारायणे करताना प्रत्येकवेळी नवीन ज्ञान प्राप्त होते. याशिवाय श्रीस्वामीजींच्या पोथ्या वाचल्याने संकटे व अडचणी दूर होतात, असाही आमचा अनुभव आहे म्हणून सकाळी व संध्याकाळी एक-एक तास आम्ही पोथ्या वाचतो व जप-ध्यान करतो. या साधनेने आम्हाला अपरिमित आनंद मिळतो. आम्ही अमेरिकेत रहात असल्याकारणाने श्रीस्वामीजींच्या दर्शनाचा योग फारसा येत नाही. परंतु श्रीस्वामीजी सर्व बाजूने काळजी घेत आहेत याची जाणीव सतत होते.

मनोजच्या ऑफिसमधील एका मुलीचे सासू-सासरे आमच्याकडे आले. आम्ही त्यांना पुस्तके दिली. दुसऱ्याच दिवशी त्यांचा आम्हाला फोन आला. पुस्तके हातातून खाली ठेववत नाहीत इतकी सुंदर आहेत. कालांतराने ते पुण्याला गेले. त्यांच्या ओळखीच्या अनेकांना त्यांनी पुस्तके वाचायला सांगितली. त्यातील अनेकांना खूपच दिव्य अनुभव आले. त्यांच्या अडचणींचे निवारण झाले. ज्यांना नोकरी नव्हती त्यांना नोकऱ्या लागल्या. ही पुस्तके आमच्या घरात आल्यापासून आम्ही सुखी झालो, असे उद्‌गार अनेकांनी काढले. आपली कोणीतरी अगदी मिनिटा मिनिटाला काळजी घेत आहे असे अनुभव सतत येत रहातात.

१९८३ मध्ये माझी आजी वारली. ती मला कधीही स्वप्नात दिसली नाही. ऑगस्ट २०१२ मध्ये ती मला स्वप्नात दिसली व मला म्हणाली, ''तुझे स्वामीजी साक्षात् देव आहेत. मला मुक्ती द्या, अशी त्यांना तू प्रार्थना कर!''

२००४ मध्ये मनोजला श्रीस्वामीजींचे दर्शन घडले. सप्टेंबर २००५ मध्ये मला स्वप्नामध्ये असे दिसले की, मी श्रीस्वामीजींच्या दर्शनाला गेले आहे. श्रीस्वामीजी औदुंबर वृक्षाखाली बसलेले असून तेथे

जाऊन मी त्यांचे दर्शन घेतले. या स्वप्नानंतर ८-१० दिवसातच आम्ही भारतात गेलो. पुण्यात एक दिवस राहून आम्ही श्रीस्वामीजींच्या दर्शनाला नागार्जुन सागरला गेलो. स्वप्नात पाहिलेले दृश्य मी जसेच्या तसे पुन्हा पाहिले.

औदुंबर वृक्षाखाली श्रीस्वामीजी बसलेले होते व तेथेच त्यांचे मला दर्शन घडले. अगदी स्वप्नात पाहिले तसे! त्या रात्री मला श्रीस्वामीजींच्या शरीरातून निळ्या रंगाचा प्रकाश बाहेर पडत आहे असे दिसले. माझे डोळे पूर्ण उघडे होते. एकदा स्वप्नामध्ये मला श्रीस्वामीजी एका शिळेवर बसलेले दिसले, त्यांच्यामागे मोर पिसारा फुलवून उभा होता. स्वप्नात असे दर्शन झाल्यानंतर काही दिवसांनी सौ. ताईंकडून पोस्टाने एक पार्सल आले, त्यात श्रीस्वामीजींचा फोटो होता. श्रीस्वामीजी एका खडकावर बसले होते व पाठीमागे मोराने पिसारा फुलविला होता.

एकदा श्रीस्वामी समर्थांचे दर्शन मला स्वप्नात झाले, ते खूप उंच होते.

एकदा मला स्वप्नामध्ये दिसले की श्रीस्वामीजींनी लाल रंगाची लुंगी व झब्बा घातला आहे. मी श्रीस्वामीजींना या ड्रेसमध्ये कधीही पाहिले नव्हते. जेव्हा मी श्रीस्वामीजींना पहिल्यांदा पाहिले तेव्हा श्रीस्वामीजी पंचावन्न वर्षांचे होते. स्वप्नात लाल लुंगी व झब्बा घातलेले श्रीस्वामीजी सुमारे तीस-बत्तीस वर्षांचे होते. मी सौ. ताईंना फोन केला व स्वप्न सांगितले तेव्हा सौ. ताई म्हणाल्या, ''तुला स्वप्नामध्ये जे दिसले ते खरे आहे. १९८० ते १९८७ या काळामध्ये श्रीस्वामीजी अरण्यात रहात होते तेव्हा ते लाल कपडे घालायचे.''

सौ. ताई जेव्हा प्रथमच आमच्याकडे आल्या होत्या, तेव्हा त्यांना आणायला मी व मनोज न्यूयॉर्क एअरपोर्टवर गेलो होतो. मनोजने सौ. ताईंना मुंबईत पाहिले होते. परंतु मी ताईंचा फोटोसुद्धा पाहिलेला नव्हता. एअरपोर्टवर प्रचंड गर्दी होती व त्या गर्दीमध्ये मला ताईंचा तेजस्वी चेहरा दिसला व याच सौ. ताई म्हणून मी ओळखले. मी तसे मनोजलाही सांगितले. मनोजला सुद्धा आश्चर्य वाटले. मला तर असे वाटत होते की, आपण सौ. ताईंना अनेक वर्षांपासून ओळखत आहोत. त्या क्षणापासून सौ. ताईंची व माझी प्रगाढ मैत्री झाली. दोन दिवसानंतर सौ. ताईंना न्यूयॉर्क सिटी दाखविण्यासाठी आम्ही फिरायला गेलो. तेव्हा आकाशामध्ये एक मोठा ॐ आम्हा तिघांनाही दिसला. सौ. ताईंनी ध्यानमार्गाचे खूप मार्गदर्शन केले. जितके दिवस सौ. ताई राहिल्या होत्या तितके दिवस पूर्ण घरामध्ये सुगंध दरवळत होता व हा सुगंध कोठून येत होता हे कळत नव्हते. नंतर लक्षात आले की, देवांच्या पोथ्यांमधून हा सुगंध येत आहे व सर्वत्र पसरत आहे. एकदा सौ. ताईंसमोर ध्यान करीत बसलेले असताना प्रगाढ ध्यान लागले व ध्यानामध्ये आकाशगंगा दिसली.

सौ. ताई आमच्याकडे न्यूजर्सीला चार-पाच दिवस राहिल्या होत्या. पहिल्या दिवशी आम्ही श्रीस्वामीजींच्या फोटोला व देवाला हार व फुले वाहिली होती. हार-फुले पाच दिवस टवटवीत होती. पाचव्या दिवशी सौ. ताई सॅनफ्रान्सिस्कोला गेल्या. त्या नंतर दोन-तीन दिवसांनी हार व फुले कोमेजू लागली व दहाव्या-अकराव्या दिवशी पूर्णपणे कोमेजून गेली.

२००९ मध्ये मी श्रीस्वामीजींच्या दर्शनाला भारतात गेले होते. तेव्हा श्रीस्वामीजी मला म्हणाले...

''तू पुढच्या वर्षी येशील तेव्हा मॅनेजर झालेली असशील.''

तेव्हा मी श्रीस्वामीजींना म्हणाले...

“श्रीस्वामीजी, माझे नुकतेच प्रमोशन झाले आहे. कंपनीच्या नियमाप्रमाणे आणखी चार-पाच वर्षेतरी प्रमोशनचा चान्स नाही.” यावर श्रीस्वामीजी म्हणाले, “काळजी करू नकोस. मी तुला मॅनेजर केले आहे!”

**ए**कदा आश्रमात देवीच्या देवळात बसून नऊ वेळा देवी सूक्त वाचले आणि हवन केले. हवन झाल्यानंतर थोडावेळ ध्यान करत बसले. तेव्हा मला एक मोठा सिंह दिसला. मला वाटले ध्यान करता करता बहुतेक मला झोप लागली व झोपेत मला स्वप्न पडले व स्वप्नात मी सिंहाला पहात आहे. मनात असे म्हणून मी डोळे उघडले पहाते तो काय... एक भला मोठा सिंह दरवाजात बसला होता व माझ्याकडे पहात होता. नंतर तो उठला व उजव्या बाजूला निघून गेला.

मी अमेरिकेत परत गेले व काही दिवसातच मला प्रमोशन मिळाले. मी फोन करून सौ. ताईंना ही गोष्ट कळविली.

**मॅ**नेजरचे प्रमोशन मिळाले तेव्हा माझा व्हिडिओ इंटरव्ह्यू होता. मला ऑफिसमध्ये जाणे भाग होते. प्रचंड बर्फ पडला होता. रस्त्यावर अनेक फूट बर्फ साचलेला होता. त्यावर गाडी चालविणे शक्य नव्हते. श्रीस्वामीजींना प्रार्थना केली व गाडी चालविण्यास सुरुवात केली. आमच्या घराच्या कंपाऊण्डच्या बाहेर आले तेवढ्यात रस्त्यावरील बर्फ साफ करणारी गाडी समोर आली व ती माझ्यापुढे बर्फ साफ करत पुढे जाऊ लागली. मी तिच्या मागे ऑफिसपर्यंत गेले व इंटरव्ह्यू दिला. ऑफिसचे काम करून संध्याकाळी जेव्हा ऑफिसमधून परत निघाले तेव्हा आता काय? हा प्रश्न मनात होता. ऑफिसच्या बाहेर आले, बर्फ साफ करणारी गाडी परत समोर आली. तिने रस्त्यावरील बर्फ साफ करण्यास सुरुवात

केली. अगदी आमच्या घरापर्यंत ती माझ्या गाडीच्यासमोर बर्फ साफ करत होती. अशा प्रकारे मला दैवी संरक्षण मिळाले.

**मा**झी बहीण प्राची एके ठिकाणी नोकरी करत होती. तिला पगार खूप कमी होता म्हणून ती नोकरी सोडण्याचा विचार करत होती. मी तिला म्हणाले, ''तू श्रीस्वामीजींच्या फोटोला नमस्कार करून प्रार्थना कर! प्रार्थना करूनही जर पगार वाढला नाही तर मग नोकरी सोडण्याचा विचार करू!''

दुसऱ्या दिवशी प्राचीने श्रीस्वामीजींच्या फोटो समोर उभे राहून प्रार्थना केली व ती ऑफिसला गेली. त्याच दिवशी तिच्या बॉसने तिला पगार वाढविण्याची गुडन्यूज दिली. प्राचीचा पगार भरपूर वाढला. एवढा पगार वाढेल अशी तिची अपेक्षाही नव्हती.

**प्रा**चीचा पगार वाढल्यानंतर सुमारे वर्षभराने तिने घर विकत घेतले. परंतु ते घर मिळण्यामध्ये अडचणी येऊ लागल्या. बँक घराची चावीच देत नव्हती. दोन-चार सह्या करायच्या राहिल्या आहेत. चार दिवसांनी या, आठ दिवसांनी या असा प्रकार सुरू होता. नवीन घरात जायचे म्हणून सर्व सामान पॅक करून झाले होते. अखेरीस तीन महिने झाले. घराची चावी काही हातात आली नाही. शेवटी ती श्रीस्वामीजींच्या फोटोसमोर उभी राहिली व तिने प्रार्थना केली. प्रार्थना केल्यानंतर दीड तासात तिला बँकेने फोन केला व चावी घेऊन जा असे सांगितले. अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी आपले फोटोतील किंवा चराचरातील अस्तित्व दाखवून दिले.

**२**०११ ला श्रीदत्त जयंतीच्या दिवशी मी श्रीस्वामीजींना नैवेद्य दाखविला. जेवून मी व मनोज टी.व्ही. बघत बसलो. इतक्यात आमची खोली दिव्य सुगंधाने भरून गेली. आम्हा दोघांनाही सुमारे अर्धा तास

आमचे घर सुगंधाने भरून गेले आहे असा अनुभव आला. अशा प्रकारे श्रीदत्त महाराजांनी ते आमच्या पाठीशी आहेत याची जाणीव आम्हाला करून दिली.

**मा**झी एक अमेरिकन मैत्रीण होती. तिचा कॅन्सर शेवटच्या स्टेजला पोहोचला होता. डॉक्टरने तिला सांगितले तुझे आयुष्य फक्त दहा-बारा दिवस शिल्लक आहे. तिची आई ८५ वर्षांची होती व तिला दुसरे कोणीही नव्हते. ती मला म्हणाली, ''अस्मिता, मला जर आणखी दोन महिने आयुष्य ईश्वराने दिले असते तर खूप बरे झाले असते. मी सगळी आवरा आवर केली असती व माझ्या आईची सोय एखाद्या वृध्दाश्रमात करून शांतपणे मृत्यूला सामोरे गेले असते.''

मी तिला म्हणाले, ''माझ्याजवळ आमच्या श्रीस्वामीजींनी दिलेली विभूती आहे. ती विभूती तू रोज श्रध्देने खा. दोन-तीन महिने तुझे आयुष्य नक्की वाढेल.'' श्रीस्वामीजींनी एक छोटेसे इंग्लिश पुस्तक लिहिलेले होते. दहा-पंधरा पानांचे ते छोटेसे पुस्तक मी तिला दिले व हे पुस्तक रोज थोडेथोडे वाच व विभूती खा असे सांगितले.

माझा हा प्रयोग यशस्वी झाला. ती पुढे सहा महिने जगली. तिने सर्व आवरा आवर केली, आईची व्यवस्था केली. सहा महिने पूर्ण झाल्यानंतर एक दिवस ती मला म्हणाली...

''अस्मिता, मी आनंदात आहे. कुठल्याही क्षणी मृत्यू आला तरी चालेल. माझी सर्व कामे पूर्ण झाली आहेत.'' असे म्हणाल्यानंतर आठ-दहा दिवसातच ती मृत्यू पावली.

**प्र**कृतीने मी मूळचीच सडपातळ आहे. ऑफिसच्या लोकांच्या नादाला लागून मी एक वेळचे जेवण बंद केले. तेव्हा श्रीस्वामीजी स्वप्नात

आले. त्यांनी माझ्यासमोर अनेक पदार्थांनी भरलेले एक मोठे ताट ठेवले व एक-एक पदार्थाकडे बोट दाखवून 'अस्मिता तू हे खा!' 'अस्मिता तू ते खा!' असे सांगू लागले. ते ज्या पदार्थाकडे बोट दाखवत तो पदार्थ मी खात असे. सकाळी उठल्यानंतर मी विचार केला तेव्हा माझ्या लक्षात आले की, आपण उपवास करायला सुरुवात केली हे श्रीस्वामीजींना आवडले नाही. उपवास करणे बंद करून मी दोन्ही वेळ जेवण सुरू केले.

मी दररोज मानसपूजा करते. मानसपूजेमध्ये मी ज्या पदार्थाचा नैवेद्य श्रीस्वामीजींना दाखवते, तो पदार्थ मला दोन-तीन दिवसात खायला मिळतो, असा माझा नेहमीचा अनुभव आहे. भारतामध्ये आंब्याचा सिझन सुरू होता म्हणून मी मानसपूजेमध्ये श्रीस्वामीजींना हापूस आंबा दिला. आश्चर्य म्हणजे दुसऱ्याच दिवशी मनोजच्या ऑफिसमधील एका मुलीने मनोजला दोन हापूस आंबे दिले. हापूस आंबे देतांना ती मनोजला म्हणाली, ''मी कालच पुण्याहून अमेरिकेत आले. पुण्यामध्ये मी चार हापूस आंबे घेतले. त्यातील हे दोन तुला देत आहे.'' अमेरिकेमध्ये हापूस आंबा खायला मिळणे ही गोष्ट माझ्याकरिता अद्भुत होती.

२०१२ साली सौ. ताई अमेरिकेत आल्या. त्यांच्या दर्शनासाठी माझी मोठी बहीण व तिची तेरा वर्षांची मुलगी अनघा आल्या. अनघाला सौ. ताई म्हणाल्या, ''काळजी करू नकोस, तुला जेथे ॲड्मिशन पाहिजे तेथे मिळेल.'' यावर अनघा म्हणाली, ''ते अगदी अशक्य आहे. मला मॅग्नेट स्कूलमध्ये ॲड्मिशन हवी आहे परंतु मला स्कूलकडून लेटर आले आहे की वेटींगलिस्टमध्ये तुझा नंबर २५ वा आहे. त्यामुळे आमच्या स्कूलमध्ये तुला ॲड्मिशन देता येत नाही.'' तेव्हा सौ. ताई म्हणाल्या..''ठीक आहे बघू!''

आश्चर्य म्हणजे ८-१० दिवसात त्याच स्कूलकडून ॲड्मिशनचे

लेटर आले.

**मा**झ्या मोठ्या बहिणीला चांगली नोकरी लागावी अशी अपेक्षा होती. सौ. ताईंनी सांगितले, ''काळजी करू नकोस, तुला चांगली नोकरी मिळेल.'' ८-१० दिवसात तिला दोन चांगल्या नोकऱ्या सांगून आल्या. त्यातील एक नोकरी तर खास तिच्यासाठी निर्माण करण्यात आली होती.

**आ**ॅफिसमध्ये खूप काम असल्यामुळे दोन आठवडे पोथ्यांचे वाचन, ध्यान व देवपूजा असे काहीच करणे शक्य झाले नाही. तेव्हा सौ. ताई स्वप्नात आल्या व म्हणाल्या, '' **असे करून चालणार नाही, आपल्याला प्रगती करायची आहे!**'' तेव्हापासून कितीही काम असले तरी अर्धातास तरी जप, ध्यान किंवा पोथीवाचन करते.

**आ**म्ही तीन बहिणी! मोठ्या बहिणीचे नांव आभा. मी मधली अस्मिता व सर्वात लहान प्राची. आम्ही सर्व अमेरिकेत रहातो. माझ्या या दोन्ही बहिणी मेरीलॅण्डमध्ये रहातात. आमची आई मेरीलॅण्डमध्ये मोठ्या बहिणीकडे रहाते. मी व माझ्या आईने श्रीस्वामीजींचे दर्शन घेतले आहे. पण माझ्या दोन्ही बहिणी आभा व प्राची यांनी श्रीस्वामीजींना अद्याप (२०१४) पाहिलेले नाही. तरीसुद्धा प्राचीला श्रीस्वामीजींचे क्षणोक्षणी अनुभव येत असतात व आपले संरक्षण होत आहे असा अनुभव येत असतो.

एकदा प्राची, तिचा नवरा व मुले आईला भेटायला गेले होते. रविवार असल्याने रात्री तेथेच जेवून घरी परतायचे असे त्यांनी ठरविले होते. रात्रीचे साडेआठ वाजले होते. पाच-दहा मिनिटात ते सर्व निघणारच होते, इतक्यात प्राचीने खिडकीतून टो करणारी गाडी येताना पाहिली. अचानक तिच्या मनांत शंका आली बहुतेक आपली गाडी उचलून घेऊन

जाणार. ती धावतच खाली आली व माझ्या आईने श्रीस्वामीजींना प्रार्थना करण्यास सुरुवात केली. प्राची खाली उतरून येईपर्यंत टो वाल्याने गाडी उचलून ट्रकवर ठेवली होती. प्राचीने त्याला विनंती केली तेव्हा तो टो ट्रकवाला म्हणाला, ''मी आता काहीही करू शकत नाही. एकदा टो केलेली गाडी कायद्याप्रमाणे खाली उतरविता येत नाही. माझी तुम्हाला सहानुभूती आहे. परंतु अगदी माझी इच्छा असली तरी एकदा ट्रकवर चढविलेली गाडी मी खाली उतरवू शकत नाही.''

प्राचीला काय करावे हे कळेना. गाडी जेथे कोठे घेऊन जातील तेथे जाऊन १५० ते २०० डॉलर्स भरून गाडी सोडवावी लागेल व मगच गाडी मिळेल. यात चार-पाच तास जातील व मुले खूप हैराण होतील व गाडी सोडवून आणेपर्यंत रात्रीचे एक-दोन वाजतील.

माझ्या आईने श्रीस्वामीजींना प्रार्थना केली होतीच, आता प्राचीनेही मनातल्या मनांत प्रार्थना करण्यास सुरुवात केली. टो ट्रकचा ड्रायव्हर ड्रायव्हिंग सीटवर बसण्यासाठी ट्रकचा दरवाजा उघडू लागला परंतु कितीही प्रयत्न केला तरी ट्रकचा दरवाजा उघडेना. शेवटी तो हैराण झाला व त्याने ऑफिसला फोन केला.

''टो ट्रकची चावी बहुतेक ट्रकमध्येच राहून गेली आहे. कृपा करून दुसरी चावी लवकर पाठवून द्या!''

कंपनीला फोन करून तो ड्रायव्हर प्राचीजवळ आला व म्हणाला, ''मला कळलं! तुझी गाडी उचलल्याकारणाने देवाने मला शिक्षा केली आहे. यापुढे तुझी गाडी कधीही मला दिसली तरीही मी उचलणार नाही.'' असे म्हणून त्याने ट्रकवरील गाडी खाली उतरवून दिली.

श्रीस्वामीजींच्या या अद्‌भुत लीलेचे आम्हा सर्वांना आश्चर्य

वाटले. माझ्या आईने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचून देवाचे व श्रीस्वामीजींचे आभार मानले.

**न**ऊ वर्षे खूप प्रयत्न करून सुद्धा प्राचीचे ग्रीन कार्ड अडकले होते. मी तिला सांगितले तू नियमित पोथ्या वाचणे सुरू कर. तुझे काम आपोआप होईल. तिने पोथ्यांचे वाचन सुरू केले. आठ-दहा दिवसात ग्रीन कार्ड कुरियरने तिच्या घरी आले.

**मा**झ्या बेडरूममधील लॅम्पशेड अतिशय जाड काचेची व सुमारे एक किलो वजनाची होती. एकदा मी बेडरूममध्ये कपड्यांच्या घड्या करत उभी असताना अचानक लॅम्पशेड माझ्या डोक्यावर पडली. काचेच्या लॅम्पशेडचे हजारो तुकडे झाले पण माझ्या डोक्याला काहीही झाले नाही. मुकामारसुद्धा लागला नाही. देवच संरक्षण करत असतो हे खरे आहे. अन्यथा एक किलो वजन डोक्यावर पडले तर काय होईल याचा विचार वाचकांनीच करावा.

**ए**कदा मी भारतात गेले होते. काही दिवस श्रीस्वामीजींच्या सहवासात राहिले. काही दिवस पुणे, मुंबई येथे राहिले व अमेरिकेला परत आले. न्यूजर्सी येथील न्यूयॉर्क या एअरपोर्टवर उतरले. माझ्याजवळ खूप मोठ्या दोन बॅग्ज् होत्या. सामान आणणाऱ्या पट्ट्यावरून जेव्हा या दोन्ही बॅग्ज् मी खेचून घेतल्या तेव्हा माझ्या लक्षात आले दोन्ही बॅग्ज्चे व्हील्स तुटलेले होते.

दोन्ही बॅग्ज्ना खूप स्ट्राँग व्हील्स होते. त्यामुळे मी एकदम निश्चिंत होते. ३ x ४ आकाराच्या त्या जड बॅग्ज् मी टॅक्सीपर्यंत नेऊ शकले असते. पण आता व्हील तुटल्याने त्या अतिशय जड बॅग्ज् हलविणे मला कठीण होते व ट्रॉली आणणेही कठीण झाले.

काय करावे? असा विचार करत मी उभी होते. इतक्यात एक धिप्पाड मनुष्य आला. ''काळजी करू नका!'' असे तो मला म्हणाला. दोन्ही बॅग्ज् त्याने अक्षरशः सहजतेने उचलल्या. ट्रॉलीवर ठेवल्या. टॅक्सीपर्यंत बॅग्ज् घेऊन आला व टॅक्सीमध्ये दोन्ही बॅग्ज् ठेवून दिल्या. त्याला काहीतरी पैसे द्यावेत म्हणून मी माझी पर्स काढून उघडेपर्यंत एअरपोर्टवरील गर्दीत तो दिसेनासा झाला. अदृश्य सृष्टीतून अशा प्रकारची मदत ईश्वरभक्तांना मिळत असते, असे मी वाचले होते त्याचा अनुभव आला.

## दुर्बिण

आम्ही जरी सातासमुद्रापलीकडे दूर अमेरिकेत रहात असलो तरी आम्हाला असे काही अनुभव येत असतात की, आमच्यावर सतत ईश्वराचे लक्ष आहे, याची जाणीव आम्हाला होत असते. आम्ही वागतो कसे? बोलतो कसे? कसे विचार करतो? आमच्यात कुठल्या प्रवृत्ती आहेत? त्या प्रवृत्ती आध्यात्मिक प्रगतीला कसे अडथळे निर्माण करतील? यावर श्री स्वामीजींचे सतत लक्ष असते असा आम्हाला अनुभव येतो. यावरून मी श्रीस्वामीजींना ''तुम्ही अगदी दुर्बिण लावून बसलेले असता किंवा तुमचा सॅटेलाईट टी. व्ही. नेहमी ऑन असतो'' असे म्हणते. वाचकांच्या मनोरंजनार्थ मी यातील दोन-तीन किस्से पुढे देत आहे.

केव्हातरी वर्षा-दोन वर्षातून एकदा श्रीस्वामीजी आश्रमात येतात. तेव्हा आम्ही त्यांना अधून मधून फोन करतो. वर्षभरात आम्ही केव्हा कोठे कसे चुकलो, केव्हा चुकीचे विचार केले या संबंधात श्रीस्वामीजी आम्हाला स्पष्टपणे सांगतात व असे वागू नका, असे वागल्याने आध्यात्मिक नुकसान होते असेही म्हणतात. एकदा आम्ही श्रीस्वामीजीं बरोबर फोनवर बोलत होतो. शेजारी मनोज बसला होता. स्पीकर लावला होता त्यामुळे,

श्रीस्वामीजींचे बोलणे दोघांनाही ऐकू येत होते. इतक्यात श्रीस्वामीजी म्हणाले, ''अस्मिता, तुझे लक्ष कोठे आहे? मनोज झोपा काढतोय बघ!''

तेव्हा मी माझ्या शेजारी बसलेल्या मनोजकडे पाहिले. मनोज खरच डुलक्या काढत होता.

**ए**कदा असेच आम्ही श्रीस्वामीजींबरोबर बोलत होतो. समोर चहाचे कप ठेवलेले होते. श्रीस्वामीजी म्हणाले, ''मनोजने चहा खूप चांगला केला आहे.'' मला जोरात हसू आले. मी म्हणाले, ''श्रीस्वामीजी! तुम्ही अगदी दुर्बिण लावून बसला आहात. चहा खरंच मनोजने केला आहे.''

**भा**रतात जेव्हा संध्याकाळचे सहा वाजतात, तेव्हा न्यूजर्सी मध्ये सकाळचे साडेआठ वाजतात. एकदा आमच्याकडे सकाळचे साडेआठ वाजले असताना मी श्रीस्वामीजींना फोन केला. श्रीस्वामीजी म्हणाले, ''आज तुम्ही ऑफिसला गेला नाहीत?'' यावर मी म्हणाले, ''श्रीस्वामीजी आज आम्ही घरूनच काम करणार आहोत. आज आमच्याकडे कारपेंटर कामासाठी येणार आहे म्हणून मी व मनोज घरीच आहोत.''

या नंतर सुमारे पाच मिनिटे मी व मनोज दोघांनी श्रीस्वामीजींबरोबर गप्पा मारल्या. आमच्या गप्पा चालूच होत्या. अचानक श्रीस्वामीजी म्हणाले,

''मनोज तुझ्या मेन डोअरजवळ कारपेंटर उभे आहेत. दरवाजा उघड जा!'' मला म्हणाले, ''कारपेंटर्सच्या व्हायब्रेशन्सचा मला त्रास होत आहे. मी आता फोन ठेवतो.'' श्रीस्वामीजींचे वाक्य संपेपर्यंत कारपेंटर घरात येऊन पोहोचले होते.

**सौ.** ताई श्रीस्वामीजींना भेटण्यासाठी नर्मदा किनारी गेल्या

होत्या. तेव्हा श्रीस्वामीजी ताईंना म्हणाले...

''तुमची इच्छा असेल तर तुम्ही गाडीने नर्मदा परिक्रमा करीत कठपोरपर्यंत जा! कठपोरहून पुन्हा अंकलेश्वरला परत येऊन मिठीतलाईला जा! मिठीतलाई मार्गे अंकलेश्वरला परत या! अंकलेश्वरहून मुंबईला जा! म्हणजे तुमची थोडीफार परिक्रमा होईल.''

श्रीस्वामीजींच्या सांगण्याप्रमाणे सौ. ताईंनी खलघाट पासून गाडीने परिक्रमा करण्यास सुरुवात केली. शहादापर्यंत प्रवास व्यवस्थित पार पडला. या प्रवासामध्ये सौ. ताईंना नर्मदा मैय्याच्या अनेक गोष्टी आठवत होत्या. नर्मदा भक्तांची काळजी घेते. वाट चुकलेल्यांना बरोबर वाट दाखविते असे अनेक अनुभव त्यांनी वाचले होते. प्रवास चालू होता. प्रत्येक ठिकाणी असा अनुभव येत होता की जेथे रस्ता चुकण्याची शक्यता होती, तेथे कोणीतरी रस्ता दाखविणारा भेटत असे.

शहादाला राजपिपलाचा रस्ता एका दोघांना विचारला. पण राजपिपला सुमारे २५० किलोमीटर दूर असल्याने व राजपिपलापर्यंत संपूर्ण जंगल असल्याकारणाने कोणालाच रस्ता सांगता येत नव्हता. इतक्यात एक सुमारे ३५ वर्षांचा मनुष्य व त्याच्या बरोबर सुमारे ६० वर्षांची म्हातारी बाई असे दोघेजण मोटर सायकलवरून गाडीजवळ आले.

तो मनुष्य सौ. ताईंना म्हणाला, ''मी त्या दिशेनेच जात आहे, तुम्ही माझ्या मागोमाग गाडी घेऊन या!''

यावर त्या माणसाला ताई म्हणाल्या, ''आमच्या गाडीत जागा आहे. तुमच्या आईला आमच्या गाडीत बसू दे!''

यावर तो मनुष्य म्हणाला, ''हे खूप चांगले झाले. आमच्या आईला पूर्ण रस्ता माहीत आहे. ही तुम्हाला आमच्या गावापर्यंत घेऊन

जाईल व तेथून पुढील रस्ता मी दाखविन.''

अशाप्रकारे त्या स्त्रिच्या रूपाने नर्मदा मैय्याच गाडीमध्ये बसली व रस्ता दाखवू लागली. तिने सुमारे शंभर किलोमीटर रस्ता दाखविला. या शंभर किलोमीटरच्या प्रवासामध्ये तिनेही एक अद्‌भुत अनुभव सौ. ताईंना सांगितला.

त्या वृद्ध तेजस्वी स्त्रिच्या रूपाने नर्मदा मैय्याच सौ. ताईंच्या मदतीसाठी आली होती. ही सर्व व्यवस्था श्री स्वामीजींनीच केली होती असे सौ. ताईंना अंतःकरणापासून वाटत होते आणि अतिशय तेजस्वी वृद्ध स्त्री आपला अनुभव सौ. ताईंना सांगू लागली. ती म्हणाली,

''आमचे गाव डेडीयापाडा! अगदी जंगलातच गांव आहे. मला मोटर सायकलने प्रवास करणे झेपत नाही. तुम्ही बघतच आहात रस्ता नाहीच, जिकडे तिकडे खड्डे आहेत. शहादाला येताना मी बसने आले. मोटर सायकलवर बसायची भीती वाटते. डेडीयापाडाला जाणाऱ्या बसची वेळ निघून गेली होती. नाईलाजाने मोटरसायकलने जायचे ठरविले होते. आम्ही नर्मदा मैय्याच्या कुशीत राहतो. अडीअडचणीला तिलाच हांक मारतो. तिची प्रार्थना केली. नर्मदा मैया मोटरसायकल वरून जाण्याशिवाय आता गत्यंतर नाही. तूच माझा प्रवास सुखरूप पार पाड! आणि चमत्कार पहा...

''साक्षात्‌ नर्मदा मैय्या तुमच्या रूपाने मोठी गाडी घेऊन आली व माझा प्रवास सुखरूप पार पडला.''

डेडीयापाडाला सौ. ताईंनी त्या स्त्रिला साडी, पैसे व तिच्या नातवासाठी भरपूर खाऊ दिला. ती काहीच घ्यायला तयार नव्हती. तेव्हा सौ. ताई म्हणाल्या, ''आम्ही नर्मदा मैय्याची प्रार्थना केली व तुम्ही आम्हाला भेटलात म्हणून आम्ही तुमचा आदर सत्कार करीत आहोत.

तिच्या मुलाला सौ. ताईंनी शाल, पॅन्ट-शर्टचे कापड व त्याच्या मुलासाठी पैसे देऊन त्याचाही सत्कार केला. नंतर ती स्त्री गाडीतून उतरली व तिच्या मुलाने मोटरसायकलने पुढे ६-७ किलोमीटर येऊन राजपिपलाचा रस्ता दाखविला.

शूलपाणीश्वराचे दर्शन करून सौ. ताई पुढे कठपोरला गेल्या व मुंबईला परतल्या.

ही कथा सांगण्याचा हेतू असा की, ईश्वराचे आपल्या भक्तावर संपूर्ण लक्ष असते व अंतःकरणपूर्वक मारलेल्या हाकेला तो धावून येत असतो. ईश्वराने वृद्ध स्त्रिच्या रूपाने सौ. ताईंना मदत केली व सौ. ताईंच्या रूपाने त्या वृद्ध स्त्रिला मदत केली यालाच म्हणतात....

**एकमेकां सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ।।**

**अ**सेच एकदा उमरग्याचे पाटील यांना श्रीस्वामीजी दोन वर्षांनी भेटले ''काय पाटील कुठल्या महाराजांना भेटून आलात?'' श्रीस्वामीजींनी विचारले.

पाटील त्यांना म्हणाले, ''तुम्हाला कसे कळले.'' यावर श्रीस्वामीजींनी काहीच उत्तर दिले नाही. परंतु पिशाच्च साधना करणाऱ्या त्या साधूकडून पाटील यांच्याकडे आलेल्या वाईट शक्तीचे निराकरण केले व निघून गेले. पाटील यांना यातील काहीच कळले नाही. पण त्यांचा बसलेला धंदा पुन्हा सुरू झाला. घरातील भांडणे संपली. घरात शांती व आनंद नांदू लागले व पाटील यांचे दारूचे व्यसनही सुटले.

श्रीस्वामीजींनी पाटील यांच्यासाठी इतके काही केले होते पण पाटील यांना यातील काहीच माहीत नव्हते. त्यावेळी सौ. ताई बरोबर होत्या म्हणून आम्हाला हे कळले.

एक-दीड वर्षाच्या लहान मुलाला आपले हित कशात आहे हे काहीच कळत नसते. पण प्रेमळ आई-वडील मुलांच्या नकळत मुलांचे यथायोग्य संगोपन करत असतात. खरे सत्पुरुष तर त्याहूनही श्रेष्ठ असतात. ते चराचरात भरून राहतात व आपल्यातील दैवीशक्तीने आपल्या भक्ताचे संगोपन व संरक्षण करतात. मात्र आपला भक्तीभाव हा लहान बालकाप्रमाणे स्वच्छ व खरा असावा लागतो.

## १२ मार्च २०१३

आमचा असा अनुभव आहे की, आम्ही अमेरिकेत बसून अनेकवेळा जे विचार केले ते श्रीस्वामीजींनी आम्हाला तसेच्या तसे सांगितले. त्यांचे आमच्यावर सदैव लक्ष असे. प्रत्येक भक्ताकडे ते आकाशातून पहात असतात, त्यांचे आपल्या प्रत्येक भक्ताकडे लक्ष असते, त्यांच्या विचारावर लक्ष असते. काही भक्त असेही असतात की फक्त स्वतःच्या स्वार्थाकरिता श्रीस्वामीजींचा वापर करतात. अशा भक्तांच्या अंतःकरणात खरी श्रद्धा निर्माण व्हावी म्हणून ते सुरुवातीची काही वर्षे त्यांना दिव्य अनुभव देतात. श्रद्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. खरी श्रद्धा निर्माण झाली की आध्यात्मात प्रगती होते व आध्यात्मात प्रगती झाली की ईश्वराच्या दिशेने भक्त पुढे पुढे जाऊ लागतो. खूप भक्त आत एक व बाहेर एक असे वागतात व स्वामीजींना काहीच कळत नाही असे समजतात. पण आमचा असा अनुभव आहे की, श्रीस्वामीजी सर्वज्ञानी आहेत पण ते तसे दाखवत नाहीत. अशा भक्तांनाही ते जास्तीत जास्त सांभाळून घेण्याचा प्रयत्न करतात. पण वातावरणातील देव-देवता अशा भक्तांना ईश्वरी कृपेपासून दूर ठेवतात व असे भक्त मग आमचे असे का होते ? असा विचार करत

बसतात.

आपल्या भक्तांवर श्रीस्वामीजींचे सतत लक्ष असते. याचा एक अनुभव आम्हाला नुकताच आला. तो मी पुढे देत आहे.

**मा**झी आई मोठ्या बहिणीकडे रहाते. १२ मार्च २०१३ रोजी आई तिच्या नोकरीच्या जागी चालत जात होती. तिला रस्ता क्रॉस करायचा होता. तिने आजूबाजूला पाहिले एकही गाडी येत नव्हती. रस्ता पूर्ण मोकळा होता. तिने रस्ता क्रॉस करायला सुरुवात केली, अचानक वेगाने एक गाडी आली व तिने आईला उडविले. आई उंच उडाली व धडाम्दिशी खाली रस्त्यावर कोसळली.

मोबाईलवर मला कॉल आला. आईचे अपघाताचे वृत्त ऐकून डोळ्यासमोर अंधारी आली. एक क्षणभर डोळे मिटले. चिदाकाशात श्रीस्वामीजींचे दर्शन झाले. श्रीस्वामीजी म्हणाले, ''काळजी करू नकोस, तुझी आई वाचेल. तिचे आयुष्य मी वाढवितो.'' मला हा सर्व भास वाटला, मी तात्काळ हॉस्पिटलला गेले, आई बेशुद्ध होती.

डॉक्टर म्हणाले...

''डोळ्याच्या पापणीला टाके घालावे लागतील पण डोळ्याला काहीही झाले नाही. पायाला फ्रॅक्चर झालेले आहे. कवटी ठिकठिकाणी क्रॅक झालेली आहे, कवटी पुन्हा जोडावी लागेल.'' डोळ्याच्या पापणीला डॉक्टरने बुबुळापासून अर्ध्या सें. मी. वर टाके घातले होते. पण बुबुळाला धक्का लागला नव्हता. ही अतिशय आनंदाची गोष्ट होती. डॉक्टरने तिच्या डोळ्याची पापणी व चेहऱ्यावरही एक-दोन ठिकाणी टाके घातले. शुद्धीवर आल्यानंतर आई व्यवस्थित बोलू लागली, डोळे उघडून सगळीकडे पाहू लागली. तिला काहीही त्रास होत नव्हता. ती म्हणाली... ''श्रीस्वामीजींनी मला मृत्यूच्या दारातून खेचून आणले.''

मी रात्रभर आय. सी. यु. च्या बाहेर बसून होते. आय. सी. यु. मध्ये काम करणारी नर्स सकाळी आय. सी. यु. च्या बाहेर येऊन मला म्हणाली... ‘‘तुम्ही कुठल्या देवाला मानता मला माहीत नाही. पण ज्या मार्गाने तुम्ही जात आहात तो मार्ग अगदी बरोबर आहे. देव तुमचे संरक्षण करत आहे. इतक्या भीषण अपघातातून वाचणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे आणि तुझी आई बेशुद्ध असताना तिच्या चेहऱ्यावर मी सोनेरी रंगाच्या प्रकाशाचे झोत पाहिले. ते बराचवेळ तिच्या अंगावर पडत होते. सोनेरी रंगाचा एक अंडाकृती मोठा आकार तिच्या डोक्याजवळ मला बराच वेळ दिसत होता. तो सुमारे दोन फूट उंचीचा होता.’’

हे सर्व ऐकल्यावर मी व मनोज समजलो, आईला बरे करण्याचे काम श्रीस्वामीजींनी केले आहे. त्याकरिता ते त्यांच्या दिव्य स्वरुपामध्ये येथे प्रकट झाले होते. मी चराचरात भरून राहिलेलो आहे. अगदी हाकेच्या अंतरावर आहे. फक्त तुमची श्रद्धा खरीखुरी हवी. श्रीस्वामीजींची ही वाक्ये आठवली.

या काळामध्ये श्रीस्वामीजी नर्मदा काठी कोठेतरी साधना करत होते, नर्मदा नदीला प्रदक्षिणा करत होते. ते साधना व तपस्येत असतानाही आपल्यामुळे त्यांना सातासमुद्रापलीकडे धावावे लागले याचे मला व मनोजला अतिशय वाईट वाटले.

खरे पाहता आईचा अपघात झाला हे ऐकल्यानंतर इतक्या भीषण अपघातात ती वाचणे शक्यच नव्हते, असे डॉक्टरसहित सर्वांना वाटले होते. पण ती वाचली व सर्वांशी बोलत होती हा एक दिव्य चमत्कार होता. परंतु आणखी एक संकट पुढे आ वासून उभे होते.

डॉक्टर म्हणाले होते डोळ्याच्यावरती जे कपाळाचे हाड आहे त्याला तसेच डोळ्याच्या खालच्या गालाच्या हाडाला व कवटीला

अनेक ठिकाणी क्रॅक्स गेल्या आहेत, म्हणजे चिरा गेल्या आहेत. यासाठी पूर्ण कवटीला एकसंध पकडून धरेल अशा स्टीलच्या पट्ट्या ऑपरेशन करून टाकाव्या लागतील. त्याचे काय होणार ही चिंता होती. दोन दिवसांनी डॉक्टर आपला निर्णय सांगणार होते. मी निश्चिंत होते व आनंदात होते.

त्याच रात्री श्रीस्वामीजी माझ्या स्वप्नात आले व म्हणाले... ''मुळीच काळजी करू नकोस. तुझी आई बरी झाली आहे व तिचे ऑपरेशन करावे लागणार नाही.''

दोन दिवसांनी डॉक्टर म्हणाले, ''ऑपरेशन करण्याची आवश्यकता नाही. कवटीला जरी अनेक ठिकाणी चिरा गेलेल्या असल्या तरी त्या अतिशय वेगाने भरत आहेत.'' हे ऐकून आम्हा सर्वांची काळजी मिटली. पंधराव्या दिवशी आई घरी आली. अशा प्रकारे श्रीस्वामीजीच आमची काळजी घेत आहेत.

सातासमुद्रापलीकडे अमेरिकेमध्ये श्रीस्वामीजींच्या कृपेने आम्ही आनंदात आहोत. ईश्वर आमचे सर्व बाजूने संरक्षण करत आहे.

**मनोज-अस्मिता शेंडे**

न्यूजर्सी (अमेरिका)

ॐ

# डॉ. मीनाक्षी अमृतकर

**मा**झे नांव डॉ. मीनाक्षी अमृतकर! मी औरंगाबादची आहे. मी डॉक्टर असून आयुर्वेदात पी. एच. डी. केली आहे. मला अगदी बालपणापासून श्रीदत्तभक्तीची आवड आहे. श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचू लागल्यानंतर मला खूप दिव्य अनुभव आले. शांती, समाधान व आनंद वाढू लागले. तसेच आमच्या घरातील सर्वांनाही शांती, समाधान, आनंद वाढल्याचा अनुभव येऊ लागला. स्वप्नामध्ये देवी-देवतांची दर्शने होऊ लागली. आपल्या पाठीमागे प्रचंड दैवीशक्ती आपले संरक्षण करत आहे असा अनुभव येऊ लागला.

मी दररोज **श्रीदत्त स्तोत्राचे** ३६ पाठ, **श्रीदुर्गा स्तोत्राचे** ३६ पाठ याशिवाय **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गा सप्तशती, श्रीस्वामी समर्थ सप्तशती** यांचे वाचन अशी उपासना करते.

**ए**कदा **श्रीदत्त स्तोत्राचे** पाठ करत असताना माझ्या समोरच्या तीन फूट उंचीच्या कपाटावर दोन सुंदर पावले उमटली. ही पावले केशरी रंगाची होती. अष्टगंधामध्ये पावले बुडवून त्या पावलांचा ठसा उमटल्यावर जशी ती पावले दिसतील तशी ती होती. मी त्या दत्त

पादुकांना अगरबत्ती दाखवून नमस्कार केला. तीन दिवस श्रीदत्त पादुकांचे वास्तव्य माझ्या घरात होते नंतर त्या अदृश्य झाल्या. असे विविध अनुभव घेत माझा आध्यात्मिक प्रगतीचा प्रवास चालू होता. पुष्कळवेळा सूचक स्वप्ने पडायची. स्वप्नातून मार्गदर्शनही मिळायचे.

**मी** एका हॉस्पिटलमध्ये नोकरी करत होते. तेथे लीना नांवाची एक मैत्रिण होती. मी पी. एच. डी. करत असताना मला एका कॉलेजमध्ये लेक्चरर्‌ची नोकरी मिळाल्यामुळे मी हॉस्पिटलची नोकरी सोडली आणि लीना व मी एकमेकींपासून दूर गेलो.

मी कॉलेजमध्ये लेक्चरर्‌चे काम करत होते. एक दिवस मला लीनाचा फोन आला. तिने माझी खूप आस्थेने चौकशी केली व म्हणाली, ''तू खूप ग्रेट आहेस.'' मी विचारले, 'तू मला ग्रेट का म्हणतेस?'

ती म्हणाली, 'मी एका साधूकडे जाते.' ते साधू मला म्हणाले, ''मीनाक्षी नांवाची तुझी एक मैत्रिण आहे. ती खूप ग्रेट आहे. तू फक्त मीनाक्षीला माझ्याकडे घेऊन ये, मी तुझी सगळी कामे करेन.''

''आता सांग तू ग्रेट आहेस की नाही! मी तीन-तीन, चार-चार वेळा फोन करून सुद्धा ते मला अपॉइन्टमेन्ट देत नाहीत आणि तुला मात्र ते सारखे बोलवत आहेत व मीनाक्षीला घेऊन माझ्याकडे केव्हा येतेस असे सारखे विचारत आहेत. आता सांग तू आहेस की नाही ग्रेट...!''

मला काय उत्तर द्यावे हे सुचेना, मी म्हणाले, 'सध्या मी खूप कामात आहे. पंधरा दिवसांनी मी तुला सांगते.'

या पंधरा दिवसात तिचे मला आठ-दहा फोन आले. कमीत कमी मला तरी येऊन भेट असे ती म्हणाली. शेवटी मी मैत्रिणीला

भेटायला तिच्या घरी गेले.

मैत्रिण म्हणाली, ''मीनाक्षी तुझ्या घरी येताच मला ताबडतोब फोन कर असे माझ्या गुरुजींनी मला सांगितले आहे'' असे म्हणून तिने तिच्या गुरुजींना फोन लावला व मोबाईल माझ्याकडे देत म्हणाली, ''गुरुजींबरोबर बोल...!''

पलीकडून लीनाच्या गुरुजींचा आवाज आला ते म्हणाले, ''मीनाक्षी, तू खूप भाग्यवान आहेस. साक्षात् दत्तमहाराज तुला गुरु म्हणून भेटले आहेत, असे म्हणून त्यांनी श्रीस्वामी दत्तावधूतांची खूप स्तुती केली व शेवटी तू लवकरात लवकर मला येऊन भेट. दोन महिन्यांनंतर तुझ्यावर एक संकट येणार आहे. त्यातून मी तुला सोडविणार आहे.'' असेही मला सांगितले.

हा साधू अतिशय बेमालूम पद्धतिने माझ्या नकळत मला स्वतःच्या जाळ्यात खेचत होता. पण पुष्कळवेळा माझे अंतर्मन मला सूचना करते, प्रेरणा देते. माझ्या अंतःकरणाने दिलेल्या प्रेरणेनुसार मी त्यांना विचारले...

''श्रीस्वामी दत्तावधूत किती ग्रेट आहेत हे तुम्ही मला आत्ताच सांगितले. ते माझे संरक्षण करत आहेत. त्यांची माझ्यावर खूप कृपा आहे हेही तुम्ही मला आत्ताच सांगितले. असे असताना दोन महिन्यानंतर माझ्यावर येणाऱ्या संकटापासून श्रीस्वामीजी माझे संरक्षण करू शकणार नाहीत का?'' माझे सडेतोड बोलणे ऐकून माझ्या मैत्रिणीचे गुरुजी थोडेसे गडबडले व स्वतःला सावरत ते म्हणाले,

''स्वामी दत्तावधूत हे राष्ट्रपतींसारखे आहेत. आता तूच मला सांग शिपायाचे काम करायला राष्ट्रपती आपली जागा सोडून येतील का? तुझे काम हे माझ्यासारख्या शिपायाने करायचे असते. मी त्या

राष्ट्रपतींचा शिपाई आहे असे समज व त्यांनीच मला हे काम सांगितले आहे असे समजून तू लवकरात लवकर माझ्याकडे निघून ये!''

श्रीस्वामी दत्तावधूतांची त्यांनी भरपूर स्तुती केली, त्यांना राष्ट्रपती म्हणाले व स्वतःला शिपाई म्हणाले, माझ्यावर येणाऱ्या संकटाची चाहूलही मला लागली होती व त्यातून सोडविण्याचे आश्वासन हे साधू मला देत होते तेही आपणहून! मला आता त्यांच्या बोलण्यामध्ये ईश्वरी कृपेचा अंश दिसू लागला. मी त्यांच्याकडे जाण्याचे ठरविले.

मी मैत्रिणीबरोबर त्या तांत्रिक साधूकडे गेले. मला पाहून त्यांना आनंद झाला. ''मी तुझी खूप वाट बघत होतो'' असे ते म्हणाले. पुढे त्यांनी मुख्य विषय बोलायला सुरुवात केली.

तांत्रिक साधू म्हणाले, ''तुला येथे बोलावण्याचा मुख्य उद्देश असा आहे की, माझ्याकडे एक विद्या असून ही विद्या मृत्यूच्या अगोदर मी कोणालातरी देणे आवश्यक आहे. ती विद्या घेण्याची पात्रता तुझ्यामध्ये आहे असे मला वश असणाऱ्या पिशाच्चाने सांगितले. म्हणून मी तुला येथे बोलावले आहे. ही विद्या तुला मिळाल्यानंतर जी भुते माझ्याशी बोलतात ती तुझ्याशी बोलू लागतील. त्याद्वारे तू लाखो रुपये कमावशील. गाडी, बंगला अशा सर्व गोष्टी तुला मिळतील. तेव्हा तू नाही म्हणू नकोस. मी ही विद्या तुला देतो, तू ती घे! माझा मृत्यू खूप जवळ आला आहे. मृत्यूच्या अगोदर जर ही विद्या मी कोणाला दिली नाही तर माझा आत्मा अडकून पडेल. तुझ्या मृत्यूच्या वेळेला तू ही विद्या कोणाला तरी दे म्हणजे तू सुद्धा सुटशील!''

तांत्रिक साधूच्या जाळ्यात आपण पूर्णपणे फसलो आहोत याची जाणीव माझ्या अंतर्मनाने मला दिली. मी मनातून दत्ताचे नामस्मरण करायला सुरुवात केली. सौ. ताईंना व श्रीस्वामीजींना मनातून प्रार्थना

केली व हिम्मत करून त्या तांत्रिक साधूला विचारले...

''तुमच्याकडून ही विद्या घेण्यासाठी काय करावे लागेल?''

यावर ते तांत्रिक साधू म्हणाले, ''अमावस्येच्या दिवशी तू माझ्याकडे ये व माझ्याजवळ बस. माझ्याजवळ असणाऱ्या सर्व भूतांना मी सांगेन की यापुढे तुम्ही मीनाक्षीजवळ रहायचे आहे व तिने सांगितलेली कामे करायची आहेत. तू फक्त हो, कबूल, चालेल असे म्हणायचे की सर्व शक्ती तुझ्या शरीरात प्रवेश करतील आणि मग तुला पैसाच पैसा मिळेल.''

मी त्या तांत्रिक साधूचा निरोप घेतला. घरी परत आल्यावर मी सौ. ताईंना फोन केला, ''मिळेल त्या विमानाने आपण श्रीस्वामीजींना भेटायला हैद्राबादला जाऊ या. माझे अतिशय महत्त्वाचे काम आहे'' असे सांगून सर्व प्रकरण थोडक्यात सौ. ताईंच्या कानावर घातले. स्वतःला भरपूर पैसे मिळावेत म्हणून स्वतःच्या फायद्यासाठी, स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी दिसेल त्या साधूच्या, तांत्रिकाच्या, मांत्रिकाच्या, शक्तीपात करणाऱ्यांच्या नादी लागणाऱ्या लोकांना माझे स्पष्टपणे असे सांगणे आहे की, कुठल्याही साधूच्या नादाला लागू नका. दत्तभक्ती करीत रहा. श्रीदत्त भक्तीने वाईट शक्ती आपल्यापासून दूर पळून जातात व योग्य मार्ग दाखविणारा भेटतो असा माझा अनुभव आहे, असो!

माझी सर्व हकिकत ऐकून सौ. ताईंनी माझ्याबरोबर हैद्राबादला यायचे कबूल केले व आम्ही हैद्राबादला जायला निघालो. मार्गामध्ये सौ. ताईंनी मला ब्रह्मेंद्रस्वामींच्या व श्रीस्वामी दत्तावधूतांच्या अनेक गोष्टी सांगितल्या.

सौ. ताई म्हणाल्या, ''सुमारे पाचशे वर्षांपूर्वीच ब्रह्मेंद्रस्वामींनी कालज्ञान नांवाचा एक ग्रंथ लिहिला असून त्या ग्रंथात त्यांनी लिहिले आहे

की कलियुगाची पाच हजार वर्षे पूर्ण झाल्यानंतर म्हणजे इ.स. १९०० नंतर शेतामध्ये ज्याप्रमाणे कांद्याचे पीक येते त्याप्रमाणे भारतामध्ये साधूंचे पीक येईल. खरा साधू शोधूनही सापडणे कठीण होऊन बसेल. दैवीशक्तीने तुला त्या तांत्रिकापासून वाचवले आहे. तुझी आतुरता व प्रसंगाचे गांभीर्य पाहून मी तुला श्रीस्वामीजींकडे नेण्याचे कबूल केले. श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचून लाखो लोकांचे अक्षरशः कल्याण झाले आहे. त्यांना खूप दिव्य अनुभव आले आहेत. त्यांच्या संकटांचे निवारण झाले आहे. रोग, व्याधी बऱ्या झालेल्या आहेत. मनोकामना पूर्ण झाल्या आहेत. परंतु यापैकी कोणालाही श्रीस्वामीजींचे दर्शन झालेले नाही.

त्यांच्याकडे गर्दी नाही. जी काही पाच-पन्नास माणसे त्यांच्याकडे जातात त्यापैकी एखाद्याने त्यांना सोडून दुसऱ्या एखाद्या साधूची भक्ती करायला सुरुवात केली तरी त्यांना त्याचे काहीही सुख-दुःख वाटत नाही. तो साधू खरा नसला, जगाला फसवत असला तरी श्रीस्वामीजी आपल्या भक्ताला त्याच्याकडे जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत नाहीत.''

एकदा मी श्रीस्वामीजींना विचारले, '' तुमच्या पोथ्या व पुस्तके वाचून लाखो लोकांचे कल्याण झाले आहे. हजारो लोकांना तुमचे दर्शन हवे आहे. तुम्ही लोकांना दर्शन का देत नाही ?''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''एखाद्या भक्ताचा उद्धार करणे हे खूप कठीण कार्य असते. प्रथम त्याच्या कुलदेवतेचा उद्धार करावा लागतो. एखादा मनुष्य मुंबईहून किंवा कुठूनही माझ्याकडे येण्यास निघाला की त्याची कुलदेवता प्रथम माझ्याकडे येऊन पोहोचते. त्या कुलदेवतेचे नांव, गाव मला कळत नाही परंतु तिची स्टेज व तिची अवस्था मला कळते. एखाद्या घराण्याच्या पाठीमागे काही सत्पुरुषांचे आशीर्वाद असतात ते सुद्धा मला तात्काळ कळतात. ज्या घराण्याच्या पाठीमागे सत्पुरुषांचे

आशीर्वाद आहेत अशा घराण्यातील लोकांचा उद्धार करणे खूप सोपे असते. नाहीतर कुलदेवतेचा उद्धार करा, पूर्वजांचा उद्धार करा, घराण्यात काही अतृप्त आत्मे असतील तर त्यांचा उद्धार करा, अशा असंख्य अडचणी असतात. माणसाचा मेंदू एखाद्या रेडिओप्रमाणे असतो. रेडिओवर ज्याप्रमाणे असंख्य स्टेशन्स असतात त्याप्रमाणे माणसाच्या मेंदूमध्ये कोट्यावधी स्टेशन्स असतात. बऱ्याच माणसांचे मेंदू negative energy म्हणजे पिशाच्च शक्ती खेचत असतात. त्यामुळे त्यांच्या घराण्यामध्ये पिशाच्च व अतृप्त आत्मे यांची रेलचेल असते. अशी घराणी अशांत असतात. घरात सुख-शांती नसते. यांचा उद्धार करायचा म्हणजे सर्व पिशाच्चांचा उद्धार करावा लागतो.

काही घराण्यांच्या कुलदेवता चक्क नरकात पडलेल्या असतात. अशा घराण्यातील लोकांचा उद्धार करणे अशक्यप्राय असते. त्यासाठी खूप मोठा अधिकार असावा लागतो. अशी माणसे खऱ्या सत्पुरुषाजवळ टिकूच शकत नाहीत.''

आमची गाडी नागार्जुन सागरच्या दिशेने वेगाने चालली होती. मी सौ. ताईंना विचारले, ''कुलदेवता नरकात पडते म्हणजे काय?''

यावर सौ. ताई म्हणाल्या, ''सुमारे सत्तर-ऐंशी वर्षापूर्वी त्या काळातील लोक समृद्धी प्राप्त व्हावी म्हणून पिशाच्च शक्ती आपल्या घरी आणत. याला बायंगी भूत किंवा चालगत असे म्हणतात. हे पिशाच्च घरी आणण्याकरिता त्या काळातील माणसे तांत्रिकांकडे जात व त्याच्याकडून पिशाच्च शक्ती घेऊन आपल्या घरी आणून ठेवत. एखादा मनुष्य पिशाच्च शक्ती आणण्यासाठी म्हणून तांत्रिकाकडे गेला की तो तांत्रिक त्या माणसाला त्याच्या कुलदेवतेचे नांव विचारत असे. कुलदेवतेचे

नांव जाणून घेतल्यानंतर त्या कुलदेवतेच्या आत्म्याला पकडून आणून नरकात टाकले जात असे व कुलदेवतेला नरकात टाकल्यानंतर मग तो तांत्रिक बायंगी भूत एका दगडामध्ये ठेवून या माणसाला देत असे. श्रीस्वामीजींनी या सर्व गोष्टी मला सिद्ध करून दाखविल्या आहेत. ज्यांच्या घराण्यामध्ये अशा प्रकारे पिशाच्च शक्ती आणलेली आहे अशी घराणी काही काळ समृद्धीच्या शिखरावर जातात. पण नंतर पुढच्या पिढ्यान्‌पिढ्या यातना भोगत राहतात. मृत्यूनंतर त्या घराण्यातील कोणालाही मनुष्यजन्म प्राप्त होत नाही.''

''मीनाक्षी, आता तूच मला सांग माणसाचा उद्धार करणे ही गोष्ट सोपी आहे का? तुझे नशीब खूप चांगले आहे. श्रीस्वामीजी तीन-तीन वर्षे आश्रमात येत नाहीत, सतत तपस्येत असतात. हिमालयात एकांतवासात रहातात. तुझा दैवयोग चांगला म्हणून आपण आज श्रीस्वामीजींकडे जात आहोत.''

आयुष्यात प्रथमच अतिशय अद्‌भुत अशा गोष्टी मी सौ. ताईंच्या मुखाने ऐकत होते. मी ताईंना विचारले...

''जी माणसे बायंगी भूत किंवा पिशाच्च शक्ती आपल्या घरी आणतात त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांची वाट लागते, असे तुम्ही आत्ताच म्हणालात... तर मग ज्या तांत्रिकांकडे अशा विद्या आहेत व जे कुलदेवतांनाही नरकात टाकण्याचे पाप करतात त्यांचे काय होत असेल?''

सौ. ताई म्हणाल्या, ''तुला असाच तांत्रिक भेटला होता. या तांत्रिकांना स्वतःचा मृत्यू अगोदर कळतो. मृत्यूपूर्वी ते आपल्याकडील सर्व विद्या एखाद्या तुझ्यासारख्या व्यक्तीला देतात. श्रीस्वामीजींच्या कृपेमुळे तू वाचलीस!''

मी म्हणाले, ‘‘खरंच! श्रीस्वामीजींनी अक्षरशः मला वाचविले. पण ताई, मी असे काय केले की त्यामुळे अशा तांत्रिकाची व माझी गाठ पडली?’’

ताई म्हणाल्या, ‘‘मीनाक्षी, उगाच यावर जास्त विचार करू नकोस. जीवनात अशा घटना घडतच असतात. आपण ईश्वराची भक्ती करत असलो तर अशा घटनाही आपल्याला ज्ञान देऊन जातात.’’

‘‘माझ्याही जीवनामध्ये एक अशीच घटना घडली. तुझ्याप्रमाणे मलाही श्रीस्वामीजींनी वाचविले.’’

सौ. ताई सांगू लागल्या...

‘‘**ए**का अनोळखी माणसाने अचानक मला सांगितले, तुमचे गुरु साक्षात् दत्तात्रेय असून ते जे ईश्वरीकार्य करत आहेत ते पुढे चालविण्यासाठी एका महान आत्म्याला जन्म घेण्याचा त्यांनी आदेश दिला, तो महान आत्मा तुमचा नातू म्हणून जन्माला आला आहे.’’ त्याचे हे वाक्य ऐकून मला खूपच आश्चर्य वाटले. कारण जितू-मानसी गेली तेरा वर्ष अमेरिकेत रहात आहेत. मला नातू झाला हे फक्त नातेवाईकांनांच सांगितले होते. फार कोणाला सांगितले नव्हते.

**मी** एका पुस्तकाच्या दुकानात बसले होते. तेथे पुस्तके विकत घेण्यासाठी आलेल्या माणसाने माझ्याकडे पाहून अमेरिकेत जन्माला आलेल्या माझ्या नातवाविषयी भविष्यवाणी करावी याचे मला अतिशय आश्चर्य वाटले.

पुस्तकाच्या दुकानाचा मालक म्हणाला, ‘‘हे खूप मोठे चमत्कारी महाराज आहेत. तुम्हाला त्यांच्याशी गप्पा मारायच्या असतील तर आतल्या बाजूला बसा.’’ असे म्हणून त्याने आमची बसण्याची सोय

करून दिली.

आम्ही एकमेकांच्या समोर बसल्यानंतर त्याने स्वामी दत्तावधूतांचा महिमा गायला सुरुवात केली. तीस वर्षे श्रीस्वामीजींच्या सहवासात राहून सुद्धा आपल्याला श्रीस्वामीजींच्या विषयी काहीच कळले नाही, जेवढे या समोर बसलेल्या माणसाला कळलेले आहे असे मला वाटले. नंतर त्याने माझ्या जीवनातील काही अडीअडचणी व समस्या याविषयी मला सांगायला सुरुवात केली. मी त्यावर उपाय विचारताच त्याने काही पूजा व त्याला येणारा खर्च सांगितला. मी त्याला सर्व पूजेच्या खर्चाचे पंचवीस हजार रुपये दिले. त्या दिवशी रात्री मी श्रीस्वामीजींना फोन केला व मला भेटलेल्या अद्भुत माणसाविषयी सांगायला सुरुवात करताच त्यांनी मला बोलू दिले नाही. श्रीस्वामीजी म्हणाले....

''त्या माणसाकडे कर्णपिशाच्च विद्या असून अशा लोकांची संगत करणे चांगले नसते. तुम्ही जर त्याला पैसे दिले असतील तर ते विसरून जा! पण पंधरा-वीस दिवसांनी त्याचा फोन येईल व तो म्हणेल मी पूजेसाठी काही वस्तू तुम्हाला देतो. तर कुठल्याही परिस्थितीत त्याच्या हातची वस्तू घरात येऊ द्यायची नाही व त्यालाही तुमच्या घरी येऊ देऊ नका. तो जी वस्तू तुम्हाला देणार आहे ते एक तांब्याचे यंत्र असेल व त्या यंत्राला त्याने पिशाच्च शक्तीने भारलेले असेल व स्मशानातील चितेची राख त्या यंत्रा बरोबर तो तुमच्या घरात पाठवेल. या सर्व गोष्टींचे भयंकर दुष्परिणाम होतील. असे काही घडू नये म्हणून तुम्ही त्याला घरात येऊ देऊ नका. तसेच त्याने पिशाच्च विद्येने भारलेली वस्तू तुमच्या घरात येणार नाही याची दक्षता घ्या. मी माझ्याकडून योग्य तो बंदोबस्त करतो.''

पंधरा-वीस दिवसांनी त्या माणसाचा फोन आला तो

म्हणाला...''तुमची वस्तू तयार झालेली आहे.'' मी त्याला वस्तू नको असे सांगितले. तर तो म्हणाला, ''अरे बाप रे! मी तर त्या यंत्रावर चितेतील राख टाकून त्याला सिद्ध केले आहे.''

मी म्हणाले, ''मी तुमच्या पूजेचे सर्व पैसे तुम्हाला दिले आहेत. तुम्ही तयार केलेली वस्तू काही कारणाने मी घरी ठेवू शकत नाही. तुम्ही ती ठेवून घ्या किंवा पाण्यात विसर्जन करा.''

अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी माझी खूप मोठ्या संकटातून सुटका केली. जर ती वस्तू घरात आली असती तर घरातील दैवीशक्ती बाहेर निघून गेल्या असत्या, कारण प्रकाश व अंधार एकत्र राहू शकत नाहीत. हे तर असे चालायचेच! जीवनात असे अनुभव येत असतातच!

गप्पांच्या ओघामध्ये वेळ कसा निघून गेला कळले नाही व नागार्जुन सागर केव्हा आले तेही कळले नाही.

श्रीस्वामीजींची भेट घेतली. तांत्रिकाविषयी सर्व श्रीस्वामीजींना सांगितले. श्रीस्वामीजी म्हणाले, ''तो मार्ग आपला नाही. आपण ईश्वरभक्ती करावी व आनंदात रहावे.''

श्रीस्वामीजींना मी माझ्यावर येणाऱ्या संकटाविषयी सांगितले. श्रीस्वामीजी म्हणाले, ''काही काळजी करू नकोस. **ॐ दत्त दुर्गा ॐ** असा जप सतत करत रहा. तुझा सर्व भार श्रीदत्तगुरुंनी घेतला आहे. तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही.''

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे अनेक दिव्य अनुभव येऊन माझी सर्व संकटातून सुटका झाली व मी पूर्णपणे सुखी झाले.

## अविस्मरणीय हिमालय यात्रा

**मा**झी आजी ८८ वर्षांची आहे. गेली छत्तीस वर्षे ती फक्त गाईचे

दूध पिते. दोन वर्षांपूर्वी तिने सोरटी सोमनाथ व द्वारका यात्रा केल्या. आजीची प्रकृती ठणठणीत होती. दीड वर्षापूर्वी आजी बाथरूममध्ये पडली. मांडीच्या सांध्यामध्ये पाय अशा पद्धतिने तुटला की परत जुळलाच नाही. तेव्हापासून आजीचा एक पाय अक्षरशः लटकत आहे. त्यामुळे आजी अंथरुणावर झोपलेलीच असते. माझे मामा-मामी तिची सर्वतोपरी काळजी घेत असतात.

थोडेफार कोठे बाहेर जायचे असल्यास एक मनुष्य आजीला उचलून घेतो व दुसरा मनुष्य आजीचा लटकता पाय आपल्या दोन्ही हातांनी उचलतो. अशा प्रकारे तिला कोठेतरी थोडेफार फिरायला नेण्यात येते. अशा या आमच्या अद्‌भुत आजीने हरिद्वार, ऋषीकेश, गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ, उत्तरकाशी, सोनप्रयाग, विष्णूप्रयाग, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, गोमतीप्रयाग, जोशीमठ याशिवाय हिमालयातील छोटी-मोठी तीर्थस्थाने व मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा अशी सर्व स्थाने पहाण्याची इच्छा व्यक्त केली. आमच्या मामाने माझ्या आई-वडीलांना व आम्हा सर्वांना आजीची ही इच्छा सांगितली. सर्वांनी मिळून आजीची इच्छा पूर्ण करण्याचे ठरविले. आजी मिळून आम्ही अकरा लोकांनी हिमालयात जाण्याची योजना आखली.

| | | |
|---|---|---|
| डॉ. मीनाक्षी अमृतकर | वय ३६ | म्हणजे मी. |
| चि. साक्षी अमृतकर | वय १२ | भाची |
| सूर्यकला अमृतकर | वय ६६ | आई |
| प्रतिभा अमृतकर | वय ४३ | बहिण |
| सुधीर अमृतकर | वय ३९ | भाऊ |

| | | |
|---|---|---|
| वत्सला कोठावदे | वय ८८ | आईची आई |
| डॉ. श्रीकृष्ण कोठावदे | वय ५७ | मामा |
| मंगला कोठावदे | वय ५२ | मामी |
| सागर कोठावदे | वय २६ | मामेभाऊ |
| समीर कोठावदे | वय २४ | मामेभाऊ |
| आकाश कोठावदे | वय २२ | मामेभाऊ |

या अकरा माणसांच्या ग्रुपची लीडर मी होते. सर्वांनी यात्रेची पूर्ण जबाबदारी माझ्यावर टाकलेली होती. हिमालयात नेहमी होणारे लॅण्ड स्लाईड व त्यामुळे महिना महिना हिमालयातील रस्ते बंद राहतात, याची जाणीव मला होती. केदारनाथला पंधरा किलोमीटर चालावे लागते. यमुनोत्रीला सात किलोमीटर चालावे लागते. त्यामुळे ८८ वर्षांच्या आजीला कोणाच्यातरी पाठीवर बसवून तिचा एक लटकता पाय आळीपाळीने आम्ही हातात घ्यायचे ठरविले होते.

दैवी संरक्षणाची खूप आवश्यकता होती. म्हणून मी सौ. वनिता ताईंना फोन केला. सौ. ताई म्हणाल्या, ''श्रीस्वामीजी सध्या नर्मदा किनारी आहेत. मी त्यांना सर्व काही सांगते. तू मला थोड्यावेळाने फोन कर!''

थोड्याच वेळात श्रीस्वामीजींचा पुढील प्रमाणे निरोप मिळाला.

''मीनाक्षी, तू खूप धाडसाचे काम करत आहेस! तेव्हा मी सांगतो तसे कर. दिल्लीमध्ये राजूभाई नांवाचे आपले एक खास गृहस्थ आहेत. त्यांच्या पाठीमागे देवाचे आशीर्वाद आहेत. त्यांच्याच गाडीने संपूर्ण प्रवास करा. अगदी दिल्ली एअरपोर्टवर उतरल्यापासून पुनश्च दिल्ली एअरपोर्टवर येईपर्यंत त्यांचीच गाडी वापरा. तुमची यात्रा आनंददायी

होईल!''

(श्रीस्वामीजींनी मला यात्रा आनंददायी होईल असा आशीर्वाद दिल्यानंतर तीन दिवसांनी सुनिल नांवाच्या श्रीस्वामीजींच्या एका भक्ताने चार धाम यात्रेसाठी परवानगी मागितली. श्रीस्वामीजींनी त्याला मुळीच जायचे नाही असे स्पष्ट शब्दात सांगितले. राजुभाईंचीच गाडी घेऊन जा असे श्रीस्वामीजींनी मला का सांगितले व सुनिलला यात्रेला जाऊ नकोस असे का सांगितले, या दोन्हीचा अर्थ मला यात्रा पूर्ण झाल्यावर कळला.)

## २७ मे

सौ. ताईंनी राजूभाईंचा मोबाईल नंबर दिला होता व आम्ही त्यांची गाडी फोन करून बुक केली होती. औरंगाबाद- दिल्ली फ्लाईटने आम्ही संध्याकाळी सहा वाजता दिल्ली एअरपोर्टला पोहोचलो. राजूभाई टेम्पो ट्रॅव्हलर घेऊन एअरपोर्टवर आले होते.

## २८ मे

सकाळी ९ वाजता आम्ही राजूभाईंच्या टेम्पो ट्रॅव्हलरने हरिद्वारकडे निघालो. संध्याकाळी हरिद्वारला पोहोचलो. हॉटेलमध्ये फ्रेश होऊन गंगादर्शन व गंगेची आरती करण्यासाठी हरि की पौडी येथे आलो.

हरि की पौडी येथे बऱ्याच पायऱ्या आहेत. या पायऱ्या उतरून गंगाकिनारी यावे लागते. आजीला व्हील चेअरवरून नेताना माझ्या चारही भावांची तारांबळ उडत होती. हरि की पौडी येथील वातावरण अतिशय प्रसन्न व सुंदर होते.

## २९ मे

हरिद्वारजवळच एक खूप उंच पर्वत असून या पर्वतावर मनसा

देवीचे स्थान आहे. पर्वतावर जाण्यासाठी रोपवेची सोय आहे. आजीसहित आम्ही सर्वजण रोपवेच्या सहाय्याने मनसादेवीला गेलो. पुन्हा हरिद्वारला येऊन आम्ही ऋषीकेशकडे प्रयाण केले. ऋषीकेशला सर्व मंदिरे व लक्ष्मण झुला ही स्थाने पाहिली. ६६वर्षांची आई व ८८वर्षांची आजी सोडून बाकी सर्वांनी रिव्हर राफ्टींग केले. बारा वर्षांच्या साक्षीने न घाबरता १५० फूट खोल पाण्यात उडी मारली. अशा प्रकारे हरिद्वार व ऋषिकेश येथे आम्हाला खूप आनंद मिळाला.

## ३१ मे

३० मे ला सर्व दिवसभर प्रवास करून संध्याकाळी उत्तरकाशीला पोहोचलो. ३१ मे ला उत्तरकाशीहून सकाळी निघून ११ वाजता गंगोत्रीला येऊन पोहोचलो. पार्किंग पासून जवळपास दीड किलोमीटर चालत जाऊन आम्ही मंदिरापर्यंत आलो. सर्वांनीच गंगेत स्नान केले. चारही बाजूला बर्फाचे पर्वत, अप्रतिम निसर्ग सौंदर्य, हात-पाय गोठवून टाकतील इतके थंडगार बर्फाचे पाणी, नदीच्या किनाऱ्याला असलेले गंगा मंदिर, गंगेची पूजा, नदीत दिवे सोडणे इत्यादी सर्व विधी करून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. पुढचे दर्शन म्हणजे केदारनाथ दर्शन!

खरे पाहता गंगोत्रीनंतर प्रथम यमुनोत्रीला जातात पण मला अशी प्रेरणा मिळाली प्रथम केदारनाथला जावे. कुठलीतरी अदृश्य शक्ती आम्हाला आनंद देत होती. संरक्षण करत होती व प्रवास कसा करावा याचे मार्गदर्शनही करत होती. त्याप्रमाणे केदारनाथला जाण्याचे ठरविले. वाटेत धरासु गाव लागले. धरासु गाव ओलांडून एक दहा-पंधरा किलोमीटर पुढे आलो. एवढ्यात आम्हाला असे कळले की, धरासु येथे लॅण्ड स्लाईड झाल्याने गंगोत्रीचा मार्ग बंद झाला आहे. दैवीशक्तीने

वेळीच प्रेरणा देऊन आम्हाला धरासु गाव ओलांडून पुढे येण्यास भाग पाडले होते. त्या दिवशी रुद्रप्रयागजवळ हिना गावी आम्ही मुक्काम केला. रात्री एकत्र बसून सर्वांनी ईश्वराची प्रार्थना केली. कारण गंगोत्रीहून निघण्यास आम्हाला जर १५-२० मिनिटे उशीर झाला असता तर आम्ही गंगोत्रीलाच अडकून पडलो असतो. या घटनेला तीन महिने होऊन गेले आहेत. आता सप्टेंबर २०१३ सुरू आहे. त्या दिवसापासून आजतागायत एकही गाडी गंगोत्रीला गेलेली नाही व आणखी एक वर्षभर जाण्याची शक्यता नाही. दैवी संरक्षणाचा हा पहिला अनुभव होता. पण असे पुढे बरेच अनुभव मी तुम्हाला वर्णन करून सांगणार आहे. मानवी जीवनामध्ये ईश्वरभक्तीची अत्यंत आवश्यकता आहे. ईश्वरावर श्रद्धा ठेवल्याने आपले सर्वत्र संरक्षण होते. आपल्या हृदयातूनच ईश्वर आपल्याशी बोलतो व आपल्याला मार्गदर्शन करतो असा माझा अनुभव आहे. देव आमच्या बरोबरच आहे असा अनुभव आम्हा सर्वांना सतत येत होता. देव ८८ वर्षांच्या आजीला अगदी फुलासारखे सांभाळत होता. जेथे जाऊ तेथे आमची उत्तम प्रकारे सोय होत होती.

## १ जून

हिना गाव ते रामपूर असा दिवसभर फक्त प्रवास केला. आमची आजी बेडरिडन पेशंट असल्याकारणाने आमच्या प्रवासाची सुरुवात इतर प्रवाशांप्रमाणे पहाटे न होता सकाळी ९-१० च्या सुमारास होत असे. त्यामुळे ठरविलेल्या ठिकाणी पोहोचण्यास खूप उशीर होत असे किंवा वाटेतच मुक्काम करावा लागत असे. आम्ही सोनप्रयागला पोहोचून मुक्काम करणे आवश्यक होते. परंतु रात्रीचे आठ वाजल्याने रामपूर येथेच रहाण्याचे ठरविले.

रुम्ससाठी चौकशी केली. परंतु एकाही हॉटेलमध्ये रुम्स रिकाम्या नव्हत्या. आता गाडीतच रात्र काढावी लागते की काय असे वाटत होते. थंडी प्रचंड होती. आमच्यापेक्षा आम्हाला आई आणि आजी यांची जास्त काळजी होती. मी आणि आई आम्ही दोघींनीही श्री स्वामीजींची प्रार्थना करायला सुरुवात केली. कारण आज रात्री व्यवस्थित झोप झाली तरच उद्या केदारनाथची पंधरा किलोमीटरची चढण पायी जाणे शक्य होणार होते.

प्रार्थना संपते न संपते तोच समोरून एक मुलगा गाडीजवळ आला व त्याने आमची चौकशी केली. आम्हाला रुम्स हव्या असे आम्ही त्याला सांगितले तेव्हा त्याने हाताने खूण करून वरती पर्वतावर एक हॉटेल आहे असे सांगितले. आम्ही अगोदरच अकरा हजार फूट उंचीवर होतो. समोरील पर्वत आजीला घेऊन पायी चढून जाणे म्हणजे खूप मोठे दिव्य होते. आमच्या मनातील शंका ओळखून तो मुलगा म्हणाला...

''गाडी उपर, हॉटेल तक जाती है।'' आम्ही गाडीने त्या टेकडीवर गेलो. हॉटेल अतिशय सुंदर होते. सगळ्या रुम्स वेल डेकोरेटेड व सर्व सुखसोयींनी युक्त होत्या. हॉटेल रिसेप्शन मधील मॅनेजरने आमचे उत्तम आदरातिथ्य केले.

राजूभाई म्हणाले, ''मी तीस वर्षे हिमालयात येत आहे पण हे हॉटेल कधीही पाहिले नव्हते. आपके उपर श्रीस्वामीजीकी बहोत कृपा है ।''

अर्ध्या तासात उत्तम व चवदार जेवण आम्हाला मिळाले. रात्रीचे जेवण आटोपल्यानंतर हॉटेल मॅनेजरने आम्हाला 'जेवण आवडले का?' विचारले. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले ''जेवण खूपच आवडले व तुमच्या

आदरातिथ्याने आम्हाला जो आनंद झाला आहे, तो आम्ही शब्दात व्यक्त करू शकत नाही.'' तेव्हा त्यानी ''सकाळी चहा, नाश्ता किती वाजता पाहिजे'' असे विचारले?

मी म्हणाले, ''पहाटे साडेचार ते पाचच्या दरम्यान आम्हाला चहा मिळेल का?''

तो म्हणाला, ''जरूर मिळेल! बरोबर साडे चार ते पावणे पाचला मी तुम्हाला भरपूर दुधाचा चहा देतो.'' त्याच्या बोलण्यातील आग्रह व आत्मविश्वास पाहून मी त्याला विचारले, ''गाईचे दूध मिळू शकेल का? शक्य असेल तर तुम्ही आत्ता गाईचे दूध मागवून ठेवा व आम्हाला पहाटे साडेचारला द्या! माझ्या ८८ वर्षांच्या नानीला (हिन्दीमध्ये आईच्या आईला नानी म्हणतात व वडिलांच्या आईला दादी म्हणतात.) पहाटे साडेचार वाजता दूध पिण्याची सवय आहे.''

यावर दिलखुलास हसून मॅनेजर म्हणाला ...

''बहेनजी आप चिंता क्यों करती हो! आपको सुबह साडेचार बजे गायका ताजा दूध मिलेगा, जो उस वक्त निकाला होगा। चलो आपको दिखाता हूँ ।'' असे म्हणून त्याने हॉटेलच्या जवळ असणारी गोशाळा दाखविली. ईश्वराच्या या अद्‌भुत लीलेचे मला अतिशय आश्चर्य वाटले.

**मनी धरावे ते होते ।**
**विघ्न अवघेचि नासोनि जाते ।।**
**कृपा केलीया रघुनाथे ।**
**प्रचिती येते ।।**

**- रामदास स्वामी**

दासबोधातील या ओवीची मला आठवण झाली.

सर्वजण खूप थकलेलो होतो, लगेचच झोपलो. पहाटे बरोबर साडेचार वाजता चहा व गाईचे धारोष्ण दूध आम्हाला मिळाले. साडेपाच वाजेपर्यंत चांगलेच उजाडले होते. हॉटेल सोडताना हॉटेलचे नांव पहावे म्हणून मी वर पाहिले, हॉटेलला नांवच नव्हते म्हणून मॅनेजरला विचारले तर मॅनेजर म्हणाला...

''दोन दिवसापूर्वीच हॉटेल उघडले आहे. अजून उद्घाटन झाले नाही. नांव द्यायचे आहे.'' सर्वकाही अद्भुत व आश्चर्यचकित करणारे होते.

## २ जून

रामपूर ते गौरीकुण्ड या सात किलोमीटरच्या प्रवासाला ट्रॅफिक असल्याने पाच तास लागले. गौरीकुंडहून पुढे १५ किलो मीटर चालत प्रवास करावा लागतो. ज्यांना चालत जाणे शक्य नसेल त्यांच्यासाठी कंठी, दंडी, खच्चर यांची सुविधा असते. मात्र सरकारी व्यवस्था काहीही नाही. स्वच्छता नाही व शिस्तही नाही. सर्वत्र किळसवाणा, घाणेरडा व संतापजनक कारभार होता. त्यात पाऊसही पडत होता. सर्वत्र खच्चरांच्या घाणीत पाय बुडून जात होते. दंडी, खच्चर, कंठी करण्यासाठी जे काऊंटर होते, तेथे प्रचंड गर्दी होती. अशा परिस्थितीत माझा मामे भाऊ आकाश आजीला दोन्ही हाताने उचलून उभा होता व लोकांचे धक्के सहन करत होता. माझे भाऊ त्याला मदत करत होते व आम्ही सर्व दंडी म्हणजे पालखी शोधत होतो. शेवटी आई व आजी साठी दोन पालख्या मिळाल्या. आकाशने रेनकोट घातलेला असल्याने त्याचे हात निसरडे झाले होते व कुठल्याही क्षणी आजी पडेल अशी त्याला भीती वाटत होती. परंतु ईश्वराच्या कृपेने असे काही झाले नाही. दोन पालख्या मिळाल्याने आई व आजीची सोय झाली. मी, बारा वर्षांची भाची साक्षी व मामेभाऊ सागर

आम्ही तिघांनी पायी प्रवास सुरू केला. मामा आणि सुधीर यांनी इतर सर्वांसाठी खच्चराची व्यवस्था करून तेही पायी निघाले व आम्हाला गाठले. येथेही खच्चरवाले चांगले लुटतात असा आम्हाला अनुभव आला. पायवाट अतिशय खराब होती. सर्वत्र खच्चरांची घाण पडलेली व त्यात पाऊस ! मामाने मला जबरदस्तीने खच्चरावर बसण्यास भाग पाडले. बारा वर्षांच्या साक्षीने मात्र १५ किलोमीटर पायी प्रवास केला. तीन तासात आम्ही केदारनाथला पोहोचलो. लॉजमध्ये राहण्याची व्यवस्था करून मामा व समीर देवदर्शनाची व्यवस्था करण्यासाठी गेले. पुजाऱ्याने अकरा हजार रुपये घेतले व रात्री दोन वाजता दर्शनाला या म्हणून सांगितले.

## ३ जून

**सो**मवार पहाटे २ वाजता आम्ही सर्वांनी केदारनाथचे दर्शन घेतले. पूजा करून पुन्हा हॉटेलवर आलो. सकाळी आठ वाजता केदारनाथहून निघालो व गौरीकुंडला आलो. रस्ता जाम असल्याकारणाने राजूभाईंनी आम्हाला दुसऱ्या एका गाडीत बसायला सांगितले व सोनप्रयागला उतरायला सांगितले. तेथे राजूभाई आम्हाला घ्यायला येणार होते. त्याप्रमाणे राजूभाई आले व बद्रिनाथच्या दिशेने आमचा प्रवास सुरू झाला. रुद्रप्रयागपर्यंत जायचे आम्ही ठरविले होते. परंतु रात्र झाल्याकारणाने चंद्रपूर येथे मंदाकिनी नदीच्या किनारी असणाऱ्या गढवाल विकास निगमच्या हॉटेलमध्ये आम्ही मुक्काम केला.

## ४ जून

**प**हाटे चार वाजता मंदाकिनी नदीत सर्वांनी स्नान केले. मंदाकिनी नदीतील एका खडकावर पहाटे साडेचार ते साडेसातपर्यंत मी ध्यान केले.

ध्यानामध्ये मला अतिशय दिव्य असे अनुभव आले. आठ वाजता पुढील प्रवासास सुरुवात केली. रात्री बद्रिनाथला पोहोचलो व तेथे एका हॉटेलमध्ये मुक्काम केला.

## ५ जून

पहाटे पाच वाजता गरमपाण्याच्या कुंडावर स्नान केले व दर्शनासाठी दीड किलोमीटर लाईनमध्ये उभे राहिलो. निसर्गाकडे पहात व निसर्गातील आनंद लुटत वेळ केव्हा गेला हे कळलेच नाही. तीन तासाने मंदिरात पोहोचलो व बद्रिनाथाचे दर्शन घेतले.दुपारी एक वाजता आम्ही बद्रिनाथ सोडले. कर्णप्रयागला रात्री मुक्काम केला.

## ६ जून

कर्णप्रयागहून आम्ही खाली आलो. हरिद्वारला केशवानंदांच्या आश्रमाला भेट दिली. येथे तीन मुखी रुद्राक्षाचे झाड पाहिले.

कर्णप्रयाग सोडल्यानंतर हरिद्वारला पोहोचेपर्यंत आम्हाला सगळीकडून बातम्या मिळत होत्या. हिमालयात गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ सर्वत्र दरडी कोसळत असून सर्व ठिकाणचे यात्रा मार्ग पूर्णपणे बंद झालेले आहेत. जणूकाही आम्ही हिमालय सोडून खाली येत होतो व आमची गाडी पुढे आल्यानंतर दरडी कोसळत होत्या व रस्ते बंद होत होते. यमुनोत्रीला जाऊ नये अशी जी मला ईश्वरी प्रेरणा मिळाली ती अगदी अचूक होती. कारण जर आम्ही यमुनोत्रीला जाण्याचे धाडस केले असते, तर केदारनाथचा रस्ता बंद झाला असता. लाखो यात्रेकरू अडकल्याच्या बातम्या येत होत्या.

## ७ जून

हरिद्वारहून आम्ही मथुरा वृंदावन येथे पोहोचलो. वृंदावन येथील बांके बिहारी मंदिर व मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमीचे दर्शन करून आग्रा येथे मुक्काम केला.

## ८ जून व ९ जून

आठ जूनला सकाळी आम्ही ताजमहाल पाहिला. दुपारी दिल्लीला आलो. दिल्लीतील थोडीफार प्रेक्षणीय स्थळे पाहून ९ जूनला संध्याकाळी विमानाने औरंगाबादला पोहोचलो.

येथे आल्यानंतर टी. व्ही. वर जे काही पहायला मिळाले ते अतिशय भयंकर होते. ज्या केदारनाथच्या मंदिरात आम्ही दोन तास होतो, त्या मंदिर परिसरात दहा हजाराहून अधिक लोक मृत्यू पावले होते. हिमालयातील सर्व रस्ते उद्‌ध्वस्त झाले होते. हजारो गाड्या पाण्यात वाहत जात होत्या. गंगोत्री यमुनोत्री, बद्रिनाथ व केदारनाथ सर्व रस्ते पूर्णपणे बंद झाले ते आजही (सप्टेंबर २०१३) सुरू झालेले नाहीत.

हिमालयाच्या उत्तुंग शिखरांवर सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस प्रचंड बर्फवृष्टी सुरू होते व दरवर्षी १५ ऑक्टोबर ते १५ मे पर्यंत हिमालयात जाणारे सर्व रस्ते बंद असतात.

पंधरा हजारहून अधिक लोक मरण पावल्याची बातमी कानावर आली आहे. परंतु स्थानिक लोकांचे म्हणणे असे आहे की हिमालयातील हजारो गावे पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाली असून लाखो लोक मृत्युमुखी पडले आहेत. हिमालयातील सर्व यात्रा परत सुरू होण्यास दोन-तीन वर्षांचा काळ लागेल असे म्हणतात.

आम्ही हिमालयात जाण्याचे ठरविल्यानंतर चारच दिवसांनी

मुलीच्या आग्रहामुळे आम्ही केदारनाथ, बद्रिनाथ, गंगोत्री, यमुनोत्रीची यात्रा करण्याचे ठरवित आहोत तरी आम्हाला आशीर्वाद द्या ! असे विचारणाऱ्या सुनिलला श्रीस्वामीजींनी मुळीच जाऊ नकोस, असे का सांगितले होते ते माझ्या आता चांगलेच लक्षात आले.

**डॉ. मीनाक्षी अमृतकर**
औरंगाबाद

ॐ

# नेहा पडाळे

*परिचय – नेहा पडाळे हिने अद्याप श्रीस्वामीजींना पाहिलेले नाही. आश्रम पाहिलेला नाही. सौ. वनिता दीक्षित यांना पाहिलेले नाही व वनिता बुक्सच्या ऑफिसमध्येसुद्धा ती कधी गेलेली नाही. ती माझी जाऊ असल्याकारणाने मी तिला पोथ्या व पुस्तके पाठविली. पुस्तकांच्या व पोथ्यांच्या वाचनामुळे तिला खूपच दिव्य अनुभव आले. इतकेच नव्हे तर तिने ज्यांना ज्यांना पोथ्या व पुस्तके दिली त्यांचेही खूप चांगले झाले. त्यातील काही अनुभव* ***ईश्वरभक्तीचे अनुभव*** *या पुस्तकात दिलेले असून पुस्तकात चुकून तिचे नांव स्नेहा असे छापले गेले आहे. तिला रोजच दिव्य अनुभव येत असतात. त्यातील काही अनुभव तिने स्वतःच लिहून पोस्टाने वनिता बुक्सला पाठविले आहेत.*

***सौ. रुचिका पडाळे***

*ठाणे, मुंबई*

# नेहा पडाळे

**मी** नेहा पडाळे. माझ्यावर कुठलेही आध्यात्माचे किंवा धार्मिकतेचे फारसे संस्कार नव्हते. दररोज देवाला श्रद्धेने नमस्कार करणे एवढेच मी करत असे. देवावर माझा विश्वास होता, श्रद्धा होती. परंतु नित्यनियमाने वाचन असे काही केले नाही. मार्च २००३ मध्ये **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग-५** व **पोथ्या** मिळाल्या. तेव्हापासून मी दररोज वाचन सुरू केले व आजही दररोज पोथ्या वाचत असते व ध्यानही करते. पोथ्या वाचन व ध्यान सुरू केल्यानंतर माझ्या मनाला खूप शांती मिळाली. अनेक समस्यांचे निराकरण झाले. संकटातून सुटका झाली. अडचणी दूर झाल्या. ध्यान मार्गात प्रगती झाली व खूपच आध्यात्मिक अनुभव आले. त्यातील काही अनुभव खाली देत आहे.

मार्च २००३ मध्ये मुंबईला माझी जाऊ रुचिका पडाळेकडे गेले होते. तेथे मला पुस्तके व पोथ्या मिळाल्या. माझा नवरा मिलिटरीत नोकरीला असल्याकारणाने दर तीन वर्षांनी आमचे राहण्याचे ठिकाण बदलत असे. मी जेथे कोठे असेन तेथे रुचिका श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके कुरियरने पाठवत असे. पुस्तके वाचून मनाला आनंद होत असे. कुरियरने पुस्तके घरात आली की घरातील वातावरण बदलून जात असे. सर्वत्र आनंद पसरत असे. पोथ्यांच्या व पुस्तकांच्या वाचनाने माझी ध्यानमार्गात चांगली प्रगती झाली. मी अद्याप श्रीस्वामी दत्तावधूतांना पाहिलेले नाही. तसेच सौ. वनिता दीक्षितांनाही पाहिलेले नाही व वनिता बुक्सचे ऑफिसही पाहिलेले नाही. रुचिकाने फोन करून मला कळविले की काही नवीन अनुभव असतील तर तू ते स्वतः लिहून वनिता बुक्सच्या ऑफिसला पोस्टाने पाठवून दे म्हणून मी माझ्या असंख्य अनुभवांपैकी काही अनुभव लिहून वनिता बुक्सच्या

ऑफिसला पाठवित आहे.

एका मंगळवारी मला स्वप्न पडले, "मी हिरव्या रंगाची खूप सुंदर रेशमी साडी नेसले आहे, गळ्यात पांढऱ्या फुलांचा हार घातला आहे व मी आरशात स्वतःला पहात आहे!" जेव्हा हे स्वप्न पडले त्याच्या काही दिवस अगोदर "पुढे काय घडणार आहे?" हे मला पाच-दहा मिनिटे अगोदर कळत असे. काही दिवस हा प्रकार चालू होता. नंतर आपोआप बंद पडला.

एकदा स्वप्नामध्ये श्री स्वामी समर्थ घरी आलेले दिसले. ते खुर्चीवर बसले मी त्यांचे पाय दाबत होते. पूर्वी मला पोथ्या व पुस्तके वाचत असताना स्टार चमकल्यासारखा प्रकाश दिसायचा. आता त्या प्रकाशाचे प्रमाण वाढले असून तो केव्हाही व कोठेही दिसतो.

१२ जून २००७ मी संध्याकाळी सात वाजता दुर्गा स्तोत्राचे पाठ करत होते. तेव्हा मला अनाहतचक्राच्या जागी काही गोल गोल फिरत आहे असे जाणवले. त्याच दिवशी रात्री स्वप्न पडले. स्वप्नात गंगा नदी दिसली. नदीमध्ये सुंदर नक्षीकाम केलेली लाकडी नाव होती. त्या नावेतून मी पैलतीरावर चालले होते. अचानक मी नावेतून उडी मारली व पोहत पोहत किनाऱ्यावर येऊन उभी राहिले व बराच वेळ गंगेच्या पाण्याकडे पहात राहिले. गंगेचे पाणी स्फटिकासारखे स्वच्छ होते.

१५ जून २००७ रोजी मला स्वप्नामध्ये श्रीस्वामी समर्थांचे मंदिर व मूर्ती दिसली. मंदिराबाहेर एक ऋषी हवन करत बसलेले दिसले. त्यांनी मला जवळ बोलाविले व नामस्मरण करण्यास सांगितले.

१८ जुलै २००७ रोजी स्वप्न पडले की, सर्वत्र पाणी पाणी झाले आहे, महापूर आलेला आहे. घराघरात पाणी शिरले आहे. काही

लोक एका स्त्रिच्या पुतळ्याचे तुकडे करत आहेत व भगवान् श्रीकृष्ण सर्व पहात आहेत.

श्रीमहालक्ष्मीच्या मंत्राचा जप करत असताना हृदयामधून ॐकार ध्वनि ऐकू येत होता.

**ए**कदा श्री गुरुपौर्णिमेला माझ्या घरी अचानक पंधरा पाहुणे आले. घरात अन्न कमी होते पण त्या सर्वांना जेवण पुरले व खूप अन्न उरले.

**१** ऑक्टोबर २००७ सोमवारी पहाटे ३ वाजता स्वप्न पडले. श्रीस्वामीजी घरी आले, पोथ्यांचे वाचन कसे करावे ते सांगितले. ''घर स्वच्छ असावे, घरात कचरा धूळ असू नये '' असे ते म्हणाले. श्रीस्वामीजींना जेव्हा मी स्वप्नात पाहिले तेव्हा श्रीस्वामीजींचा फोटोही मी पाहिला नव्हता. त्यामुळे ते कसे दिसतात हे मला माहीत नव्हते. जेव्हा मला श्रीस्वामीजींचा फोटो मिळाला तेव्हा मला खूप आश्चर्य वाटले. फोटोतील श्रीस्वामीजी माझ्या स्वप्नात आले होते.

**ए**का रात्री स्वप्नात मला एक गोशाळा दिसली. भगवी कफनी घातलेले एक साधू तेथे बसलेले होते. ते मला म्हणाले, ''ध्यान धारणा करत रहा म्हणजे तुझी आध्यात्मात चांगली प्रगती होईल. चांगली प्रगती होण्यास अजून एक वर्ष लागेल.''

**दो**न-तीन वेळा स्वामीजी माझ्या स्वप्नात आले. जेव्हा प्रथम स्वप्नात आले तेव्हा मी त्यांचा फोटोही पाहिलेला नव्हता. २७ डिसेंबर २००८ ला ते पुन्हा माझ्या स्वप्नात आले. माझे घर पूर्ण फिरून बघितले. मला म्हणाले, ''प्रत्येक भक्ताकडे माझे पूर्ण लक्ष असते. त्याच्यातील गुण-दोषांकडेही माझे लक्ष असते. शुभमकडेही माझे पूर्ण लक्ष आहे, काळजी करू नकोस.''

**मी** दत्तस्तोत्र म्हणू लागले की, (मी अत्रिपुत्रो महातेजा या दत्त स्तोत्राचे पाठ करते) मनाने नृसिंहवाडीला जाते. तेथे कृष्णानदीचे स्नान करते, सूर्याला अर्घ्य देते. त्यावेळी मला सूर्योदयाच्या वेळेचा सूर्य दिसतो. मग मी मंदिराजवळ येते. औदुंबराला नमस्कार करते, प्रदक्षिणा करते त्यावेळी मला ओरिजनल पादुका दिसतात. एकदा मला ध्यानामध्ये पादुकांच्या मागे श्रीनृसिंह स्वामी सरस्वती बसलेले दिसले. त्यांनी मला एक केळं प्रसाद म्हणून दिले. ही मानस पूजा मी दररोज करते. या मानस पूजेमध्ये मी पादुकांवरती दुधाने अभिषेक करते. एकदा पादुकांवर दुधाने अभिषेक करत असताना गुडघ्यापर्यंत पाय दिसले व श्रीनृसिंह स्वामी सरस्वती यांच्या पायावर मी अभिषेक करू लागले. या घटनेनंतर मला दररोज श्रीनृसिंह स्वामी सरस्वतींचे गुडघ्यापर्यंत पाय दिसतात व त्यावर मी दररोज अभिषेक करते. या मानस पूजेने मला अगाध शांतीचा अनुभव येतो. आनंद मिळतो.

**श्री**दुर्गा स्तोत्राचे पाठ करताना मला पूर्ण दुर्गा स्तोत्र माझ्याभोवती फिरत असून मी व दुर्गा एकच आहे असे वाटते.

**चो**वीस तास, सतत मला खूप चमकणारे तारे दिसतात. हिऱ्याप्रमाणे चमकणाऱ्या या ताऱ्यांकडे माझे लक्ष केंद्रीत होते व त्याकडेच मी पहात असते.

**श्रीदत्त जय दत्त** असे नामस्मरण करत असताना मला ऑरेंज रंगाचा गोळा दिसतो. त्याच्या बाजूला निळ्या रंगाची चौकट दिसते.

**श्री**स्वामीजींचा फोटो समोर ठेवून साधना करत असताना श्रीस्वामीजींच्या मागे श्रीमहाअवतार बाबाजी व गौतम बुद्ध आपोआप दिसू लागतात.

**ए**कदा स्वप्नात श्रीस्वामीजी दिसले. ते नदी किनारी हिरवळीवर उभे होते. तेथून एक पायवाट टेकडीकडे जात होती. श्रीस्वामीजींनी त्या टेकडीकडे बोट दाखविले. मी पायवाटेने त्या टेकडीकडे गेले. तेथे गुहा होती. त्या गुहेमध्ये श्रीस्वामीजींचे आसन होते व बाजूला सर्व पोथ्या ठेवल्या होत्या. या सर्व पोथ्या श्रीस्वामीजींनीच लिहिलेल्या होत्या. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीस्वामी समर्थ सप्तशती, श्रीदत्तलीलामृत-श्रीसिद्धलीलामृत** इत्यादी. यावरून श्रीस्वामीजी नर्मदा किनारी कोठेतरी एका गुहेमध्ये साधना करत आहेत असे अनुमान मी बांधले. कारण दीड वर्षापूर्वीच मला ते नर्मदा किनारी गेल्याचे कळले.

**ए**कदा मला स्वप्नामध्ये एक योगी दिसले. ते पद्मासन घालून बसले होते. काही बोलले नाहीत. पद्मासनाकडे बोट दाखविले.

**ए**कदा ध्यान करत असताना मी, श्रीस्वामीजी माझ्यासमोर हिरवळीवर बसले आहेत व ते माझ्याकडे बघून हसत आहेत असे दिसले. या दृश्याचा अनुभव एवढा जिवंत होता की, याला मी ध्यानाचा अनुभव म्हणणे योग्य नाही. कारण माझे डोळे पूर्ण उघडे होते व हा सर्व प्रकार मी उघड्या डोळ्यांनी पहात होते. हा अनुभव 3D (थ्रिडी) होता.

माझ्या असंख्य अनुभवांपैकी फक्त काही अनुभव मी दिले आहेत. या शिवाय ज्यांना ज्यांना मी श्रीस्वामीजींच्या पोथ्या अथवा पुस्तके वाचण्यास दिली त्या सर्वांनाही अतिशय दिव्य अनुभव आले आहेत. त्यांच्या जीवनात शांती व आनंद निर्माण झाला आहे. अशा प्रकारे आनंद, शांती, इच्छापूर्ती व दैवी अनुभवाच्या आनंदाचे जीवन जगत असताना एक हलकासा प्रश्न मनात येतो,

मी अद्याप (२०१४) श्रीस्वामीजींना पाहिलेले नाही,

श्रीस्वामीजींच्या कुठल्याही भक्ताला मी ओळखत नाही. असे असताना फक्त श्रीस्वामीजींची पुस्तके व पोथ्या वाचून जीवनामध्ये सफलतेचा व आनंदाचा अनुभव कसा येतो? आणि असे माझ्यासारखे लाखो लोक आहेत जे पोथ्या व पुस्तके वाचतात व त्यांना दिव्य अनुभव येतात पण त्यांनी सुद्धा श्रीस्वामीजींना पाहिलेले नाही किंवा श्रीस्वामीजींच्या कुठल्याही भक्ताला ते ओळखत नाहीत, हे सर्व कसे घडते मला कळत नाही.

**सौ. नेहा पडाळे**

कोल्हापूर

# समाप्त